# संतश्रेष्ठ कान्हुराज महाराज साहित्य



## संत सात्यिात महाराजांचे विषयी असलेले संदर्भ व महाराजांच्या साहित्याचा अनुवाद यांचे संकलन

प्रथमावृत्ती:- २००० प्रती. वैशाख वद्य १३ दिनांक

द्वितीयावृत्ती:- ५००० प्रती. मार्गशिर्ष वद्य १३ दिनांक

प्रकाशक:- श्रीसंत कान्हुराज महाराज भक्त मंडळ, केंदूर. तालुका-शिरुर, जिल्हा-पुणे.
आनंदाश्रम प्रकाशन, आळंदी देवाची. तालुका-खेड, जिल्हा-पुणे.

मुद्रक:-

किंमत:- सदुपयोग

# अनुक्रमणिका


| | |
|---|---|
| **१)कान्होपाठक साहित्य-** | **१ते३०** |
| (अ)महाराजांचे सकलसंत गाथ्यांत असणारे अभंग- | १ |
| (ब)महाराजांच्या अभंगांचा भावार्थ- | २ |
| (क)तत्वांश प्राकृत गीता अर्थात् गीतासार- | ९ |
| (ड)तत्वांश प्राकृत गीता मराठी अनुवाद- | १७ |
| **२)संतसाहित्यात आलेले संदर्भ-** | **३१ते३७** |
| (अ)संत एकनाथ महाराज- | ३१ |
| (ब)संत तुकाराम महाराज- | ३२ |
| (क)संत निळोबा महाराज- | ३२ |
| (ड) संत महिपती महाराज- | ३३ |
| **३) संत साहित्याचे अभ्यासकांच्या साहित्यातील संदर्भ-** | **३८ते४५** |
| (अ)डॉ.सौ सीता कुलकर्णी तथा के. विनया- | ३८ |
| (ब)निवृत्ती महाराज वक्ते- | ४४ |
| (क)राजाभाऊ राजपाठक- | ४५ |
| **४)कीर्तन विभाग-** | **३६ते१३५** |
| (१)ह.भ.प.गु.डॉ. नारायण महाराज जाधव(प्रवचन)- | ४६ |
| (२)ह.भ.प. नरहरि महाराज सांगळे- | ५८ |
| (३)ह.भ.प. कृष्णा महाराज गुट्टे- | ७८ |
| (४)ह.भ.प.गु.डॉ. नारायण महाराज जाधव- | ९० |
| (५)ह.भ.प. नरहरि महाराज सांगळे- | १०८ |
| (६)ह.भ.प. माऊली महाराज कुऱ्हाडे- | १२१ |
| (७)ह.भ.प.गु.गाथामूर्ति रामभाऊ महाराज राऊत- | १३५ |


## संकलकांचे मनोगत

'संतश्रेष्ठ कान्हुराज महाराज साहित्य आणि संत साहित्यांत त्यांचे विषयी आलेले संदर्भ' या संकलन पुस्तिकेची प्रथमावृत्ती इ.स. २०१३ प्रसिद्ध झाल्यानंतर बऱ्याच वाचकांकडून अशी सुचना करण्यात आली की, महाराजांचे वाङ्मय हे अत्यल्प असले तरी ते साररूप आणि गंभीर असे आहे. महाराज म्हणतात- **हे वेदशास्त्रांचे सार । उपनिषदांचे गौरव । साकारी निराकार । सगुण निर्गुण निवडिले ।।१।।** हे वाङ्मय वेद आणि उपनिषदांचे मंथन करून सर्व सामान्य लोकांसाठी **बुडते हे जन न देखवे डोळा । येतो कळवळा म्हणोनिया ।।तु.म.।।** या तळमळीतून तयार झालेले आहे. परंतु ते ७५० वर्षापूर्वीचे असल्याने बरेच दुर्बोध आहे. त्यासाठी त्याचा भावार्थ किंवा अनुवाद सध्याच्या सुलभ मराठी भाषेत करून तो प्रसिद्ध केल्यास ते सर्वसामान्य वाचकांस अधिक उपयुक्त होईल. वाचकांची ही भावना विचारांत घेऊन संत वाङ्मयाचे गाढे अभ्यासक असणाऱ्या गाथामूर्ति गुरुवर्य रामभाऊ महाराज राऊत, गुरुवर्य डॉ. नारायण महाराज जाधव, कृष्णा महाराज गुट्टे, नरहरी महाराज सांगळे, माऊली महाराज कुऱ्हाडे, निकमबाबा कैलास महाराज येवले आणि इतरही अनेकांनी महाराजांच्या वाङ्मयाचे चिंतन करून त्याचा सोप्या भाषेत अनुवाद करण्याचा प्रयत्न केलेला आहे. अशा तऱ्हेने **'संतश्रेष्ठ कान्हुराज महाराज साहित्य आणि संत साहित्यांत त्यांचे विषयी असलेले संदर्भ'** या पुस्तिकेची ही सोपी आणि सुगम केलेली द्वितीय आवृत्ती प्रसिद्ध करून ती आपल्या हाती देताना कान्हुराज महाराज भक्त मंडळाला अत्यंत आनंद होत आहे.

महाराजांचे वाङ्मय हे स्वाध्याय स्वरूप असल्याने एखादा ते समजावून घेऊन जर ते अनुष्ठानांत आणील तर त्याचे ऐहिक जीवन तर सुखी होईलच परंतु त्याला आत्मज्ञान होऊन तो मुक्तही होईल. **मेरूमांदाराचेनि तुके जे केली असतील महापातके । हरतील निमिषे एके । आत्मज्ञान झालिया ।।** हा महाराजांचा स्वानुभव आहे. म्हणून प्रत्येक मुमुक्षुने महाराजांचे हे वाङ्मय अभ्यासून त्याप्रमाणे आचरण करावे अशी मंडळाची तळमळ आहे. त्यासाठी सदर आवृत्तीच्या ५००० प्रती छापून त्या केंदूर आणि केंदूर पंचक्रोशीतील प्रत्येक घरी विनामुल्य वितरित करण्याचा मंडळाचा मानस आहे.

संतश्रेष्ठ श्रीकान्हुराज महाराज भक्त मंडळ, केंदूर

**१. गाये तो गाणुं नाचे तो नाचणु । परिसे तो जाणु भेदवादी ।।१।।**
**नव्हे तो संतु योगी ना भक्तु । जो लोकांतु डंव करी ।।धृ।।**
**पढे तो पढता उपलवी भक्ता । कवित्व करितां ख्याती लागीं ।।३।।**
**पाठक कान्हो म्हणे वरदळ लटिकें । जंव जीव सात्त्विकें विनटेना ।।४।।**

**२. कान्हो जन्मूनिया उत्तम कुळीं । केली संसाराची होळी ।।१।।**
**पैका जमूनिया फार । पोशी दारा आणि कुमर ।।२।।**
**सदा निंदी साधुसंता । नेणे धर्म कर्म व्रता ।।३।।**
**कान्हो पाठक कथितो नर। अंती भोगी नरक घोर ।।४।।**

**३. जरी तुज देवाची चाड । तरी न करीं बडबड । बहुत बोलतां वाड । पडसी पतनीं ।।१।।**
**जरी तुज देवाची बाधा । तरी न करी वेवादा । वाद करितां निंदा । घडती दोष ।।२।।**
**जरी तुज देवाचा छंद । तरी सांडी कामक्रोध । तेणे परमानंद । होउनी ठासी ।।३।।**
**जरी तुज देवचि व्हावा । तरी मौन धरी पा जिव्हा । जेणें तूं अनुभवा । पावसील ।।४।।**
**जरी तुज देवाचा सांगात । होतां अखंडित । तरी बैस पा निवांत । साधुसंगीं ।।५।।**
**जरी तुज देवाचा विश्वास । तरी हृदयीं धरी नागेश । म्हणे कान्हो पाठक । अरे जना ।।६।।**

**४. जेथें जेथें मन जाय । तेथें नागनाथ आहे ।।१।।**
**म्हणवोनि पाहे । मन गुंतलें नागेश पाये ।।२।।**
**सुखसोहळा भोगियले । भोग भोगणें नागेश जेणें ।।३।।**
**कान्हो पाठक आनंदला । सद्गुरु नागेश भेटला ।।४।।**

**५. पेंधा म्हणे हृषीकेशी । आरुष बोबडें हें परियेसीं ।।१।।**
**या रे नाचों अवघे जन । गावों हरिनाम कीर्तन ।।२।।**
**कान्हो पाठक बागडा । प्रेमे नाचे वैष्णवां पुढां ।।३।।**

**६. वेद गणितां मर्यादला । तरि तूं अगाध बा विठ्ठला ।।१।।**
**येवढें माप कैचें थोर । ज्याणें उमाणे तुमचा पार ।।धृ।।**
**शेष वर्णितां श्रमला । जिव्हा दुखंड होउनि ठेला ।।३।।**
**म्हणौनि कान्हो पाठक उगा । मौनें मवी पांडुरंगा ।।४।।**





**नमामि सद्गुरुं शांन्तं सच्चिदानंद विग्रहम् ।**
**पूर्णब्रह्म परानंदमीशमालन्दिवल्लभम् ।।**

### अभंग क्र.१.

**गाये तो गाणुं नाचे तो नाचणु । परिसे तो जाणु भेदवादी ।।१।।**
**नव्हे तो संतु योगी ना भक्तु । जो लोकांतु डंव करी ।।धृ।।**
**पढे तो पढता उपलवी भक्ता । कवित्व करितां ख्याती लागीं ।।३।।**
**पाठक कान्हो म्हणे वरदळ लटिकें । जंव जीव सात्त्विकें विनटेना ।।४।।**

श्रीमंत श्री कानहोबा महाराज या अभंगातून संतांचे लक्षण व्यावृत्तीपूर्वक सांगतात. संतांच्या बाबतीत समाजात फारच मोठा गैरसमज आहे. संतांविषयी अपार श्रद्धा मनामध्यें असल्यामुळे वास्तव संतांच्या देशात, वेषात, कृतीत असणाऱ्या कोणालाही संत मानले जाते. सर्व सामान्यांपेक्षा कांही वेगळेपण असले (गोधडी पांघरणें, उघडे अथवा गुहेत राहणे, मौन धरणे इ.) की त्यांना संत मानले जाते. वास्तविक संतत्व हा बाहेरून दिसणारा घटक नाही, तो अनुभवात्मक घटक असल्यामुळे संत ओळखण्याकरिता स्वतः संत असावे लागते. **"तुका म्हणे अंगे व्हावे ते आपण । तरीच महिमान येईल कळो ।।"** महाराज स्वतः संत असल्यामुळे सामान्य श्रद्धावान समाज ज्यांना संत मानतो, त्याला ते संत कसे मानतील? म्हणून संत आणि असंत यांची निवड करून संत कोण आहे आणि संत कोण नाही याचे स्पष्टीकरण महाराज या अभंगातून करतात.

**गाये तो गाणुं नाचे तो नाचणु । परिसे तो जाणु भेदवादी ।।१।।**

कोणी एखादा सुंदर गात असेल, त्याला नैसर्गीक रित्या ताल, सूर, लय, गायनातील राग रागीणीचे ज्ञान आणि आवाजात गोडवा हे गुण असतील तर तो माणासालाच काय पण पशूलाही गायनाने मोहित करू शकतो. म्हणून तो संत होतो असे मात्र नाही. तर तो गायक आहे, संत नाही, तसेच नृत्याची कला प्राप्त असणारा, हाव-भाव, कटाक्ष या द्वारा लोकांना रंजवणारा हा नाचा असतो, संत नाही.

**नव्हे तो संतु योगी ना भक्तु । जो लोकांतु डंव करी ।।धृ।।**

खुप श्रवण करणारा हा बहुश्रुत आहे. तो भेदाला वास्तव मानणारा असल्यामुळे तो सिद्ध, संत, योगी अथवा भक्त नाही, तर तो लोकांमध्ये दंभ करणारा आहे, तोही संत नाही.

**पढे तो पढता उपलवी भक्ता । कवित्व करितां ख्याती लागीं ।।३।।**

शास्त्राभ्यास करणारा विद्वान असेल, तो लोकांना शास्त्र समाजावून सांगणारा पंडीत

होईल, काव्य करणारा कवी होईल. तो स्वताःच्या प्रसिद्धीकरीता काव्य करीत असेल, परंतु तो संत नाही.

**पाठक कान्हो म्हणे वरदळ लटिकें । जंव जीव सात्त्विकें विनटेना ।।४।।**

ही सर्वच संतांची वरवरची, बाह्य लक्षणे धारण करणारे लबाड, धोकेबाज आणि ढोंगी आहेत. त्यांना संत समजून त्यांचे अनुकरण कोणीही करू नये. **तुका म्हणे नाही निरसला देह । तोंवरी अवघे संसारिक ।।** संतत्व तेव्हां प्राप्त होते, जेव्हां जीव, जीवपणाचा बळी देऊन परमात्म रूपाशी पूर्णतः ऐक्य पावतो, अर्थात् स्वतः परब्रह्मस्वरूप होतो. माऊली महावैष्णव ज्ञानेश्वर महाराज म्हणतात-**''ते चालते ज्ञानाचे बींब । तयाचे अवयव ते सुखाचे कोंब । येर मानुसपण ते भांब । लौकिक भागु ।।''** तर वैराग्य राजरसिक जगद्गुरु तुकोबाराय म्हणतात-**''तुका म्हणे मिळे जिवाचिये साठी । नाहीतरी गोष्टी बोलू नये''।।** त्यासाठी अंतःकरणांतील सत्वगुण वाढवून त्याद्वारे रजोगुण आणि तमोगुण यांना बाहेर काढून आणि आत्मज्ञानानें आपण गुणातीत होऊन स्वस्वरूपाशी जो एकरूप होतो तो संत आहे. असे कान्हुराज महाराज म्हणतात.

## अभंग क्र.२.

**कान्हो जन्मूनिया उत्तम कुळीं । केली संसाराची होळी ।।१।।**
**पैका जमूनिया फार । पोशी दारा आणि कुमर ।।२।।**
**सदा निंदी साधूसंता । नेणे धर्म कर्म व्रता ।।३।।**
**कान्हो पाठक कथितो नर। अंती भोगी नरक घोर ।।४।।**

मानवदेह मिळूनही जे त्याचा उपयोग करून घेत नाहीत, त्यांची निर्भत्सना महाराज या अभंगात करतात.

**कान्हो जन्मूनिया उत्तम कुळीं । केली संसाराची होळी ।।१।।**
**पैका जमूनिया फार । पोशी दारा आणि कुमर ।।२।।**

ज्यांना नरदेह मिळाला ते भाग्यवान आहेत, असे अनेक संतांनी शास्त्रांनी म्हटले आहे. **''बडेभाग मानव तनु पावा ।** अथवा **भाग्ये आलेती मनुष्य देहा ।।** अथवा **भरतखंडी नरदेह प्राप्ती । हे परम भाग्याची संपत्ती ।।''** कारण हा देह दुर्लभ आहे. **''नरदेह दुर्लभ जाणा ।''** यामध्ये अलौकिक सामर्थ्य आहे. या देहाने जीवत्वाचा नाश करून, देवत्वाची प्राप्ती करून घेता येते. **''नरदेह निधान लागले हाती । उत्तम सार उत्तम गती । देवची होईन म्हणती ते होती । तरी का चित्ती न धरावे ।।''** अशी सुवर्णसंधी प्राप्त होऊनही म्हणजे उत्तम कुळात जन्म मिळूनही कान्होबा महाराज सांगतात- त्यांनी आपल्या नरदेहरुपी संसाराची होळी अर्थात्



वाटोळे केले. कसे? तर ज्या देहाने परमार्थाची साधना करून दुःख, अज्ञान, मृत्यु यावर विजय मिळविण्याचे सोडून पैसा मिळविण्यात आणि बायका-मुले यांचे पोषण करण्यात व्यर्थ घालविला.

**सदा निंदी साधूसंता । नेणे धर्म कर्म व्रता ।।३।।**

आपण कर्तव्य करावे ती देवाची सेवा आहे पण त्यात अहंकार वा अभिलाषा नसावी. **''तस्मादसक्त सततं कार्य कर्म समाचर ।''** असे भगवंतांनी सांगितले आहे. ते सोडून देऊन हा असे आचरण करतो, एवढेच नाही तर सतत आत्म कल्याणाच्या साधनाचे अनुष्ठान करून लोकांना त्यामध्ये प्रवृत्त करणारे जे महात्मे आहेत त्यांच्या विषयी- सतत त्यांची निंदा करतो. निंदा हा पापाचा कारखाना आहे. **''येती निंदकापाशी अशेषही पापे''** अथवा **''निंदा दुरीते व्याली''**असे ज्ञानोबारायांनी म्हटले आहे. त्यात पुन्हा संतांची निंदा हे तर घोर पाप आहे. ज्याला विना थांबा गाडीने नरकाला जाण्याची इच्छा आहे त्यांच्याकरीता हा मार्ग आहे. **''आणीक एक कोड । नरका जाण्याची चाड । तरी संत निंदा गोड । करी कवतुके सदा ।।''** असे जे करू नये ते करतो आणि जे करणे आवश्यक आहे, धर्माचरण, व्रताचरण, सत्कर्माचरण हे कांहीच करणे जाणत नाही. अर्थात् त्याचा परिणाम त्याला भोगावा लागतो. तो परिणाम काय आहे ते महाराज शेवटच्या चरणांत सांगतात.

**कान्हो पाठक कथितो नर । अंती भोगी नरक घोर ।।४।।**

मनुष्य शेवटी घोर अशा नरकाचे दुःख भोगतो. सुखदुःखाचे कारण मानव जन्मातील कर्मच आहे. हा सिद्धांत अनेक ठिकाणी सांगितलेला आहे. **''केले कर्म झाले । तेचि भोगा आले ।। तुका म्हणे येथे झाकतील डोळे । भोग देता वेळे येईल कळो''** ।।१।। अथवा **''विषयाचे सुख येथे वाटे गोड । पुढे अवघड यमदंड ।''** म्हणून असे कोणीही करू नये हे तात्पर्य.

## अभंग क्र.३.

**जरी तुज देवाची चाड । तरी न करीं बडबड ।**
**बहुत बोलतां वाड । पडसी पतनीं ।।१।।**
**जरी तुज देवाची बाधा । तरी न करी वेवादा ।**
**वाद करितां निंदा । घडती दोष ।।२।।**
**जरी तुज देवाचा छंद । तरी सांडी कामक्रोध ।**
**तेणे परमानंद । होउनी ठासी ।।३।।**
**जरी तुज देवचि व्हावा । तरी मौन धरी पा जिव्हा ।**
**जेणें तूं अनुभवा । पावसील ।।४।।**

**जरी तुज देवाचा सांगात । होतां अखंडित ।**
**तरी बैस पा निवांत । साधुसंगीं ।।५।।**
**जरी तुज देवाचा विश्वास । तरी हृदयीं धरी नागेश ।**
**म्हणे कान्हो पाठक । अरे जना ।।६।।**

हा अभंग केवळ साधकांकरीता आहे. साधन म्हणजे ज्याने या जीवनांत दुःखावर विजय मिळविण्याचा निश्चय करून त्याकरीता संताचे मार्गदर्शन घेण्याचे ठरविले आहे त्यांना महाराज सांगतात-

**जरी तुज देवाची चाड । तरी न करीं बडबड ।**
**बहुत बोलतां बाड । पडसी पतनीं ।।१।।**

तुला जर खरोखर भगवत्प्राप्तीची इच्छा असेल तर त्याचेच चिंतन कर, दुसरे कांही बडबडू नकोस **''नको बोलो फार बैसो जनामधी । सावधान बुद्धी इन्द्रिय दमी ।''** **'' युक्त आहार विहार । नेम इन्द्रियांसी सार । नसावी बासर । निद्रा बहु भाषण ।। बहु बोलणे ते सारा ।''** जगद्गुरु तुकाराम महाराजांनी साधकांना अती बडबड करू नये असेच अनेक ठिकाणी सांगितलेले आहे. विनाकारण बोलण्याचे अनेक तोटे होतात- १)आयुष्य व्यर्थ जाते- **''मोलाचे आयुष्य जाते वायाविण ।''** २)खोटे बोलले जाते. ३)निंदा होण्याची शक्यता असते. ४)चित्त विक्षिप्त होते. म्हणून विनाकारण फार बोलू नये. जगद्गुरु तुकाराम महाराज म्हणतात-भगवत्प्राप्तीची इच्छा असेल तर वादविवाद करू नकोस. **''तार्किकांचा टाका संग । पांडुरंग स्मरा हो ।।''** त्यामध्ये दोष घडण्याची शक्यता असते.

**जरी तुज देवाची बाधा । तरी न करी वेवादा ।**
**वाद करितां निंदा । घडती दोष ।।२।।**
**जरी तुज देवाचा छंद । तरी सांडी कामक्रोध ।**
**तेणे परमानंद । होउनी ठासी ।।३।।**

तिसऱ्या चरणांत कान्होबा महाराज सांगतात की, जर तुला देवाच्या प्राप्तीचा छंद लागला आहे तर तू काम क्रोधांचा त्याग कर. काम क्रोध हे आनंदाच्या प्राप्तीतील महान प्रतिबंधक आहेत. **''काम एष क्रोध एष रजोगुणसमुद्भवः । महाशनो महापाप्मा विद्ध्येनमिह वैरिणम् ।।३।।३७।।''** **''विहाय कामान्यः सर्वान्पुमांश्चरति निःस्पृहः । निर्ममो निरहङ्कारः स शान्तिमधिगच्छति ।।२।।७१।।''** त्यातून जो साधक मुक्त होतो तो आनंदाच्या साम्राज्यावर अभिषिक्त होऊन राज्य करतो. **''हे अंतरीहूनी जरी फिटले । तरी निभ्रांत जाण निवटले । जैसे रश्मीवीण उरलें । मृगजळ नाहीं ।। तैसे राग द्वेष जरी निमाले । तरी ब्रह्मींचें स्वराज्य आलें । मग तो भोगी सुख आपुलें । आपणचि ।।३।।७०,७१।।''**

**जरी तुज देवचि व्हावा । तरी मौन धरी पा जिव्हा ।**



**जेणें तूं अनुभवा । पावसील ।।४।।**

तेव्हां जर खरोखर तुला देव मिळावा असे वाटत असेल तर मौन धारण करून भगवद्चिंतन कर त्या अभ्यासानें अनन्यता प्राप्त होऊन तुला भगवत्स्वरूपाचा अनुभव येईल.

**जरी तुज देवाचा सांगात । होतां अखंडित ।**
**तरी बैस पा निवांत । साधुसंगीं ।।५।।**

जर तुला देवाच्या अखंड संगतीची इच्छा असेल तर सत्संगामध्यें स्थिर चित्त करून बैस.

**जरी तुज देवाचा विश्वास । तरी हृदयीं धरी नागेश ।**
**म्हणे कान्हो पाठक । अरे जना ।।६।।**

सत्संग हा भगवत्संगच आहे. त्यामुळे देवाविषयीचा विश्वास दृढ होईल. त्या विश्वासानें तूं अंतरंगातील नागेशाला (देवाला) धर. म्हणजे तुझी पारमार्थीक साधना पूर्ण होईल.

**अभंग क्र.४.**

**जेथें जेथें मन जाय । तेथें नागनाथ आहे ।।१।।**
**म्हणवोनि पाहे । मन गुंतलें नागेश पाये ।।२।।**
**सुखसोहळा भोगियले । भोग भोगणें नागेश जेणें ।।३।।**
**कान्हो पाठक आनंदला । सद्गुरु नागेश भेटला ।।४।।**

कान्हुराज महाराज या अभंगातून आपली अनुभूती सांगतात. परमार्थाचा नकाशा उभा करतात.

**जेथें जेथें मन जाय । तेथें नागनाथ आहे ।।१।।**

मी चिंतन करीत असता या साधनाचा आश्रय केला असता मन ज्या ज्या विषयाचे चिंतन करेल तो तो विषयच परमात्मा रुपाने नागेश आहे. **''यो मां पश्यति सर्वत्र सर्वं च मयि पश्यति । तस्याहं न प्रणश्यामि स च मे न प्रणश्यति ।।६।।३०।।''**

**म्हणवोनि पाहे । मन गुंतलें नागेश पाये ।।२।।**

हा अभ्यास अर्थात् सर्व जगत परमात्म स्वरूप आहे, कोणत्याही विषयाचे ध्यान, चिंतन, मन करू लागले तरी त्या विषयाच्या रूपाने देवच आहे म्हणून ते ही देवाचे चिंतनच आहे. आता मनाला देवाच्या स्वरूपाशिवाय दुसरे कांहीच प्रतीतीला येत नसल्यामुळे सहजच अव्यभिचारी भक्ती घडु लागली.

**सुखसोहळा भोगियले । भोग भोगणें नागेश जेणें ।।३।।**
**कान्हो पाठक आनंदला । सद्गुरु नागेश भेटला ।।४।।**

अशी अवस्था झाल्यानंतर सर्व त्रैलोक्यच आनंदरूप आहे असा अनुभव आल्यामुळे तो आनंद सोहळा कांही काळ भोगून नंतर ते द्वैतही नाहीसे झाले. अर्थात् सर्व परमात्मा आहे, मी ही परमात्मा आहे. जीव-देव-जगत ही भेदभ्रांती निवृत्त होऊन सर्वत्र अभेद प्रतीती, सद्गुरु

नागेशनाथांच्यामुळे प्राप्त झाली असे कान्हुराज महाराज सांगतात.

**अभंग क्र.५.**

**पेंधा म्हणे हृषीकेशी । आरुष बोबडें हें परियेसीं ।।१।।**
**या रे नाचों अवघे जन । गावों हरिनाम कीर्तन ।।२।।**
**कान्हो पाठक बागडा । नाचे वैष्णवां पुढां ।।३।।**

हा अभंग बाळक्रीडेतील आहे. या अभंगात पेंद्या आणि कृष्णाचा संवाद महाराज सांगतात- गोपाळांचे कृष्णावर खूप प्रेम आहे. **''तुझी आण वाहीन गा देवराया । बहु आवडसी जीवा पासोनिया ।।''** गोपाळांचे जीवनच कृष्ण बनला होता. ते त्याचे अखंड ध्यान, चिंतन करीत होते. **''करीती नामाचें चिंतन । गडी कान्होंबाचे ध्यान ।।''** कृष्णालाही गोपाळ फार आवडायचे, तोही त्यांच्या शिवाय राहू शकत नव्हता. **''तुमची मज लागली सवे । ठायींचें नवे नव्हों गडी ।।''** अशा प्रेमळ देवाचे वर्णन करावे असे पेंद्याला वाटले म्हणून तो कृष्णाला म्हणतो **पेंद्या म्हणे हृषीकेशी । आरुष बोबडें हें परियेसीं ।।१।।** हे इंन्द्रिय नियंत्या श्रीकृष्णा माझे आरुष अशुद्ध आणि बोबडे असे शब्द तूं ऐक. म्हणून पेंद्यानें श्रीकृष्णाचे स्तवन केलेले आहे. प्रेमाने केलेली स्तुती देवाला फार आवडते. स्तवन झाल्यानंतर पेंद्या म्हणतो **या रे नाचों अवघे जन । गावों हरिनाम कीर्तन ।।२।।** आपण सगळे नाचू आणि हरिनाम कीर्तन गाऊ. सगळेच गोपाळ गातात आणि नाचतात. देवही त्यांच्या बरोबर देहभान विसरून नाचू लागलेला आहे. ज्यांत देव आहे तो आनंद कांही औरच असतो. कान्होबा महाराज त्यामध्यें आहेत तेही उड्या मारतात आणि बागडतात. **कान्हो पाठक बागडा । नाचे वैष्णवां पुढां ।।३।।**

**अभंग क्र.६.**

**वेद गणितां मर्यादला । तरि तूं अगाध बा विठ्ठला ।।१।।**
**येवढें माप कैचें थोर । ज्याणें उमाणे तुमचा पार ।।धृ।।**
**शेष वर्णितां श्रमला । जिव्हा दुखंड होउनि ठेला ।।३।।**
**म्हणौनि कान्हो पाठक उगा । मौनें मवी पांडुरंगा ।।४।।**

या अभंगात कान्हुराज महाराज आपण वर्णन न करता शांत का राहिलो ते सांगतात-भगवंताचे स्वरूप अगाध आहे. म्हणूनच त्याचे अनंत हे नांव आहे आणि ते अत्यंत सार्थ असेच आहे. त्याच्या स्वरूपाचा देशाने अन्त होत नाही, कालाने अन्त होत नाही व वस्तुनेही अन्त होत नाही. **''न व्यापित्वात्देशतोन्तोनित्यत्वान्तापि कालतः । न वस्तुतोऽपि सार्वत्म्यादानंत्य ब्राह्मणि त्रिधा ।।''** असे त्याचे वर्णन आहे. स्वरूप अगणित, अपार आहे. सर्वसामान्यांच्या आवाक्यात तो येत नाही असे महाराज प्रथम चरणांत सांगतात. **वेद गणितां मर्यादला । तरि तूं अगाध बा विठ्ठला ।।१।।** एवढा मोठा वेद. **''वेद काय काय न बोले ।''** पण तोही कुंठीत



झाला, मर्यादीत झाला. आता तुला कव घालील असे जगांत कोणते माप मोठे आहे? **''एवढे माप कैचे थोर ।''** देवा तुझे गुणही अनन्त आहेत. त्याचे वर्णन करताना एक हजार तोंडांचा शेष थकला आणि त्याच्या जिभा चिरल्या. **शेष वर्णितां श्रमला । जिव्हा दुखंड होउनि ठेला ।।२।। ''जिव्हा चिरुनी पलंग झाला । शेष शिणला । झाल्या सहस्र जिभा जिभा ।।''** जेथे वेद, शेष, महेश, गणेश, हेही कमी पडतात. **मायावाचातीत तुझे हे स्वरूप । म्हणोनिया माप भक्ती केले ।। भक्तिचिया मापे मोजितो अनंता । इतराने तत्त्वता न मोजवे ।। तु.म.।।** कान्हुराज महाराज म्हणतात मी आता मौनानेच तुझे मोजमाप करतो.

श्री विठ्ठल

वै. ह. भ. प. श्रीविठ्ठल यशवंत राजपाठक यांनी संकलित केलेली
आणि श्रीकांत विठ्ठल राजपाठक यांनी प्रकाशीत केलेली
श्री कान्हुराज महाराज विरचित
तत्त्वांश प्राकृत गीता तथा गीतासार

**श्री कान्होपाठक महाराज ध्यान**

शांतं ब्रह्मपरं जलधितकरं श्रीशंभूतेजोद्भवम् ।
कान्होपाठकं सर्वज्ञं तं द्विजवरं ध्यायेदहम् सर्वदा ।।
स्वर्गंगानयनाप्तकीर्तिमनसस्तलं नद्यासरे ।
श्रीबोधीद्रूमरूपीणं च शशिनोप्तप्तीर मायांकृता ।।१।।

**।। श्रीगणेशाय नमः ।।**

**।। हरिः ॐ ।।**

कृष्णं कमलपत्राक्षं । पुण्यश्रवणकीर्तनम् ।।
वासुदेवं जगद्योनीं । नौमि नारायणं हरिम् ।।१।।
सप्तशत तत्त्वपदार्था । पदभावना, भावटीका ।।
ज्ञानदेवी आत्मज्ञानार्था । प्रकृत पद वक्ता ।।२।।

आल्हादयुक्त कान्होपाठक

## अध्याय १ ला

ॐ नमो जी भगवंता । पुराणपुरुषा अव्यक्ता ।
परियेसा भगवद्गीता । महापातके हरतील ।।१।।
धृतराष्ट्रे प्रश्न केला । तव संजयो अनुवादिला ।
कौरवभार देखिला । मग काय बोलिला अर्जुन ।।२।।
हे सकळही गोत्र बंधू । यांचा करू नये वधू ।
धर्मद्रोही महाबाधू । येणे राज्यचाड नाही ।।३।।
मोह पडला पांडवा । धनुष्य ठेविले गांडीवा ।
म्हणे अपराध माधवा । घडत घडत मज चुकला ।।४।।
इति प्रथमोध्यायः समाप्तः ।



## अध्याय २ रा

तयाचे ऐकून बोलणे । मग काय म्हणितले नारायणें ।
मारिजे मरिजे कवणे । आत्मस्वरूप अविनाश ।।१।।
सांडी सांडी देहवासना । न धरी विषयाची कल्पना ।
निवारेल भवबंधना । कृष्ण म्हणे रे अर्जुना ।।२।।
न तुटे न बुडे न जळे । येता जाता कवणाही न कळे ।
इच्छे आपुलिया खेळे । ये वैष्णवीचेनि संगे ।।३।।
मी मारितो ऐसे न म्हण । अनादि सिद्ध ते कारण ।
मनसंकल्प क्रिया जाण । फळ उद्देश न धरी गा ।।४।।
न करी सुखदुःखाचा विचारू । अभंग भंगेना निर्धारू ।
ज्ञान दृष्टी पाहे विचारू । नाही पाप युद्धाचे ।।५।।
इति द्वितीयोध्यायः समाप्तः ।

## अध्याय ३ रा

पंचभूतांचा एकवटा । ते हे शरीर गा सुभटा ।
कर्म करिते जे जया निष्ठा । तैसीच फळे गा पावती ।।१।।
यज्ञ करिती मन कामना । जे जे रूचे जया वासना ।
ती पावती निज भावना । हे विपरीत ऐक पां ।।२।।
अनाश्रयें कर्मे करिती । कर्म-कर्ते, ते नव्हेती ।
नाही कर्माची फळप्राप्ती । ये कल्पने वाचोनिया ।।३।।
सत्त्व रज तम त्रयोगुणी । प्रकृति अज्ञान गवसणी ।
ज्ञान लोपलें द्वैत घणी । कर्म इंद्रियाचेनि संगे ।।४।।
इति तृतीयोध्यायः समाप्तः ।

## अध्याय ४ था

चक्रपाणी म्हणे वीरा । मज तुज संख्या नाही अवतारा ।
अमित्य केल्या येरझारा । अझुनि नाही निमणे ।।१।।
माझे ऐसिची अवतरणे । धर्म रक्षावया कारणे ।
साधुसंता प्रतिपाळणे । दुष्टा दुःख द्यावया ।।२।।
सहज देहीं निपजत । ते ब्रह्मार्पण करीत ।

आपुले म्हणूनि नाही ठेवित । यातायातिचेनि भेदे ।।३।।
त्याचे सर्वस्व जेतुले । ते मजचि अर्पिले ।
आपुले म्हणूनि नाही ठेविले । पुढती जन्मा यावया ।।४।।
इति चतुर्थोऽध्याय: समाप्त: ।

**अध्याय ५ वा**

जे करूनि मज अर्पिती । ते सायुज्यता मीच होती ।
सम, सारिखे सकळ भूती । ते संन्यासी भगवंत ।।१।।
इच्छा दंभ काम क्रोध । नाही इच्छेचा अनुवाद ।
अनुभविता सोऽहंबोध । आत्मतत्त्वी राहिले ।।२।।
पहाणे, ऐकणे, स्पर्शणे । ग्रहणे अवग्रहणे, आश्वासणे ।
चालणे बोलणे श्वसणे । कहीच वृथा न धरिती ।।३।।
आचरता सांख्ययोगे । प्राणापान सम संयोगे ।
ते जीव जाताती सोहं संगे । स्वये बुध जाहलिया ।।४।।
इति पंचमोऽध्याय: समाप्त: ।

**अध्याय ६ वा**

गोविंद म्हणे पंडुसुता । योगी राहे पां निरुता ।
जितेंद्रिय होई सर्वथा । न करी चिंता देहाची ।।१।।
परतोनी आपण पाही । मनी चिंतू नको कांहीं ।
सदा अनुभवचि राही । तरी तूं ठायीच निवशील ।।२।।
शब्द स्पर्श रस गंध रूप । हा विषयो अतिसमीप ।
याते देखोनिया लपणी लप । आपणिया देखो नेदी ।।३।।
धनंजयो म्हणे अवधारी । हे मन चंचल गा, भारी ।
देव म्हणे वैराग्य धरी । तरी सहजचि राहील ।।४।।
इति षष्ठोऽध्याय: समाप्त: ।

**अध्याय ७ वा**

मी सकळिकांसी दुर्गमू । एकासीच होय सुगमू ।
जे सांडिती द्वैत भ्रमू । आत्माराम म्हणोनिया ।।१।।



माझे साकार प्रकृती भजन । पृथ्वी आप तेज वायू गगन।
मी सकळ जीवा जीवन । उत्पत्ती प्रळयो मजमाजी ।।२।।
दिव्य तेज प्रकाशत । तेणे चंद्रसूर्य उजळत ।
ध्वनी आकाशी उमटत । हेचि ओळख माझी ।।३।।
हेचि अनुस्यूतपद लक्षण । मज जाणावया कारण ।
माझे स्वरूप कां निर्वाण । परब्रह्म तूंचि होसी ।।४।।
इति सप्तमोऽध्याय: समाप्त: ।

**अध्याय ८ वा**

अर्जुन म्हणे ऋषिकेशा । ब्रह्म निर्णयो कैसा ।
देह जातसे अपैसा । कैशापरी भेटशील ।।१।।
देव म्हणे सदाकाळीं । जे मज ध्याती हृदयकमळी ।
त्यांसी भेटेन अंतकाळी । म्हणोनि माते स्मर पां ।।२।।
माझेनि नामे मज भजती । त्यासी नाही पुनरावृत्ति ।
मज वेगळे सुख चिंतिती । ते पावती दु:खाते ।।३।।
दाने व्रते जपे तपे । जे काळी नाकळे, नव्हे सोपे ।
ते पाविजे येणे स्वरूपे । श्रीगुरुकृपा झालिया ।।४।।
इति अष्टमोऽध्याय: समाप्त: ।

**अध्याय ९ वा**

मी हे व्यापून अघवे । माझे स्वरूपे जगजीवे ।
न लिंपे सुखदु:खाचेनि भावे । स्वभावे वर्तत असे ।।१।।
मी अधिष्ठान ये प्रकृति । भूते आपोआप होती ।
साकार सांडूनी कल्पिती । ते होऊनिया नव्हेती ।।२।।
नाही मज वाचूंनिया दुजे । ऐसे कल्पूनि राहिजे ।
त्याचिया संसाराचे ओझे । मजचि जाण पडियेले ।।३।।
पत्रपुष्प फळ उदक । जे मज अर्पिती भाविक ।
आणिक निपजले साहजिक । गुणदोष मज अर्पी ।।४।।
इति नवमोऽध्याय: समाप्त: ।

## अध्याय १० वा

मी विश्वाधिकारी सृष्टी । तू अपेक्षिले गा किरिटी ।
तरी दैवाचिया गोष्टी । काय मजवाचूनि वेगळिया ।।१।।
कृष्ण म्हणे मी एकला । विश्व भरितसे भरिला ।
रिता ठाव नाही उरला । तेचि आता सांगेन ।।२।।
मी रवि शशी सामवेदू । व्यास कपिल मुनी नारदू ।
अर्जुन गरुड प्रल्हादू । विभूती विराट विश्वरूप ।।३।।
म्हणोनि हे जीवजाते । साकार विस्तारले भूते ।
न करी भिन्न भेद द्वैते । तरी तू सहजमुक्त ।।४।।
इति दशमोऽध्याय: समाप्त: ।

## अध्याय ११ वा

संतोषोनि म्हणे पार्थू । मज उत्कंठा मनोरथू ।
जे निजस्वरूप ते, तू मज । प्रत्यक्ष दाखवी पां ।।१।।
तव संजय म्हणे दाखविले । नेत्री, लव नाही, लक्षिले ।
देखोनि मन मावळले । अनुवाद खुंटला ।।२।।
आनंदे आसुवे सद्गदीले । अंग कांपत रोमांच उठिले ।
यानंतर जे वर्तले । ते अनुभवी जाणती ।।३।।
इति एकादशोऽध्याय: समाप्त: ।

## अध्याय १२ वा

तव घातले होते दंडवत । उठोनि आसवे पुसित ।
म्हणे धन्य धन्य विष्णुभक्त । जे सदासुख पावले ।।१।।
तव सावरी म्हणता हे कृष्णू । आणिक ऐक एक प्रश्नु ।
भक्तियोगे पाविजे विष्णू । न करी चिंता कासयाची ।।२।।
न सोडोनी आपुला यातीधर्म । मजउद्देशे करिती कर्म ।
इच्छा न धरिती अनुश्रम । मन इंद्रिये दाहिली ।।३।।
कौतुके नाचरती पापपुण्य । जाणोनि नेणती ते धन्य ।
सकळ देवा मज मान्य । ध्याती शून्य साकार ।।४।।
इति द्वादशोऽध्याय: समाप्त: ।



## अध्याय १३ वा

पुढती एक पां निवृत्ती । मुनी पावले परमशांती ।
सकळ भाव बीज उत्पत्ती । मी देह ते आत्मा ।।१।।
त्रिगुण प्रकृती निपजे । सत्त्वे उत्तम गती पाविजे ।
रजे मध्यम होईजे । तामसे जाईजे अधोगती ।।२।।
हे गुणत्रयी अनादिसिद्ध । तेणे शरीर हो बद्ध ।
संगदोष नव्हे शुद्ध । भवजाळी गुंतल्या ।।३।।
म्हणोनि निर्विकार हो पां । संग अवघाचि सांडी पां ।
तू तत्त्व विचार घे पां । सहज मुक्त आहेसी ।।४।।
इति त्रयोदशोऽध्याय: समाप्त: ।

## अध्याय १४ वा

वर्म सांगे मधुसूदना । जेणे न ये, न कळे माझिया मना ।
अनुभवाविण अनुमाना । आले काय करावे ।।१।।
आहे अनित्य हे शरीर । कैसे याते वागविता, हे कवण ।
ऐसा भ्रांतीचा शीण । हरी माझा केशवा ।।२।।
गोविंद म्हणे पंडुनंदना । हे शरीर पंचभूत भावना ।
देही आत्मा मी कारणा । जगत्रय गा माझेनि ।।३।।
यत्र जीव तत्र शीव । हा गुरुमुखे असे अनुभव ।
इतुकेन बुझावला पांडव । म्हणे हा देव हृदयीचा ।।४।।
इति चतुर्दशोऽध्याय: समाप्त: ।

## अध्याय १५ वा

सांगत परमार्थ गुज । सकळही भोगणे मज ।
माझिया आनंदाचे भोज्य । हे त्रैलोक्य पाहे पां ।।१।।
पुण्यपाप घडे देही । तेही मीच करितो पाही ।
मज वाचूनी दुजे नाही । बरवे वोखटे मजमाजी ।।२।।
मी दीप्त हुताशनू । इंद्रिये आणि मनू ।
सौंदर्य मूर्ती मदनू । अष्टभोग मीच भोगी ।।३।।

म्हणूनि साकार निराकार । हे समस्त माझे अंकुर ।
तू आपणियाते विसर । मीच होऊनि राहे ।।४।।
इति पंचदशोऽध्याय: समाप्त: ।

## अध्याय १६ वा

शंका न धरीजे जन्म मरणा । म्हणसी अधोगती कवणा ।
या तव प्रकृतीच्या गुणा । माझे असुनी अलिप्त ।।१।।
मन हेचि लिंगदेह जाण । कल्पना याची खूण ।
मनावाचून न दुजेपण । गर्भवासा यावया ।।२।।
यालागी रचलासे वेद । चालावया विधीनिषेध ।
आचार धर्म ज्ञान भेद । कुलधर्म न सांडावे ।।३।।
जव जाणितले नाही ब्रह्म । तव कासया त्यजील कर्म ।
तो ही अधम चुकला वर्म । पाषाण निर्णयी पडियेला ।।४।।
इति षोडषोऽध्याय: समाप्त: ।

## अध्याय १७ वा

पार्थ म्हणे ते सांगावे । त्रिविध कर्म बोलिले देवे ।
जे जाणोनि भजती भावे । त्या काय फळ असे? ।।१।।
ऐक सात्त्विके जे भजती । ते देवलोका जाती ।
दंभे प्रपंच भजती । ते होती कुरु राक्षस ।।२।।

सक्रोधे भजती तामसे । होती प्रेत पिशाच्च ते ।
काया वाचा आणि मानसे । यातायाती उद्देश ।।३।।
आधी देवाचे तोंड धरी । मग करू नये तेचि करी ।
बाह्य असोनि लोक व्यवहारी । अभ्यंतरी कळो नेदी ।।४।।
इति सप्तदशोऽध्याय: समाप्त: ।

## अध्याय १८ वा

कर्म करावे सकळ । न कल्पावे कर्मफळ ।
करी भजन गा निर्मळ । हा उपदेश ऐक पा ।।१।।



भावे भक्ति माझी करी । दोन्ही चित्तें तू न धरी ।
सर्वाभूती नमस्कारी । अष्टांगे विनये ।।२।।
अर्जुन म्हणे परमानंदा । मी विसरलो जी भिन्न भेदा ।
धाकुटपणाचिया संवादा । क्षमा कीजे स्वामिया ।।३।।
म्हणोनि घातले लोटांगण । आनंदे आसुवे स्फुंदन ।
उचलोनि दिधले आलिंगन । म्हणे जे विसरलो जी सखया ।।४।।
इति अष्टादशोऽध्याय: समाप्त: ।

हे वेदशास्त्रांचे सार । उपनिषदांचे गौरव ।
साकारी निराकार । सगुण निर्गुण निवडिले ।।१।।
सर्व आगमीचे मथिले । ते कृष्णे अर्जुना कथिले ।
थोडेनि बहु विस्तारले । अध्यात्म निभ्रांति ।।२।।
मेरूमांदाराचेनि तुके । जे केली असतील महापातके ।
हरतील निमिषे एके । आत्मज्ञान झालिया ।।३।।
गुरु उपदेशी नागनाथु । पाठक कान्हु जीवनमुक्तु ।
तत्त्वमसि असे चिंतितु । आत्मज्ञान शिवयोगी ।।४।।
इति श्रीमद्भगवद्गीता । स्वाध्याय पाठक मान्होकृता ।
अध्याय अष्टादश समान्त । शुभं भवतु सकळांचे ।।५।।
।। संपूर्णमस्तु ।। शुभं भवतु ।।

## श्री कान्होपाठक महाराज ध्यान

**शांतं ब्रह्मपरं जलधितकरं श्रीशंभूतेजोद्भवम् ।**
**कान्होपाठकं सर्वज्ञं तं द्विजवरं ध्यायेदहम् सर्वदा ।।**

शांतस्वरूप, परब्रह्मपरायण, श्रीगंगेस धारण करणाऱ्या श्रीशंभूरूप तेजापासून प्रगट झालेल्या, व सर्वज्ञ ईश्वरस्वरूप अशा द्विजश्रेष्ठ श्रीकान्होपाठक महाराजांचे मी सदैव ध्यान करीत आहे.

**स्वर्गंगानयनाप्तकीर्तिमनसस्तलं नद्यासरे ।**
**श्रीबोधीद्रूमरूपीणं च शशिनोप्तीर मायांकृता ।।१।।**

श्री गंगामातेस पृथ्वीवर आणण्यास कारण झाल्यामुळेज्यांची कीर्ति सर्वत्र आहे, व गंगाप्रवाह धारण करणाऱ्या अशा भगवान शंकरास तसेच अश्वत्थ वृक्षस्वरूप अशा मायाधिपति श्रीविष्णुस मी सर्वदा ध्यात आहे.

**।। श्रीगणेशाय नमः ।।**

**।। हरिः ॐ ।।**

**कृष्णं कमलपत्राक्षं । पुण्यश्रवणकीर्तनम् ।।**
**वासुदेवं जगद्योनीं । नौमि नारायणं हरिम् ।।१।।**

कमलपत्राप्रमाणे ज्यांचे नेत्र आहेत, ज्यांच्या कथेचे श्रवण व कीर्तन अत्यंत पुण्य (पवित्रस्वरूप) आहे. वसूदेवपुत्र किंवा ज्यांचे सर्व जगांत वास्तव्य आहे, समस्त विश्वाचे कारण अशा श्रीहरि, नारायणस्वरूप श्रीकृष्णास मी नमन-वंदन करीत आहे.

**सप्तशत तत्त्वपदार्था । पदभावना, भावटीका ।।**
**ज्ञानदेवी आत्मज्ञानार्था । प्रकृत पद वक्ता ।।२।।**

**आल्हादयुक्त कान्होपाठक**

## अध्याय १ ला

**ॐ नमो जी भगवंता । पुराणपुरुषा अव्यक्ता ।**
**परियेसा भगवद्गीता । महापातके हरतील ।।१।।**

हे ॐकार स्वरूप! षड्गुणैश्वर्यसंपन्न! पुरातन असूनही नित्य नुतन! इंद्रियातीत परमपुरुषा! हे महाराजा आपणास नमस्कार असो, (आपण किंवा हे श्रोतेगणहो!) श्रीमद्भभगवद्गीता ऐकावी, या गीता श्रवणाने महापातके सुद्धा नाश पावतील.

**धृतराष्ट्रे प्रश्न केला । तव संजयो अनुवादिला ।**
**कौरवभार देखिला । मग काय बोलिला अर्जुन ।।२।।**



धृतराष्ट्राने प्रश्न विचारला तेव्हां संजय धृतराष्ट्रास म्हणाला- अर्जुनाने कौरवांचे सैन्य पाहिले त्यावेळी अर्जुन काय म्हणाला ते सांगतो, आपण ऐकावे.

**हे सकळही गोत्र बंधू । यांचा करू नये वधू ।**
**धर्मद्रोही महाबाधू । येणे राज्यचाड नाही ।।३।।**

युद्धासाठी उपस्थित झालेले हे सर्व आमचे गोत्रज आणि बांधव आहेत, म्हणून यांचा वध करू नये. त्यामुळे धर्माशी द्रोह, प्रतारणा आणि विश्वासघात केला असे होईल म्हणून अशा प्रकारे राज्य संपादन करण्याची (माझी) इच्छा नाही.

**मोह पडला पांडवा । धनुष्य ठेविले गांडीवा ।**
**म्हणे अपराध माधवा । घडत घडत मज चुकला ।।४।।**

अर्जुनाला अशा तऱ्हेने मोह झाला आणि म्हणून त्याने आपले गांडीव धनुष्य खाली ठेवले आणि तो भगवंताला म्हणाला- माधवा माझ्या हातून आता फार मोठा अपराध होत-होता, परंतु तो होता-होता मी त्यापासून बचावलो.

**इति प्रथमोध्यायः समाप्तः ।**

## अध्याय २ रा

**तयाचे ऐकून बोलणे । मग काय म्हणितले नारायणें ।**
**मारिजे मरिजे कवणे । आत्मस्वरूप अविनाश ।।१।।**

अर्जुनाचे हे बोलणे ऐकून भगवंत अर्जुनाला महणाले, अरे अर्जुना कोण मारतो आणि कोण मरतो. आत्मस्ववरूप तर अविनाशी आहे.

**सांडी सांडी देहवासना । न धरी विषयाची कल्पना ।**
**निवारेल भवबंधना । कृष्ण म्हणे रे अर्जुना ।।२।।**

भगवंत अर्जुनाला म्हणतात- या भव बंधनातून तुला सुटायचे असेल तर, देह मी आहे, हे विषय सत्य आहेत, ही जी तुझी कल्पना आहे ना, ती सोडून दे. असे द्विवार सांगतात.

**न तुटे न बुडे न जळे । येता जाता कवणाही न कळे ।**
**इच्छे आपुलिया खेळे । ये वैष्णवीचेनि संगे ।।३।।**

(आत्म्याचे स्वरूप सांगतात) हा आत्मा तुटत नाही, बुडत नाही, जळत नाही. तो आलेला आणि गेलेला कळत नाही. तो स्वेच्छेने आपल्या प्रकृती-मायेबरोबर खेळतो ही सर्व त्याची लीला आहे, आभासिक आहे.

**मी मारितो ऐसे न म्हण । अनादि सिद्ध ते कारण ।**
**मनसंकल्प क्रिया जाण । फळ उद्देश न धरी गा ।।४।।**

मी मारतो, असे म्हणू नकोस. कारण तो अनादी काळचा आहे आणि पुढेही तसाच

राहणारा आहे. तो सर्वांचे कारण म्हणजे मूळ आहे. मनाने केलेले संकल्पव्यर्थ म्हणजे क्रियेचे केवळ भान आहे, म्हणून त्यापासून कर्तृवाचे फळ प्राप्त करण्याचा विचारही करू नकोस.

**न करी सुखदुःखाचा विचारू । अभंग भंगेना निर्धारू ।**
**ज्ञान दृष्टी पाहे विचारू । नाही पाप युद्धाचे ।।५।।**

मला सुख मिळेल का दु:ख मिळेल याचा विचारही करू नकोस. ज्ञानदृष्टीने विचार करून पाहिल्यास तो आत्मा अभंग आहे, त्यामध्ये कोणताही विकार निर्माण होत नाही. अशा प्रकारे जाणून युद्ध केलेस तर तुला कोणतेही पाप लागणार नाही.

**इति द्वितीयोध्याय: समाप्त: ।**

## अध्याय ३ रा

**पंचभूतांचा एकवटा । ते हे शरीर गा सुभटा ।**
**कर्म करिते जे जया निष्ठा । तैसीच फळे गा पावती ।।१।।**

हे शूर योदध्या पंचमहाभूतांचा एकत्रित झालेला मिलाप म्हणजे हे शरीर आहे. जो ज्या निष्ठेने-श्रद्धेने-विश्वासाने कर्म करतो, त्याला तशाच प्रकारच्या फळाची प्राप्ती होते.

**यज्ञ करिती मन कामना । जे जे रूचे जया वासना ।**
**ती पावती निज भावना । हे विपरीत ऐक पां ।।२।।**

अर्जुना ही एक अत्यंत विपरित (आश्चर्यकारक) गोष्ट ऐक! ज्याला ज्याला ज्याच्या वासनेने जे जे आवडते, ते ते त्याचीच इच्छा मनांत धरून यज्ञ करतात व मग ती ती आपली इच्छा पूर्ण करतात!

**अनाश्रयें कर्मे करिती । कर्म-कर्ते, ते नव्हेती ।**
**नाही कर्माची फळप्राप्ती । ये कल्पने वाचोनिया ।।३।।**

ही सर्व कर्मे करणारी तर प्रकृति आहे, मी अकर्ता-अभोक्ता-असंग-निष्क्रिय ब्रह्मरूप आत्मा आहे. अशा यथार्थ समजुतीनंतर जे लौकिकदृष्टीनें कर्म करतात, ते वस्तुत:त्या कर्माचे कर्ते नसतात. व त्यांना त्यापासून कोणत्याही फलाची प्राप्ती होत नाही, कारण या कर्तृत्वाच्या कल्पनेवाचून ( मी कर्ता या भावने वाचून) फलप्राप्ती होत नाही.

**सत्त्व रज तम त्रयोगुणी । प्रकृति अज्ञान गवसणी ।**
**ज्ञान लोपलें द्वैत घणी । कर्म इंद्रियाचेनि संगे ।।४।।**

सत्त्व-रज-तमात्मक प्रकृतिरूप अज्ञान हे आत्मरूपास आवरक-अच्छादक झाले म्हणून आत्मविषयक यथार्थज्ञान विस्तीर्ण द्वैतरूप घनाच्या सत्यत्वनिश्चयरूप आघाताने लुप्त झाले (लोपले) व प्रकृतिकार्य अशा इंद्रियांच्या संगतीमध्यें (आसक्तिमुळे) जीव नाना प्रकारची कर्मे करू लागला.

**इति तृतीयोध्याय: समाप्त: ।**



## अध्याय ४ था

**चक्रपाणी म्हणे वीरा । मज तुज संख्या नाही अवतारा ।**
**अमित्य केल्या येरझारा । अझुनि नाही निमणे ।।१।।**

ज्याच्या हातांत सुदर्शन चक्र आहे असे भगवान श्रीकृष्ण वीर अर्जुनाला म्हणतात- माझ्या आणि तुझ्या होऊन गेलेल्या अवतारांची गणना करता येणार नाही. आत्तपर्यंत आपले अनेक अवतार झालेले आहेत. ते अद्यापही थांबलेले नाहीत.

**माझे ऐसिची अवतरणे । धर्म रक्षावया कारणे ।**
**साधुसंता प्रतिपाळणे । दुष्टा दुःख द्यावया ।।२।।**

माझे अवतार हे धर्माचे रक्षण करणे, साधुसंताचे पालन-संरक्षण करणे आणि दुष्टांना दु:ख देण्यासाठी होत असतात.

**सहज देहीं निपजत । ते ब्रह्मार्पण करीत ।**
**आपुले म्हणूनि नाही ठेवित । यातायातिचेनि भेदे ।।३।।**

शरीराकडून जे जे सहज कर्म होते ते (मी) केले म्हणून त्याचे कतृत्व स्वत:कडे न घेता ते ब्रह्मार्पण करावे, त्यामुळे कर्मफळाच्या कचाट्यातून आपली सुटका होते.

**त्याचे सर्वस्व जेतुले । ते मजचि अर्पिले ।**
**आपुले म्हणूनि नाही ठेविले । पुढती जन्मा यावया ।।४।।**

त्याने केलेले जेवढे म्हणून कर्म आहे ते सर्व तो जर मला अर्पण करील, माझे म्हणून स्वत:कडे काहीही ठेवणार नाही तर त्याला पुढील जन्म घ्यावा लागणार नाही.

**इति चतुर्थोऽध्याय: समाप्त: ।**

## अध्याय ५ वा

**जे करूनि मज अर्पिती । ते सायुज्यता मीच होती ।**
**सम, सारिखे सकळ भूती । ते संन्यासी भगवंत ।।१।।**

जे (कर्म) करून ते मला अर्पण करतात, त्यांना सायुज्य मुक्ती प्राप्त होते. त्यांना सर्व भूतांच्या ठिकाणी समतेचा अनुभव येतो. तेच खरे खऱ्या अर्थाने संन्यासी आहेत, तेच भगवंत आहेत.

**इच्छा दंभ काम क्रोध । नाही इच्छेचा अनुवाद ।**
**अनुभविता सोऽहंबोध । आत्मतत्त्वी राहिले ।।२।।**

ते ''ब्रह्म मीच आहे'' अशा अनुभवाला प्राप्त झाल्यामुळे त्यांच्या ठिकाणी इच्छा, दंभ, काम, क्रोध निर्माण होत नाहीत. ते आत्मस्वरूपी रममाण होऊन राहतात.

**पहाणे, ऐकणे, स्पर्शणे । ग्रहणे अवग्रहणे, आश्वासणे ।**

**चालणे बोलणे श्वसणे । कहीच वृथा न धरिती ।।३।।**

पहाणे, ऐकणे, स्पर्श करणे, ग्रहण करणे, त्याग करणे, आश्वासित करणे, चालणे, बोलणे, श्वसन करणे हे असे कोणतेही व्यर्थ कर्म 'मी केले' म्हणून त्याचे कर्तृत्व आपल्या ठिकाणी होत नाहीत.

**आचरता सांख्ययोगे । प्राणापान सम संयोगे ।**
**ते जीव जातातीं सोहं संगे । स्वये बुध जाहलिया ।।४।।**

सांख्ययोगाचे आचरण करीत असताना, प्राण आणि अपान सम-समान करून ते जीव सोऽहं (ते ब्रह्म मी आहे) या बोधावर आरूढ होतात. स्वतः ब्रह्मरूप होतात.

**इति पंचमोऽध्याय: समाप्त: ।**

## अध्याय ६ वा

**गोविंद म्हणे पंडुसुता । योगी राहे पां निरुता ।**
**जितेंद्रिय होई सर्वथा । न करी चिंता देहाची ।।१।।**

गोविंद (गो=इंद्रिये, विंद=ताब्यात ठेवणारा) इंद्रियांना आपल्या ताब्यांत ठेवणारा गोविंद पंडुसुताला म्हणजे अर्जुनाला म्हणतात- तू (निरूता=खरा) योगी हो. तू देहाची चिंता करू नकोस. जितेंद्रिय हो!

**परतोनी आपण पाही । मनी चिंतू नको कांहीं ।**
**सदा अनुभवचि राही । तरी तूं ठायीच निवशील ।।२।।**

तू जर मनांत कोणतीही चिता न करता अंर्तमुख होऊन स्वतःकडे पहाशिल तर तू नित्य ब्रह्मरूप असल्याच्या अनुभवास प्राप्त होऊन आहे त्याच ठिकाणी परम सुखरूपतेला प्राप्त होशील.

**शब्द स्पर्श रस गंध रूप । हा विषयो अतिसमीप ।**
**याते देखोनिया लपणी लप । आपणिया देखो नेदी ।।३।।**

शब्द, स्पर्श, रूप रस, गंध हे जे विषय आहेत ते अगदी तुझ्या समीप म्हरजे जवळ आहेत. परंतू तू त्या विषयांना तुझ्याकडे पाहू देऊ नकोस. त्यापासून लपून रहा.

**धनंजयो म्हणे अवधारी । हे मन चंचल गा, भारी ।**
**देव म्हणे वैराग्य धरी । तरी सहजचि राहील ।।४।।**

यावर धनंजय म्हणजे धनावर विजय मिळविणारा अर्जुन अशी शंका उपस्थित करतो की,हे मन फारच चंचल आहे. त्यावर भगवंत म्हणात की, तू वैराग्याचा अंगीकार कर म्हणजे मग हे चंचल असणारे मन सहजच स्थिर होईल.

**इति षष्ठोऽध्याय: समाप्त: ।**

## अध्याय ७ वा



**मी सकळिकांसी दुर्गमू । एकासीच होय सुगमू ।**
**जे सांडिती द्वैत भ्रमू । आत्माराम म्हणोनिया ।।१।।**

मी सर्वांना दुर्गम म्हणजे प्राप्त करण्यास अवघड आहे. परंतु जे हे सर्व जगत् आत्माराम आहे म्हणजे ब्रह्मस्वरूप आहे. असे चिंतन करतात व म्हणून जे द्वैत भ्रमास सोडतात त्यांना मात्र मी सुगम आहे म्हणजे सहज प्राप्त होणारा आहे.

**माझे साकार प्रकृती भजन । पृथ्वी आप तेज वायू गगन।**
**मी सकळ जीवा जीवन । उत्पत्ती प्रळयो मजमाजी ।।२।।**

पृथ्वी, जल, अग्नी, वायु आणि आकाश ही माझी साकार प्रकृती असून मी सर्व जीवांचे जीवन आहे. सर्वांची उत्पत्ती आणि प्रलय माझ्यामध्येच होतात.

**दिव्य तेज प्रकाशत । तेणे चंद्रसूर्य उजळत ।**
**ध्वनी आकाशी उमटत । हेचि ओळख माझी ।।३।।**

माझ्या दिव्य प्रकाशाने चंद्रसूर्य प्रकाशित होतात. आकाशात ध्वनी निर्माण होतो. ही माझी ओळख आहे.

**हेचि अनुस्यूतपद लक्षण । मज जाणावया कारण ।**
**माझे स्वरूप कां निर्वाण । परब्रह्म तूचि होसी ।।४।।**

अनुस्यूत-अखंडत्व असणे हेच माझे लक्षण असून, तेच मला ओळखण्याचे मुख्य साधन आहे. मोक्ष हेच माझे स्वरूप असल्याने मला जाणल्यास तूच परब्रह्म पदाला प्राप्त होशिल.

**इति सप्तमोऽध्याय: समाप्त: ।**

## अध्याय ८ वा

**अर्जुन म्हणे ऋषिकेशा । ब्रह्म निर्णयो कैसा ।**
**देह जातसे अपैसा । कैशापरी भेटशील ।।१।।**

अर्जुन ऋषीकेश म्हणजे भगवंताला म्हणतो-ब्रह्मपदाचा निर्णय कसा करायचा, हा देह तर अचानक पडत असतो, मग त्यावेळी तूं मला कसा काय भेटशील?

**देव म्हणे सदाकाळीं । जे मज ध्याती हृदयकमळी ।**
**त्यांसी भेटेन अंतकाळी । म्हणोनि माते स्मर पां ।।२।।**

भगवंत म्हणतात- जे माझे अंत:करणांत नित्य-निरंतर ध्यान करतात त्यांना मी (त्यांच्या) अंतकाळी भेटत असतो, म्हणून तूं माझे नित्य-निरंतर ध्यान कर.

**माझेनि नामे मज भजती । त्यासी नाही पुनरावृत्ति ।**
**मज वेगळे सुख चिंतिती । ते पावती दु:खाते ।।३।।**

माझे नाव घेऊन माझे भजन करतात, त्यांना परत जन्म घ्यावा लागत नाही, मात्र मला

विसरून अन्याचे चिंतन करून सुख मिळवू पाहतात, त्यांना दु:खाचीच प्राप्ती होते.

**दाने व्रते जपे तपे । जे काळी नाकळे, नव्हे सोपे ।**
**ते पाविजे येणे स्वरूपे । श्रीगुरुकृपा झालिया ।।४।।**

दाने, व्रते, जप, तप करून काळावर विजय मिळविणे तेवढे सोपे नाही, परंतू गरुकृपा झाली असता स्वरूपाची म्हणजे माझी प्राप्ती होते आणि काळावर मिजय मिळविता येतो.

**इति अष्टमोऽध्याय: समाप्त: ।**

## अध्याय ९ वा

**मी हे व्यापून अघवे । माझे स्वरूपे जगजीवे ।**
**न लिंपे सुखदु:खाचेनि भावे । स्वभावे वर्तत असे ।।१।।**

या सर्व जगाला मीच व्यापलेले असून हे जग माझ्या स्वरूवरच भासत आहे. (असे असले तरी) मला कोणाच्याही दु:खाने दु:ख किंवा कोणाच्याही सुखाने सुख होत नाही.मी जगाच्या सुखदु:खापासून अलिप्त असतो.

**मी अधिष्ठान ये प्रकृति । भूते आपोआप होती ।**
**साकार सांडूनी कल्पिती । ते होऊनिया नव्हेती ।।२।।**

मी या प्रकृतीचे अधिष्ठाण असून प्रकृतीपासून भूतसृष्टी आपोआप निर्माण होते. ही भूतसृष्टी साकार होऊन भासत असली तरी कल्पित आहे. त्यामुळे ती असून नसल्यासारखीच आहे.

**नाही मज वाचूंनिया दुजे । ऐसे कल्पूनि राहिजे ।**
**त्याचिया संसाराचे ओझे । मजचि जाण पडियेले ।।३।।**

माझ्या शिवाय दुसे कांहीच नाही. असा ज्याचा निश्चय आहे, त्यांच्या संसाराचा भार माझ्यावरच पडतो, म्हणजे त्याला ह्या संसार-दु:खातून मी पलिकडे घेऊन जातो.

**पत्रपुष्प फळ उदक । जे मज अर्पिती भाविक ।**
**आणिक निपजले साहजिक । गुणदोष मज अर्पी ।।४।।**

झाडाचे पान, फूल अथवा पाणी जे भाविक भक्त मला अर्पण करतात तसेच त्यांच्याकडून घडणारी चांगली वाईट कर्मे आणि त्यांच्या ठिकाणी असणारे गुणदोषही जे मला अर्पण करतात.

**इति नवमोऽध्याय: समाप्त: ।**

## अध्याय १० वा

**मी विश्वाधिकारी सृष्टी । तू अपेक्षिले गा किरिटी ।**
**तरी दैवाचिया गोष्टी । काय मजवाचूनि वेगळिया ।।१।।**

हे अर्जुना! मी संपूर्णविश्वाचे कारण असून मीच विश्वरूपानेही प्रगट होतो. माझी ुपासना



करता यावी म्हरूनमी कोणत्या कोणत्या विशेष रूपांनीअभिव्यक्त होतो? अशी तुला अपेक्षा असेल तर- मला सांग, ज्या ज्या या जगांत विभूती आहेत त्या त्या काय माझ्याहून वेगळ्या आहेत काय?

**कृष्ण म्हणे मी एकला । विश्व भरितसे भरिला ।**
**रिता ठाव नाही उरला । तेचि आता सांगेन ।।२।।**

भगवान कृष्ण म्हणतात मी एकटाच या विश्वात भरून राहिलेलो आहे. मी नाही असे या विश्वात एकही ठिकाण नाही. तेच आता तुला सांगत आहे.

**मी रवि शशी सामवेदू । व्यास कपिल मुनी नारदू ।**
**अर्जुन गरुड प्रल्हादू । विभूती विराट विश्वरूप ।।३।।**

मीच सूर्य, चंद्र, सामवेद आहे. मीच व्यास, कपिलमुनी आणि नारद आहे. अर्जुन, गरुड, प्रल्हाद आणि विराट विश्वरूप ह्या माझ्याच विभूती आहेत.

**म्हणोनि हे जीवजाते । साकार विस्तारले भूते ।**
**न करी भिन्न भेद द्वैते । तरी तू सहजमुक्त ।।४।।**

म्हणून हे सर्व चराचर विश्व जे साकार अशा भूतसृष्टीने भरलेले आहे, त्यामध्ये तूं कोणत्याही प्रकारचा भेद पाहू नकोस. असे केले तर तूं सहजच मुक्त होशिल.

**इति दशमोऽध्याय: समाप्त: ।**

## अध्याय ११ वा

**संतोषोनि म्हणे पार्थू । मज उत्कंठा मनोरथू ।**
**जे निजस्वरूप ते, तू मज । प्रत्यक्ष दाखवी पां ।।१।।**

(हे ऐकून) अर्जुन संतुष्ट झाला आणि भगवंताला म्हणाला की, भगवंता तुमचे जे मूळ स्वरूप आहे ते पहाण्याची मला अनावर इच्छा झाली आहे. तेव्हा ते स्वरूप आपण मला दाखवावे.

**तव संजय म्हणे दाखविले । नेत्री, लव नाही, लक्षिले ।**
**देखोनि मन मावळले । अनुवाद खुंटला ।।२।।**

(हे अर्जुनाचे वाक्य ऐकल्या बरोबर भगवंताने आपले विश्वरूप अर्जुनापुढे मगट केले. ही गोष्ट संजय धृतराष्ट्रास सांगत आहे.) तेव्हा संजय म्हणाला-(भगवंताने) आपले विश्वरूप अर्जुनास दाखविले. ते दाखविताना भगवंताने कांहीही राखून ठेवले नाही.

**आनंदे आसुवे सद्‌गदीले । अंग कांपत रोमांच उठिले ।**
**यानंतर जे वर्तले । ते अनुभवी जाणती ।।३।।**

(ते विश्वरूप) पाहून अर्जुनाला उन्मनी अवस्था प्राप्त झाली, परीणामी दोघांचा संवाद थांबला. आनंदाने अर्जुनाचे अंत:करण सद्गतीत झाले. अंगावर रोमांच उभे राहिले आणि यानंतर जे

कांही घडले ते अनुभवी महात्मे जाणतातच.

**इति एकादशोऽध्याय: समाप्त: ।**

## अध्याय १२ वा

**तव घातले होते दंडवत । उठोनि आसवे पुसित ।**
**म्हणे धन्य धन्य विष्णुभक्त । जे सदासुख पावले ।।१।।**

विश्वरूप दर्शनाच्या शेवटी अर्जुनाने भगवंताला दंडवत घातलेले होते तो अर्जुन उठून आता स्वत:चे अश्रूंनी डबडबलेले डोळे पूसू लागला आणि भगवंताला म्हणाला- भगवंता विष्णुभक्त खरोखर धन्य आहेत, कारण त्यांना भगवंताचे नित्य सुख प्राप्त होते.

**तव सावरी म्हणता हे कृष्णू । आणिक ऐक एक प्रश्नु ।**
**भक्तियोगे पाविजे विष्णू । न करी चिंता कासयाची ।।२।।**

तेंव्हा भगवंत अर्जुनाला सावध करतात आणि सांगतात- अणिक एक प्रश्न सांगतो तो ऐक. भक्तियोगाने विष्णूची प्राप्ती होते. म्हणून तू कशाचीही चिंता करू नकोस (फक्त भक्तियोगाचे अनुष्ठान कर)

**न सोडोनी आपुला यातीधर्म । मजउद्देशे करिती कर्म ।**
**इच्छा न धरिती अनुश्रम । मन इंद्रिये दाहिली ।।३।।**

जे आपली जात-धर्म न सोडता मन व इंद्रियांना ताब्यात ठेवून कोणतीही इच्छा न करता माझ्यासाठी कर्मे करतात.

**कौतुके नाचरती पापपुण्य । जाणोनि नेणती ते धन्य ।**
**सकळ देवा मज मान्य । ध्याती शून्य साकार ।।४।।**

माझ्याशिवाय दुसरे काहीही नाही हे जे जाणत असूनही ते माझ्या सगुन साकार अथवा निर्गुण निराकार स्वरूपाचे ध्यान करतात. परंतु कौतुकानेही ते पापात्मक अथवा पुण्यात्मक कर्म करीत नाहीत ते सर्व भक्त मला मान्य आहेत म्हणजे मला आवडतात.

**इति द्वादशोऽध्याय: समाप्त: ।**

## अध्याय १३ वा

**पुढती एक पां निवृत्ती । मुनी पावले परमशांती ।**
**सकळ भाव बीज उत्पत्ती । मी देह ते आत्मा ।।१।।**

पुढे एक गोष्ट महत्वाची आहे, ती अशी- मननशील असे मुनी निवृत्तीमार्गाने परमशांतीला प्राप्त झाले, तसेच पंचमहाभूतादि संपूर्ण विकार यांची उत्पत्ति माझ्यापासून झाली, अशा माझ्या स्वरूपाला आत्मत्वानें जाणणारे भक्त माझा आत्मा व मी देह आहे.

**त्रिगुण प्रकृती निपजे । सत्त्वे उत्तम गती पाविजे ।**



**रजे मध्यम होईजे । तामसे जाईजे अधोगती ।।२।।**

प्रकृतीपासून (सत्त्वगुण, रजोगुण आणि तमोगुण) अशा तीन गुणांची निर्मिती होते. सत्त्वगुणामुळे उत्तमगती मिळते, रजोगुणामुळे मध्यम गती मिळते तर तमोगुणामुळे अधोगती प्राप्त होते.

**हे गुणत्रयी अनादिसिद्ध । तेणे शरीर हो बद्ध ।**
**संगदोष नव्हे शुद्ध । भवजाळी गुंतल्या ।।३।।**

हे त्रिगुण अनादीसिद्ध म्हणजे मूळचेच आहेत. त्यांच्या मुळे शरीर बांधले गेलेले आहे. या भव म्हणजे संसार सागरांत पडलेल्या जीवांसाठी ह्या त्रिगुणांची संगती चांगली नाही.

**म्हणोनि निर्विकार हो पां । संग अवघाचि सांडी पां ।**
**तू तत्त्व विचार घे पां । सहज मुक्त आहेसी ।।४।।**

म्हणून तूं या सर्वच गुणांचा संग सर्वथा सोडून दे आणि तत्त्वाचा विचार कर असे केलेस तर तूं सहजच म्हणजे कांहीही न करता मुक्तच आहेस.

**इति त्रयोदशोऽध्याय: समाप्त: ।**

## अध्याय १४ वा

**वर्म सांगे मधुसूदना । जेणे न ये, न कळे माझिया मना ।**
**अनुभवाविण अनुमाना । आले काय करावे ।।१।।**

मधु दैत्याचा वध करणारा तो मधुसूदन म्हणजे भगवान श्रीकृष्णास अर्जुन म्हणतो- एखादी गोष्ट अनुमान प्रमाणानें सिद्ध झाली तरी ती मला कलत नाही आणि पटतही नाही. म्हणून तू मला त्या गोष्टीचे वर्म सांग.

**आहे अनित्य हे शरीर । कैसे याते वागविता, हे कवण ।**
**ऐसा भ्रांतीचा शीण । हरी माझा केशवा ।।२।।**

शरीर हे अनित्य आहे. या शरीराशी कसे वागावेहे नेमके कसे आहे, या विषयी भ्रमात पडलेलो आहे. म्हणून माझी भ्रांती दूर करून तू माझा शीण म्हणजे दु:ख हरण म्हणजे नाहीसे कर.

**गोविंद म्हणे पंडुनंदना । हे शरीर पंचभूत भावना ।**
**देही आत्मा मी कारणा । जगत्रय गा माझेनि ।।३।।**

गो म्हणजे इंद्रिये विंद म्हणजे जिंकणारा असा भगवान श्रीकृष्ण पंडुनंदन म्हणजे अर्जुनाला म्हणाला- हे शरीर पंचमहाभूतां पासून तयार झालेले आहे, परंतु या शरीरांत असणारा देही म्हणजे आत्मा मात्र मी आहे. आणि हे जगत्रय म्हणजे मृत्युलोक, स्वर्ग आणि पाताळ हे सर्व मीच आहे.

**यत्र जीव तत्र शीव । हा गुरुमुखे असे अनुभव ।**

**इतुकेन बुझावला पांडव । म्हणे हा देव हृदयीचा ।।४।।**

यत्र म्हणजे जेथे जीव आहे, तत्र म्हणजे तेथे शीव आहे. याचा अर्थ जेथे जीव आहे, तेथेच शीव आहे आणि गुरुमुखाने ऐकल्यामुळे अर्जुनाचा संशय दूर झाला आणि माझ्या हृदयांत असणारा देव मीच आहे. एऱ्हवीं सर्वांच्या हृदयदेशीं । 'मी अमुका' आहे ऐसी । जे बुद्धि स्फुरे अहर्निशीं । ते वस्तु गा मी ।।१५।।४२१।।

**इति चतुर्दशोऽध्यायः समाप्तः ।**

**अध्याय १५ वा**

**सांगत परमार्थ गुज । सकळही भोगणे मज ।**
**माझिया आनंदाचे भोज्य । हे त्रैलोक्य पाहे पां ।।१।।**

परमार्थाचे गुह्य मी तुला सांगत आहे, की या संपूर्ण विश्वाच्या रूपानें तूं मलाच पहा. कारण हे त्रैलोक्य माझ्याच आनंदस्वरूपाचे भोज्य आहे. (माझ्याच स्वरूपावर भासलेले आहे.)

**पुण्यपाप घडे देही । तेही मीच करितो पाही ।**
**मज वाचूनी दुजे नाही । बरवे वोखटे मजमाजी ।।२।।**

देहांत घडणारे पुण्य-पाप हे माझ्यामुळेच घडते. माझ्याशिवाय दुसरे कांहीच नाही. चांगले अथवा वाईट सर्व कांही माझ्यांतच आहे.

**मी दीप्त हुताशनू । इंद्रिये आणि मनू ।**
**सौंदर्य मूर्ती मदनू । अष्टभोग मीच भोगी ।।३।।**

मीच प्रदीप्त अग्नी आहे. इंद्रिये आणि मन सुद्धा मीच आहे. सौंदर्याची मूर्ति सुद्धा मीच आहे. अष्टभोग मोगणाराही मीच आहे.

**म्हणूनि साकार निराकार । हे समस्त माझे अंकुर ।**
**तू आपणियाते विसर । मीच होऊनि राहे ।।४।।**

म्हणून साकार आणि निराकार सर्व मीच आहे. हे दिसणारे (सर्व विश्व) मीच आहे. (यासाठी) तूं स्वत:ला विसर आणि मीच होऊन रहा.

**इति पंचदशोऽध्यायः समाप्तः ।**

**अध्याय १६ वा**

**शंका न धरीजे जन्म मरणा । म्हणसी अधोगती कवणा ।**
**या तव प्रकृतीच्या गुणा । माझे असुनी अलिप्त ।।१।।**

जन्म आणि मरणाची शंका धरू नकोस. (जन्म मरण) हे प्रकृतीचे गुण (लक्षणे) आहेत. तूं म्हणशील अधोगती कोणाला प्राप्त होते? तर ही शंकाच तुला मत्स्वरूप असूनही माझ्याहून तुला वेगळे करते.



**मन हेचि लिंगदेह जाण । कल्पना याची खूण ।**
**मनावाचून न दुजेपण । गर्भवासा यावया ।।२।।**

मन हेच लिंगदेह असून संकल्प-विकल्पात्मक कल्पना करणे हेच त्याचे कार्य आहे. गर्भवासाला येण्याचे मनाशिवाय दुसरे कोणतेच कारण नाही.

**यालागी रचलासे वेद । चालावया विधीनिषेध ।**
**आचार धर्म ज्ञान भेद । कुलधर्म न सांडावे ।।३।।**

विहित आणि निषिद्ध, धर्म आणि अधर्म या पैकी कशाचे आचरण करावे यासाठीच वेदाची रचना असून तूं विहित आणि धर्माला अनुकुल असेच आचरण कर.

**जव जाणितले नाही ब्रह्म । तव कासया त्यजील कर्म ।**
**तो ही अधम चुकला वर्म । पाषाण निर्णयी पडियेला ।।४।।**

जोपर्यंत स्वस्वरूपाचा म्हणजेच ब्रह्माचा अनुभव प्राप्त होत नाही, तो पर्यंत त्याच्याकडून कर्माचा त्याग होणार नाही.(ब्रह्मस्वरूपलच्या अनुभूतीशिवाय जर एखादा कर्माचा त्याग करील तर त्याला वर्म समजलेले नसून त्याचा तो निर्णय म्हणजे ब्रह्मस्वरूपाच्या मार्गातील तो मोठा अडथळा आहे.

**इति षोडषोऽध्यायः समाप्तः ।**

**अध्याय १७ वा**

**पार्थ म्हणे ते सांगावे । त्रिविध कर्म बोलिले देवे ।**
**जे जाणोनि भजती भावे । त्या काय फळ असे? ।।१।।**

अर्जुन भगवंताला म्हणत आहे- भगवंता आपण जे तीन प्रकारचे कर्म सांगितले आहे ते समजावून घेऊन जे भक्त भगवंताची सेवा करतात. त्यांना त्या कर्माचे काय फळ मिळते?

**ऐक सात्त्विके जे भजती । ते देवलोका जाती ।**
**दंभे प्रपंच भजती । ते होती कुरु राक्षस ।।२।।**

भगवंत म्हणातात- ऐक, जे सात्त्विक भक्ती करतात ते देवलोकाला प्राप्त होतात. जे दांभीक आहेत ते माझ्या भक्तीचे केवळ ढोंग करतात आणि प्रपंचाची भक्ती करतात, ते कौरवांच्या सारखे कुरु कुळात जन्मूनही राक्षसी वृत्तीचे होतात.

**सक्रोधे भजती तामसे । होती प्रेत पिशाच्च ते ।**
**काया वाचा आणि मानसे । यातायाती उद्देश ।।३।।**

काया म्हणजे शरीर, नामसी लोक शरीराने वाचेने आणि मनानें दुसऱ्याला त्रास व्हावा या हेतूने क्रोधयुक्त भक्ती करतात. त्यांना मृत्युनंतर प्रेत किंवा पिशाच्च यानी प्राप्त होते.

**आधी देवाचे तोंड धरी । मग करू नये तेचि करी ।**

**बाह्य असोनि लोक व्यवहारी । अभ्यंतरी कळो नेदी ।।४।।**

प्रथम देवाचे तोंड बंद करतात आणि मग जे करायला नको तेच करतात. असे लोक बाह्य दृष्टीने लोकांप्रमाणें व्यवहार करताना दिसत असले तरी त्यांच्या अंत:करणांत काय आहे ते मात्र कळत नाही.

**इति सप्तदशोऽध्याय: समाप्त: ।**

## अध्याय १८ वा

**कर्म करावे सकळ । न कल्पावे कर्मफळ ।**
**करी भजन गा निर्मळ । हा उपदेश ऐक पा ।।१।।**

सर्व (वेद-विहित) कर्मे करावित, मात्र ती करताना कर्मफळाची अपेक्षा आणि कर्तृत्वाचा अहंकार न ठेवता करावे. यालाच निर्मळ कर्म म्हणतात. भगवंताचे भजनही तसेच करावे. हा माझा उपदेश आहे, तो तूं ऐक.

**भावे भक्ति माझी करी । दोन्ही चित्तें तू न धरी ।**
**सर्वाभूती नमस्कारी । अष्टांगे विनये ।।२।।**

अंत:करणांत शुद्ध भाव ठेवून माझी भक्ती कर. पाप-पुण्य या दोहोंचाही विचार तूं चित्तांत आणू नकोस. सर्व भूतांच्या ठिकाणी मीच आहे या भावनेनें विनयपूर्वक तूं त्यांना साष्टांग नमस्कार कर.

**अर्जुन म्हणे परमानंदा । मी विसरलो जी भिन्न भेदा । धाकुटपणाचिया संवादा । क्षमा कीजे स्वामिया ।।३।।**

सर्वांना श्रेष्ठ आनंद देणाऱ्या भगवंताला अर्जुन म्हणतो देवा, व्यवहार हा तर द्वैतांत होतो आणि मी तर भेदभावाला विसरून गेल्याने मला तर द्वैत दिसतच नाही मग मी हा व्यवहार कसा करावा. माझे हे बोलणे अज्ञानांतील आहे, म्हणून आपण मला क्षमा करावी.

**म्हणोनि घातले लोटांगण । आनंदे आसुवे स्फुंदन ।**
**उचलोनि दिधले आलिंगन । म्हणे जे विसरलो जी सखया ।।४।।**

असे म्हणून अर्जुनाच्या डोळ्यांतून आनंदाश्रू ओघळू लागले त्याने भगवंताला लोटांगण घातले, ते पाहून भगवंतांनी अर्जुनाला उचलून घेतले आणि त्याला म्हणाले सख्या तुझे बरोबरच आहे. माझेच चुकले.

**इति अष्टादशोऽध्याय: समाप्त: ।**

अशा रीतीने तत्त्वांश प्राकृत गीतेचा अठरावा अध्याय संपूर्ण झाला.

**हे वेदशास्त्रांचे सार । उपनिषदांचे गौरव ।**



**साकारी निराकार । सगुण निर्गुण निवडिले ।।१।।**

हे म्हणजे श्रीमद्भगवद्गीताशास्त्र, हे वेदांचे सार असणाऱ्या उपनिषदांचा गौरव करणारे आहे. यामध्ये (भगवंताच्या) सगुण आणि निर्गुण स्वरूपाचा स्पष्ट असा निवाडा केलेला आहे.

**सर्व आगमीचे मथिले । ते कृष्णे अर्जुना कथिले ।**
**थोडेनि बहु विस्तारले । अध्यात्म निभ्रांति ।।२।।**

सर्व आगम म्हणजे वेदांचे जे मंथनरूप सार काढून कृष्णानें ते अर्जुनाला सांगितले. हे सार अतिशय कमी दिसत असले तरी त्यामध्ये अध्यात्माचा मोठा विस्तार सामावलेला आहे.

**मेरूमांदाराचेनि तुके । जे केली असतील महापातके ।**
**हरतील निमिषे एके । आत्मज्ञान झालिया ।।३।।**

मेरू आणि मंदार पर्वता एवढी मोठी आणि अनंत पापे जरी एखाद्यानें केलेली असतील तरी त्याला आत्मज्ञान झाले असता त्या सर्व पापांचा एका क्षणांत नाश होईल.

**गुरु उपदेशी नागनाथु । पाठक कान्हु जीवनमुक्तु ।**
**तत्त्वमसि असे चिंतितु । आत्मज्ञान शिवयोगी ।।४।।**

ज्यांना नागनाथ गुरुंचा उपदेश प्राप्त झालेला आहे असे कान्होबा पाठक हे जीवनमुक्त असून ते तत्त्वमसि महावाक्याचे सतत चिंतन करणारे शिवयोगी आहेत.

**इति श्रीमद्भगवद्गीता । स्वाध्याय पाठक मान्होकृता ।**
**अध्याय अष्टादश समान्त । शुभं भवतु सकळांचे ।।५।।**

अशा तऱ्हेने श्रीमद्भगवद्गीतेचा स्वाध्याय म्हणजे दररोज नियमाने करावयाचा अभ्यास कान्होराज पाठकांनी तयार केलेला आहे आणि या बरोबरच तत्त्वांश प्राकृत गीतेचा अठरावा अध्याय समाप्त झालेला असून या स्वाध्याचे अनुष्ठाण करणाऱ्या सर्वांचे कल्याण व्हावे.

|| संपूर्णमस्तु || शुभं भवतु ||

(शांतिब्रह्म एकनाथ महाराजांच्या गाथ्यातील संदर्भ)

(सकलसंतगाथा-गीताप्रेस गोरखपुर=१६१९ वरद बुक्स्=१७१७ कराडकर=१६१९)

१६१९ ऐसे म्हणशील कोण । ज्याचें गातां नामाभिधान । देवाधिदेव आपण । स्वमुखें सांगे उद्धवा ।।१।। नारद पराशर पुंडरीक । व्यास शुक वाल्मिकादिक । ध्रुव उपमन्यु भीष्मादिक । वंद्य जाण उद्धवा ।।२।। वसिष्ठ वामदेव विश्वामित्र । अत्रि दत्तात्रेय पवित्र । ऐसे पुण्यश्लोक सर्वत्र । ते तुज वंद्य उद्धवा ।।३।। रघु-दिलीप हरिश्चंद्र । शिभ्रीराज बली थोर । जयांचा अंकित मी निर्धार । हे तूं जाणें उद्धवा ।।४।।पांडव माझे पंचप्राण । काया वाचा वेचिलें मन । मज निर्धारितां पूर्ण । जीव वेंचिला उद्धवा ।।५।। निवृत्ति ज्ञानेश्वर सोपान । मुक्ताबाई ज्ञानकळा आपण । इहीं अवतार धरून । जग तारिलें उद्धवा ।।६।। गोरा सांवता जगमित्र । चोखा रोहिदास कबीर । हे माझे प्राणमित्र । आहेत जाण उद्धवा ।।७।। दामा नामा जनाबाई । राजाई आणि गोणाई । येशि आणि साकराई । जिवलग माझें उद्धवा ।।८।। कान्हुपात्रा जन जसवंत । हनुमंतादि समस्त । **पाठक कान्हा आनंदभरित** । तयाचेनीं उद्धवा ।।९।। परसा भागवत सूरदास । वत्सरा आणि कूर्मदास । एकाजनार्दनीं निजदास । संतांचा मी उद्धवा ।।१०।।

(सकलसंतगाथा-गीताप्रेस गोरखपुर=१६२१ वरद बुक्स्=१७१९ कराडकर=१६२१)

१६२१ निवृत्ति शोभे मुगुटाकार । ज्ञान सोपान वटेश्वर ।।१।। विठू पंढरीचे राणे । ल्याले भक्तांचीं भूषणें ।।२।। खेचर विसा जगमित्र नागा । कुंडलें जोडा विठोबा जोगा ।३।। बाहु शोभे बाहुवाट । गोरा सांवता दिग्पाट ।।४।। कंठीं जाणा येकविद । तो हा जोगा परमानंद ।।५।। गळा शोभे वैजयंती । तीसी मुक्ताई म्हणती ।।६।।अखंड शोभे माझ्या बापा । पदकी शोभे नामा शिंपा ।।७।। कटी सूत्र कटावरी । तो हा सोनार नरहरी ।।८।।कासे कसिला पीतांबर । तो हा जाणावा कबीर ।।९।। जानु जघन सरळ । तेहि कान्होपात्रा विशाळ ।।१०।। **दंतपंक्तींचा झळाळ । तो हा कान्हया रसाळ** ।।११।। चरणींच्या क्षुद्र घंटा । नामयाचा नारा विठा ।।१२।। वाम चरणीं तोडर । परिसा रुळतो किंकर ।।१३।। चरणीं वीट निर्मळ । तो हा जाला चोखामेळ ।।१४।। चरणातळील ऊर्ध्वरेखा । जाला जनार्दन एका ।।१५।।



(जगद्गुरु संत तुकाराम महाराजांच्या गाथ्यातील संदर्भ)

(सकलसंतगाथा-गीताप्रेस गोरखपुर= वरद बुक्स्=१७४२ कराडकर=१०६९)

१०६९ पंढरिये माझें माहेर साजणी । ओविया कांडणी गाऊं गीतीं ।।धृ।। राही रखुमाई सत्यभामा माता । पांडुरंग पिता माहियेर ।।२।। उद्धव अक्रूर व्यास अंबऋषि । भाई नारदासी गौरवीन ।।३।। गरुड बंधु लडिवाळ पुंडलीक । यांचें कवतुक वाटे मज ।।४।। मज बहु गोत संत आणि महंत । नित्य आठवित ओवियेसी ।।५।। निवृत्ति ज्ञानदेव सोपान चांगया । जिवलगा माझिया नामदेवा ।।६।। नागो जगमित्रा नरहरि सोनारा । रोहिदास कबीरा सोयरिया ।।७।। परिसा भागवता सुरदास सांवता । गाईन नेणतां सकळिकांसी ।।८।। चोखामेळा संत जिवाचे सोईरे । न पडे विसर याचा घडी ।।९।। जीवींच्या जीवना एका जनार्दना । **पाठक हा कान्हा** मिराबाई ।।१०।। आणीकही संत महानुभावमुनि । सकळां चरणीं जीव माझा ।।११।। आनंदे ओविया गाईन मी त्यांसी । जाती पंढरीसी वारकरी ।।१२।। तुका म्हणे माझा बळिया बापमाय । हर्षे नांदों सये घराचारीं ।।१३।।

(संत निळोबा महाराज गाथ्यातील संदर्भ)

(सकलसंतगाथा-गीताप्रेस गोरखपुर=५३१ वरद बुक्स्=५३१ कराडकर=५३१ डॉ. मिसाळ ५३३)

५३१ सुरदास आंधळा पंजाबी ब्राह्मण । गातां तुमचे गुण धण्य झाला ।।१।। विसोबा खेचर चांगा वटेश्वर । नरहरी सोनार पाठक नामा ।।२।। जिवलग तुम्हां सांगती जीवाचे । विभागी भाग्याचे केले तुम्हीं ।।३।। निळा म्हणे भेद नाहीं तुम्हां संतां । दाविली भिन्नता प्रीतीसाठीं ।।४।।

(सकलसंतगाथा-गीताप्रेस गोरखपुर=१५५६ वरद बुक्स्=१५५६ कराडकर=१५५६)

१५५६ आळेखिंडीवरूनि चालियेले भार । केले नमस्कार म्हैसीपुत्रा ।।१०८।।**केंदुरावरूनि** उतरले घाट । गर्जती उद्भट सिद्धनामें ।।१०९।। **कान्होपाठक** प्रीतीं चालविले सवें । प्रार्थुनी चांगदेवे अत्यादरें ।।११०।। आले भीमातीरीं स्नानीं स्थिरावले । पुढे पाठविलें सांगोनियां ।।१११।। यावरी म्हणे निळा होईल सिद्धभेटी । परस्परें ते गोमटी आहे कथा ।।११२।। बहुत अपूर्व असमाई चरित्र । परिसोत सर्वत्र श्रोतेजन ।।११३।।

ह. भ. प. कै. महिपतिबाबा ताहराबादकर रचित संतलीलामृत ग्रंथामध्यें आलेले

## संतश्रेष्ठ कान्हुराज महाराज यांचे चरित्र.

## अध्याय ३२ वा

।। श्रीगणेशाय नमः ।। सकळां श्रोतियांसि प्रार्थितसे । एकाग्र करोनि चित्तासी । सप्रेमे सेविजे कथारस । निद्रा आळस टाकोनी ।।१।। संसारधंदा । रिकामपण नव्हेचि कदा । तरी रात्रीं बैसोनि प्रेमछंदा । गीतगोविंदा पैं गावें ।।२।। गायनकळा नये जाण । तरी सत्समागम धरावा प्रयत्नान । भगवद्गुण होतां श्रवण । सहजचि मन वेधेल ।।३।। चित्तासि लागल्या मोहर । मग एकचि भासे जगत्र । द्वैत तुटतां निर्धारी । वेरझार खुंटली ।।४।। द्वैत मीपण भासे देही । त्याचा ठाव मोडीतां पाहीं । मग सहजचि झाला विदेही । विश्रांती नाहीं या परती ।।५।। यालागीं सत्समागमाविण । आणीक साधन नसे जाण । म्हणाल संत कैसे कोण । तेंही लक्षण अवधारा ।।६।। जे अहंता टाकोनि मानसी । भजन करिती अहर्निशी । द्वेष वार्ता नाहीं ज्यासी । शत्रु मित्रासी सारिखा ।।७।। ऐसी अखंड जयाचि स्थित । त्यासीच बोलिजे संत । ऐसे जगीं बहुत आहेत । परी  विकल्प निश्चित नाढळें ।।८।। साधू जोंवरी आहेत दूर । त्याचें ठाई आर्त तोवर । साक्षात दृष्टी देखिलें जर । तरी विकल्पे अंतर विटाळे ।।९।। याविषयी तुम्ही सज्जन । सादर ऐका निरोपण । कान्हो पाठक एक ब्राह्मण । केंदुर नगरांत पैं असे ।।१०।। अल्पसंतुष्ट सर्वदां चित्तीं । कांहीं मिळाले अयाचित वृत्ती । त्यांतही तोषवोनि अतिथी । शेष भक्षिती आपण ।।११।। तो भाविक प्रेमळ बहुत । हरिचरणीं सर्वदां चित्त । ब्रह्मरूप सर्वदा भावित । चित्तीं द्वैत असेना ।।१२।। कांता पतिव्रता जाण । उल्लंघूं नेदी तयाचें वचन । विपत्ती काळीं समाधान । सत्वासि हानि होऊं नेदी ।।१३।। ऐसी दांपत्यें दोघेंजण । एकचित्तें असती जाण । अहोरात्र श्रीहरीचें भजन । जागृती स्वप्नीं सुषुप्तीसी ।।१४।। श्रवणीं ऐकती भगवत्कीर्ती । अर्चनी पूजित विष्णुमूर्ती । मुखीं गात नामकीर्ती । संतोष चित्तीं सर्वदां ।।१५।। भाविक दिसे भगगवद्धजनें । अभक्त मानिती अहाच वाणें । अज्ञानासी साधारण । सर्वांसारिखा दिसतसें ।।१६।। कान्हयाची स्थित ऐसी । देखोनि पूजिती सद्भावेसी । मग तो गेला वाराणसी । कुटुंबेसी आपुल्या ।।१७।। तेथें होत होते पुराण । बहुश्रुत करिति श्रवण । महापंडित विचक्षण । व्यासोक्त वचन बोलती ।।१८।। इतिहासाचा अर्थ सांगतां । भगवद्भावीं लागली कथा । तेथें केंदुरकर ब्राह्मण होता । उत्तर देत वक्तियासी ।।१९।। विष्णुभक्तांचीं लक्षणें । ऐकोनि म्हणती श्रोतेजन । कलियुगीं ऐसें वर्तन । न ये होवो कोणासी ।।२०।। सांगती ऐकती बहुत । यावरी हांसोनियां



तेथ । बोलिल्या ऐसे न करित । वाग्वाद व्यर्थ घालिती ।।२१।। तंव तेथें केंदुरकर ब्राह्मण । करीत बैसला होता श्रवण । तो म्हणें आमुचे गांवीं वैष्णवजन । कान्हो पाठक एक असे ।।२२।। भगवद्भक्तीची सांगती स्थित । तितुकें लक्षण तयांत । चित्ती सर्वदां विरक्त । कैलासनाथ जयापरी ।।२३।। ऐसी ऐकोनियां स्थिती । सत्य न भासे कोणाप्रती । म्हणती शिवाची उपमा निश्चिती । नराकारणें दिसतसे ।।२४।। नाना पक्षि अंडज याती । निराळमार्गे उडोनि जाती । दृष्टीं देखोंनि चपळ गती । तया खगपती न म्हणावें ।।२५।। वोहळ सरिता अपार । वाहत असती उर्वीवर । त्यांचें भागीरथी ऐसें नीर । सर्वथा उत्तर न म्हणावें ।।२६।। बहूरंगी पाषाण असती । सप्तरंगें लखलखिती । दृष्टीसि देखोंनी आकृती । परिस तयांप्रती न म्हणावें ।।२७।। नाना अगाध सरोवर । शुद्ध शीतळ भरलें नीर । दृष्टीं देखतां विश्रांति थोर । तयासी समुद्र न म्हणावें ।।२८।। नाना नाग बहुवस । वारुळीं करिती प्रवेश । लंबायमान देखिले दृष्टीस । तयांसी शेष न म्हणावें ।।२९।। देखोनि मानवाची महिमा । त्यासी शंकराची देता उपमा । परि तें सत्य न वाटे आम्हां । ऐसें विचक्षण बोलती ।।३०।। तंव त्यांत एक पंडित ब्राह्मण । चित्ती विस्मित जाहला जाण । म्हणें कान्हों पाठकाचीं लक्षणें । पाहों जावें दृष्टीसी ।।३१।। एथें ऐकिली त्याची स्तुत । कैसा आहे भगवद्भक्त । म्हणती संसारी विरक्त । हेंचि नवल वाटतसे ।।३२।। भजन करितां निरंतर । ज्यानीं साह्य केला ईश्वर । संकटी होय साक्षात्कार । त्यासि पहावें दृष्टीसीं ।।३३।। विप्र इच्छा धरोनि ऐसी । सोडिलें क्षेत्र वाराणसी । पंथ क्रमित सायासीं । दक्षिण देशासी पातला ।।३४।। मग येऊनि केंदुरा सम्यक । लोकांसी पुसतसे स्वमुखें । येथें सत्पुरुष कान्हो पाठक । असे एक ऐकतों ।।३५।। त्याचें दर्शन घ्यावया येथें । दुरोनि आलों क्रमित पंथ । मंदिर पुसोनि लोंकातें । वाडियांत प्रवेशला ।।३६।। तो नित्यनेम सारोनि सकळिक । बैसले होते कान्हो पाठक । तान्ही कन्या होती एक । कौतुकें खेळवित तिजलागीं ।।३७।। बाळक बोबडे बोले जैसे । आपण वदती तिजचि ऐसें । शेंबुड आलिया नाकास । स्वहस्तें पुसोनि टाकिला ।।३८।। स्वरूपें तरी दिसे मळीन । परि आवडी करोनी देती चुंबन । हें दृष्टीसि देखोनि ब्राह्मण । विकल्प मनांत पातला ।।३९।। मग स्वमुखें पुसताहे । कान्हो पाठक तुम्हींच काय । ते म्हणती नाम देहे । हेंचि होय स्वामिया ।।४०।। दृष्टीस देखोनि द्विजवर । सद्भावें केंला नमस्कार । ब्राह्मण तेव्हां बोले उत्तर । व्यर्थचि येरझार पडिली कीं ।।४१।। प्रेमळ भक्त म्हणोंनि त्यासी । म्हणे काय बोलतां चित्तासी । येरझार पडली कैसी । सांगिजे आम्हासीं भूदेवा ।।४२।। तुम्ही कवण कोठील ब्राह्मण । येथें केले जी आगमन ।

कोठपर्यंत असे जाणे । सकळ वर्तमान सांगावें ।।४३।। ऐकोनि म्हणे द्विजवर । आमुचें गांव काशीपुर । तुझी स्तुती ऐकीली फार । विरक्त थोर म्हणोनि ।।४४।। पंथ क्रमोनि दिवस बहुत । दर्शनास्तव आलों एथ । तों तुमची स्थित दिसोनि येत । मायाजाळांत पडियेलां ।।४५।। गृहदारा कन्या पुत्र । असोनियां त्यजिलें जर । तोचि विरक्त म्हणावा थोर । योगेश्वर नाम तयाचें ।।४६।। यात्रेकरी आला ब्राह्मण । त्याणें बहुत केलें स्तवन । त्याचा विश्वास धरोनि मनें । घ्यावया दर्शन आलों कीं ।।४७।। कल्पतरु आहे म्हणोन । छायेसीं बैसावया आलो जाण । तंव तो बाभळीचा वृक्ष कठिण । तळीं कांटेवन बहुतची ।।४८।। हातीं परीस लागेल गोमटा । त्यालागीं प्रयत्न केला मोठा । पाहों जातां पाषाण गोटा । काय अदृष्टा करावें ।।४९।। सुधारस साधेल म्हणोनी । साधक लागला प्रयत्नीं । तों दृष्टी देखिलें थिल्लरपाणी । मजलागोनि तेवि झालें ।।५०।। प्रसन्न व्हावया नारायण । यालागीं केलें अर्घ्यदान । तों पुढें खद्योत तेजहीन । दैवें करोनि देखिला ।।५१।। अध्यात्मज्ञान इच्छितां मनीं । तों कोकशास्त्र ऐकिलें कर्णी । तैसी आपुली स्थिती पाहुनी । मजलागुनी तेंवि वाटे ।।५२।। ऐसीं द्विजाचीं कठिणोत्तरें । ऐकोनि शांति दयासागरें । क्रोध न ये अनुमात्र । मधुरोत्तरें बोलतसे ।।५३।। हात जोडोनि विनवितसे । टाकोनि आलांत दूरदेश । दृष्टीस पाहतां आम्हांस । अवगुण दिसे कोणता ।।५४।। तो कृपा करोनि सांगिजे आतां । विवेकें त्याग करीन मागुता । तुम्हीं उदास न व्हावे सर्वथा । चरणीं माथा ठेवितसें ।।५५।। कान्हो पाठक ऐशा रितीं । चित्तीं धरिली परमशांती । म्हणे कोणता अवगुण चित्तीं । तो मजप्रती सांगावा ।।५६।। ऐकोनि द्विज बोले वचन । तुम्हीं खेळवित बैसला तान्हें । स्वहस्तें श्लेष्मा पुसोन । देतां चुंबन निज प्रीतीं ।।५७।। तुम्ही संत भक्त प्रेमळ । ऐसें लोक म्हणती सकळ । कासया पाहिजे मायाजाळ । त्याग तात्काळ करावा ।।५८।। ऐसें ऐकोनि लवलाहें । कान्हों पाठक करी काय । बाळ उचलोनी पाहे । आडामध्यें टाकिलें ।।५९।। मग विप्रासी विनवित । आतां मी जाहलों मायातीत । स्वामींनीं करोनियां स्वस्थचित्त । प्रसाद येथें करावा ।।६०।। विपरीत देखोनि ते अवसरीं । ब्राह्मण विस्मित जाहला अंतरीं । म्हणे तुज ऐसा निर्दय नेत्रीं । पृथ्वीवरी दिसेना ।।६१।। सहज बोलिलों वैराग्य लक्षण । ऐसें करिसील हें नेणें । उदकीं टाकिलें बाळक तान्हें । गेला प्राण तयाचा ।।६२।। मनांत विचार करी विप्र । मी येथें आलों नसतों जर । तरी बाळहत्या थोर । येती मजवर कासया ।।६३।। बोभाट करावा बाहेरी । तरी अवघेचि कोपती मजवरी । जाब देऊं कैशापरी । नाहीं उजागरी बोलावया ।।६४।। पहावया आलों



साधु संत । तों येथें देखिलें विपरीत । मज घडलें महादूरीत । म्हणोनि चित्तांत खेद करीं ।।६५।। कान्हो पाठक म्हणे त्यासी । तुम्हीं उद्विग्न कां मानसीं । स्नान करोनि वेगेसीं । प्रसादासी बैसावें ।।६६।। संकटीं पडिला द्विजवर । म्हणे उठोनि गेलों बाहेर । तरी नगरवासी लोक समग्र । अवघे मजवरी कोपती।।६७।। कान्हो पाठकाची कांता । परम भाविक पतिव्रता । जाणोनि पतीच्या मनोगता । मोह ममता तीस न ये ।।६८।। देखत देखत बुडालें बाळ । परी किंचित न करी हळहळ । ब्राह्मण विस्मित ते वेळ । म्हणें वैराग्य प्रबळ पैं यांचें ।।६९।। श्रियाळ राजा सत्त्वधीर । त्या शिवें मागतां मांस आहार । चांगुणा स्वहस्तें वधी कुमर । तैसा विचार जाहला ।।७०।। हाही दृष्टांत तेथें न पुरे । शिवें मारविला त्याचा पुत्र । मी कांहीं न बोलतां उत्तर । आडांत पोर टाकिलें ।।७१।। कांता म्हणे द्विजाप्रती । तुम्हीं खेद न करावा चित्तीं । प्रसाद घ्यावा सत्वर गती । पाक निष्पत्ती जाहली असे ।।७२।। तुम्ही विन्मुख जाल या क्षणीं । तरी सत्त्वाची होईल हानी । प्रपंच परमार्थ अंतरले दोन्ही । आम्हांसि दिसोनि ये ।।७३।। ऐकोनि त्यांचे करुणोत्तर । संकटीं पडला द्विजवर । मग स्नान करोनि सत्वर । पात्रावरी बैसला ।।७४।। देवास नैवद्य दाखवून । घरस्वामिणी वाढी अन्न । संकल्प सोडिला कृष्णार्पण । आपोषणें करावीं ।।७५।। कान्हो पाठकासी म्हणे विप्र । लेंकरूं मारिलें नसतें जर । तरी मी संतोषे साचार । जेवितों पोटभर ये ठाई ।।७६।। तुम्हासी विटाळ पडला पाहे । आणि मजवरी निमित्त आलें आहे । उभयतांचाहि अन्याय । म्हणोनि ठाय वाढिला ।।७७।। परी सत्य सांगतों तुम्हांसी । भोजन न रुचे मजसी । बहुत संकट पडलें त्यासी । मग देवासी आठविती ।।७८।। बहुत संकट जाणोनि तेव्हां । श्रीहरीचा करिती धांवा । पंढरीनाथा देवाधिदेवा । पाव केशवा लवलाहें ।।७९।। बहुत भक्तांचीं काजें । तुवां केलीं गरुडध्वजें । आतां कैसें कळेल तुज । तैसी लाज राखावी ।।८०।। हिरण्यकश्यपु दुराचारी । प्रल्हाद गांजिला नानापरी । तुझा आठव करितां अंतरीं । त्यासी श्रीहरी रक्षिलें ।।८१।। परम कपटी दुर्योधन । करी द्रौपदीचें वस्त्रहरण । धांवा ऐकोनि जगज्जीवन । आलासि धावोन लवलाहें ।।८२।। निजांगें वस्त्रें नानापरी । तीतें नेसविलीं श्रीहरी । ऐसा कृपाळू वैकुंठविहारी । चराचरी ब्रिद गाजें ।।८३।। नंद बुडाला यमुनाजळीं । तो तुवां आणिला तत्काळीं । आमुचें संकट वनमाळी । कां ये काळीं निरसेना ।।८४।। भीमासि विष घालितां जाणा । तो गेला पाताळभुवना । तुझे कृपेनें जगज्जीवना । संकटे नाना निरसती ।।८५।। तूं भयकृद्भयनाशन । ऐसें व्यास मुखींचें वचन । तें असत्य नव्हे कदा जाण । कीर्ती त्रिभुवनीं गातसे ।।८६।।

असो मागील गोष्ट कायसी । कलियुगी पावलासी संतांसीं । रामराय छळितां भानुदासीं । पल्लव शूळासी फुटले ।।८७।। अविंध बेदरीचा राय । तेणें नामा गांजितां पाहें । तुवा येवोनि लवलाहें । जीवविली गाय ते काळीं ।।८८।। पैठणींचे द्विजवर । त्यांनी निषेधिला ज्ञानेश्वर । मग रेडियामुखें साचार । श्रुति अपार वदविल्या ।।८९।। दामाजीपंत अतिउदार । दुष्काळीं लुटिलें धान्य भांडार । मग होवोनि विठो महार । रसद सत्वर भरियेली ।।९०।। राका कुंभार नेणत । मांजरीची पिर्ली घाली आव्यांत । त्याचा धावा ऐकोनि त्वरित । मार्जार पिर्ली जीवविली ।।९१।। ऐसी अपार तुझी ख्याती । प्रेमळ भक्त कीर्तनीं गाती । आम्हांसि पावें तैशा रिती । रुक्मिणीपती विठ्ठला ।।९२।। ऐसा कान्हो पाठकाचा धांवा । श्रवणद्वारे ऐकतां देवा । म्हणे संकट पडलें भक्त वैष्णवा । अघटित माव करावी ।।९३।। तों नवल वर्तलें ते अवसरीं । कूपांतोनि बाळक बाहेरी । धांवत येवोनि ते अवसरीं । पितया शेजारी बैसलें ।।९४।। का ते रीती करुणाकर । ग्रंथासि वर दिधला ।।९५।। विप्रवेष जगजेठी । स्वामीं येवोनि पाठी थापटी । म्हणें महिपती वेगें उठीं । दवंडी पिटी निजमुखें ।।९६।। संतलीलामृत ग्रंथ । श्रवणेंचि पुरती मनोरथ । प्रेमळ परिसोत भाविक भक्त । द्वात्रिंशतितमोऽध्याय गोड हा ।।९७।। अध्याय ।।३२।। ओंव्या ।।९७।। श्रीकृष्णार्पणमस्तु ।। इति श्री संतलीलामृत ग्रंथ द्वात्रिंशतितमोऽध्याय समाप्त ।।



डॉ. सौ. सीता कुलकर्णी (के. विनया), पुणे. विरचित

## श्रीसंत कान्हूराज महाराज कीर्ति-सौरभ (स्तोत्र)

श्री गणेशायनमः । वन्दन तूते श्री गण नाथा । शुभ कार्याचा जो अधिष्ठाता । संत श्रेष्ठ नमविती तूते माथा । असती कर्ता सत् सुखांचा ।।१।। आता नमीत शारदा सुन्दरी । मयुरवाहना शोभते जी खरी । वाग्वीणा सदैव जिचे करी । झंकारीत तीते सदैव ।।२।। सदा कृपेची साऊली । सच्चिदानंद गुरू माऊली । पवित्रतम त्यांच्या चरण कमली । ठेविले शीर्ष अष्टोप्रहर ।।३।।स्तोत्र नायक कान्हुराज । भाली लावून त्यांचे पद रज । करून नमस्कार अब्ज अब्ज । स्तोत्र लिहाया प्रारंभिते ।।४।। तेरावे शतका माझारी । ज्ञानदेव वसती अलंकापुरी । ते समयी पुणे परगण्याभितरी । 'केंदूर' नामे ग्राम एक ।।५।। त्या ग्रामाची ग्राम देवता । केंदराबाई पूज्य माता । ती सदैव जागृत भक्ता करिता । माय माऊली सर्वांची ।।६।। तिचीया कृपे करून । त्या ग्रामी वसे कोणी ब्राह्मण । असे जो कुल शीलवान । ज्ञान संपन्न देवता ।।७।। विठ्ठलाचा परम भक्त । कथा पुराण श्रवणी जागृत । असे मग्न सद्गुरु चिंतनांत । महात्मा कानहुराज नामे ।।८।। अष्टोप्रहर चिंती ईश्वरा । किडा मुंगी मध्ये पाही परमेश्वरा । ज्ञानमार्ग सांगे इतरा । सज्जनांचा परमस्नेही ।।९।। काय वानु तयाचे गुण गान । त्यांची पत्नी चारित्र्य संपन्न । अर्भके असती लहान । महाराजांप्रती तेधवा ।।१०।। जनी पाही जनार्दन । हृदयी बिंबे सेवा भाव म्हणून । अखण्ड ईश्वराचे चिंतन । अहिंसाव्रती सर्वदा ।।११।। सदैव मुखी मधुरावाणी । अवतारी कान्होबा म्हणूनी । सेवार्थ अष्टसिद्धी सर्वजणी । भरिती पाणी त्यांचे घरी ।।१२।। राजपाठक उपनाम । ईश्वरसेवा हेचि त्यांचे काम । तेणे प्रसन्न सदा पुरुषोत्तम । अखण्ड नाम मुखी तयांचे ।।१३।। नित्य चाले ध्यान धारणादी । तैसेचि चाले पूजाअर्चनादी । विन्मुख न जाय अतिथी आदी । सर्व भूती परमात्मा पाहती ।।१४।।जिज्ञासूने जिज्ञासा तृप्त्यर्थ । संत लीलामृत ग्रंथात । साग्र वाचावी हकिगत । सत्यासत्य पहाया कारणे ।।१५।। कीर्ति पसरली कान्होबांची थोर । दर्शना येती संत महंत फार । कान्होबांचा साधा सुधा विचार ।स्तोमा थारा मुळी नसे ।।१६।। अवतारी पुरुष कान्होबा राया । अज्ञान न जाणती महात्म्या या । बोलती ही तर मानवी काया । एकही खूण नसे साधूची ।।१७।। लोक भूलती वरच्या ढोंगा । न जाणती शुद्ध अंतरंगा । लाचावले जे सुखोपभोगा । मायाधीन जे बिचारे ।।१८।। एकदा घडे एक घटना । महा व्याधीने त्रासिले कोणा ब्राह्मणा । साहिल्या त्याने बहु यातना । देव दैव पाहिली भारी ।।१९।। पीडेने त्रासला जीवना । केला निश्चय हअदयीं जाणा । घ्यावे काशी

विश्वेश्वर दर्शना । गंगाजीवना देह समर्पू ।।२०।। जुना काळ जाणिजे सुविचारी । नव्हती तै वाहने मोटारी । पायी जातसे तेधवा यात्री । यातना त्या नवर्णवे ।।२१।। होती ब्राह्मणाची निष्ठा फार । झाला प्रसन्न त्या काशी विश्वेश्वर । दृष्टान्ते सुचवी साचार । केंदूरी जाई कानहू दर्शना ।।२२।। कान्हूराज संत थोर । दर्शन स्पर्शने तयांचतया पार । होईल व्याधी पीडा नरिहार । वन्दी वेगे महापुरुषा ।।२३।। स्वप्नी देखता दृष्टांत । ब्राह्मण विश्वासला तेथ । केली घोड दौड बहुत । केंदूर ग्रामी पातला ।।२४।। तो ब्राह्मण प्रवेशे कान्होबा घरी । तै पूजेमग्न असे अवतारी । साधा वेष त्यांचा खरोखरी । अज्ञाने नोळखी, पीडित तया ।।२५।। पीडित म्हणे स्वमनी । हा तर पूजारी कसचा ज्ञानी । मी काय पाहिले स्वप्नी । वृथा दगदग घेतलीसे ।।२६।।न चर्चिले भस्म अंगास । न धरिले भगव्या वस्त्रास । रुद्राक्ष मालिका न ती गळ्यास । साधू कोण म्हणेल यासी ।।२७।। नव्हे नव्हे हा संन्यासी । बायका पोरे दिसती यासी । मुले तर गलिच्छ या समयासी । माझी पीडा कैसी हरेल हा ।।२८।। येणेपरी मनी तळमळे बिचारा । जो माया मोहे व्यापला सारा । जाऊन भगवन्ताचे द्वारा । तडफडे मीन जलाबाहेरी ।।२९।। श्रीकान्हूराज ज्ञानी पुरुष । अंतर ज्ञाने जाणिले त्यास । प्रेमे कले आथित्यास । ईश स्वरूपासेविती जणू ।।३०।। तेथ खेळती लहान बाळे । अस्वच्छ दिसती ते वेळे । पीडिताचे मनी मळमळे । जाणिले कान्हूराजांनी ।।३१।। बाळे धरिली स्वकरी । जलांत फेकली खरोखरी । ब्राह्मण घाबरे अंतरी । येथ अन्न कैसे घ्यावे ।।३२।। वेळ होता भोजनाची । पाचारी सर्वा पत्नी महाराजांची । साधाया सेवा जनार्दनाची । प्रेमे वाढीत सर्वांते ।।३३।। ब्राह्मण अती संकोचला । म्हणे कैसे करूं भोजनाला । अविचारे फेकीले तुम्हीं पोरांना । जलस्तृप्यंतु झाली ती ।३४।। तै महाराज वदती । बाळे अस्वच्छ झाली होती । स्नानार्थ जळी टाकिली असती । येऊनी बसतील पाटावरी ।।३५।। महाराज बाळांते पाचारिती । बाळांनो या जलाचे वरती । येथ तिष्ठलाअतिथी । तुम्हांवीण जेवेना ।।३६।। उद्गार मुखी निघता क्षणी । बाले बैसली येऊन भोजनी । पीडित आश्चर्यान्वीत झाला मनी । गेला शरण सर्वस्वी स्वामी ते ।।३७।। ब्राह्मणाचा सरला भोग । हस्त स्पर्शे तयाचा रोग । ईशकृपे झाला तो दिव्यांग । क्षमा याची पदोपदी ।।३८।। धन्य धन्य महाराजा । केंदूर निवासी विश्वराजा । राजपाठक कुलोत्पन्न कान्हूराजा । नमन तूते वारंवार ।।३९।। जन कल्याणकारी श्रीधरा । शिखा पिळून निर्मिली जल धारा । भागिरथी नाम तीते ऋषीवरा । अद्यापी साक्ष देतसे ।।४०।। अशा किती एक घटना । विस्तार भयास्तव त्यांना । सोडून आरंभिली प्रार्थना । मनोभावे महाराजांची



।।४१।। तू मुळी निर्गुण निराकार । भक्त कल्याणा सगुण साकार । भेदाभेद रहित सर्वेश्वर । भक्ता सुखदाई खरा ।।४२।। घटी घटी दिसे तुज ईश्वर । वदसी माझेच रूप हे साचार । भेदाभेद तू हरिहरेश्वर । विश्व निवासी निरंजना ।।४३।। तुजवरी जयांचा भाव । त्वया पावसी तू देवाधी देव । वैकुंठ निवासी विश्व देव । तरी सदैव भक्ता रक्षिसी ।।४४।। मंदिर बांधणीचे वेळी । भिंतीवरी असे कान्हु माळी । ढासळे भिंत सायंकाळी । तया अलग दूर ठेविले ।।४५।। हे भगवान भास्करा । आळंदीच्या श्रीज्ञानेश्वरा । तुवा दिलीस समाधी साचारा । कार्तिक वद्य त्रयोदशीस ।।४६।। पाठक अन्ताते नसे पुत्र रत्न । तव सेवा केली रात्रंदिन । हे दीनानाथा तू कृपाळू होऊन । दिधले गुणी कुल दिपक ।।४७।। अद्यापी जागृत देव देवा । मनी धरिता सश्रद्ध भावा । कृष्ण कान्हा तू माधवा । पावशी निज भक्ताते ।।४८।। साक्षात तू ॐ प्रकाश । सच्चिदानंद सर्वेश । भक्त भूषणा द्वारकाधीश । मायातीत सर्वस्वी सदा ।।४९।। हे मधुसूदना अच्युता । हे जगदीश जगन्नाथा । दीन बांधवा करुणा कान्ता । साष्टांग वन्दिते शतशः ।।५०।। जय जय श्रीनारायणा । सुप्रसिद्ध यात्रिक स्मृतिवंदना । वसुन्धरा एकपदे व्यापी वामना । दयाघना भक्त तारका ।।५१।। अनन्त रूपा अनंता । सत्पथाचार लोक नाथा । प्रणव प्रभा विश्वनाथा । ॐ कार ही तूच असती ।।५२।। भूलोकीचा ज्ञान सविता । सनातन दिव्य देवता । पुण्य श्रवण विश्वधाता । माय माऊली कान्हूराजा ।।५३।।सुन्दर तन सुन्दर लोचना । सदा विजयी सुन्दरानना । अमूर्त ते मूर्त रूपा पावना । जगजेठी कान्हूराजा ।।५४।। तव नामा असे अन्त । तव भक्तीचा धरिता पथ । तरले की पातकी अनन्त । ज्ञानार्क ज्ञान भास्करा ।।५५।। कमलपत्र जेवी जलांत । तेवी तूं गृहस्थाश्रमांत । न होसी माया मोही लिप्त । हे बुद्धिमंत बृहस्पती ।।५६।। हे शुभांग शुभ लक्षणा । भक्त वत्सला सत्य ज्ञाना । दुरित हरी मधु भावना । प्रभंजना तिमिर नाशका ।।५७।। हे त्रिलोकात्मा त्रिलोकेश । विश्व विजया श्रीनरेश । पापभंजना त्रिभुवनी ज्ञानेश । भव-भय-हारका ।।५८।। काय वर्णावी मी पामरे । तव अगणित नामे हे मुरारे । सत्संगा, हरि हरेश्वरा । त्रिभुवन कीर्ति कानकहूराजा ।।५९।। ब्रह्मीभूत होशी जरी । वृक्ष दे साक्ष वेळा तीरी । भक्त प्रेमास्तव हे श्रीहरी । राहिलासी मूर्तीमंत ।।६०।। तूं संत श्रेष्ठ मुकुटमणी । मग्न होता तव नामस्मरणी । सरे तापत्रय हर क्षणी । संत शिरोमणी विद्वन्मान्य ।।६१।। जी जी तीर्थे पृथ्वीवरी । तव पदांबुजी वसती सारी । प्रचिती घेता खरोखरी । अनुमूती येत भक्ता ।।६२।। तव दर्शनी हरती पापे तव । तव पूजनी घडती तपे । तीर्थप्राशने जड जीवरूपे । उद्धरती हे संत श्रेष्ठ ।।६३।। अर्चिता तुज मनोभावे । भक्त बैसला

भवसागर नावे । तव कृपे परतीर पावे । याची देही मुक्त ते ।।६४।।तव सेवेत जे गुंतले । तयांचे नाना रोग पळाले । चिंता जाळे न उरले । तरले ते भवसिंधु पार ।।६५।। मार्गशिर्ष पुण्यमासी । वद्य तिथी एकादशी । टाकून पार्थिव देहासी । स्वस्वरूपी लीन झालेती ।।६६।। देह जोखड साचार । सोडिता ते मानव शरीर । कान्हूराज विश्वाकार । एकाकार स्वरूपासी ।।६७।। हे जय जय पुण्य पुरुषा । अज, अव्यय, जगदीशा । परात्परा परेशा । धाव वेगी करुणाकरा ।।६८।। प्रार्थनेत होता लीन । आरंभिले मानस पूजन । मनीचेच साहित्य कल्पून । षोडषोपचारे अर्चिले तुम्हां ।।६९।। पंचामृती घातले स्नान । धूत वस्त्रे केली अर्पण । केशरी गंध लाविले छान । अर्पिले पुष्पहार तुम्हां ।।७०।। पंच पक्वान्ने भोजना । शुद्धोदक ठेविले पाना । तांबूल रूपे शुद्ध भावना । वाहिली तव चरणारविंदी ।।७१।। हे सद्‌गुरुनाथा दयाळा । प्रतिवर्षी सद्भक्त तव सोहळा । प्रेम भरे करिती आगळा । काय वर्णावे त्यांचिया सुखा ।।७२।। येणे परी मन एकाग्र होता । कानहूराज प्रगटे स्नेह भरिता । मम पृष्टी फिरवून हस्ता । प्रेमे बोधिती माते ।।७३।। जीवनांत यात्रांचे महत्त्व फार । 'सरिता' याच मुळी तिर्थे पवित्र । तेथे भेटती संत थोर थोर । संत संगा अती महत्त्व ।।७४।। हे अवघे विश्व आपुले घर । तेथ सर्वत्र वसे ईश्वर । नसे कोणी लहान थोर । मानव धर्म श्रेष्ठ जगी ।।७५।। सर्व भूती पाही ईश्वराते । अगतिक जे पृथ्वी तलाते । मनो भावे सेविता तयाते । प्रसन्न हो जगदात्मा ।।७६।। जरी मनरंजनार्थ प्रभूने । निर्मिली देह वसने । सेविता तया तनमने । प्रसन्न हो परमात्मा ।।७७।।तयाची लीला किती विचित्र । सद् साधूरूपे तोची पवित्र । सर्पादीत ही तोची परत्र । वेगळ्या गुण धर्मी नटे ।।७८।। धनी तोची, तोची नोकर । साव तोचि, तोची चोर । मायेचे घालूनी आवर । कळो नेदी स्वत्त्व कोणाते ।।७९।। न कळे आलो कोठून । जायचे कोठे जाणतो कोण?। मधली स्थिती फक्त भासमान । अतः सावधान राही तूं ।।८०।। जै दुर्जनांची होत सरशी । सज्जन सोशिती छळाशी । तै परमात्मा घे अवताराशी । दुर्जनासी दळावया ।।८१।। जो सज्जनांचा पालक । शरणागताचा तारक । त्रिभुवनाचा रक्षक । सर्व साक्षी परमात्मा ।।८२।। जो अनन्त कोटी ब्रह्मांड नायक । राज राजेश जगच्चालक । राजाधिराज चेतना चेतक । विश्वगुरु स्वामी महाराज ।।८३।। सहस्त्र शीर्षे जयास । तैसेच 'नेत्रबाहू' अशा वर्णनास । करून करती जयघोष । ज्ञानी, तपी, तापसी ते ।।८४।। निष्काम धरावी भावना । सेव-भावी त्या मनमोहना । आळवावे निजानंद पूर्णा । ॐ प्रकाश जो सदासर्वदा ।।८५।। आर्त-आर्त तर व्हावे निरंतरी । सर्व चिंता सोडून सर्वतोपरी । अखंड स्मरावा श्रीहरी



। आत बाहेरी त्यातेची पहावे ।।८६।। हा प्रयत्न करिता नित्य । स्वये आपणची परमात्मा सत्य । अनुभूतीने कळे तथ्य । ध्यानांत धरावे सदा ।।८७।। हा पंचभूतात्मक देह सारा । जीवात्म्याची जाणूनी करा कारा । सभोवती मायेचा पसारा । नेणे अतः 'स्वये मी' कोण ?।।८८।। देहेंद्रिया पलीकडे मन । मनाचे पलीकडे बुद्धी जाण । त्याही पलीकडे परमात्मा ही खूण । ध्यानी धरीजे सदा सदैव ।।८९।। तोच परमात्मा निजांतरी । परब्रह्मरूपे वास करी । जै जीवात्मा मायाजोखडाते सारी । तै तोची पूर्ण 'परब्रह्म' ।।९०।। नाना विधा ज्या योनी । त्यात श्रेष्ठ मनुष्य प्राणी । याच देही होतसे ज्ञानी । स्वस्वरूपी मिळायाते ।।९१।। रहित 'जी' का असूया । तीच जाणिजे अनसूया । इच्छा तृष्णा वासना या । जेथ मुळी न राहती ।।९२।। तै तयाते जाणिजे साधू । त्यासची पटे आत्म बोधू । जो का सदा उपाधी रहितू । वन्दू त्या परब्रह्म रूपा ।।९३।। तै त्या न उरे खेद वा खन्त । देहात्मतेचा जेथ अन्त । जग कल्याणार्थ जयाचा पंथ । क्रमे क्रमे चालिलेच असे ।।९४।। अग्नी जयाते कदा न जाळी । ज्याते न वायु सुकवी । शस्त्र न ज्याते कदा छेदी । अशा स्वरूपी एकरूप तो ।।९५।। कलीयुगी नाम संकीर्तन । सोपे सर्वात साधन । नाही कांही खटाटोप त्या लागून । स्मरणे सरे भव चिंता ।।९६।।गगनांगणी प्रकाशे सूर्यबिंब । जलाशयांत त्याचे प्रतिबिंब । परि जलाशयीचे बिंब । नव्हेची मुळी सूर्य सत्य ।।९७।। तेवी सर्व घटी 'ब्रह्म' परिपूर्ण । 'जो' विश्वी भरलासे परिपूर्ण । त्या 'मी' चे स्वरूप हे जाण । वृथाभिमान शरिरी ।।९८।। विषयांची सोडिजे आसक्ती । परमात्म पदी धरिजे भक्ती । तै मनी उपजे एकान्तिक प्रीति । तै आत्म प्रकाश दीप्ती देखीजे ।।९९।। गुरुचरणी धरावी प्रीति । दिनरात स्मरावे गुरु प्रती । गुरु गुरुविना नसे सद्‌गती । शरणांगती सदैव सेवावी ।।१००।। करित असता बोधामृत पाना । जागृती येत तै मन्मना । सभामंडपी जणू देवराणा । देखिले कान्हूराजाते ।।१०१।। ती अवस्था अवस्थातीत । ते वर्णन वर्णनातीत । मम मती असे असमर्थ । कथाया आनंद बोध तो ।।१०२।। मीठ बाहुली सागरातळी । मापाया उतरे सागर खोली । जाता तळाशी एकरूप झाली । परतली न ती कधीही ।।१०३।। साधके ऐसेची या परी । एकरूपता सुवर्ण अलंकारी । नुरे भेद ज्योत कर्पुरी । तादात्म्य पावावे स्वस्वरूपा ।।१०४।। सारखा गुरुपदांचा ध्यास । मनी पुजावे गुरुपादांबुजास । निरंतर अर्चनास । करिता अन्य प्रयास नुरती ।।१०५।। निजानंद पूर्ण गुरुमाऊली । तीच सत्य सदाकृपा साऊली । मन धुन्द असावे सर्व काळी । अक्षय गुरुचिंतनी ।।१०६।। अनन्त मी अपराधी असता । तत्त्वज्ञान बोधिलेसी तत्त्वता । हे सद्‌गुरु कानहूराजा आता । माय माता

तूच माझी ।।१०७।। श्रीकानहूराज कृपे कीर्ती सौरभावली । श्रीकान्हूराजेच लिहून घेतली । अत: कान्हूराज चरणी अर्पिली । विनम्रभावे विनयाने ।।१०८।। श्रीकान्हूराजार्पणमस्तु । शुभं भवतु । ॐ ॐ ॐ



ब्रह्मचित्कला दर्शन अर्थात् श्री मुक्ताबाई चरित्र व गाथा
लेखक व प्रकाशक श्री निवृत्ती महाराज वक्ते या ग्रंथातील संदर्भ.
प्रकरण ११ ज्ञानेश्वर महाराज समाधी मुद्दा क्र. २२, पेज क्र. ३६०

## समाधिचे कीर्तन कान्होपाठक करतात.

ज्ञानेश्वर महाराजांची समाधी कार्तिक वद्य द्वादशीसह त्रयोदशीला झाली म्हणजे सकाळी एकवीस घटका द्वादशी होती व नंतर म्हणजे दिवसाचे दोन वाजून बारा मिनिटास पुढे त्रयोदशी लागली होती. (त्या दिवसाचा सूर्योदय ५वा. ४८मिनिट) सकाळचे द्वादशीचे कीर्तन कान्हो पाठक केंदुरकर यांनी श्रीसंत नामदेव व श्रीसंत निवृत्तीनाथांचे आग्रहावरून केले. कान्होपाठक केंदुरकरांचे गुरु नागनाथ(नागेश) होते. **कान्हो पाठक आनंदला । सद्गुरु नागेंश भेटला ।।** (केंदुरकरांची द्वादशीची कीर्तनाची पाळी अजूनही आळंदीला चालु आहे) त्यालाच द्वादशीच्या क्षिरापतींचे कीर्तन म्हणतात.ते कीर्तन म्हणजेच समाधीचे त्रयोदशीचे कीर्तन समजावे. पंचांगात त्या दिवशी द्वादशी एकवीस घटका असुन दुपारुन त्रयोदशी दिसून येते. तिर्थीची अमावस्येपर्यंत क्षय-वृद्धि दिलेली नाही. कारण सूर्योदयाला सर्वच तिथी क्रमानें आलेल्या आहेत.

दोन प्रहर पावेतो आटोपले भोजन । तृतीयप्रहरी कीर्तन आरंभिले ।।३।।
कीर्तनाच्या नादे मोहियेला गोविंद । करावा उद्वेग समाधिचा ।।४।।
नामा म्हणे देवा करिता उशिर । विकळ ज्ञानेश्वर जात असे ।।५।।
सर्व स्वस्ति क्षेम वैष्णव मंडळी । बैसलेती पाळी समाधिच्या ।।१।।
पताकाची छाया दुणावली फार । सिद्ध ज्ञानेश्वर तेंव्हा झाले ।।२।।
अजानवृक्ष दण्ड आरोग्य अपार । समाधि समोर स्थापियेला ।।३।।
कोरड्या काष्ठी फुटियेला पाला । तेंव्हा अवधियाला नमस्कारी ।।४।।
मुंग्याचिये विवरी लागलीसे आग । पुढे आणि मागे झाले नाही ।।५।।
राही रुक्माबाई आणि सत्यभामा । ओवाळिती प्रेमा ज्ञानेश्वरा ।।६।।

## महाराजांचे मागील पिढीतील वंशज ब्रह्मलीन राजाभाऊ राजपाठक तथा निजानंदसिद्ध यांनी महाराजांच्या स्तुतीपर केलेले अभंग आणि नमस्कार

**१) कान्हुराज नाम घेता । नाही भीती आम्हा आता ।।१।।**
**कान्हुराज संत श्रेष्ठ । त्यांच्या रूपा नाही अंत ।।२।।**
**कान्हुराज येता ओठी । विघ्ने जाती उठा उठी ।।३।।**
**कान्हुराज म्हणा जरा । दुःखालागी नसे थारा ।।४।।**
**राजा कुळांत जन्मला । सर्व सौख्याने लाधला ।।५।।**
**२) कान्हुराजा आळविता । धन्य झाला हरिपिता ।।१।।**
**कान्हुराजा नित्य गाया । मुक्त झाली राधा आई ।।२।।**
**कान्हुराज गीती गाता । जन्म मृत्यु नाही आता ।।३।।**
**कान्हुराज नित्य स्मरा । हाचि सोपा मार्ग बरा ।।४।।**
**कान्हुराज मारी हाका राजालागी लोटू नका ।।५।।**
**३) कान्हुराज ऐसे नाम । राजालागी हेचि काम ।।१।।**
**कान्हुराज नित्य स्मरणी । मुखी यावे अंतःसमयी ।।२।।**
**कान्हुराज माऊली । जय जय कान्हुराज माऊली ।।३।।**
**भक्तावरती करा हो । राजा वरती करा हो ।।४।।**
**करा हो करा खरी साऊली ।।५।।**

### नमस्कार

**जनी सर्व संती जयाचीच कीर्ती । असूनी प्रपंचात वैराग्य मूर्ती ।**
**झटे नेहमी जीव कल्याण काजा । नमस्कार माझा तया कान्हुराजा ।।१।।**
**सदा विठ्ठलाची करी शुद्ध सेवा । आणि कष्टवी लोक कल्याण जीवा ।**
**प्रतिपादी जो कीर्तनी गूढ गूजा । नमस्कार माझा तया कान्हुराजा ।।२।।**
**करुनी प्रपंचा असे जो विदेही । अतिथी पूजा जो करी नित्य गेही ।**
**काका असे आळवी ज्ञानराजा । नमस्कार माझा तया कान्हुराजा ।।३।।**
**काशीमध्ये जो करी नित्य स्नाना । अरण्यांमध्ये ध्यातसे शांत ध्याना ।**
**भजा हो भजा त्या म्हणे दास राजा । नमस्कार माझा तया कान्हुराजा ।।४।।**
**स्वये पूर्ण तो विश्व तारावयासी । जटी निर्मिले स्वर धूनीचे पयासी ।**
**हरी कीर्तनी तोषवी श्रीवराला । नमो कान्हया पाठक स्वामी याला ।।५।।**
**श्री सद्गुरु वडवाळसिद्ध नागेश भगवान की जय । श्री संत कान्हुराज महाराज की जय ।।**



## गुरुवर्य ह.भ.प.डॉ. नारायण महाराज जाधव यांनी वैशाख वद्य त्रयोदशीला संतश्रेष्ठ कान्होराज महाराज समाधी मंदिरांत महाराजांच्याच अभंगावर केलेले प्रवचन

**गाये तो गाणुं नाचे तो नाचणु । परिसे तो जाणु भेदवादी ।।१।।**
**नव्हे तो संतु योगी ना भक्तु । जो लोकांतु डंव करी ।।धृ।।**
**पढे तो पढता उपलवी भक्ता । कवित्व करितां ख्याती लागीं ।।३।।**
**पाठक कान्हो म्हणे वरदळ लटिकें । जंव जीव सात्त्विकें विनटेना ।।४।।**

संतसम्राट भगवान श्रीज्ञानेश्वर महाराज, वैराग्यराजरसिक जगद्गुरु संतशिरोमणी श्रीतुकोबाराय, शांतिब्रह्म श्रीएकनाथ महाराज, महाराष्ट्रातील सर्व संतांची मांदियाळी, संप्रदायाचे परम आराध्य दैवत श्रीपांडुरंग परमात्मा, या सर्वांच्या अलौकिक, अकारणकरूण, अद्‌भुत, अहेतुकी, अपूर्व, असीम, अशा अनुग्रहामुळे, दयेमुळे ह्या वैशाख मासाच्या पावन पर्वामध्ये तुम्ही आम्ही सर्व जीवंत आहोत, श्वासोच्छवास करीत आहोत आणि समाधी स्थळाची अधिष्ठात्री असणारी संतदेवता संतश्रेष्ठ श्रीकान्होराज महाराज राजपाठक या सर्वांच्या कृपेने या ठिकाणी आपण अंतर्मुखवृत्तीने त्यांच्या चरणकमलाजवळ बसून चिंतन करण्याला प्रवृत्त झालो. मनुष्याचा संकल्प सत्य होईलच असे सांगता येत नाही, आणि त्यानुसार आज या ठिकाणी भगवद् इच्छेनुसार काही नैसर्गिक आपत्ती निर्माण झाली. मात्र **सत्य संकल्पाचा दाता नारायण । सर्व करी पूर्ण मनोरथ ।।** ईश्वराचा संकल्प हा सत्य असतो. म्हणून आपण सत्य संकल्प करावेत कोणत्या ना कोणत्या प्रसंगी भगवंत त्यांची पूर्तता करतो. त्याप्रमाणे या ठिकाणी आज आपण महाराजांचे जे सकलसंत गाथेमध्ये सहा अभंग प्रसिद्ध झालेले आहेत ते, आणि महाराजांची तत्त्वांशप्राकृतगीता, हे महाराजांचे वाङ्मय, ते या पुस्तिकेत दादांनी संकलित केलेले आहे; त्याचबरोबर संतलीलामृतामध्ये महिपती महाराज तहाराबादकर यांनी महाराजांचे चरित्र सांगणारा एक अध्याय लिहिलेला आहे तो, तसेच शांतिब्रह्म श्रीएकनाथ महाराजांचे दोन आणि जगद्‌गुरु तुकोबारायांचा एक अभंग की ज्यामध्ये कोन्होराज महाराजांचा ऊल्लेख त्यांनी केलेला आहे, ते अभंग आहेत. याशिवाय श्रीनिळोबारायांनी चांगदेव महाराज माऊलींच्या भेटीला जात असताना ते केंदूरहून कान्होराज महाराजांना बरोबर घेऊन गेल्याचा ऊल्लेख केलेला आहे त्या अभंगाचा कांहीभाग आणि माऊलींच्या समाधी प्रसंगी कान्होराज महाराजांनी जे कीर्तन केले त्याचे वर्णन ब्रह्मचित्कला मुक्ताबाई या ग्रंथात गुरुवर्य ह.भ.प.श्री. निवृत्ती महाराज वक्ते यांनी केलेला आहे तो भागही या पुस्तिकेमध्ये समाविष्ट केलेला आहे. अशा तऱ्हेने महाराजांचे वाङ्मय आणि संत साहित्यामध्ये महाराजांचा उल्लेख असलेले वाङ्मय या सर्वांचा एकत्रित संग्रह या पुस्तिकेत केलेला आहे, तो कशासाठी? तर असे सांगितले जाते की, **"जननी जन्मभूमिश्च स्वर्गादपि गरियसी ।"** आपली आई आणि आपली जन्मभूमी

ही स्वर्गापेक्षाही श्रेष्ठ आहे. आणि त्या जन्मस्थळाला खरे महत्व येत असते ते त्या भूमीमध्ये जे काही संत-सत्पुरूष होऊन गेलेले असतात किंवा त्या गावामध्ये गावाचे संरक्षण करण्यासाठी ज्या कांही अधिष्ठात्री देवता असतात त्यांच्यामुळे. त्या स्थळाला **''श्री क्षेत्र''** असे संबोधले जाते. **''श्री''** शब्दाचा अर्थ आहे ऐश्वर्याने संपन्न आणि **''क्षेत्र''** शब्दाचा अर्थ आहे **''क्षतात् त्रायते इति क्षेत्रम्''** आपल्या जीवनांत येणारी संकटे, येणारे अपघाताचे प्रसंग यापासून त्रायते म्हणजे संरक्षण केले जाते. म्हणून केंदूर हे केवळ एक गांव नाही, तर महाराजांच्यामुळे ते **''श्री क्षेत्र केंदूर''** झालेले आहे. या ठिकाणी असणारी संत देवता आणि गावची अधिष्ठात्री ग्रामदेवता श्रीकेंद्राईमाता यांचा आपल्यावर अत्यंत अनुग्रह आहे आणि तो अनुग्रह आपल्यावर नित्य होत राहावा त्यासाठी आपण अशा मंदिरांची, समाधीस्थळांची मूर्तिंची सेवा आणि खरे तर त्यांना आवडते ते चिंतन, **'तुका म्हणे देवा । चिंतन हे तुझी सेवा ।।'** आपण या ठिकाणी भजन, पूजन, कीर्तन, नामस्मरण, सत्संग हे ज्यावेळी होतात त्यावेळी त्या स्थानाचे महत्व वाढत असते. त्या ठिकाणी जे वायुमंडळ आहे ते सर्व वायुमंडळ अत्यंत पवित्र होऊन अनेक शतकानुशतके आपल्या परंपरेला आपल्या भावी पिढ्यांना मनोबल, बुद्धिबल, शारिरबल देऊन अंत:करणामध्ये भगवंताची भक्ती वाढवीत असते. आता या ठिकाणी पूर्वीही आम्ही आलेलो आहोत. या ठिकाणी प्रत्येक महिन्याच्या वद्य त्रयोदशीला महाराजांचा मासिक पुण्यतीथी उत्सव साजरा केला जात होता. आता म्हणतात की, तो काही दिवसापासून बंद पडलेला आहे. या ज्या परंपरा आहेत, त्या जर आपणाकडून खंडीत झाल्या तर पुढच्या पिढ्यांना त्याचे काहीच वाटणार नाही. म्हणून तुकाराम महाराज सांगतात- **उपवास पारणीं राखिला दारवंटा । केला भोगवटा आम्हांलागीं । माझ्या वडीलांची मिरासी गा देवा । तुझी चरणसेवा पांडुरंगा ।।तु.गा.।।१२८७।।** आपण कल्पना करा की आळंदी क्षेत्रामध्ये माउलींची जी संजीवन समाधी झाली त्यावेळी महाराजांनी समाधी सोहळ्याचे केलेले कीर्तन, याचा अर्थ हे कान्होराज महाराज किती अधिकारी कोटीतले महात्मे असतील? साक्षात पांडुरंग परमात्मा, निवृत्तीनाथ महाराज, गोरोबा काका, सावता महाराज असे सर्व संत त्या ठिकाणी जमा झालेले, कोणी कीर्तनात चाल म्हटले, कोणी टाळकरी झाले, कोणी मृदंग वाजविला आणि अशा प्रकारची संजीवन समाधी, साक्षात पांडुरंगराया समोर त्यांना इतका मोठा मान मिळाला. अशा या महापुरुषाची सेवा या ठिकाणी अव्याहतपणे व्हायला पाहिजे. त्यासाठी काही कष्ट पडतील. पण महाराजांनी कधी गर्दीचा परमार्थ केला नाही, तर दर्दी लोकांचा परमार्थ केला. म्हणून आपल्या जीवनामध्ये ज्यांना ज्यांना शक्य आहे त्यांनी हा त्रयोदशीच्या उत्सव जो आहे, तो पूर्वीप्रमाणे चालू ठेवायला पाहिजे. अशा परंपरा एकदा का खंडीत झाल्या तर त्यांची पुनर्उभारणी करणे कठीण आहे. इतके मोठे स्थान निर्माण केलेले आहे, या वायुमंडळाचा मोठा प्रकाश आहे. असो, आता मी एक अभंग वाचून दाखविला. असे सहाच



अभंग आहेत महाराजांचे परंतु या सहा अभंगामध्ये तुकोबारायांच्या संपूर्ण चार हजार अभंगांचा आशय आलेला आहे. सर्व संतवाङ्मय, वेद, पुराणे या सर्वांच्या आशयाला कवळ घालणारे असे हे सहा अभंग आहेत. अशी देणगी त्यांनी आपल्याला दिलेली आहे. इतके विशेष चरित्र त्यांनी केले की, काशीमध्ये एक ब्राह्मण जातो आणि तेथे पुराणांत वैष्णवांच्या लक्षणांचे विवरण चालू असते. त्यामध्ये **अद्वेष्टा सर्वभूतानां मैत्रः करुण एव च । निर्ममो निरहङ्कारः समदुःखसुखः क्षमी ।।१३।।** अशी भक्ताची लक्षणे आठ श्लोकामध्ये सांगितलेली आहेत. ती लक्षणे ऐकल्यानंतर त्याला इतके कौतुक वाटते की, खरोखर भक्त किंवा वैष्णव असावा तर असा! तसे पाहिले तर ब्राह्मणामध्ये परस्पराविषयी स्पर्धा, द्वेष असतो. लोक म्हणतात की, दोन ब्राह्मणामध्ये आणि दोन सवतीमध्ये स्पर्धा आणि द्वेष असतो. परंतु तो अधिकारीच इतका मोठा होता की, ती लक्षणे ऐकल्यानंतर त्याच्या डोळ्यासमोर कान्होराज महाराज मूर्तिमंत उभे राहिले. ही सर्व लक्षणे जी भगवद्गीतेत किंवा पुराणामध्ये सांगितलेली आहेत, ती सर्व आमच्या कान्होराज महाराजांच्या मध्ये आहेत असे त्याने तेथे असलेल्या सर्व श्रोत्यांना सांगितले. त्याचे ते बोलणे ऐकून काशीतील एक ब्राह्मण फारच प्रभावित झाला. या कलीयुगात अशा प्रकारचा भक्त असणे संभव नाही अशी त्याची कल्पना होती. मात्र जर असा कोणी असेल तर अशा थोर महात्म्याला आपण प्रत्यक्ष पाहिले पाहिजे असे त्याला वाटू लागले आणि तो महाराजांना भेटण्यासाठी केंदूरला आला. आता विचार करा. तो काळ आजच्या प्रमाणे मोटारी, रेल्वे, विमाने ही साधने तेव्हा नव्हती. काशीवरुन पायी या ठिकाणी येणे कितीतरी त्रासदायक होते. भगवान विश्वेश्वराच्या काशी नगरीतील ब्राह्मण, शिवाय वैष्णव, तोही अत्यंत विद्वान्, तो या ठिकाणी आला. त्याने प्रत्यक्ष अनुभव घेतला. आपणा सर्वांना माहितच आहे की, मुलीला खेळवत बसलेल्या कान्होराज महाराजांना पाहून त्याच्या मनांत विकल्प निर्माण झाला हे पाहून महाराजांनी त्या मुलीला त्याच्या देखत घरातील आडात टाकून दिले. आणि पुन्हा त्याच्याच विनंतीवरून मुलीला हाक मारली त्या बरोबर ती मुलगी विहिरीतून जिवंत बाहेर आली. ईश्वर अनुग्रहाने अशा प्रकारचे सामर्थ्य ज्यांच्या ठिकाणी होते त्या या केंदूर गावामध्ये अशा या क्षेत्रामध्ये तुमचा-आमचा जन्म झाला म्हणून आपल्याला आपली आई जेवढी प्रिय आहे, तेवढीच ही जन्मभूमी प्रिय आहे. जन्मभूमी का प्रिय आहे, तर संतांच्या वास्तव्याने तिचा वैशिष्ट्यपूर्ण गौरव किंवा महात्म्य आहे. म्हणून आपली ही जबाबदारी आहे. जसे तुकाराम महाराज म्हणतात- **''माझ्या वडीलांची मिराशी''** । ही आमची खरी वतनदारी आहे. शेती करणे किंवा व्यवसाय करणे ही खरी वतनदारी नाही. आपली खरी वतनदारी आहे, **तुझी चरणसेवा कान्होराजा!** आपण यथाशक्ती, यथामती आपल्याला काही ना काही या समाधीस्थळाची, केवळ मंदिर बांधणे धनवंताचे काम आहे. त्याने संत प्रसन्न होत नाहीत. दगड-वीटा पेक्षाही येथे असणारी माणसे ही चैतन्यमय आहेत. म्हणून आपल्या पुढच्या पिढीला हा

वारसा प्राप्त व्हावा, संतांचे विचार आपल्या ठिकाणी राहावेत. ही पुस्तिका सुद्धा याच हेतूने प्रकाशित केलेली आहे, ती गावातील सर्वांपर्यंत पोहचावी म्हणून तिचे विनामुल्य वितरण करण्याचा मानस आहे. मी कान्होबारायांच्या गावचा आहे. कान्होबा महाराजांचा अधिकार काय आहे? त्यांचे वाङ्मय काय आहे? त्याचा किमान गावातील लोकांना तरी परिचय व्हावा. अशी त्यांची इच्छा आहे.

असो, आता मी आपल्या पुढे जो महाराजांचा अभंग वाचून दाखविला. असे त्यांचे फक्त सहाच अभंग आहेत. त्या सर्वच अभंगांचे चिंतन पुन्हा काही प्रसंगाने करू, पण आता या ठिकाणी जो अभंग वाचून दाखविला त्याचा थोडक्यात अर्थ सांगतो. **गाये तो गाणुं नाचे तो नाचणु । परिसे तो जाणु भेदवादी ।।१।। नव्हे तो संतु योगी ना भक्तु । जो लोकांतु डंव करी ।।धृ।। पढे तो पढता उपलवी भक्ता । कवित्व करितां ख्याती लार्गी ।।३।। पाठक कान्हो म्हणे वरदळ लटिकें । जंव जीव सात्विकें विनटेना ।।४।।** या ठिकाणी आपण जेव्हा त्रयोदशीचा उत्सव साजरा करतो तेव्हा एकवेळ अन्नदान झाले नाही तरी चालेल. पण ज्याला भजन येते त्याने भजन करावे. ज्याला भजन करता येणे शक्य नाही, त्याने नामस्मरण करावे. ते ही जमले नाही तर परस्परांशी परमात्मविषयक चर्चा करावी. सत्संग करावा किंवा आपल्याला आळंदी येथून जवळच आहे. आम्हालाही आपण काही सेवा सांगितली तर ती सेवा आम्ही येथे येऊन करू शकतो. त्याला काही खर्च नाही. परंतु आपल्या या ज्या परंपरा आहेत त्या आपण जपल्या पाहिजेत. त्या टिकून राहाणे अत्यंत आवश्यक आहे, नाहीतर काही दिवसांनी पुढच्या पिढ्यांना या अभंगांचा अर्थ सुद्धा कळणार नाही किंवा आपले संत किती मोठे होते, आपला वारसा किती मोठा आहे तेही कळणार नाही. आता आपल्याला आपल्या खापर पणजोबांचे नांवही सांगता येणार नाही, पण ७०० वर्षापूर्वी होऊन गेलेल्या कान्होबा महाराजांबद्दल आपल्याला आत्मियता आहे. संतांचा हा जो कांही वारसा आहे, आपण त्यांच्या मांस वंशातील नसलो तरी आपला ज्ञानवंश हा त्यांचाच आहे. म्हणून आपण त्याचे जतन केले पाहिजे. त्यामध्ये कांही लोक भगवंताचे गायन करतात. गायनाचे राग असतात. मेघमल्हार हा एक राग आहे. तो जर योग्य प्रकारे गायला तर आकाशात ढग जमा होतात आणि पाऊस पडू लागतो. इतके ते गायन प्रभावशाली असते. नारद आणि तुंबर यांच्या विषयी असे सांगितले जाते की, जेव्हा त्या तुंबराने गायन केले तेव्हा महर्षी नारदांचा विणा ज्या दगडावर ठेवलेला होता तो दगड वितळला आणि विणा त्या दगडांत रूतून बसला. अशा प्रकारचे गायन करणारे लोक आहेत. किंवा त्याला काय **'दीप'** राग म्हणतात. तो गायल्यानंतर दीप प्रज्वलीत होतात. अशा प्रकारची विद्या आपल्याकडे आहे. जसे गायन आहे तशीच नृत्यकला आहे. त्यामध्ये कथ्थक नावाचे नृत्य आहे. कांहीही न बोलता केवळ नृत्यातून आणि अभिनयातून द्रोपदी वस्त्रहरण, प्रभू रामचंद्रांचा वनवास इत्यादी



पौराणिक घटना त्या नृत्यातून दाखविल्या जातात. अशी आपली नृत्यकला सुद्धा आपल्या भारतीय सनातन संस्कृतीमध्ये अत्यंत विकसीत झालेली आहे. एक काळ असा होता की या विद्यांची फारच भरभराट झालेली होती. आत्ता त्यांचे स्वरूप थोडेसे विडंबनात्मक किंवा हिडीस झालेले आहे. पण तरी सुद्धा या देशात या कला जोपासलेल्या आहेत. खरे तर आपल्या या देशात कला विशेष महत्वाच्या नाहीत. आत्मज्ञान महत्त्वाचे आहे. आणि भक्तांची भक्ती महत्त्वाची आहे. आपल्याकडे असणाऱ्या भजन, कीर्तन, गायन, नृत्य इत्यादी अनेक कलांचे सूक्ष्म निरिक्षण करून त्यांनी सांगितले की, केवळ गायन करणे किंवा भजन रंगामध्ये आपण रंगून जाणे. भजन रंगात आपण नाचतो सुद्धा. **गाये नाचे उडे आपुलीया छंदे । मनाच्या आनंदे आवडीने ।।** कांही लोक त्या गाण्यावरच भर देतात. कांही लोक भजन करताना नृत्यावर भर देतात. गायनाचा किंवा नृत्याचा आनंद ते घेतात. परंतु या कला आपण ज्या परमात्म प्राप्तीच्या उद्देशाने करतो त्या परमात्म्यालाच ते विसरतात. परमात्याचा रंग त्यांच्या त्या कलामध्ये आलेला नसतो. त्या केवळ बाह्य लौकिकाचा भाग झालेल्या असतात. ही गोष्ट ध्यानी घेवून महाराज सर्वांना सांगतात- **''तुका म्हणे मना सांगतो विचार । धरावा निर्धार दिसेंदिस''।। ''नये जरी तुज मधुर उत्तर । दिधला सुस्वर नाही देवे ।। नाही तयाविण भूकेला विठ्ठल । येईल तैसा बोल रामकृष्ण''।।** आपले जसे बोबडे बोल असतील त्या बोलांनी परमात्म्याचे चिंतन करावे. केवळ कलेवर भर देऊ नये. म्हणून कान्होराज महाराज म्हणतात- गाये तो गाणुं । गाये म्हणजे गाणारा, हा गायक आहे. जरी तो गायन करीत असेल तरी ते म्हणतात- **राग आळवितो नाना ।** अनेक प्रकारचे राग आळवतो, परंतु **राग आळवितो नाना । गातो काय ते कळेना ।** आपण कशासाठी गात आहोत तेच विसरून जातो. परमात्म्याला आपले गायन भावपूर्ण वाटले पाहिजे, आवडले पाहिजे. हृदयातून ते असले पाहिजे, मग ते रागात नसले तरी चालेल. म्हणून ते म्हणतात- या ठिकाणी जर एखादा मनुष्य केवळ गायनातच रस घेत असेल तर, गाये तो गाणुं । तो गायनांत रंगलेला आहे, त्याला गाणुं किंवा गायक असे म्हणतात आणि नाचे तो नाचणु । हे जरी गायनाची आणि नृत्याची कला जोपासत असले तरी त्यामुळे त्यांना पारमार्थिक म्हणता येत नाही. त्यांच्या त्या गायनाने किंवा नृत्याने भगवंत त्यांच्यावर प्रसन्न होत नाही. **आणि परिसे तो जाणुं भेदवादी ।** या रीतीने पाहिले तर तो भेदवादी आहे. म्हणजे देवाशी तो एकरूप झालेला नाही. तो भेद म्हणजे देव वेगळा आणि मी वेगळा असे तो पाहतो. तो देवाशी एकरूप होऊन गायन करीत नाही. अभेदाशिवाय देवाशी एकरूप होता येत नाही. देवाशी एकरूप होऊन गायन करता येत नाही. परमात्मा आणि मी एकच आहे. मीच परमात्मा आहे आणि परमात्माच मी आहे, हा अभेद केव्हा येतो? जेव्हां मनुष्य संतांच्या संगतीत वेदांताचे श्रवण करतो, त्यावेळी त्याला आत्मज्ञान होते. माझा आत्मा हाच परमात्मा आहे. मी परमात्म्याहून भिन्न नाही. मी

आणि परमात्मा एकच आहोत, यालाच म्हणतात अभेद. अशा प्रकारची अभेदावस्था प्राप्त झालेली नाही आणि एखाद्याने गायन केले, वादन केले, नृत्य केले तर त्याला गायक, वादक किंवा नाचा म्हणता येईल परंतु त्याला ज्ञानवान म्हणता येणार नाही. त्याला भेदवादी म्हणतात. **परीसे तो जाण भेदवादी ।** जर परमात्म्याला शरण गेला आणि परमात्म्यापासून वेगळा राहिला तर माउली म्हणतात- **मजही शरण रिघिजे । आणि जीवत्वेंचि असिजे । धिग् बोली यिया न लजे । प्रज्ञा केवीं ।। ज्ञा.अ-१८।।१४०२।।** मला शरण आला आणि पुन्हा वेगळा राहिला तर त्याच्या बुद्धीला लाज कशी वाटत नाही. हीच गोष्ट या ठिकाणी कान्होराज महाराज सांगतात. **परिसे तो जाणु भेदवादी ।** जो मनुष्य देवात आणि आपल्यात यत्किंचितही अंतर पहातो तो भेदवादी आहे. आणि जेथे भेद आहे तेथे भय आहे. **द्वैतात भयं भवति ।।** त्याला आयुष्यभर भिती राहाते आणि त्याला पुन्हा जन्म-मरण परंपरेत वारंवार यावे लागते. जोपर्यंत परमात्मा जसा अमर आहे, परमात्मा जसा ज्ञानघन आहे, आनंदघन आहे, त्याच परमात्म्याचा अंश असणारा मी सुद्धा कधीही मरणारा नाही. माझ्याही ठिकाणी अज्ञान नाही. मी स्वयंप्रकाश आहे, दुःख माझ्या स्वप्नांत सुद्धा नाही, मी केवळ आनंदघन आहे. अशा प्रकारचा बोध ज्याला झाला असेल तो खरा अद्वैती आहे किंवा तोच खरा अभेदवादी आहे.

पुढे सांगतात- **नव्हे तो संतु योगी ना भक्तु । जो लोकांतु डव करी ।।धृ।।** कान्होबा महाराजांनी आपल्याला जीवनामध्ये परमार्थ करीत असताना, ज्याप्रमाणे वळणाच्या रस्त्याच्या सुरुवातीला सूचना लिहिलेली असते. ''वेडी वाकडी वळणे, वाहने सावकाश चालवा'' किंवा ''पुढे तीव्र वळण आहे.'' त्याप्रमाणे परमार्थ करायला निघालेल्या साधकांना महाराज धोक्याच्या सूचना देतात, परमार्थाची दिशा, त्याची धारणा कशी असावी हे या अभंगातून सांगतात. असा जो मनुष्य आहे त्याने गायन केले तर आपण भूलून जातो. आपल्याला तो भक्तीत रंगलेला आहे असे वाटते. परंतु महाराज म्हणतात- असा जरी मनुष्य असला आणि त्याचे अंतरंग भगवंताच्या चिंतनांत, अनुसंधानात अखंड नसेल आणि परमात्मा वेगळा आणि मी वेगळा. **मी तव अनाथ अपराधी ।** त्या ठिकाणी मी दुबळा आहे, मी पापी आहे असे त्याला वाटत असेल तर तो खरा भगवंताचा भक्त नाही. म्हणून या ठिकाणी एक गोष्ट आपल्याला सांगितली. वास्तविक केंदूर गावच्या प्रत्येक माणसाला आत्मज्ञान झाले पाहिजे. कारण केंदूरला आत्मज्ञानाची परंपरा आहे. म्हणून आपल्याला जरी हे सहाच अभंग आहेत असे वाटत असले तरी, त्यामध्ये त्यांनी मनुष्य जीवनासाठी काय सांगितले? ते म्हणतात- असा जर पुरुष असेल बाह्यात्कारी, बहिरंग वृत्तीचा पुरुष, लोकांनी आपल्याला पारमार्थिक म्हणावे म्हणून त्याच्या बाह्य क्रिया भक्ताप्रमाणे दिसत असल्या, तरी महाराज म्हणतात- **नव्हे तो संतु ।** तो संत नाही. **नव्हे तो योगी ।** तो योगी सुद्धा नाही. आणि **नव्हे तो भक्तु ।** तो भक्तही नाही. याचा अर्थ योगी, संत आणि भक्त



यांची लक्षणे वेगवेगळी आहेत. केवळ माळ घातली, गंध लावतो किंवा भजनाच्या रंगात नाचताना दिसतो, गायन करतो, म्हणून तो भक्त झाला, म्हणून तो योगी झाला, म्हणून तो संत झाला असे नाही. या ठिकाणी भक्ताची लक्षणे आहेत. **भक्त ऐसे जाणा जो देहीं उदास । गेले आशापाश निवारूनि ।। विषय तो त्यांचा झाला नारायण । नावडे जन धन माता पिता ।।धृ।। निर्वाणीं गोविंद असे मागेंपुढे । कांहींच सांकडे पडों नेदी ।।३।।** ज्याला आपल्या देहाची चाड नाही, भक्तीच्या रंगात ज्याला जागृती, स्वप्न आणि सुषुप्तींचेही स्मरण होत नाही. त्याचे मन जे आहे ते रात्रंदिवस भगवद्चरणांच्या ठिकाणी रंगलेले आहे, त्याला म्हणतात भक्त. या ठिकाणी **भक्त म्हणविता वाटे गोड । परी भक्ती मुद्रा अति अवघड ।।** भक्त म्हणवून घ्यायला माणसाला बरे वाटते परंतु आपण भक्त आहोत असा परमात्म्याचा शिक्का आपल्यावर पडला पाहिजे. देवाने आपल्याला भक्त म्हटले पाहिजे. नाहीतर हा जो पुरुष आहे याला जर संत म्हणत असले तरी संत कोणाला म्हणतात- **संत तोचि जाणा जगी । दया क्षमा ज्याच्या अंगी ।।** अंतःकरणांत दया आहे. किंवा **तेचि संत तेचि संत ज्याचा हेत विठ्ठली ।। नेणती कांही टाणा टोणा । नामस्मरणा वाचोनी ।।** रात्रंदिवस नामस्मरणांत रंगलेले आहेत तेच संत आहेत. त्यांच्या अंतःकरणांत दया आणि क्षमा आहे तेच संत आहेत. योगी जरी असला, योगी कोणालाही नाही म्हणता येत, प्राणायाम करतो, आसन घालतो एवढेच पुरेसे नाही. **योगी पावन मनाचा । साहे अपराध जनांचा ।।** लोकांनी जरी अपराध केला, गुन्हा केला तरी त्याचे मन इतके पवित्र आहे की, तो त्यांचे अपराध क्षमा करतो, **मधूरा वाणी ओठी । तुका म्हणे वाव पोटी ।।** अपकार सहन करतो एवढेच नाही तर अपकाऱ्यावरही उपकार करतो. त्याला म्हणतात योगी. नुसता प्राणायामादि करतो, एकांतात बसतो, आसन घालतो त्याला आम्ही योगी म्हणत नाही. या ठिकाणी योगी म्हणजे परमात्मप्राप्तीसाठी, जो साधना करण्यात तत्पर आहे. तोच योगी आहे. मग ही लक्षणे नसतील तर- **नव्हे तो संतु योगी ना भक्तु ।** तो संतही नाही, योगीही नाही आणि भक्तही नाही. का बरे? तो तर भजन करताना दिसतो. महाराज म्हणतात- जरी तो भजन करताना दिसत असला तरी, **भजन ते ओंगळवाणें नरका जाणे चुकेना ।** त्याने कितीही भजन केले तरी तो नरकाला गेल्याशिवाय राहाणार नाही. मग तो भक्त नाही म्हणायचा का? महाराज म्हणतात- **जो लोकांतु डंव करी ।** म्हणजे लोकांनी त्याला भक्त म्हणावे या हेतूने तो **'डंव'** करी म्हणजे **'दांभिकपणा'** करतो. दांभिक शब्दाचा अर्थ आहे, आंत अंतःकरणांत एक भावना आहे आणि बाहेर दाखवितो मात्र दुसरी. असे जर असेल तर कान्होराज महाराज म्हणतात- तो भक्त नाही, यागीही नाही आणि संतही नाही. तुकोबाराय देवाशी भांडतात- **करिसी तें देवा करीं माझें सुखें । परि मी त्यासी मुखें न म्हणे संत ।।१।।२६२।।** या ठिकाणी काय वाटेल ते मला कर, पण मी जो संत नाही, जो केवळ दांभिकपणा करतो, म्हणजे वर-वर संत असल्याचे लोकांना

भासविण्याचा प्रयत्न करतो. लोकांनी आपल्याला संत म्हणावे, आपली लोकांत कीर्ति व्हावी, त्याला भगवंताच्या प्राप्तीची चाड नाही, तर लौकिकाची आणि किर्तिची चाड आहे असा जो मनुष्य आहे **जो लोकांतु डंव करी ।** म्हणजे दांभिकपणा करतो. तुकोबारायांना हे आवडत नाही. ते म्हणतात- **हित व्हावें तरी दंभ दुरी ठेवा । चित्त शुद्ध सेवा देवाची हे ।।१।। आवडी विठ्ठल गाइजे एकांतीं । अलभ्य ते येती लाभ घरा ।।धृ।।** लोकांसाठी परमार्थ नाही, तर देवासाठी देवाची उपासना करायची. आणि या लोकांच्या ठिकाणी असे दिसते. **पढे तो पढता उपलवी भक्ता ।** थोडासा अभ्यास करतात आणि त्यांना वाटते जणू कांही मला देवाचा साक्षात्कारच झालाय. चार ग्रंथ वाचलेले आहेत. पण महाराज म्हणतात- **पढे तो पढता ।** त्याला काय म्हणायचे? पढीक पंडीत आहे, पुस्तकी ज्ञान त्याला झालेले आहे. चार पुस्तके आली आणि एखादा साधा भोळा भक्त जर भावाने परमात्म्याचे नामस्मरण, चिंतन, ध्यान करीत असेल तर तो म्हणतो हा अडाणी आहे. ह्याचा अभ्यास झालेला नाही, मग म्हणतात- **उपलवी भक्ता ।** त्या भक्ताला तो काय करतो? तर त्याला दुषण देतो, त्याला कमी लेखतो. स्वतःला श्रेष्ठ आणि भक्ताला कनिष्ठ समजतो. शास्त्राचा कितीही अभ्यास केला तरी शास्त्र काय सांगते? **वेद अनंत बोलिला । अर्थ इतुलाचि शोधिला ।।१।। विठोबासी शरण जावें । निज निष्ठा नाम गावें ।।धृ।। सकळशास्त्रांचा विचार । अंतीं इतुलाचि निर्धार ।।३।। अठरा पुराणीं सिद्धांत । तुका म्हणे हाचि हेत ।।४।।** वेदांचा अभ्यास केला तर वेद सांगतात, विठोबासी शरण जावें निज निष्ठा नाम गावें । तुम्ही अंतःकरणपूर्वक परमात्म्याचे नामस्मरण करा. आता भोळा भक्त काय म्हणतो? सगळी शास्त्रें हेच सांगतात, सगळी पुराणें हेच सांगतात, तर कशाला पुराणे वाचायची? मी सारखा विठ्ठल विठ्ठल म्हणेन. वास्तविक त्याचे खरे आहे. आणि हा सगळी शास्त्रे वाचतो पण शास्त्रांनी जे सांगितलेले आहे त्याचे अनुष्ठान मात्र करीत नाही. म्हणून महाराज म्हणतात- असा जो पुरुष आहे तो, **पढे तो पढता ।** तो पढीक पंडीत आहे आणि उपलवी भक्ता म्हणजे पुन्हा भक्ताला कमी लेखतो, असा जो आहे, तो कधी कधी काव्य करतो. वास्तविक पहाता तुकोबारायांनी केलेले अभंग आहेत आणि ज्ञानोबारायांनी ज्ञानेश्वरी ओवी छंदात केलेली आहे. परंतु माउलींनी केलेल्या ओवी नंतर जर कोणी ओवी करील तर नाथ महाराज म्हणतात- **ज्ञानेश्वरीपाठीं । जो ओवी करील मऱ्हाटी । तेणें अमृताचे तार्टी । जाण नरोटी ठेविली ।।** त्याने अमृताच्या ताटांत नरोटी ठेवल्यासारखे आहे. त्याप्रमाणे कांही लोक कवित्व करतात. पण ते कशासाठी? तर महाराज म्हणतात- **कवित्व करीती ख्यातीलार्गी ।।** ख्याती म्हणजे प्रसिद्धी व्हावी म्हणून कवित्व करतात आणि नामस्मरण करणाऱ्या भोळ्या भाविकांना मात्र कनिष्ठ आहे, भोळा आहे, साधा आहे असे म्हणतात. परंतु महाराज म्हणतात- **पाठक कान्हो म्हणे वरदळ लटिकें ।** अशा प्रकारचा केलेला वरपांगी परमार्थ, तो सगळा लटका आहे. मिथ्या आहे.



तर आता सत्य परमार्थ तरी कोणता? तर सांगतात- **जंव जीव सात्त्विकें विनटेना ।।** जो पर्यंत जीव सात्त्विक सुखाला प्राप्त होत नाही किंवा सत्त्वगुणात्मक साधना करीत नाही, त्याचे संपूर्ण जीवन जो पर्यंत सत्त्वगुणयुक्त होत नाही, त्याच्यातील सत्त्वगुण वाढून त्याच्यातील रजोगुण व तमोगुण नष्ट होत नाहीत, तो पर्यंत त्याचा परमार्थ लटका आहे. याचा अर्थ माणूस परमार्थ मार्गात आल्यानंतर त्याचा तमोगुण कमी व्हायला पाहिजे. रजोगुण झडून जायला पाहिजे आणि सत्त्वगुण उत्तरोत्तर वाढायला पाहिजे. तमोगुणाची काय लक्षणे सांगितली? **तमस्त्वज्ञानजं विद्धि मोहनं सर्वदेहिनाम् ।** तो मनुष्य अज्ञानांत राहातो, त्याला कांही सुचत नाही. जसा मंद अंधकारांत दोरीवर साप भासावा त्याप्रमाणे त्याला चांगले असलेले वाईट दिसते आणि वाईट असलेले चांगले दिसते. कायम आळस, कायम झोप अशा प्रकारचे गुण त्याच्या ठिकाणी असतात तो तमोगुणी आहे. आणि रजोगुणी पुरुष जो आहे. त्याला इतकी तृष्णा असते की, पायाला भोवरा बांधून, झोप जरी नसली तरी चालेल परंतु रात्रं-दिवस धन, पुत्र, वैभव, कीर्ति यांच्या पाठीमागे तो लागलेला असतो. **रजो रागात्मकं विद्धि तृष्णासङ्गसमुद्भवम् ।** त्याला मुलखाची आसक्ति असते आणि अतिशय तहान म्हणजे तृष्णा असते. जगातील सर्व सोने त्याला दिले तरी त्याला वाटते की, इतरांच्या घरी थोडे-फार तरी अजून राहिलेले असेल. **तैसी तृष्णा वाढिनलिया । मेरूही हाता आलिया । तरी म्हणे एखादिया । दारूणाहि वळघो ।।ज्ञा.१४.१६४।।**असा जो आहे, तो रजोगुणी पुरुष आहे. आणि सत्त्वगुणी जो पुरुष आहे, त्या सत्त्वगुणी पुरुषाचा आहार वेगळा असतो, त्या पुरुषाचा विहार वेगळा असतो. **सत्त्वात्सञ्जायते ज्ञानं** त्या सत्त्वगुणी पुरुषाला हे ज्ञान होऊ शकते. त्याचा आहार सुद्धा वेगळा आहे. रजोगुणी पुरुषाचा आहार वेगळा आहे. तमोगुणी पुरुषाचा आहार वेगळा आहे. रजोगुणी पुरुषाचा आहार कोणता आहे? **कट्वम्ललवणात्युष्णतीक्ष्ण-रूक्षविदाहिनः । आहारा राजसस्येष्टा दुःखशोकामंप्रदाः ।।भ.गी.।।१७।।९।।** हा रजोगुणी पुरुषाचा आहार आहे. अशा पुरुषाला दुःख, शोक आणि अनेक रोग होतात. आणि तमोगुणी पुरुषाचा आहार- **यातयामं गतरसं पूति पर्युषितं च यत् । उच्छिष्टमपि चामेध्यं भोजनं तामसप्रियम् ।।भ.गी.।।१७।।१०।।** त्याला मांसाहार, मद्यपान अशा प्रकारचा तामस आहार तो भक्षण करतो. त्या पुरुषाला इहलोकातही सुख मिळत नाही व परलोकातही सुख मिळत नाही. सत्त्वगुणी पुरुषाचा आहार- **आयुःसत्त्वबलारोग्यसुखप्रीतिविवर्धनाः । रस्याः स्निग्धाः स्थिरा हृद्या, आहाराः सात्त्विकप्रियाः ।।भ.गी.।।१७।।८।।** हा आहार आयुष्य वाढविणारा आहे. अंतःकरणाची शुद्धी करणारा आहे. बल वाढविणारा आहे. आरोग्य वाढविणारा आहे. मनुष्याच्या ठिकाणी प्रेमाचा, आनंदाचा व्यवहार वाढविणारा आहे. आणि **रस्याः स्निग्धाः स्थिरा हृद्या, आहाराः सात्त्विकप्रियाः ।।** आहार सात्त्विक पाहिजे. कारण काय? **जोवरी सात्त्विके विनटेना ।**

मनुष्य जसे अन्न खातो, तशा प्रकारचे त्याचे मन तयार होते. खाल्लेल्या अन्नाचा जो स्थूल भाग आहे त्यापासून मल तयार होतो. मध्यम भाग जो आहे त्यापासून आपल्या शरीरातील रस रक्तादी धातू निर्माण होतात. आणि आन्नाचा जो सूक्ष्म भाग आहे त्यापासून माणसाचे मन तयार होते. तेव्हा आपले मन जर सात्त्विक व्हायचे असेल तर त्यासाठी सात्त्विक आहार सेवन केला पाहिजे. हीच गोष्ट कान्होबा महाराज सांगतात- **जंव जीव सात्त्विके विनटेना ।** सात्त्विक गुणाने जीव विनटला म्हणजे शोभला नाही तो पर्यंत बाकीच्या कितीही गोष्टी करीत असला तरी महाराज म्हणतात- **कान्हो पाठक म्हणे वरदळ लटिके ।** ते वरपांगी आहे. ते सर्व खोटे आहे. हा महाराजांच्या वाङ्मयातील पहिलाच अभंग आहे. पुस्तिकेतही तो प्रथमच दिलेला आहे. मनुष्य परमार्थाला निघाल्यानंतर, ज्याप्रमाणे माणसाने आरसा पाहिला आणि त्याच्या लक्षात आले की, आपल्या कपाळावरील गंध वाकडा आहे. तर तो कोठे सरळ करतो? आपल्या कपाळावर सरळ करतो. तसे हे जे सहा अभंग आहेत त्यांच्याकडे आपण आरशासारखे पाहिले आणि आपल्या जीवनांत चालू असलेली परमार्थ साधना कोठे चुकते हे समजून घेवून त्याप्रमाणे आपल्या साधनेत सुधारणा केली तर समजायचे की, महाराजांची आपणावर कृपा झालेली आहे. आणि जर कांही कमी पडत असेल तर समजायचे की, अजून आपला अधिकार कमी पडत आहे. त्यामुळे कृपा होत नाही. त्यांच्या कृपेचा तर वर्षावच चालू आहे परंतु या ठिकाणी दाता देणारा असला आणि आपली झोळी जर फाटकी असली तर तिच्यांत कांही रहात नाही. म्हणून आपल्या जीवनामध्ये हा साधा एक अभंग, साधा म्हणण्याचा अर्थ खूप महान आहे. परंतु आपल्याला दिसायला वर-वर मातृभाषेत मायबोलीत **गाये तो गाणुं नाचे तो नाचणु । परिसे तो जाणु भेदवादी ।।१।।** हे सगळे शब्द आपल्या परिचयाचे आहेत परंतु त्यांचा अर्थ गहन अशा स्वरूपाचा आहे. भक्त म्हटला तर देहावर उदास असला पाहिजे. संत म्हटला तर नामस्मरणांत रंगलेला असला पाहिजे. योगी म्हटला तर त्याच्या अंतःकरणांत दया, क्षमा असली पाहिजे. तोच योगी आहे, तोच भक्त आहे, तोच संत आहे. आपल्याला संत बनायचे आहे, आपल्याला योगी बनायचे आहे. आपल्याला भक्त बनायचे आहे. याचा अर्थ कान्होबा महाराजांना अभिप्रेत असणारी सगळी लक्षणे आपल्या जीवनांत मरण्याच्या अगोदर एक क्षण का होईना आपल्याला आपल्या जीवनांत आणायची आहेत. अशा प्रकारचा जर आपण विचार केला तर बाहेरच्या लोकांच्यात आपल्याला कीर्ति मिळेल किंवा नाही, आपले आयुष्य किती राहिल? आपल्याला रोग होतील. सगळे सामान्य लोकांप्रमाणे होईल. परंतु आपल्या आंत सुखाचा समुद्र उसळत राहिल. तसेच कान्होबा महाराजांच्या जीवन चरित्राचा आणि तत्त्वज्ञानाचा आपल्याला आनंद घेता येईल. महाराज म्हणतात की, आपले अंतःकरण सात्त्विक असले पाहिजे. याचा अर्थ माणसाने कोणतीही क्रीया करताना आपला रजोगुण वाढत चालला, तमोगुण वाढत चालला का सत्त्वगुण वाढत चालला याचा विचार करावा.



७०० वर्षापूर्वी एका खेड्यामध्ये रहात असताना इतक्या सिद्धी, विहिरीमध्ये बालक टाकावा आणि पुन्हा हाक मारल्यावर तो जीवंत परत यावा असे असताना ते रिद्धी-सिद्धींच्या नादी लागले नाहीत. रिद्धी-सिद्धींना ते भाळले नाहीत. प्रसंग पडला काशीवरून भगवान विश्वेश्वरांनी पाठविलेला कोणी साधु महात्मा होता तेवढ्यापूरताच चमत्कार केला. चमत्कार करणे हे गारूड्याचे काम आहे. संतांचे काम नाही परंतु असे असले तरी त्या काळामध्ये चमत्काराशिवाय नमस्कार नाही. म्हणून माउलींनी रेडा बोलविला, भिंत चालविली परंतु २२ वर्षे तेच करीत बसले नाहीत. तसे कान्होराज महाराजांनी एक आपले अलौकिक सामर्थ्य भगवंताच्या कृपेने आणि तपस्येने जीवात्मा कसे प्राप्त करून घेऊ शकतो एवढ्यापुरतेच दाखविले. कान्होराज महाराज हे चमत्कारामुळे मोठे नाहीत, तर त्यांनी हे जे वाङ्मय आपल्याला दिलेले आहे त्या वाङ्मयाने आणि त्यांनी जे आदर्श जीवन चरित्र घडविले त्यामुळे ते महापुरुष आहेत, संत आहेत, योगी आहेत, भक्त आहेत. आणि याच गावात जन्म कशासाठी घेतला? येथून पुढच्या असणाऱ्या ज्या परंपरा, जसे आपण दिंडीत जातो. अनेक परंपरा अध्यात्माच्या, वारकरी संप्रदायाच्या अशाच प्रकारे अव्याहत निर्विघ्नपणे प्रवाहित होत रहाव्यात, चालत रहाव्यात ही सर्व जबाबदारी आपल्यावर आहे. म्हणून या ठिकाणी प्रत्येकाच्या हृदयांत असा भाव निर्माण झाला पाहिजे की, ही जी त्रयोदशी महिन्यातील एक दिवस आहे. या दिवशी कान्होराज महाराजांच्या चरणांजवळ हजेरी द्यायची. संतांच्या संगतीत कांही थोडे श्रवण करायचे, त्यासाठी मोठ-मोठ्या पंगतीच दिल्या पाहिजेत असेही नाही. लोक कमी आले तरी काही हरकत नाही. आपण घरी भाकरी खातच असतो. घरी जेवण करून येथे आले तरी चालेल. घरून डबा आणून येथे खाल्ला तरी चालेल. असे वाटले पाहिजे की कान्होबाराय मोठे आहेत, जेवण मोठे नाही. व्यवस्था मोठी नाही, यापेक्षा आपली सेवा त्यांच्या चरणी रूजू व्हावी. एक माळ तरी जप करावा. ज्याला कीर्तन, प्रवचनाला येणे शक्य नाही त्याने दिवसभरात जेव्हा वेळ मिळेल तेव्हा का होईना येथे येवून महाराजांच्या चरणावर नतमस्तक होऊ, कांही चिंतन करू, ज्ञानेश्वरीचा एखादा अध्याय वाचू किंवा त्यांच्या समोर बसून प्रार्थना करू. लहान मुलापासून ते वृद्धांपर्यंत प्रत्येकाच्या अंतःकरणांत वाटले पाहिजे की, आज त्रयोदशीचा दिवस आहे. हा दिवस आपल्या जीवनांतील महत्त्वाचा दिवस आहे, सेवेचा दिवस आहे आणि अशी निष्ठा बनण्यासाठी कितीही प्रसंग आले तरी किमान मी समाधीवर डोके टेकवून येईन अशा प्रकारची भावना वृद्धींगत व्हायला पाहिजे. गावामध्यें कांही स्पर्धा, कलह असतात, त्यांचा आणि कान्होबारायांचा कांहीच संबंध नाही. त्यांच्या छत्राखाली आपण सर्व एकाच आईची लेकरे आहोत, अशी भावना असावी. जरी कांही लोक आता येथे सम्मिलीत होताना आप-पर भाव किंवा भेद-भाव करीत असतील तरी आपल्या अंतःकरणांत एक आदर्श भावना असली पाहिजे. कान्होबारायांपेक्षा या जगात कोणीच मोठे नाही, म्हणून मी त्यांची सेवा केल्याशिवाय राहाणार नाही. अशा प्रकारची सद्बुद्धी त्यांनी

आपणा सर्वांना द्यावी. या ठिकाणी त्यांच्या सत्तेतून अशा प्रकारची प्रार्थना करू की, **सर्वेऽत्र सुखिनः सन्तु सर्वे सन्तु निरामयाः । सर्वे भद्राणि पश्यन्तु मा कश्चिद्दुःखमाप्नुयात् ।। सर्वेऽत्र सुखिनः सन्तु** याचा अर्थ- सर्वजन सुखी असोत. **आकल्प आयुष्य व्हावें तयां कुळा । माझिया सकळां हरिच्या दासां ।।१।। कल्पनेची बाधा न हो कोणे काळीं । ही संतमंडळी सुखी असो ।।२।।** अशा प्रकारे. सर्वे संतु निरामयाः । सर्व लोक निरोगी असोत. सर्वे भद्राणि पश्यन्तु सर्वांना चांगल्या गोष्टी पहायला, ऐकायला मिळोत. आणि मा कश्चित दुःखमाप्नुयात् । कोणाच्याही वाट्याला दुःख न येवो. अशा प्रकारची प्रार्थना श्रीसंत कान्होराज महाराजांच्या चरणी, माउलींच्या सत्तेतुन माउलींच्या चरणी करून या ठिकाणी चिंतनाला पूर्णविराम देऊ. पुंडलिक वरदा हरि विठ्ठल । श्री ज्ञानदेव तुकाराम. ज्ञानेश्वर महाराज की जय. जगद्गुरु तुकाराम महाराज की जय. संतश्रेष्ठ कान्होराज महाराज की जय.

आतां, विश्वात्मकें देवें । येणें वाग्यज्ञें तोषावें । तोषोनि, मज द्यावें । पसायदान हें ।।९४।। जे- खळांची व्यंकटी सांडो । तया सत्कर्मी रती वाढो । भूतां परस्परें पडो । मैत्र जीवाचें ।।९५।। दुरिताचें तिमिर जावो । विश्व स्वधर्म-सूर्यें पाहो । जो जें वांछील, तो तें लाहो । प्राणिजात ।।९६।। वर्षत सकळमंगळीं । ईश्वरनिष्ठांचीं मांदियाळी । अनवरत, भूमंडळीं । भेटतु या भूतां ।।९७।। चलां कल्पतरूंचे आरव । चेतना चिंतामणीचें गांव । बोलते जे अर्णव । पीयूषाचे ।।९८।। चंद्रमे जे अलांछन । मार्तंड जे तापहीन । ते सर्वांही, सदा, सज्जन । सोयरे होतु ।।९९।। किंबहुना? सर्वसुखीं । पूर्ण होऊनि, तिहीं लोकीं । भजिजो आदिपुरुखीं । अखंडित ।।१८००।। आणि ग्रंथोपजीविये । विशेषीं लोकीं इयें । दृष्टादृष्टविजयें । होआवें, जी ।।१।। येथ म्हणे श्रीविश्वेशरावो । हा होईल दानपसावो । येणें वरें ज्ञानदेवो । सुखिया जाला ।।२।।



चैत्र व. १३ शुक्रवार दिनांक १४/०४/२०१८ रोजी सायंकाळी ७.०० ते ९००
संतश्रेष्ठ कान्होराज महाराजांच्या मासिक समाधी सोहळ्या निमित्त
ह.भ.प. नरहरी महाराज सांगळे यांनी केलेले कीर्तन.

**२. कान्हो जन्मूनिया उत्तम कुळीं । केली संसाराची होळी ।।१।।**
**पैका जमूनिया फार । पोशी दारा आणि कुमर ।।२।।**
**सदा निंदी साधुसंता । नेणे धर्म कर्म व्रता ।।३।।**
**कान्हो पाठक कथितो नर। अंती भोगी नरक घोर ।।४।।**

कैवल्य साम्राज्य चक्रवर्ती माउली महावैष्णव ज्ञानोबारायांच्या कृपाशिर्वादाने प्राप्त झालेल्या या सेवेकरीता निवडलेला अभंग महान भगवद्भक्त वैराग्याचे मूर्तीमंत पुतळे म्हणायला काहीच हरकत नाही अशा संतश्रेष्ठ कान्होराज महाराज राजपाठक यांच्या अभंग संहितेतील उत्कृष्ट अशा प्रकारचा सर्व केंदुरकरांच्या पाठात असणारा चार चरणांचा अभंग या ठिकाणी सेवेसाठी निवडलेला आहे.

अभंगाची पूर्वपिठीका अशी- कान्होराज महाराज ज्या काळांत समाजाला उपदेश करीत होते, समाजाला आत्मसन्मुख करण्याचा प्रयत्न करीत होते त्यावेळी अनेकदा उपदेश करूनही समाजामध्ये अपेक्षित असणारा बदल होत नाही असे त्यांच्या लक्षात आले. त्याचे कारण समाज हा केवळ पैसा गोळा करण्याच्या मागे लागलेला आहे असे त्यांच्या लक्षांत आले. **पैका जमूनिया फार । पोशी दारा आणि कुमर ।।२।।** झोपेतून उठल्यापासून ते पुन्हा झोपेत जाईपर्यंत ते पैसा कसा मिळवायचा याचाच विचार करीत आहेत, एवढेच नाही तर झोपेतही त्यांना पैशांचीच स्वप्ने पडतात. म्हणून मी सांगत असलेले ज्ञान आणि शास्त्रसिद्धांत त्यांना समजत नाहीत. ज्याप्रमाणे संजय धृतराष्ट्राला सांगत असलेले गीतेचे तत्त्वज्ञान धृतराष्ट्राचे संजयाकडे लक्ष नसल्याने समजत नाही. माउली म्हणतात- **तेथ संजयें माथा तुकिला । अहो अमृताचा पाऊस वर्षला । की हा येथ असतुचि गेला । शेजिया गावां ।।९।।५२३।।** संजय सांगतो- भगवान श्रीकृष्ण अर्जुनाला गीतेचे तत्त्वज्ञान सांगत असताना अमृताचा वर्षाव होत होता, परंतु धृतराष्ट्राचे तिकडे लक्षच नव्हते. उलट तो संजयाला विचारतो- अरे तुला हे कोणी सांगायला सांगितले? **माझी अवसरी ते फेडी । सांगे विजयाची गुढी ।।** संजया अरे विजय कोणाचा होणार आहे ते सांग. व्यासांनी तुला येथे कशासाठी बसविले आहे? मला ज्ञान सांगण्यासाठी नाही, तर या कौरव-पांडवांच्या युद्धात सरशी कोणाची होणार आहे ते मला सांगण्यासाठी. तेव्हां संजयाच्या लक्षांत अले की, हा धृतराष्ट्र ज्ञानाचा अधिकारी नाही. म्हणून ह्याला ज्ञान सांगून उपयोग नाही. त्याप्रमाणे कान्होराज महाराजांच्याही लक्षात आले की, मी या लोकांना उपदेश करीत आहे, मी

ह्यांना ह्यांचे हित कशात आहे ते सांगत आहे परंतू त्यांचे याकडे लक्ष नाही. केवळ पैसा कमविण्याकडेच यांचे लक्ष आहे. बरे पैसा कमवितात त्याचा विनियोगही हे धर्मासाठी करतात काय? नाही! आळंदी-पंढरपूरला जातात काय? नाही! अखंड हरिनाम सप्ताहाचे आयोजन करतात काय? नाही! आता या मंदिराचा रंग निघून गेलेला आहे, त्याला रंग द्यावा असे यांना वाटते काय? तर नाही. मग काय करतात- **पोशी दारा आणि कुमर ।** कपाट उघडले तर एक नाही पन्नास साड्या! हे मी म्हणत नाही तर मी महाराजांच्या अभंगाचा अनुवाद करीत आहे. यावर कोणाला कांही शंका असेल तर त्यांने महाराजांना विचारावे, महाराज! तुम्ही असे का लिहिले?

महाराज म्हणतात- पैका जमूनिया फार । भरपूर पैसा जमवितात आणि काय करतात- तर **पोशी दारा आणि कुमर ।।२।।** म्हणजे आपली पत्नी आणि मुले यांचे संगोपन करतात. मग वेगवेगळ्या रंगाच्या साड्या, ब्लाऊज, चपला त्यांच्यासाठी खरेदी करतात. हे करताना मुलगा चांगला आहे किंवा नाही याचा विचारही ते करीत नाही. तो व्यसनाधीन झालेला आहे की, परमार्थ मार्गानें आत्मस्वरूपाकडे निघालेला आहे याचाही ते विचार करीत नाहीत. तो दारा आणि कुमर म्हणजे बायका मुलांचे पालन-पोषण करीत असतात. परंतु परमार्थ करण्यासाठी मात्र त्याच्याकडे वेळ नसतो. ज्ञानोबाराय म्हणतात- **सर्वस्वें शिणोनि एथे । अर्जवावी संपत्तीजातें । तेणें स्वधर्मु सांडुनि देहातें । पोखावें काई ।।ज्ञा.३।।२०७।।** संपत्ती आवश्य कमावली पाहिजे. कमवू नये असे माझेही मत नाही. परंतु ती संपत्ती कमावल्यानंतर माणसानें स्वधर्माचे आचरण केले पाहिजे. माणसे रात्रंदिवस रक्ताचे पाणी करतात, घाम गाळतात आणि संपत्ती कमावतात परंतु स्वधर्माचे आचरण करीत नाहीत तर स्वधर्माचा त्याग करून आणि केवळ स्वत:चे आणि बायका मुलांचे पालन-पोषण करीत राहतात. बरे येवढ्यावरच ते थांबत नाहीत तर पुढे जावून साधु-संतांची निंदाही करतात.अर्जुन भगवंताला म्हणतात- देवा आपल्याकडून साधु संतांची पूजा-अर्चा व्हावी, परंतु त्यांची निंदा कधीही होऊ नये. **देवा संतवृंद नमस्कारिजे । कां घडे तरी पूजिजे । हें वांचूनि; केवीं निंदिजे । स्ये वाचा ।।ज्ञा.-२।।३३।।** आपली जर ऐपत असेल, सामर्थ्य असेल तर गांवांत अलेल्या साधु-संतांना घरी घेऊन यावे. त्यांची पाद्यपूजा करावी, त्यांचे पाय धुवून त्यांना गंध-अक्षता लावाव्या, त्यांना पंचारतीने ओवाळावें. त्यांना पक्वान्नाचे भोजन द्यावे, दक्षिणा द्यावी, त्यांचे दर्शन घ्यावे आणि मग त्यांची सन्मानाने बोळवण करावी. परंतु आपल्यात ऐपत नसेल तर निदान त्यांची निंदा नालस्ती तरी करू नये. कान्होराज महाराज म्हणतात- देवा हे लोक केवळ पैशाच्यामागे लागलेले आहेत असे नाही, ते केवळ बायका-मुलांचेच पालन-पोषण करतात असे नाही, तर ते उन्मत्त होऊन काय करतात तर **सदा निंदी साधु-संता ।** संतांची निंदा करतात. त्यांना धर्म-कर्म-व्रत-वैकल्ये यांचे ज्ञान नाही,



ते नास्तिक वृत्तीचे आहेत. अशा लोकांची काय स्तिती होते हे महाराज अभंगाच्या शेवटच्या चरणांत सांगतात- **कान्हो पाठक कथितो नर । अंती भोगी नरक घोर ।।४।।** अंती म्हणजे या मनुष्य जन्माच्या शेवटी, त्याला नरकाची प्राप्ती होते. मग जर नरकांत जायचे नसेल तर साधु-संतांची निंदा तरी करू नका. धर्म-कर्म-व्रत-वैकल्ये यांचे अनुष्ठान करा. संपत्ती कमवा परंतु ती तुकोबाराय सांगतात त्या प्रमाणें **जोडोनियां धन उत्तम व्यवहारें । उदास विचारें वेंच करी ।।१।। उत्तमचि गति तो एक पावेल । उत्तम भोगील जीवखाणी ।।२।।११७८।।** आणि असे जर झाले नाही तर कान्होराज महाराज म्हणतात त्याला घोर अशा नरकाला जावे लागेल महाराज आपल्या कीर्तनांतून असा उपदेश करीत असताना कीर्तनातील एक श्रोता उठून उभा राहिला. मला असे वाटते की कीर्तन ऐकत असताना कीर्तनकाराने सांगितलेला एखादा सिद्धांत जर श्रोत्याला पटला नाही तर त्याने कीर्तनकाराला त्याच क्षणी उभे राहून आपले मत स्पष्ट शब्दांत सांगितले पाहिजे असे जर झाले तर आज जो कीर्तनाचा बाजार झालेला आहे, तो कमी होईल. असाच प्रसंग महाराजांच्या कीर्तनांत घडला. महाराजांनी सांगितले की, जो संपत्ती कमवून केवळ बायका-मुलांचे पालन-पोषण करतो, साधु-संतांची निंदा करतो, धर्म-कर्म-व्रत-वैकल्ये जाणत नाही, त्यांचे अनुष्ठान करीत नाही, तो घोर अशा नरकाला प्राप्त होतो. हे ऐकल्यावर एक श्रोता उठून उभा राहिला आणि महाराजांना म्हणाला- महाराज! तुम्ही आम्हांला हे जे सांगता, त्याप्रमाणे तुम्ही वागता का? नाहीतर लोका सांगे ब्रह्मज्ञान आणि आपण कोरडे पाषाण. तुमची स्थिती कशी आहे? ते आम्हांला सांगा महाराज! त्यावर महाराज म्हणाले- आपण फारच चांगला प्रश्न विचारला!

साधु-संत स्वत: अनुष्ठान करतात आणि मगच समाजाला सांगतात. जगद्गुरु तुकोबाराय म्हणतात- **अनुभवे आले अंगा ते या जगां देतसे ।** मी हा अनुभव घेतलेला आहे आणि मगच मी तो जगाला सांगत आहे. नाथमहाराजांकडे एक महिला आली आणि म्हणाली- महाराज हा माझा मुलगा, तो फारच गुळ खातो. त्यामुळे त्याच्या पोटांत जंत होतात. त्याला अनेकवेळा सांगूनही तो ऐकत नाही. गुळ खाण्याचे सोडीत नाही, म्हणून आपण त्याला सांगा, तो आपले ऐकेल! नाथ महाराज म्हणाले- बाई त्याला आता घरी घेऊन जा आणि ८ दिवसांनी परत माझ्याकडे घेऊन या. ती माऊली मुलाला घेऊन घरी गेली आणि ८ दिवसांनी परत नाथमहाराजांकडे घेऊन आली. तेव्हां नाथमहाराजांनी मुलाला आपल्या समोर बसवून घेतले आणि म्हणाले- बाळ! अरे जास्त गुळ खाणे आरोग्याला घातक आहे! खायचाच झाला तर प्रमाणांत खावा! जास्त खाल्ला तर पोटांत जंत होतात! मुलगा म्हणाला- महाराज मी आजपासून जास्त गुळ खाणार नाही. त्याने महाराजांचे म्हणणे ऐकले. तेव्हां मुलाची आई महाराजांना म्हणाली महाराज! तुम्हीं मुलाला आज जे सांगितले ते तर ८ दिवसापूर्वीही सांगू शकला असता, मग ८ दिवसानंतर या असे मला का सांगितले? हे ८ दिवस कशाकरता वाया घलविले? त्यावर नाथमहाराज म्हणाले- माऊली मी

कशासाठी ८ दिवसांनी तुम्हांला बोलावले त्याचे कारण सांगतो- माझ्या घरी परमात्म्याला दररोज पुरण-पोळीचा नैवद्य दाखविला जातो. त्यामुळे दररोज पुरण-पोळी खाण्याची मला सवय लागली होती. मग मी जर पुरणपोळीच्या रूपाने दररोज गुळ खात होतो तर मुलाला कोणत्या तोंडाने सांगू की गुळ खाऊ नकोस म्हणून. त्यासाठी प्रथम मी पुरण-पोळी खाण्याचे बंद केले. त्यामुळे मुलाला तूं गुळ खाऊ नकोस हे सांगण्याचा अधिकार मला प्राप्त झाला आणि म्हणून आज मी त्याला गुळ खाऊ नकोस असा उपदेश करू शकलो आणि त्या सांगण्याचा मुलावरही परीणाम झाला. आपण जसे बोलतो तसेच वागलो तर शब्दाला शील प्राप्त होते आणि त्यांचा दुसऱ्याच्या मनांवरही परीणाम होतो. तात्पर्य असे की, कीर्तनकार स्वत: तसा वागत नसेल आणि केवळ उपदेश करीत असेल तर लोक तो उपदेश एका कानाने ऐकतात आणि दुसऱ्या कानाने सोडून देतात. म्हणून वक्त्याने विचारलेल्या प्रश्नाच्या उत्तरादाखल महाराज म्हणाले- मी जीवन कसे जगतो हे सांगू का तुला. **कान्हो जन्मूनिया उत्तम कुळीं । केली संसाराची होळी ।।१।।** येथे आयुष्याची होळी नाही बरं का? येथे आयुष्याची होळी असा जर पाठ घेतला तर कोणाच्या आयुष्याची होळी होते, माहिती आहे? दुर्लभ असा नरदेह प्राप्त झालेला आहे आणि जो भगवंताचे भजन करीत नाही, त्याच्या आयुष्याची होळी होत असते. म्हणून येथे आयुष्याची होळी या ऐवजी संसाराची होळी असा पाठ पाहिजे. त्यासाठी प्रमाण आहे तुकोबारायांचे- **जाळोनि संसार बैसलों अंगणीं ।२४८।।** आम्ही आमचा संसार जाळून टाकला आणि काय केले तर अंगणांत बसलो. कान्होराज महाराज म्हणतात- मी उत्तम कुळांत जन्माला आलो आणि केवळ संपत्तीच कमवित बसलो का? तर नाही! मग काय केले? संसाराची होळी केली. परमात्मा प्राप्त करायचा असेल तर संसार करून चालत नाही. संसारावर तुळसीपत्र ठेवावे लागते. जगद्गुरु तुकोबाराय म्हणतात- जोपर्यंत तुमच्या अंत:करणांमध्ये संसाराची वाढ व्हावी, वृद्धी व्हावी अशी आकांक्षा आहे, तोपर्यंत तुम्ही संसार सोडू नका. **जोवरी या तुम्हां मागिलांची आस । तोंवरी उदास होऊ नका ।।धृ.।।३४३६।।** जगद्गुरु तुकोबाराय म्हणतात- आम्हीं आमच्या घरांवर तुळसीपत्र ठेवलें आणि मगच आम्हीं परमात्म प्राप्तीच्या नादाला लागलो. **प्रपंच वोसरो । चित्त तुझे पायीं मुरो ।।१।। ऐसें करीं गा पांडुरंगा । शुद्ध रंगवावें रंगा ।।धृ.।।१२७९।।** जगद्गुरु तुकोबाराय भगवंताकडे मागणी करतात- देवा! माझे चित्त प्रपंच्यातून वोसरू दे, म्हणजे प्रपंच्याचा त्याला वीट येऊ दे, त्याची प्रपंच्या विषयी असणारी आसक्ती नाहीसी होऊ दे आणि ते तुझ्या चरणांच्या ठिकाणी लागू दे, विलिन होऊ दे. जोपर्यंत संसार चांगला व्हावा त्याची वृद्धी-वाढ व्हावी अशी अपेक्षा असते, तोपर्यंत व्यक्ती परमात्म स्वरूपाकडे प्रवृत्त होऊ शकत नाही. कान्होराज महाराज म्हणतात- मी उत्तम कुळांत जन्माला आलो खरा, मण मी माझ्या संसाराची अशी होळी केलेली



आहे आणि असे जे महात्मे असतात ते केवळ निरपेक्ष जीवन जगत असतात. **काय घडेल तें घडो या शेवटीं । लाभ आणि तुटी देव जाणे ।।धृ।।३१५१।।** असे जे महात्मे असतात तेच समाजाचे खरे हित जाणू शकतात, त्याला उपदेश करू शकतात. कान्होराज महाराज म्हणतात- लोकहो! आपण केवळ संपत्तीच जमा करीत आहात, मात्र धर्म-कर्म-व्रत हे कांहीही जारत नाही. म्हणून सावध व्हा. शेवटी घोर अशा नरकाला जावे लागेल. देव दुर्लभ असणारा हा मनुष्यजन्म तुम्हांला मिळालेला आहे. तो सहज प्राप्त होत नसतो. अंडज, जारज, स्वेदज आणि उद्भीज असे चार प्रकारचे जीव आहेत. मनुष्यदेह हा त्यापैकी जारज या प्रकारचा आहे. स्वेदज-म्हणजे ज्यांची घामापासूत निर्मिती होते. उदा. उवा, गोचिड इ. उद्भीज-म्हणजे जमीन आणि पाणी यांच्या संयोगातून ज्यांची निर्मिती होते असे जीव. उदा. सर्व प्रकारच्या वनस्पती. अंडज-म्हणजे ज्यांचा अंड्यातून जन्म होतो असे पक्षी, साप इ. आता आपली उत्पत्ती होते ती जारज योनी. या जारज योनी काय फक्त माणूसच आहे का? तर नाही. मग गाय, शेळी, मेंढी, कुत्रे, गाढव, डुक्कर असे अनेक प्राणी आहेत की जे जारज या प्रकारच्या योनीत जन्म घेतात. एका-एका योनीत कोटी-कोटी वेळा जन्म घ्यावा लागतो, तेव्हां कोठे मनुष्य जन्म प्राप्त होतो. महाराज म्हणतात- आंधळ्याच्या हातात कावळा सापडावा त्या प्रमाणे आपल्याला हा मनुष्यदेह प्राप्त झालेला आहे. **पावलों हा देह कागटाळी न्याय ।।१।।३१३६।।** मनुष्य देहाची प्राप्ती होणे दुर्लभ असे आहे. असे महाराज म्हणतात. त्यात ब्राह्मण देह प्राप्त होणे त्याहून दुर्लभ. त्याहीपेक्षा वैदिक ब्राह्मणाचा देह प्राप्त होणे त्याहून दुर्लभ. त्यातही विद्वान वैदिक ब्राह्मणाचा देह प्राप्त होणे अधिक दुर्लभ. आणि त्या देहांत आत्मज्ञान प्राप्त होणे त्याहूनही दुर्लभ. विवेक चुडामणी ग्रंथात भगवान् भाष्यकार वर्णन करतात- **जन्तूनां नरजन्म दुर्लभमत: पुंस्त्वं ततो विप्रता, तस्माद्वैदिकधर्ममार्गपरता विद्वत्त्वमस्मात्परम् ।।१।। आत्मानात्मविवेचनं स्वनुभवोब्रह्मात्मना संस्थितिर्मुक्तिर्नो शतजन्मकोटिसुकृतै: पुण्यैर्विना लभ्यते ।।२।।** भाष्यकार सांगतात- मनुष्यजन्म दुर्लभ आहे. हे सर्व केव्हां घडते? अनंत जन्मांची पुण्याई जेव्हां फल देण्यास उद्भूत होते तेव्हांच हे घडते. आता आपल्याला हा मनुष्यजन्म प्राप्त झाला की, नाही? **दुर्लभं त्रयमेव तत् देवानुग्रहं मनुष्यत्वं, मुमुक्षत्वं, महापुरुष संश्रय: ।।** या तीन गोष्टी दुर्लभ आहेत. त्यामध्यें प्रथम आहे मनुष्यत्वं. मग एवढा दुर्लभ असणारा मनुष्यदेह आपल्याला प्राप्त झालेला आहे, तर मग त्या देहाने आपण काय केले पाहिजे? परमार्थ मात्र केला पाहिजे. माऊली ज्ञानोबाराय म्हणतात- **पाहें पां, शरीराचिया गांवा । जयालागीं आले पांडवा । तो कार्यार्थु आघवा । सांडूनियां ।।ज्ञा.७।।१०५।।** मनुष्यजन्म ज्याच्याकरीता मिळालात्याचा हेतूच समाज विसरून गेला. कबीरजी सांगतात- **औट हात का मनुष देह अल्लानें तुज दिया । खाया पिया सुखसे सोया । नाहक जमाना खोया**

।। खाल्ले-पिल्ले आणि झोपला, जीवनाचे साफल्य झाले का? नाही! (लाईट जाते) शांत रहा. माझा आवाज भरपूर मोठा आहे. तो तुमच्यापर्यंत सहज पोहचू शकेल. लाईट गेली म्हणून कीर्तन मात्र बंद केले जाणार नाही. आमचे बाबा एक विनोद सांगत असतात- एकाने बाजारातून पावकिलो जांभळे विकत घेतली आणि त्यापैकी एक जाभूळ तोंडात टाकले. त्या जांभळांत होता एक भूंगा. तो दाताखाली आल्या बरोबर चीरऽऽचीरऽऽ करु लागला. तेव्हां तो माणूस त्या भुंग्याला म्हणाला पैसे देऊन तुला तोलून घेतलेले आहे. त्यामुळे तूं जीरऽऽ कर नाहीत फीरऽऽ कर आता तुझी सुटका होणार नाही. त्याप्रमाणें तुम्हीं मला कीर्तन करण्यासाठी बोलावलेले असल्याने आता तुम्ही कितीही गडबड केली तरी कीर्तन बंद केले जाणार नाही. उलट वाया जाणारा वेळ पुढे भरून काढला जाइल. म्हणून एकाग्र होऊन कीर्तन ऐकणे हेच तुमच्या हिताचे आहे. त्यामुळे मोठ्याने बोलण्याचे मला श्रम होणार नाहीत. आणि दादांना किर्तन लिहून काढणेही सोपे होईल. असो.

मनुष्याने संपत्ती कमावलीच पाहिजे. कारण संपत्ती-पैसा हा मनुष्याचे जीवन जगण्यासाठी आवश्यक आहे. व्यवहारांत पावलो-पावली पैशांची गरज पडते. म्हणून प्रत्येकाने पैसे कमावले पाहिजेत. सुभाषितकार सांगतात- ... मनुष्याने मी अमर आहे, मी कधीच मरणार नाही असे समजून पैसा आणि ज्ञान कमवावे. **अजरामरवत् प्राज्ञौ विद्यामर्थम् चिंतयेत् ।।** कारण मनुष्य मरेपर्यंत विद्यार्थी असतो. आता येथे आबा महाराज आपल्या बरोबर उभे आहेत. त्यांना वारकरी संप्रदायाचे भीमसेन जोशी असा पुरस्कार संप्रदायाने दिलेला आहे. त्यांना ओळखत नाही असा कीर्तनकार महाराष्ट्रात सापडणार नाही, मग तो टिपण्या का असेना पण तो बाबांना ओळखतो. आता त्यांचे वय झाले घरी बसून आराम करावा ना! पण नाही. मरेपर्यंत आमच्या सारख्यांनाही ते साथ करतात. मी नवीन आहे तरी सुद्धा ते मला कीर्तनांत उभे राहून साथ करतात. माणसाने मरेपर्यंत परमार्थ केला पाहिजे. त्याच प्रमाणे माणसाने मरेपर्यंत संपत्ती आणि ज्ञान सुद्धा कमावले पाहिजे. मानवी जीवनाचे चार पुरुषार्थ सांगितलेले आहेत. धर्म, अर्थ, काम आणि मोक्ष, हे ते चार पुरुषार्थ आहेत. आता यामध्यें अर्थ या पुरुषार्थाचा दुसरा क्रमांक आहे. म्हणून मनुष्यानें संपत्ती कमावली पाहिजे. जो या चार पुरुषार्थपैकी एकही पुरुषार्थ प्राप्त करून घेत नाही, त्याचे जीवन व्यर्थ असते? सुभाषितकार सांगतात- **धर्मार्थ काम मोक्षाणां एकस्येकोऽपि न विद्यते । अजागलस्तनस्यैव तस्य जीवन निरर्थका: ।।** ज्या पुरुषाने धर्म, अर्थ, काम आणि मोक्ष या चार पुरुषार्थां पैकी एकही पुरुषार्थ संपादन केला नाही, त्या पुरुषाचे जीवन, शेळीच्या गळ्याला असणाऱ्या स्तना प्रमाणे निरर्थक आहे. हे चार पुरुषार्थ क्रमाणे एकापेक्षा एक श्रेष्ठ आहेत आणि त्यांना प्राप्त करणेही एकापेक्षा एक कठीण असे आहे. म्हणून काम आणि मोक्ष प्राप्त नाही करता आला तरी मनुष्याने किमान अर्थ हा पुरुषार्थ तरी संपादन केला पाहिजे. आता तुम्ही म्हणाल



महाराज आम्ही संपत्ती कमावण्याचा प्रयत्न तर भरपूर करतो पण तरीही आम्हांला संपत्ती प्राप्त होत नाही. आम्ही तिच्या मागे धावतो आणि ती आमच्या पुढे धावते. ती कांही आमच्या हाताला लागत नाही. त्यासाठी संपत्ती कशी कमवावी ते मी तुम्हांला सांगतो. संपत्ती कमावण्याचे दोन मार्ग आहेत. १)मनगटाच्या बळावर संपत्ती कमावता येते आणि २) बुद्धीच्या बळावर संपत्ती कमावता येते. मनगटाच्या बळावर कमावलेल्या संपत्तीला बऱ्याच मर्यादा पडतात- त्या संपत्तीतून तुम्ही बंगला, गाडी, बँकबॅलन्स, ऐषाराम नाही प्राप्त करू शकत. कल्पना करा एखाधा माणुस मजूरी करतो. तुमच्या गावांत मजुरी करणाराला किती मजुरी मिळते? दिवसाला २५०/३०० रुपये धरुन चला. आता घारांत हे दोघे पती-पत्नी आणि दोन मुले आहेत असे समजा. आई वडीलांचा प्रश्न सोडून द्या. कारण मला माहिती आहे की तुम्ही आईवडिलांना धाब्यावर काढून दिलेले आहे. विनोदाचा भाग सोडून द्या, तुम्ही सगळे सज्जन मंडळी आहात. घरांच चारच व्यक्ती आहेत असे धरुन चला. हे पती-पत्नी आणि दोन मुले. आता कमवून आणलेल्या ३०० रुपयांत या चौघांचे ३ वेळचे जेवण आणि मुलांच्या शाळेचा खर्च, कपडे-लत्ते, मोबाईल चार्जिंग हे सर्व भागणेच दुरापास्त मग गाड्या-घोड्या, बंगला कोठून आणायचा? मनगटाच्या बळावर व्यक्ती श्रीमंत होऊ शकत नाही. मग श्रीमंत व्हायचे असेल तर बुद्धीचा वापर करावा लागतो. पहा एखाद्या घरांतला मुलगा शिकतो. क्लासवन ऑफिसर होतो. त्यावेळी त्याला फिरण्यासाठी गाडी कोण देते? सरकार! त्या गाडीत डिझेल कोण भरते? सरकार! बरे त्या गाडीच्या ड्रायव्हरचा पगार कोण देते? सरकार! त्याला राहण्याकरता बंगला कोण देते? सरकार! त्याच्या घरांत स्वयंपाक करणाऱ्या कुकचा पगार कोण देते? सरकार! घराशेजारच्या बागेत काम करणाऱ्या माळ्याचा पगार कोण देते? सरकार! सगळे कांही सरकार करते. त्यासाठी त्याने काय केले? कांहीच नाही. फक्त अगोदर अभ्यास केला आणि क्लासवन अधिकारी झाला. बरोबर! बुद्धीचा विकास केला, ज्ञान प्राप्त करून घेतले. त्याचा संपूर्ण खर्च सरकार करू लागले. मनगटाच्या बळाचा वापर करणारा पहिला दुसऱ्याकडे मजूरी करतो आणि बुद्धीचा वापर करून क्लासवन अधिकारी झाला त्याची कामे दुसरे लोक करतात. फरक कशाचा आहे? बुद्धी आणि मनगट यांचा. आता मला सांगा ज्याला संपत्ती कमवायची आहे, त्याने कोणत्या मार्गानें गेले पाहिजे? बुद्धीचा विकास केला पाहिजे का नाही? पण त्या बुद्धीचा विकास कोणत्या क्षेत्रामध्यें करायचा ते मी तुम्हांला सांगतो. लक्षपूर्वक ऐका! ज्यांना कळले ते इथपर्यंत आले, बरका बाबा. बुद्धीचा विकास झाल्याने संपत्ती मिळते हे खरे पण कांहींनी आपली बुद्धी अनाठायी वापरली. अनेक प्रकारचे विध्वंसक असे शोध लावले. अनुबॉम्ब तयार केला. त्यांना संपत्ती मिळाली परंतु मृत्युसमयी त्यांना नैराश्य प्राप्त झाले. त्यांच्या डोक्यांत असे विचार येऊ लागले की मी हे काय करून ठेवले. लोक माझ्या या शोधांचा दुरुपयोग करताहेत लोकांना हकनाक मारताहेत आणि त्याचे पाप मात्र मलाच भोगावे लागणार!

ज्ञानाचेही दोन प्रकार आहेत. भौतिक ज्ञान आणि अध्यात्मिक ज्ञान. मग मी कोणत्या ज्ञानाचा विकास करायला पाहिजे होता. तर अर्थातच अध्यात्मिक ज्ञानाचा. अध्यात्मिक ज्ञान जर मनुष्याने प्राप्त केले तर मनुष्याला संपत्तीही मिळते आणि त्याला परमात्माही मिळतो, म्हणजेच त्याला सर्वश्रेष्ठ असे रम्य समाधान प्राप्त होते. भौतिक ज्ञान तुम्ही कमवा आणि संपत्ती कमवा, त्यामध्यें अपूर्णता आहे. पहा कितीही संपत्ती तुम्ही कमवा परंतु शेजाऱ्याची बंगला-गाडी पाहिली की, आपले सुख कमी पडते आणि आपल्याला ते का नाही म्हणून दु:ख वाढू लागते. परंतु परमार्थामध्यें जेव्हां तुम्ही अध्यात्मिक ज्ञान प्राप्त करून घेता त्यावेळी त्याला संपत्तीही मिळते आणि समाधानही मिळते. माझेच उदाहरण घ्या मी जर कीर्तनाला गेलो तर लोक काय करतात मला ४/५ हजार रुपये देतात.आता तुम्हीच द्याल. महिन्याला १० कर्तिने केली तर ४*१०=४०हजार रुपये. आणि संतांच्या संगतीत आळंदीला राहायला मिळते, शिवाय मरणानंतर मोक्ष! म्हणून ज्ञानोबाराय सांगतात भौतिक ज्ञानाचा तुम्हीं कितीही विकास करा, त्यामध्यें समाधान नाही. **अगा याचि कारणें । हें उत्तम सर्वांपरी मी म्हणें । जे वन्हि; हें तृणें । येरें ज्ञानें ।।ज्ञा.-१४।।४४।।** ज्ञानोबाराय म्हणतात- अध्यात्म ज्ञान हे अग्निसारखे आहे आणि बाकीची ज्ञाने ही गवतासारखी आहेत. भौतिक ज्ञान संपादन केले बुद्धीला अहंकार होतो. **नवल अहंकाराची गोठी । विशेषें न लगे अज्ञानापाठीं । सज्ञानाचे झोंबे कंठी । नाना संकटी नाचवी ।।ज्ञा.-१३।।८२।।** थोडेसे ज्ञान झाले की अहंकार त्याच्या मानगुटीवर येऊन बसतो. अध्यात्मिक ज्ञान पहा. बाबांचेच उदाहरण देतो याचे कारणे येथे मला तेच सर्वात मोठे दिसतात. त्यांचा आख्खा गाथा पाठ आहे. आता आळंदीहून येताना जेव्हां त्यांची भेट झाली तेव्हां दादांनी गाडी उभी केली. मी पुढच्या सीटवर बसलो होतो, त्यांना जागा करून द्यावी म्हणून मी खाली उतरू लागलो , तर त्यांनी जोरात दरवाजा दाबून धरला आणि म्हणाले महाराज तुम्हीच पुढे बसायचे. आता येथे गाडीतून खाली उतरताना त्यांचे दर्शन घेण्यासाठी वाकणार तेवढ्यात त्यांनीच माझे दर्शन घेतले. ज्ञानोबाराय म्हणतात- **कां फळलिया तरूची शाखा । सहजें भूमीसी उतरे देखा । तैसें जीवमात्रा अशेखां । खालावती ते ।।ज्ञा.-९।।२२५।।** मनुष्याच्या जीवनांत जेवढे ज्ञान अधिक असते तेवढी त्याच्या ठिकाणी अधिक नम्रता असते आणि जेथे ज्ञान कमी तेथे गर्व मात्र अधिक असतो. **अल्प विद्या परी गर्व शिरोमणी । मजहूनी ज्ञानी कोण आहे? ।।** ज्ञान असावे आणि नम्रता असावी, तर ती विद्या शोभून दिसते. **विद्या विनयेन शोभते ।** विद्या अहंकाराने शोभते का हो? नाही. तुम्हांला आश्चर्य वाटेल मी जेव्हां लहान होतो, तेव्हां गावाकडे भजनाला जायचो. आवड होती टाळ घेऊन बसण्याची. नविनच असल्याने चुकायचे,चुक झाली की तो म्हातारा कानाखाली ठेवून द्यायचा आणि म्हणायचा ''ठेवून दे तो टाळ''! तुला वाजवता येत नाही. आता मी गावाकडे जाऊन पाहतो ना! १५/१६ वर्षे झाली मी पाहतो, त्या म्हाताऱ्याचा तोच अभंग आणि तिच



चाल! अभंगातही बदल नाही आणि चालीतही बदल नाही. गावांत भजन असले आणि चुकून त्याला आमंत्रण देण्याचे विसरले, जर यजमाला त्याच्या घरी जाणे शक्य झाले नाही, तर तो भजनाला जाणार नाही. दुसऱ्या दिवशी जर विचारले- का हो! संपतराव रात्री तुम्ही भजनाला नव्हते? तर म्हणणार, मला कोणी आमंत्रण दिले होते? जसे काय यजमानाच्या मुलाचे लग्न होते. ज्ञान थोडे परंतु अहंकार मात्र जास्त. आपल्याकडे म्हण आहे ना, ''उथळ पाण्याला खळखळाट फार''. सुभाषितकार सांगतात- **संपूर्ण कुम्भं न करोति शब्दं चार्धघटा घोषमुपैति नित्यं । विद्वान कुलिन न करोति शब्दं जल्पन्ति मुढा: तु गुणैर्विहिन: ।।** ज्याच्याकडे भरपूर ज्ञान असते ना! ती व्यक्ती कधीच गर्व करीत नाही, पण ज्याच्याकडे थोडेच ज्ञान असते ते त्याला कधीच शांत बसू देत नाही. आपल्याला सगळ्यांना अनुभव आहे. भरलेला हंडा डोक्यावरुन घेऊन जाताना त्यातील पाणी शांत राहाते ते हंड्याबाहेर सांडत नाही. मात्र हंडा जर अर्धा असेल तर आतील पाणी हालत राहाते आणि बाहेर सांडून ते हंडा घेऊन जाणाराला भिजविल्याशिवाय राहात नाही. कांही महिला तर दुडीवर दुडी म्हणजे एकावर एक असे पाण्याचे चार हंडे वाहून नेतात परंतू त्यातील थेंबभर पाणीही सांडू देत नाहीत. याचे कारण ते सर्व पूर्ण भरलेले असतात. सुभाषितकार म्हणतात- संपूर्ण कुंभ न करोति शब्द... त्याप्रमाणे अर्धवट ज्ञान असणाऱ्या व्यक्ती जास्त बडबड करीत असतात.

म्हणून तुम्हांला जर संपत्ती कमवायची असेल तर प्रथम ज्ञान संपादन करा आणि ज्ञान मिळाल्यानंतर नम्रता धारण करा. त्यानंतर अधिकार प्राप्त होत असतो आणि अधिकारानंतर संपत्ती येत असते. संपत्ती आल्यानंतर धर्म घडतो आणि धर्म घडल्याने सुख प्राप्त होते. ही एक साखळी आहे. तुम्ही म्हणाल कोठून काढली त्यासाठी श्लोक सांगतो- **विद्या ददाति विनयं । विनयात याति पात्रतां ।। पात्रत्वात् धनं आप्नोति । धनांत् धर्म तत: सुखम् ।।** ही परंपरा आहे. संपत्ती पाहिजे ना तुम्हांला मग ज्ञान प्राप्त करून घ्या. ज्ञान मिळाल्यानंतर तेथेच थांबायचे नाही, नम्रता धारण करा. **नम्र झाला भूता तेणे कोंडीले अनंता ।।** किंवा **महापूरे झाडे जाती । तेथे लव्हाळी वाचती ।।७१७।।** मोठी झाडे पूरांत वाहून जातात पण पूर आला की, लव्हाळी खाली वाकतात. पुराचे पाणी त्यावरून वाहून जाते. पूर ओसरला की, लव्हाळी पुन्हा पूर्ववत होतात. सागरांत किती पाणी आहे हे सांगता येत नाही, तसेच ज्ञानोबारांकडे किती ज्ञान आहे ते सांगता येत नाही. **ज्ञानाचा सागर सखा माझा ज्ञानेश्वर ।। पैवल्याचा पुतळा प्रगटला भूतळा । चैतन्याचा जिव्हाळा ज्ञानोबा माझा ।।** एवढे ज्ञान ज्ञानोबारायांकडे आहे पण ते कधी म्हणतात का? की, हे माझ्यामुळे झाले. नाही म्हणत. ते म्हणतात- **किंबहुना तुमचे केले । धर्म कीर्तन हे सिद्धी गेले । तेथ माझे जी उरले पाईकपण ।।ज्ञा.-१८।।१७९२।।** एकच कीर्तन येते बाबा! कोठेही गेले तरी तेच कीर्तन. तरी काय म्हणतो माहिती

आहे? माझ्यासारखा कीर्तनकार आख्या महाराष्ट्रत नाही. ज्ञानोबारायांनी संपूर्ण विश्वाला ज्ञान दिले. ज्ञानेश्वरी, अमृतानुभव, अभंगगाथा, चांगदेव पासष्टी, हरिपाठ असे ग्रंथ लिहिले पण अहंकार आहे का? नाही. ते म्हणतात- **एऱ्हवीं तरी मी मूर्खु । जरी जाहला अविवेकु । तऱ्ही संतकृपा-दीपकु । सोज्वळु असे ।।ज्ञा.-१।।७६।।** काय पराकाष्ठेची नम्रता आहे हो! म्हणून तर सर्व साधु-संत ज्ञानोबारायांची सेवा करतात. **सेविती साधुसंत । मनु वेधला माझा ।।१।। आरती ज्ञानराजा ।।धृ।।** ज्यांच्याकडे ज्ञान आणि नम्रता असते सहाजिकच ती माणसे मोठी असतात. त्यांनाच अधिकार प्राप्त होतो. अधिकारी आणि फलाचा संबंध असतो.

संपत्ती पचवू जाणे मारवाडी आणि जैन धर्मीय. आपल्या लोकांना संपत्ती कमावता येत नाही. कमावलीच तरी तिचे रक्षण करता येत नाही. आपले लोक उन्मत्त तरी होतात किंवा व्यसनाधीन तरी होतात. साधुसंतांना मानीत नाहीत. धर्म-कर्म-व्रत जाणत नाहीत.म्हणून ते नरकाला जातात. मात्र जैन धर्मीय लोक आपल्या संपत्तीचा किमान १०% हिस्सा ते गोशाळेला तरी देतील किंवा धर्म कार्याला तरी खर्च करतील. आज भारतात ज्या मोठमोठ्या गोशाळा किंवा मंदिरे आहेत ना! ती बहुधा त्यांचीच आहेत. आपले लोक एखादा अखंड हरिनाम सप्ताह केला आणि त्याला जर त्यांनी वर्गणी दिली तर सप्ताह संपल्याबरोबर सप्ताहाचा ताळेबंद मागायला येतात. आपले लोक संपत्ती आली की उन्मत्त बनतात. म्हणून कान्होराज महाराज म्हणतात- **पैका जमूनिया फार । पोशी दारा आणि कुमर ।।२।। सदा निंदी साधुसंता । नेणे धर्म कर्म व्रता ।।३।।** पैका जमवून काय करतात तर पोशी दारा आणि कुमर । त्याचा परीणाम काय होतो? ते महाराज अभंगाच्या शेवटच्या चरणांत सांगतात- **कान्हो पाठक कथितो नर। अंती भोगी नरक घोर ।।४।।** महाराज स्पष्ट शब्दांत सांगतात- जे लोक फक्त संपत्ती कमावतात, परंतु धर्माचे आचरण करीत नाहीत. त्यांच्या वाट्याला शेवटी नरकयातनाच येतात. देहाला आल्या नंतर संपत्ती कमावलीच पाहिजे म्हणून मी सांगितले, पण किती? जेवढी गरज आहे तेवढीच. **साई इतना दिजीये । जिनमें कुडुंब समाये । मै भी भुकाँ न रहूँ । और साधुभी भूका न जायें ।।** संपत्ती तेवढीच कमवावी की, जेणेकरून कुडुंबाचे पालन-पोषण होईल आणि साधुसंताचा मान सन्मान करता येईल एवढी संपत्ती आवश्य कमावली पाहिजे. मात्र त्या संपत्तीने उन्मत्तता येईल येवढी संपत्ती कमवू नका. संपत्ती ही मीठासारखी असते. स्वयंपाकांत मीठ पाहिजेच. पण त्याचा अतिरेक झाला तर ते भोजनाची लज्जत बिघडवते. तसेच संपत्तीचे आहे. संतती करता संपत्ती कमावण्याची गरज नाही, फक्त त्यांना चांगले संस्कार देण्याची गरज असते. संस्कार न देता केवळ संपत्ती कमावली तर काय होते त्याचे प्रत्यक्ष घडलेले उदाहरण सांगतो. रेमंड कंपनीचे मालक विजयपत सिंघानिया. नांव ऐकून असाल तुम्ही, मुंबईमध्यें सर्वात उंच इमारतीत राहणारे ते उद्योगपती, आज मचंबईच्या फुटपाथवर भिक मागत फिरत आहेत. का? माहित आहे! मुलानें



त्यांना घराबाहेर काढले, म्हणून त्यांच्यावर ही वेळ आलेली आहे. मुलासाठी संपत्ती कमावली परंतु मुलावर संस्कार करण्यांत ते कमी पडले. म्हणून सांगतो, संपत्ती गरजे पुरती कमवा, पण उर्वरीत वेळेत मुलांच्यावर चांगले संस्कार करा, म्हणजे उतार वयांत तुमच्यावर अशी वेळ येणार नाही. बरे खूप संपत्ती कमावली तर ती मरणानंतर बरोबर नेता येते का? नाही ना! **धनानी भूमौ पशवश्च गोष्ठे । भार्या गृहद्वारे जन स्मशाने। देह चितायां परलोक मार्गे। कर्मानु गच्छन्ति जीव: एक: ।।** ज्या संपत्तीने तुम्हीं बायका-मुलांचे पालन-पोषन करता ती पत्नी तुम्ही मेल्यानंतर कोठपर्यंत येते? घराच्या दरवाज्यापर्यंत! भार्या गृहद्वारे । हो जिच्यासाठी तुम्हीं आई-वडीलांना वाऱ्यावर सोडले, भावाशी भांडण केले, कोणाशी नीट राहिला नाहीत. बरे ज्या मित्रमंडळींना तुम्ही ढाब्यावर जेऊ घातले ते! माऊली म्हणतात- **घरीं माता-पितरां । धड बोली नाहीं संसारा । येर विश्व भरी आदरा । मूर्खु जैसा ।।ज्ञा.-१८।।५९५।।** संपत्ती कमावतात आई-बापला विचारीत नाहित, मित्रांना मात्र ढाब्यावर जेऊ घालतात, माऊली म्हणतात ते मूर्ख आहेत. बरे असे जे मित्र आहेत ते कोठपर्यंत येतात? जन स्मशानें । स्मशानापर्यंत येतात. बरे ज्या देहाला तुम्ही खाऊ नये ते खाऊ घातले, पिऊ नये ते पाजले, चांगला शाम्पू लावून धुतले, तो देह तरी कुठपर्यंत येतो तर चितेपर्यंत. **कर्माणि गच्छंति जीव एक: । जसे कर्म असेल तसे त्याला जावे लागते. जैसे ज्याचे कर्म तैसे फळ देतो ईश्वर ॥** म्हणून संपत्ती कमवा, संपत्ती बरोबरच संस्कार सुद्धा फार महत्त्वाचे आहेत. संपत्ती तुम्ही कितीही कमवा ती जागेवरच राहते. संपत्ती आली की मग मनुष्यानें धर्म केला पाहिजे, जर त्याने धर्म केला नाही तर- एक व्यक्ती होती. पुणे जिल्ह्यात नंबर एक ची श्रीमंती, परंतु त्याने कधी सप्ताहाची वर्गणी दिली नाही. कधी मंदिराला रंग दिला नाही. सप्ताहात त्याने कधी पंगत दिली नाही. गोशाळेला कधी वर्गणी दिली नाही. साधु-संतांना त्याने कधी विचारले नाही आणि नको तेथे उधळपट्टी केल्याशिवाय राहिला नाही. असा तो एक दिवशी मेला. लोकांनी त्याला तिरडीवर बांधले आणि राम नाम सत्य है असे म्हणत घेऊन निघाले. ज्याने कधी राम-नाम घेतले नाही त्यालाही लोक **''राम नाम स्त्य है''** असे म्हणतच घेऊन जातात. जेव्हा ते चितेपर्यंत पोहचले तेव्हा मात्र एक चमत्कार घडला. त्या चितेला वाचा फुटली आीण ती त्या मढ्याला म्हणाली- **मंजिल तेरी यही थी । उम्र लगा दी तुमने आते-आते । क्या मिला तुझे इस दुनियासे । आपनोने ही जला दिया तुझे जाते-जाते ।।** ज्यांच्यासाठी तू एवढे रक्ताचे पाणी केले, त्यांच्याकडून तुला काय मिळाले? **धन मिळविले कोटी-कोटी । बरोबर नाही आली लंगोटी ।।** किती कृतघ्न लोक आहेत पहा ना! ज्यांच्यासाठी एवढे कमावले ते तुमच्या अंगावर लंगोटीच काय पण करगोटाही ठेवित नाहीत. तो सुद्धा तोडून टाकतात. म्हणून म्हणतो कोणासाठी कमावता? तुकोबाराय म्हणतात- **इहलोकीच्या व्यवहारे नका डोळे धुरे भरोनी राहू ।।२५२३।।** आता तरी सावध व्हा! **कवनाचे माय-**

**बाप, कवनाचे गणगोत मृगजळवत जाईल रया । नाहीतरी संसारू जाईल रया ।।** संपत्ती कमावण्याच्या पाठीमागे तुम्हीं लागले, बाबांनों संस्कार कमवा. संतांच्या संगतीमध्यें रहा. ज्ञान प्राप्त करून घ्या आणि जीवनाचे कल्याण करून घ्या. हे न करता नुसती संपत्ती कमावली, मुला-बाळांचे पालन-पोषण केले, साधु-संतांची निंदा केली, धर्म-कर्म-व्रत कांही जाणले नाही तर शेवटी नरकाला जावे लागते. दोन वर्षापासून एक गुजराथमधील संन्यासी आळंदीला येतात. त्यांनी फोर्ड कंपनीच्या मालकाचे उदाहरण सांगितले होते. ते अमेरीकेचे आहेत. ते जेव्हां मृत्युशय्येवरती पडले होते तेव्हां त्यांच्या मुलाने त्यांना जगातील सर्वात मोठ्या आणि सुसज्य अशा हॉस्पिटल मध्यें दाखल केले. आणि तेथील मुख्य डॉक्टरांना त्याचा मुलगा म्हणाला- डॉ. हे माझे वडील आहेत. फोर्ड कंपनीचे मालक आहेत. जगांत जेवढे देश आहेत त्या प्रत्येक देशांत आमच्या कंपनीच्या शाखा आहेत. पैशांना कांहीही कमी नाही. हवे तेवढे पैसे खर्च करतो, एवढेच नाही तर यापेक्षाही मोठे आणि सुसज्य असे हॉस्पिटल मी तुम्हांला बांधून देतो, पण माझे वडील वाचले पाहिजेत. डॉक्टर म्हणाले- प्रयत्न करणे आमच्या हातात आहे. ते वाचणे न वाचणे हे ईश्वरी इच्छेच्या आणि त्यांच्या प्रारब्धाच्या हातात आहे. **ललाटीचे लिहिले । न चुके कांही केले ।।** डॉक्टरांनी त्यांना ऑपरेशन टेबलवर घेतले. मुलाला आंत बोलावले आणि त्याला एका फॉर्मवर सही करण्यास सांगितले. मुलाच्या लक्षांत आले आपले वडील आता कांही वाचू शकत नाहीत. तो परत गयावया करू लागला, तेव्हां डॉक्टर म्हणाले- **आयु: कर्म च वित्तंच विद्या निधनमेवच पनचैतान्यपि सृज्यन्ते गर्भस्थस्यैव देहिन: ।।** प्रत्येकाच्या जीवनांत तो किती जगणार आहे? किती आणि कोणती कर्मे करणार आहे? किती संपत्ती मिळविणार आहे? किती विद्या संपादन करणार आहे हे त्याच्या प्रारब्धानुसार घडणार आहे. त्यामध्ये कोणीही बदल करू शकत नाही. डॉक्टरांच्याही लक्षांत आले की, हा कांही आता जगू शकत नाही. मग ते म्हणाले- तुम्हांला त्याच्याशी बोलायचे असेल तर बोलून घ्या. ते फारतर ३/४ मिनिटे बोलू शकतात. तेवढ्यांत तेथे न्युज चानलचे प्रतिनीधी आले आणि त्यांनी डॉक्टरांना आणि त्या पेशंटच्या मुलाला विनंती केली की जगातील सर्वात श्रीमंत असणारे हे तुमचे पिताश्री आता मृत्युच्या दारांत उभे असताना साऱ्या जगाला कांही मौलिक असा संदेश देऊ शकतात. तेव्हां कांही क्षण आम्हांला त्यांच्याशी बोलण्याची परवानगी द्या! डॉक्टर म्हटले मी फकत दोन मिनिटांचा वेळ तुम्हांला देऊ शकतो. पटकनं काय विचारयचे ते विचारून घ्या! ते मिडियाचे लोक आंत गेले. एकाने त्यांच्या तोंडासमोर माईक धरला आणि दुसऱ्याने त्यांना विचारले आपण जगातील सर्वात श्रीमंत व्यक्ती आहात. आपण इहलोकीची यात्रा संपवून परलोकांत जाणार आहात. तर जाताना तुम्हीं जगाला काय संदेश देऊ इच्छिता? तेव्हां ते म्हणाले- ऐका!- जगात सर्वात श्रीमंत असणारा मी या मृत्युलोकाची यात्रा



संपवून स्वर्गलोकांत जात आहे. माझ्यासारखी संपत्ती आजपर्यंत कोणीच कमावली नाही. व्यवसायांत माझ्याइतका विकास कोणीच करू शकलेले नाही परंतु मी सांगतो जर तुम्हांला खरोखर सुख पाहिजे असेल तर माझ्या मार्गाने कोणीच जाऊ नका, त्याचे कारण मी कमावलेली ही सर्व संपत्ती माझ्या या शेवटच्या क्षणी मला कांहीही उपयोगाची नाही. त्यातील एक कवडीही मी माझ्या पुढील जीवनासाठी घेऊन जाऊ शकत नाही. तुम्हांला जर खरोखर सुख पाहिजे असेल तर तुम्ही भारतात जा! भारतामध्ये गेल्यावर महाराष्ट्रात जा! नंतर पुणे जिल्ह्यांत जा! तेथून आळंदीला जा! तेथे वयाच्या १६व्यावर्षी ज्ञानेश्वर महाराजांनी जी ज्ञानेश्वरी लिहिलेली आहे ती घ्या आणि वाचून त्याप्रमाणे अनुष्ठान करा. तुम्ही इहलोकांतीलच काय पण परलोकातील सुखालाही प्राप्त व्हाल. अगदीच म्हातारपणांत ज्ञानेश्वरी माझ्या हातांत आली. ती जर तारूण्यांतच माझ्या हातात आली असती तर मला मरणाचे आता जे दु:ख मला होत आहे ते झाले नसते. जे अमेरिकेतील त्या उद्योगपतीला कळले ते आम्हांला माऊलींच्या सानिध्यात राहूनही कळू तये हा खरा दैवदुर्विलास आहे. तुम्हांला आश्चर्य वाटेल, तुमच्या गांवचेच असणारे पऱ्हाड दादा येथे बसलेले आहेत, तेच मला येथे कीर्तनासाठी घेून आलेले आहेत. म्हणून मी त्यांची स्तुती करतो असे नाही. मी या पुर्वीही ३/४ वेळा येथे येऊन गेलेलो आहे. कधी टाळ वाजविले, कधी पखवाज वाजविला, कधी गायन केले आणि आज प्रथमच कीर्तन करीत आहे. दादांचा अद्वैत नावाचा नातू आहे ६ वर्षाचा. त्याच्या ज्ञानेश्वरीच्या ५५० ओव्या तोंडपाठ आहेत. तुम्हांला कदाचित खरे वाटणार नाही. पण ही वस्तुस्थिती आहे. तुमच्याकडे जर मोबाईल असेल तर गुगलवर जावून तुम्ही Advait Astadashah असे टाईप करून सर्च करा. अष्टादशामध्यें डॉ. बाबांनी त्याची परीक्षा घेतली होती, त्याची क्लीप यु.ट्युबवर आहे ती तुम्हांला पहता आणि ऐकता येईल. महाराज जे जे विचारतात ते ते तो त्यांना म्हणून दाखवित आहे. त्याला नीट बोलताही येत नाही, पण ज्ञानेश्वरीच्या ओव्या तो स्पष्टपणे उच्चारतो. ही माऊलीची त्याचवर कृपा नाही तर काय आहे? कशाकरता मी तुम्हांला सांगितले? संपत्ती तुम्हीं कितीही कमवा. संपत्ती कमावणे फार अवघड नाही. संपत्ती कोणीही कमावतो. थोडी निती आणि लाज सोडली तर पाहिजे तेवढी संपत्ती मिळविता येते. कान्होराज महाराज म्हणतात- माणसाने संपत्ती कमावली पाहिजे पण किती? पोटापुरती, पण ती धर्माने आणि नितीने कमावली पाहिजे. ते म्हणतात मी लोकांकडे पाहिले तेव्हां माझ्या असे लक्षांत आले की लोक फक्त संपत्ती कमावतात. मात्र धर्म, कर्म, व्रते याचा त्यांना विसर पडलेला आहे. मिळविलेल्या संपत्तीचा ते धर्म-कार्यासाठी उपयोग करीत नाहीत आणि केवळ बायका-पोरांचे पालन-पोषणच करतात. हे अभंगाच्या दुसऱ्या चरणांत सांगतात- **पैका जमूनिया फार । पोशी दारा आणि कुमर ।।२।।** महाराज म्हणतात- त्यामुळे यांची मरणोत्तर काय दशा होईल? **नाही कुणाचे कुणी । तुझे नव्हे रे कोणी ।। अंती जाशील प्राण्या माझे माझे म्हणोनि ।। प्राण्या**

**मायेचा बाजार ।** आता तरी सावध व्हा! ज्यांच्यासाठी तुम्ही संपत्ती कमावता ते सर्व नाशिवंत आहेत.

जेव्हां वाल्ह्याकोळ्याला नारद महर्षी भेटले, तेव्हां त्याला कळले. अरे बापरे! ज्यांच्याकरता मी संपत्ती कमावली, ते तर माझ्या कांहीच कामाचे नाहीत. ज्यांच्यासाठी एवढे पाप केले ते तर या पापाचे वाटेकरी होत नाहीत. ते फक्त मिळविलेल्या संपत्तीचे वाटेकरी आहेत. तेव्हां त्याला संतसंगतीचे महत्त्व कळले आणि तो नारदांना शरण गेला. नारदमहर्षींच्या उपदेशाप्रमाणे वागण्यास तयार झाला आणि वाल्ह्याचा वाल्मिकी झाला. संत संगतीत मनुष्याचे विचार परिवर्तन होते. मनुष्याला सुख समाधान शांती व आत्मस्वरूपाचे ज्ञान प्राप्त होते. मनुष्याला भगवंताची प्राप्ती होते. ब्रह्मज्ञान त्याला प्राप्त होते आणि तो मुक्त होतो. **बैसता संतांचे संगती । कळों आलें कमळापती । आपली कोणीच नव्हती । निश्चय चित्तीं दृढ झाला ।।** महाराज सांगतात, संतांच्या संगतीमध्यें राहिल्यानंतर मला कळले की, माझे कोणीच नाहीत. माऊली म्हणतात- **तैसे हरपले आपणपें पावे । तै संताते पाहतां गिवसावें । म्हणौनि वानावे ऐकावे । तेचि सदा ।।ज्ञा-१८।।४००।।** महाराज म्हणतात- आपले स्वरूप हरवलेले आहे. संतांच्या संगतीत राहिल्याने ते आपल्याला प्राप्त होते, म्हणून वानावे त्यांचे वर्णन करावे, त्यांची स्तुती करावी, त्यांचे चरित्र ऐकावे. स्तुती तर दुरच राहिली, पण लोक त्यांची निंदा-नालस्ती करायला लागले हे अभंगाच्या तृतिय चरणांत सांगतात-

**सदा निंदी साधुसंता । नेणे धर्म कर्म व्रता ।।३।।** संतांच्या संगतीतत राहिल्यावर विवेक प्राप्त होतो. विचार सागरामध्यें व्याख्या केलेली आहे. आत्मा हा अविनाशी आहे, तद्व्यतिरिक्त सर्व विनाशी आहे, असा ज्याचा निश्चय आहे, त्याला विवेकी म्हणतात. संताच्या संगतीमध्यें माणूस विवेकी होत असतो. लोक मात्र संताच्या संगतीमध्यें जाण्यास तयार नाहीत, मग त्यांना विवेक आणि पर्यायानें ज्ञान कसे काय प्राप्त होईल? भगवंत कसा काय प्राप्त होईल आणि त्यांच्या जीवनाचे कल्याण तरी कसे काय होईल? पहिली गोष्ट संत सहसा भेटत नाहीत त्याचे कारण त्यांचे वर्तन हे- **चातुर्य लपवी । महत्त्व हरवी । पिसेपण मिरवी । आवडोनी।।ज्ञा.-१३।।१९२।।** अमानित्व या पदावर भाष्य करताना माऊलींनी हे संताचे लक्षण सांगितलेले आहे. त्यामुळे संत आपल्याला समजत नाहीत. पर्यायाने त्यांची भेट होणे दुर्लभ होते. तुकोबाराय म्हणतात- **चंद्रामृत सुखे सेववेल । अस्ताजाता रवि धरवेल । बाहिहेळा समुद्र तरवेल । परि त्या साधुची भेटी न होय गा ।।** त्यासाठी तुम्हांला एक गोष्ट सांगतो-

आपल्या केंदूर गावासारखे एक गांव होते. डोंगराच्या कुशीत वसलेले सुंदर असे ते गांव. धर्म आणि नीतिने वागणारे तेथील लोक. त्या पवित्र आणि सुंदर गावांत एका दिवशी भगवी वस्त्रे परिधान केलेला एक साधु, सकाळची १०/११ वाजण्याची वेळ. पोटात भूकेची जाणीव होऊ



लागलेली. महात्म्याने विचार केला येथे खाण्यासाठी काही तरी मिळेल या हेतूने एका मोठ्या वाड्यासमोर तो महात्मा उभा राहिला आणि त्याने ''अलख निरंजन भिक्षांदेही'' अशी साद घातली. घरातील एक माऊली बाहेर आली. अंगावर नऊवारी साडी, डोक्यावरती पदर कपाळावर कुंकू, अलंकारांनी मंडीत अशी ती साध्वी. कशासाठी सांगतोय तर अशा तऱ्हेचे दर्शन आज दुर्मीळ होऊ लागलेले आहे. अशी स्त्री पाहिली तर पाहाणाराच्या अंत:करणांत सात्त्विक भाव जागृत होतात, आपल्याला आपल्या मातेचे स्मरण होते आणि तिचे दर्शन घ्यावे अशी इच्छा निर्माण होते. असो. पाहिले तर एक साधु दारांत उभा आहे. विचारले- महाराज काय हवे आहे? मी आपली काय सेवा करू शकते? तेव्हां तो महात्मा म्हणाला- आईसाहेब, मला भूक लागलेली आहे. खाण्यासाठी कांही असेल तर द्या! ती स्त्री साधुमहाराजांना म्हणाली महाराज सावलीत बसा. मी तुमच्यासाठी भाकरी घेऊन येते. ती घरांत गेली आणि चुलीवर केलीली भाकरी, त्यावर भाजी आणि मिरचीचा ठेचा हे सर्व एका हातात आणि दुसऱ्या हातात पाण्याने भरलेला तांब्या घेतला आणि ते सर्व घेऊन ती साधु महाराजांच्या जवळ आली. ते सर्व महाराजांना दिले आणि म्हणाली- महाराज येथेच सावलीत बसून आपण भोजन करा. साधु महाराजांनी दिलेली भाकरी-भाजी खाल्ली. तांब्यातील पाणी प्राशन केले. महात्मा तृप्त झाले. यांचे अन्न आपण भक्षण केलेले आहे, जाताना यांना कांहीतरी देऊन जावे असा विचार त्यांच्या मनांत आला, आणि ते त्या साध्वीला म्हणाले माताजी आता मी आपली काय सेवा करू शकतो? तेव्हां ती स्त्री महात्माजींना म्हणाली महाराज आपल्या कृपेने सर्व कांही उत्तम आहे. कशाचीच ददात नाही. एकच कमी आहे. माझ्या पोटी संसती नाही, ती देता येणे शक्य असेल तर द्या! त्या महात्म्याने आपल्या झोळीत हात घातला आणि झोळीतून थोडे भस्म घेऊन ते अभिमंत्रित केले तंतर ते एका कागदाच्या तुकड्यात बांधून ते तिच्या हातात देत ते तिला म्हणाले हे भस्म तू पाण्यातून प्राशन कर म्हणजे तुला मुलगा होईल असे सांगून महात्मा आल्या वाटेने निघून गेले. नंतर ती स्त्री शेजारणीकडे गेली आणि तिने घडलेली हकिगत त्या शेजारणीला सांगितली. तेव्हां ती शेजारीण तिला म्हणाली- तुझ्या डोक्यांत काय पाणी झाले आहे की काय? अग अशा तऱ्हेने भस्म टाकलेले पाणी पिऊन मुलं झाली असती तर लोकांनी लग्न कशाला केले असते? हे साधु बैरागी मोठे विचित्र असतात. ते सुंदर दिसणाऱ्या स्त्रीयांना वेगवेगळ्या युक्त्या करून आपल्या जाळ्यांत ओढतात. दिवसा कुत्री आीण रात्री स्त्री करून तिचा उपभोग घेतात. तू या फंदात पडू नकोस. तिला तिचे म्हणणे पटले आणि तिने ती भस्माची पुडी एका उकिरड्यावर टाकून दिली. या गोष्टीला १२ वर्षे उलटून गेली. किती? बारा! त्यानंतर तो साधु परत त्याच गावांत आला त्याच वाड्यासमोर उभा राहिला आणि त्याने परत साद घातली ''अलख निरंजन'' फक्त पुढे भिक्षांदेही म्हणाला नाही. ती पूर्वी भेटलेली स्त्रीच समोर आली. तिने विचारले महाराज काय पाहिजे. महात्मा म्हणाले आज काहीही नको.

१२ वर्षापूर्वी मी तुला एक भस्माची पुडी दिली होती आणि तुला मुलगा होईल असे म्हणालो होतो. तर तो मुलगा कोठे आहे? तो मला दाखव! साधुमहाराजांचे ते शब्द कानावर पडल्याबरोबर त्या स्त्रीला बारावर्षापूर्वी घडलेला सर्व इतिहास आठवला आणि तिला दरदरून घाम आला. तिच्या लक्षांत आले. ज्याअर्थी हा साधु १२ वर्षानंतर परत आलेला आहे याचा अर्थ त्याने दिलेल्या भस्मांत निश्चितच पुत्र निर्मीतीचे सामर्थ्य होते. पण माझे भाग्य कमी पडले. आता हा साधु माझ्या अपराधाबद्दल मला कांहीतरी शिक्षा करणार हे निश्चित! तिने लगेच आपले गुडघे टेकले आणि महात्म्याचे पाय धरले आणि म्हणाली महाराज माझ्याकडून चुक झाली. मी तुमची मुलगी आहे असे समजा आणि मला क्षमा करा! महाराज क्रोधाविष्ट झाले आणि म्हणाले- करंट्या कपाळाची आहेस तूं! जेव्हां तुला मी ती भस्माची पुडी दिली होती तेव्हांच मला कळले होते की, याच जन्मांत काय पण पुढच्या सात जन्मांतही तुला पुत्र प्राप्ती होणे शक्य नाही. परंतु तुझे अन्न खाल्ले होते त्यातून उतराई होण्यासाठी तुझ्यावर कृपा केली परंतु तुझ्या प्रारब्धाने तुला त्याचे फळ प्राप्त होऊ दिले नाही.आता तुझ्यावर रागाऊन काय उपयोग! सांग त्या पुडीचे पुढे काय केले? कोठे टाकली ती पुडी? तिने पुडी टाकलेला उकिरडा दाखवला. महाराजांनी त्यातून एका दिव्य पुरुषाची मिर्मीती केली. त्याचे नांव? श्रोते म्हणतात-गोरक्षनाथ! हुषार आहात आपण, उदाहरण कशासाठी सांगितले? त्या माऊलीला संत भेटले का नाही? भेटले! पण कळले का? कळले नाही असेच उत्तर द्यावे लागेल! जर कळले असते तर कल्याण झाले असते का नाही? तसेच आपले झालेले आहे.

कान्होराज महाराज जर आपल्याला कळले असते तर त्यांची आपल्याकडून उपेक्षा झाली असती का? ही अशी स्थिती असती का? आपल्याला साधु भेटले पण कळले नाही. आपली अवस्था कशी झाली ते सांगू का? ज्ञानोबाराय म्हणतात- **नातरी निदैवाच्या परिवरी । लोह्या रुतलिया आहाति सहस्त्रवरी । परि तेथ बैसोनि उपवासु करी । कां दरिद्रें जिये ।।ज्ञा.-९।।५९।।** श्रीमंत बापाची दरिद्री मुले आहोत आपण. ज्ञानोबाराय उदाहरण देतात- एका व्यक्तीचे आई-बाप म्हणे फारच श्रीमंत होते. त्याकाळी बँका नव्हत्या त्यामुळे त्याने कमावलेली आपली संपत्ती मोठमोठ्या सात कढयामध्यें भरून त्या सोन्यानाण्यांनी भरलेल्या कढया वाड्याच्या मध्यभागी असणाऱ्या चौकांत मोठा खड्डा घेऊन त्यामध्यें गाडून ठेवल्या. मात्र याची माहिती मुलाला देण्याअगोदरच तो हार्ट अटॅक येऊन मृत्यु पावला. पोरगा आळशी आणि मंदबुद्धी होता त्याच्याकडे कांहीच संपत्ती नाही. मग तो खाणार काय म्हणून भिक मागू लागला. गावातून शिळ्या भाकरी मागून आणायच्या आणि त्या कढया जेथे पुरलेल्या होत्या त्यावर बसून तो त्या शिळ्या भाकरी खायचा. **नातरी निदैवाच्या परिवरी । लोह्या रुतलिया आहाति सहस्त्रवरी । परि तेथ बैसोनि उपवासु करी । कां दरिद्रें जिये ।।ज्ञा.-९।।५९।।** तशी



आपली अवस्था झालेली आहे. धन आपल्या घरांत आहे पण आपल्याला त्याचे ज्ञान नाही. तसे संत आपल्याला भेटतात पण कळत नाहीत. ज्ञानेबाराय-तुकोबाराय जर कळले असते तर समाजाने त्यांना त्रास दिला असता का? नाथमहाराज कळले असते तर त्रास दिला असता का? कान्होबाराय कळले असते तर त्यांच्या समाधी स्थळाची अशी उपेक्षा झाली असती का? कान्होबाराय म्हणतात- लोक संपत्ती कमावतात आणि मुलाबाळामध्यें गुरफटून जातात. धर्म-कर्म-व्रत-वैकल्ये हे कांही जाणत नाहीत. परीणामी काय होते तर नरकाचे भागीदार होतात. **कान्हो पाठक कथितो नर। अंती भोगी नरक घोर ।।४।।** मनोनिग्रह श्रीमद्‍भग्वदगीतेच्या १८व्या अध्यायाच्या ४२ ते ४४ ब्राह्मण, क्षत्रिय, वैश्य आणि शूद्र यांचे सामान्य धर्म सांगितलेले आहेत. **शमो दमस्तपः शौचं क्षान्तिरार्जवमेव च । ज्ञानं विज्ञानमास्तिक्यं ब्रह्मकर्म स्वभावजम् ।।४२।।** मनोनिग्रह करणे, इंद्रिये स्वाधीन करणे. धर्मपालनासाठी कष्ट सहन करणे. बाह्यभ्यंतर शुद्ध राहणे. दुसऱ्याच्या अपराधांना क्षमा करणे. शरीर-मन इत्यादीत सरळता ठेवणे. वेद-शास्त्राचे ज्ञान करून घेणे. यज्ञविधी अनुभवात आणणे. परमात्मा व यांचे ठिकाणी आस्तिक्य भाव ठेवणे. ही सर्वच ब्रह्मणाची साधारण कर्मे आहेत. **शौर्यं तेजो धृतिर्दाक्ष्यं युद्धे चाप्यपलायनम् । दानमीश्वरभावश्च क्षात्रं कर्म स्वभावजम्।।४३।।** शूरवीरता, तेज, धैर्य, प्रजासंचलन इत्यादीची विशेष चतुरता. तसेच युद्धात कधी पाठ न दाखविणे, दान करणे आणि शासन करण्याचा भाव ही क्षत्रियाची साधारण कर्मे आहेत. **कृषिगौरक्ष्यवाणिज्यं वैश्यकर्म स्वभावजम् । परिचर्यात्मकं कर्म शूद्रस्यापि स्वभावजम् ।।४४।।** शेती करणे, गायींचे रक्षण करणे आणि व्यापार करणे ही वैश्याची साधारण कर्मे आहेत. चारही वर्णांची सेवा करणे हे शूद्राचे स्वाभाविक कर्म आहे. परंतु हे जे लोक आहेत ना धर्म न जाणणारे, विनाकारण ब्राह्मणांना बदनाम करायला लागले आहेत. ब्राह्मण ही देवता आहे. ज्ञानोबाराय म्हणतात- **किं पुनर्ब्राह्मणा: पुण्या भक्ता राजर्षयस्तथा ।**-मग पुण्यशील ब्राह्मण तसेच राजर्षी भक्तलोक मला शरण येऊन परम गतीला प्राप्त होतात, हे काय सांगायला पाहिजे? ब्राह्मण हे तपाचे साक्षात रूप आहेत एवढेच नाही तर, ते भू-लोकीचे देव आहेत. ब्राह्मणाचे नुसते दर्शन जरी झाले तरी त्या ब्राह्मणाने केलेल्या पुण्याचा कांही भाग आपल्याला प्राप्त होतो. **जैसा द्विज षटकर्मे करी । शूद्र तयातें नमस्कारी । कीं दोहींसही सरोभरी । निपजे यागु ।।ज्ञा.-१६।।९६।।** म्हणून ब्राह्मणाची कधीही निंदा करू नये. शक्य असेल तर पूजा करावी. म्हणून प्रत्येकाने आपल्या साधारण धर्माचे आचरण करावे. विनाकारण याच्या-त्याच्यावर जळून उपयोग नाही. कोणत्या जातीत जन्मायचे हे आपल्या हातात नाही. सत्त्वगुणांत राहिलात तर ब्राह्मण व्हाल. रजोगुणांत राहिलांत तर क्षत्रिय-वैश्य व्हाल. तमोगुणांत राहिलात तर शूद्र व्हाल. हे आपल्या हातांत आहे.परमात्मा सांगतात-**चातुर्वर्ण्यं मया सृष्टं**

**गुणकर्मविभागशः ।** मी हे चार वर्ण केले. **विद्ध्यकर्तारमव्ययम् ।।** मी केले पण, तुमच्या कर्मानुसार. म्हणून ज्यांचा महाराजाचेवर विश्वास असेल त्यांनी गीतेला मानलेच पाहिजे. साधु-संतांची निदा कधीच करायची नाही. धर्म काय आहे? व्रते कोणती आहेत? हे जाणून त्यांचे अनुष्ठान केले पाहिजे. एकादशी आणि सोमवार ही व्रते वारकरी संप्रदायांत दंडक म्हरून सांगितलेली आहेत. एकादशी व्रत सोमवार न करिती । कोण त्यांची गति होईल नेणों ।।१।। एकादशी आणि सोमवार ही व्रते जे करीत नाहीत त्यांना कोणती गति प्राप्त होईल हे सांगता येत नाही. म्हणजे त्यांना नरकाला जाण्याशिवाय गत्यंतर नाही. **कान्हो पाठक कथितो नर। अंती भोगी नरक घोर ।।४।।** तेव्हां श्रोता म्हणाला महाराज तुम्हीं फारच जहाल बोललांत, पण तुम्हीं तुमच्या जीवनांत काय केले ते सांगा ना! त्याचे उत्तर महाराज अभंगाच्या प्रथम चरणातून देतात- **कान्हो जन्मूनिया उत्तम कुळीं । केली संसाराची होळी ।।१।।** विठोबा रखुमाई...

कान्हो जन्मूनिया उत्तम कुळीं । महाराज म्हणतात- कान्हो म्हणजे मी उत्तम कुळांत जन्माला आलो. आणि काय केल? भगवंताची भक्ती केली. भगवंताचे नामस्मरण केले. साधुसंतांच्या संगतीमध्यें राहिलो. ज्ञानोबारायांच्या समाधी सोहळ्याचे कीर्तन केले. आळंदी पंढरीची वारी केली. संतांच्या विचाराचे अनुकरण केले. सर्वसामान्य समाजावर पुत्रवत् प्रेम केले. आप-पर भाव कधी केला नाही. हा जो संसार आहे, जो व्यक्तीला बंधनात टाकतो त्या संसाराची मी होळी केली. **केली संसाराची होळी ।।१।।**

संसाराचे दोन प्रकार- १) **पुनरपी जननं पुनरपी मरणं । पुनरपी जननी जठरे शयनम् ।।** पुन्हा-पुन्हा जन्मायचे आणि पुन्हा-पुन्हा मरायचे, हा एक संसार आहे. पण महाराज म्हणतात- मी उत्तम कुळांत जन्माला आलो, संताच्या संगतीत राहून भगवंताची भक्ती केली, त्याचा परीणाम असा झाला की माझी जन्म-मरणरूपी परंपरा खंडीत झाली. **तैसें येणेचि शर्रीरें । शरीरा येणे सरे । किंबहुना येरझारें । चिरा पडें ।।ज्ञा.-१२।।१३६।।** या मानवी देहाला अल्यानंतर महाराजांनी असा पुरुषार्थ करून दाखवला. एकदा गेले ते पुन्हा शरीराला आले नाही, जन्म-मरणरूपी परंपरा खंडीत करून टाकली.

दुसरा जो संसार आहे, तोही महाराज म्हणतात आम्हीं जाळून टाकला आहे.कारण संसार मनचष्याला आसक्ती निर्माण करतो. मग तो सोडून द्यायचा का? संन्यासी व्हायचे का? साधु-संत संसारामध्यें राहिले, परंतु कसे? नाथ महाराज म्हणतात- **पक्षी अंगणी उतरती । ते का गुंतोनिया राहती ।। तैसे असावे संसारी । जोवरी प्राचिनाची दोरी ।।** अंगणामध्ये टाकलेले दाणें टिपण्यासाठी पक्षी अंगणांत येतात. पण पोट भरले की तेथे थांबत नाहीत, निघून जातात. त्याप्रमाणे माणसाने संसारांत राहिले पाहिजे. संसार गळ्यांत पडलाय म्हणून संसारांत राहायचे परंतु त्याविषयीची आसक्ती टाकून राहायचे. जून्या काळांत आमची आजी पूजा उरकली



म्हणजे थोडे तांदुळ किंवा ज्वारी-बाजरी अंगणात फेकीत असे. ते खाण्यासाठी चिमण्या येत असत. त्या ते दाणे टिपत. मोठे विलोभनीय असे ते दृश्य असे. त्यामुळे घरांतील माणसांच्यामध्यें सात्त्विकता, भूतदया आणि पावित्र्याची भावना वाढते. त्यामुळे कुटुंब सुखी आणि समाधानी राहण्यास मदत होते. जसे ते पक्षी दाणें खाण्यासाठी अंगणांत आले तरी त्यांना ते अंगण आपले वाटत नाही. दाणे खाऊन झाले की ते पक्षी निघून जातात. दाणें टाकणाऱ्या बद्दल आसक्ती आणि नटाकणाऱ्याबद्दल द्वेष त्यांच्या ठिकाणी निर्माण होत नाही. परंतु माणसे फार विचित्र असतात. ज्या देहाचा क्षणाचाही भरवसा नाही त्या देहासाठी काय-काय करतात. घरे बांधतात, जमीन जुमला घेतात, परंतु आपण या देहात कशासाठी आलो, हा देव-दुर्लभ असा मनुष्यदेह मिळालेला आहे तर काय केले पाहिजे? याचा विचार मात्र करीत नाहीत. साने गुरुजी म्हणतात- **खरा तो एकची धर्म । जगाला प्रेम अर्पावे ।।** प्रेम सगळ्यांच्यावर करायचे पण मोहांत कोणाच्याच अडकायचे नाही. प्रेम मनुष्याला ज्ञान प्राप्त करून देते आणि मोह मनुष्याला पतनाला नेतो. धृतराष्ट्रानें आपल्या मुलांच्या विषयी मोह ठेवला त्यामुळे त्याला नरकाला जावे लागले. याच्या उलट अर्जुनाने भगवंतावर प्रेम केले तर भगवंताने जो उपदेश आपल्या आई-वडीलांना केला नाही, आपल्या पत्नीला केला नाही, असा गुह्य उपदेश अर्जुनाला केला. **जें न सांगेचि पितया वसुदेवासी । जे न सांगेचि माते देवकीसी । जें न सांगेचि बंधु बळिभद्रासी । तें गुह्य अर्जुनेंशीं बोलत ।।८।। देवी लक्ष्मीयेएवढी जवळिक । वपरी तेही न देखे या प्रेमाचें सुख । आजि कृष्णस्नेहाचें ऊबिक । यातेंचि आथी ।।९।। सनकादिकांचिया आशा । वाढीनल्या होतिया कीर बहुवसा । परी, त्याही येणें मानें यशा । येतीचिना ।।१०।। या जगदीश्वराचें प्रेम । एथ दिसतसे निरुपम । कैसें पार्थें येणें सर्वोत्तम । पुण्य केलें! ।।११।।** ४।। माऊली म्हणतात- मोहामुळे धृतराष्ट्राची स्थिती आणि प्रेमामुळे अजुनाची झालेली स्तिती पहा. अर्जुनाने भगवंतावर प्रेम केले, भगवंताची बहिणच त्याने पळवून नेली. **सन्यासी तुवां होऊनि जर्नी । चोरूनि नेली माझी भगिनी । तऱ्हीं विकल्पु नुपजे मर्नी । मी तूं दोन्ही स्वरूप एक ।।ज्ञा.-१०।।२९४।।** तरी मनांत विकल्प आला कां? नाही! पहा प्रेमाची पराकाष्ठा. किती प्रेम होते पहा. जे ज्ञान देवाने आपल्या पित्याला सांगितले नाही, मातेला सांगितले नाही, भावाला सांगितले नाही, पत्नीला सांगितले नाही, सनकादिकांना सांगितले नाही, ते ज्ञान भगवंताने अर्जुनाला सांगितले. तूं प्रेमाचा पुतळा । भक्तीचा जिव्हाळा । मैत्रियेचि चित्कळा । धनुर्धरा ।।ज्ञा-४।।२९।। प्रेम मनुष्याला ज्ञान प्राप्त करून देते आणि मनुष्य मोक्षापर्यंत जातो तर मोहाने व्यक्ती पतनाकडे जाते. मुले-बाळे, पती-पत्नी, आई-वडील, सर्वांच्यावर प्रेम करा, परंतु त्यांत मोहांत गुंतू नका. मोह हा महामृत्यु आहे. विवेकचूडामणित शंकराचार्य सांगतात- ज्याने या देहाच्या ठिकाणी मोह धरला तर त्याला मृत्यु प्राप्त होतो आणि मोह सोडला तर त्याला

परमात्मा प्राप्त होतो.

मोह. मोह हाच मृत्यु आहे. ज्याने या मोहाला जिंकले- पत्नीवरती प्रेम आहे, पण मोह नाही. मुलावरती प्रेम आहे, पण मोह नाही. नवऱ्यावरती प्रेम आहे, पण मोह नाही. संपत्तीवरती प्रेम आहे, पण मोह नाही. मोह ठेवला की व्यक्ती पतनाला जाते. म्हणून मोहाचा त्याग करा. अंत:करणांत प्रेम धारण करा. भगवत् प्राप्ती झाल्याशिवाय राहाणार नाही. जगद्गुरु तुकोमारायांचे बंधु म्हणतात- **करूनि उचित । प्रेम घाली ह्रदयांत ।।१।। आलों दान मागायास । थोर करूनियां आस ।।धृ।।** महाराजांचे बंधु म्हणतात- देवा अगोदर मला योग्यता द्या आणि मग मला प्रेम द्या. आता थोडक्यांत सांगतो-

मनुष्याने जन्माला आल्यानंतर संपत्ती कमवावी. घरादाराची आसक्ती ठेऊ नये. धर्माने सांगितल्याप्रमाणे आचरण करावे. साधु-संतांची निंदा कधीही करायची नाही. धर्म-कर्म-व्रत-वैकल्ये यांचा त्याग करायचा नाही. त्यांचा त्याग केल्यास नरकाला जावे लागते. संपत्ती कमवून धर्म-कर्म-व्रत-वैकल्ये यांचे पालन केले, संतांची संगती केली, त्यांची सेवा केली तर ती व्यक्ती परमात्मपद प्राप्त करू शकते. म्हणून कान्होराज महाराज आपल्याला सांगतात- मनुष्याने नरदेह मिळाल्यानंतर जन्म-मरणरूपी संसाराची होळी करावी, तसेच प्रपंचरूप संसाराचीही होळी करावी. महाराजांच्या आणि आपणा सर्वांच्या कृपेने मला जे आणि जसे सुचले ते बोलण्याचा मी प्रयत्न केला. या अभंगाचा अर्थ असाच आहे! असा माझा आग्रह नाही. संताचे अभंग हे समुद्रासारखे अथांग असतात. ज्याच्यामध्ये जेवढा दम असतो त्या प्रमाणें तो त्यामध्ये अवगाहन करून आपल्या ताकदीनुसार ठाव घेण्याचा प्रयत्न करीत असतो. जेवढे त्याच्या बुद्धीरूपी हाताला लागेल तेवढेच तो घेऊन येऊ शकतो. जे कांही सांगितले ते संस्थेच्या गुरुवर्यांचे, डॉ. बाबांचे आहे. जे कांही चुकले असेल किंवा आपल्याला पटले नसेल ते माझ्या अल्प बुद्धीचे दोष आहेत. झालेली सेवा कान्होबा महाराजांच्या, ज्ञानेश्वर महाराजांच्या, जगद्गुरु तुकोबारायांच्या चरणी समर्पित करतो. **नव्हे हा उपदेश । तुमचे बडबडीलों शेष ।।३।। तुमचे कृपेचें पोसणें । जन्मोजन्मीं तुका म्हणे ।।४।।१८७०।। नातरी बालक बोबडा बोलीं । कां वाकुडा विचुका पाऊलीं । तें चोज करूनि माऊली । रिझें जेवीं ।।ज्ञा.-९।।६।।** ज्ञानेश्वर माऊली....



मार्गशिर्ष व. १३ शुक्रवार दिनांक १५/१२/२०१७ रोजी सायंकाळी ७.०० ते ९०० संतश्रेष्ठ कान्होराज महाराज समाधी सोहळ्या निमित्त ह.भ.प. कृष्णा महाराज गुट्टे यांनी केलेले कीर्तन.

**३. जरी तुज देवाची चाड । तरी न करीं बडबड ।**
**बहुत बोलतां वाड । पडसी पतनीं ।।१।।**
**जरी तुज देवाची बाधा । तरी न करी वेवादा ।**
**वाद करितां निंदा । घडती दोष ।।२।।**
**जरी तुज देवाचा छंद । तरी सांडी कामक्रोध ।**
**तेणे परमानंद । होउनी ठासी ।।३।।**
**जरी तुज देवचि व्हावा । तरी मौन धरी पा जिव्हा ।**
**जेणें तूं अनुभवा । पावसील ।।४।।**
**जरी तुज देवाचा सांगात । होतां अखंडित ।**
**तरी बैस पा निवांत । साधुसंगीं ।।५।।**
**जरी तुज देवाचा विश्वास । तरी ह्रदयीं धरी नागेश ।**
**म्हणे कान्हो पाठक । अरे जना ।।६।।**

प्रस्तुत प्राप्त प्रसंगी कीर्तन सेवेसाठी निवडलेला अभंग संतश्रेष्ठ कान्होराज महाराजांचा आहे. अभंग सहा चरणांचा असून  एका साधक मुमुक्षूला परमात्म प्राप्तीची इच्छा झाली असता, त्याला उपदेश करणारा आहे.

संतश्रेष्ठ कान्होराज महाराजांच्या वार्षिक पुण्यतिथी निमित्ताने आयोजित केलेल्या या कार्यक्रमात आज माझे गुरुवर्य ह.भ.प. श्री. डॉ. महाराज यांची आजची ही नियोजितकीर्तन सेवा होती; तथापि बाबांची तब्येत ठीक नसल्याने आणि त्यांनी आज्ञा केल्यामुळे, त्यांच्या आज्ञेचे पालन करण्यासाठी म्हणून आज मी या ठिकाणी कीर्तनासाठी उभा आहे.

आता या ठिकाणी माझ्याबरोबर आलेले माझे गुरुबंधु आणि गुरुवर्य आबा महाराज गोडसे, वास्तविक माझ्या कीर्तनात टाळ घेऊन उभे राहण्याची आबांची ही दुसरी वेळ आणि तिही याच ठिकाणी. खरे तर ते या ठिकाणी माझ्या कीर्तनासाठी नव्हे, तर संतश्रेष्ठ कान्होराज महाराज यांची सेवा करण्यासाठी उभे आहेत. येथे असलेली ही सर्व मंडळी ''एकाहूनी एक बळी रे'' अशा प्रकारची, माझ्यापेक्षा श्रेष्ठ आहेत. परंतु केवळ बाबांची आज्ञा मला आहे म्हणूनच मी येथे उभा आहे.

आता कीर्तनासाठी हा अभंग निवडण्याचे कारण- हा अभंग संतश्रेष्ठ कान्होराज महाराज यांचा आहे आणि पुण्यतीथी महोत्सवही त्यांचाच आहे. म्हणून त्यांचाच अभंग कीर्तनासाठी निवडला आहे. त्यांनी या जगाला जो कांही उपदेश केलेला आहे, त्याचे काहीतरी चिंतन घडावे अशी दादांची इच्छा; बाबाही याच अभंगावर चिंतन करणार होते. बाबांनी यापुर्वीही महाराजांच्या एका अभंगावर येथेच चिंतन केलेले आहे. ते मला म्हणाले- ''तुला जमत असेल तर हा अभंग घे, हाच अभंग घेतला पाहिजे असाही काही आग्रह नाही''. केवळ बाबांची इच्छा म्हणूनच मी हा अभंग घेतलेला आहे.

कीर्तन म्हटले की, जगद्गुरु तुकोबारायांचा अभंग घ्यावा हा सर्वसाधारण नियम आहे. प्रवचन असेल तर भगवद्‌गीतेतील श्लोक किंवा त्या श्लोकावरील माऊलींची ओवी घ्यावी अशी आपल्या संप्रदायाची परंपरा आहे. असे असले तरी कांही प्रसंगी आपण कीर्तनासाठी ज्ञानोबारायांचा, नामदेवरायांचा किंवा चोखोबारायांचाही अभंग घेत असतो. कीर्तनासाठी इतर संताचा अभंग घेऊच नये अशा प्रकारचा कोणताही लिखित अथवा अलिखित नियम नाही. इतर संतांचे वाङ्मयही समोर यावे. हा त्यामागील हेतू असतो. संतश्रेष्ठ कान्होराज महाराजांचे थोडेच म्हणजे (फक्त सहा) अभंग आहेत. महाराजांनी या अभंगातून जगाला जो उपदेश केलेला आहे, तो जगासमोर यावा या हेतूने मी या अभंगावर थोडेसे चिंतन करण्याचा प्रयत्न करणार आहे.

संताना उपदेश करावा लागतो. का? तर या मृत्युलोकामध्ये जो जन्माला आलेला आहे तो प्रत्येक जीव अपूर्ण आहे. परिच्छिन्न आहे. या अपूर्णतेतून पूर्णत्वाकडे तो वाटचाल करीत असताना कांही इच्छा, अकांक्षा किंवा अपेक्षा त्याच्या अंत:करणांत निर्माण होत असतात. त्याची पहिली इच्छा असते की मला आनंद प्राप्त व्हावा, मला सुख मिळावे; परंतु त्या आनंदाच्या, सुखाच्या प्राप्तीसासाठी मला कोणती साधना केली पाहिजे? हे स्वबुद्धीने त्याला कळत नाही. जीवाने आपल्या बुद्धीनुसार अनेक साधने निवडली; परंतु त्याला सुख प्राप्त झाले नाही. **सर्व सुखाचीया आशा जन्म गेला । क्षण एक मुक्ति यत्न नाही केला ।। हिंडता दिशा शीण पावला । माया वेष्टीला जीव माझा ।।** हा त्या जीवाचा अनुभव आहे. आयुष्यभर अनेक साधना करूनही त्याला सुख प्राप्त न झालेल्या आपल्या सारख्या जीवांना कायमचे सुख मिळण्यासाठी संतांनी जीवाला केलेला उपदेश अत्यंत महत्वाचा आहे. आता जर त्याला विचारले की, तुला सुख पाहिजे, तुला आनंद पाहिजे ते सुख तो आनंद मी तुला आजच्या दिवस देतो, परंतु ते सुख आणि तो आनंद, तुला उद्या मिळणार नाही. चालेल का? तो म्हणतो नाही चालणार. मला नित्य निरंतर अशा प्रकारचा आनंद आणि सुख मिळायला हवे आहे. ठिक आहे, तुला नित्य निरंतर अशा प्रकारचा आनंद आणि सुख देतो परंतु त्याच्या बरोबरीने तू अज्ञानी असशील तर ते तुला चालेल का? तो म्हणतो नाही चालणार! अज्ञानातील सुख मला नको आहे. मला नित्य निरंतर आनंद



आणि सुख हवे आहे, त्याच्या बरोबरीनेच मला ज्ञानही हवे आहे. लहान मुलाला आपण, तुला कांही कळत नाही असे म्हटलो तर ते म्हणते- तुलाच कांही कळत नाही! त्याला जर म्हटले- तू मर! तर ते म्हणते- नाही, तू मर! का? तर त्याची पहिली इच्छा आहे सुखाची, त्याची दुसरी इच्छा आहे नित्यत्वाची अर्थातच अमरत्वाची. आणि त्याची तिसरी इच्छा आहे ज्ञानाची म्हणजेच चिदत्वाची. सर्वांना अमर व्हावे वाटते, कोणालाही मृत्यु नको आहे. सर्वांना ज्ञान प्राप्त व्हावे असे वाटते, कोणालाही अज्ञान नको आहे. आणि सर्वांना सुखाच्या प्राप्तीची इच्छा आहे, कोणालाही दु:ख नको आहे. यालाच शास्त्रीय भाषेत सत्-चित्-आनंद अशा ब्रह्मस्वरूप स्थितीची अपेक्षा म्हणजेच मुमुक्षा म्हणतात.

मला कधीही मृत्यु नको म्हणजे मला नित्यत्वाची इच्छा आहे. मी ज्ञानी असलो पाहिजे म्हणजे मला 'चित्‌ची' इच्छा आहे. आणि मला दु:ख नको म्हणजे मला आनंदाची इच्छा आहे. का तर बाबा म्हणत असतात- तर तो स्वरूपानेच सत्-चित्-आनंदरूप आहे म्हणून. मला ज्ञानाची इच्छा का होते? तर मी मूळचा ज्ञानघन आहे म्हणून. मला आनंदाची इच्छा का होते? तर मी मूळचा आनंदघन आहे म्हणून आणि मला अमर होण्याची इच्छा का होते? तर मी मूळचा अमर आहे म्हणून. **अमर आहा अमर आहा । खरे की पाहा खोटे हे ।। तु. म.।।**

नित्यत्वाची अपेक्षा अंत:करणात धरून, ज्ञानाची अपेक्षा अंत:करणात धरून आणि सुखाची अपेक्षा अंत:करणात धरून प्रत्येकजण, आपआपल्या परीने साधना करीत आहे. असाच एक साधक त्याने वरील इच्छांच्या परिपूर्तीसाठी अनेक प्रकारच्या साधना केल्या. योग, याग, तपादी अनेक साधना केल्या. सर्व शास्त्रांचे अध्ययन केले. परंतु हे सर्व करूनही त्याला सुखाची, समाधानाची प्राप्ती झाली नाही. कारण **षडङ्गादिवेदो मुखे शास्त्रविद्या कवित्वादिगद्यं सुपद्यं करोति । गुरोरङ्घ्रिपद्मे मनश्चेन्न लग्नं ततः कीं ततः किं ततः किं ततः किं ।।** षडांगपूर्वक वेदांचे अध्ययन केले परंतु त्याचे मन सद्‌गुरुंच्या चरणाशी लीन झाले नसेल तर त्याला त्या ज्ञानाचा काय उपयोग? ते स्वामी म्हणत असत-शांती है तो सबकुछ है । शांती नही तो कुछ भी नही । शांती मिळाली, आनंद मिळाला, समाधान प्राप्त झाले, तर त्या साधनेची परिसमाप्ती झाली. शांतीच मिळाली नाही तर साधना सफल झाली असे म्हणता येत नाही.

सत्-चित्-आनंद यांची इच्छा होणे म्हणजेच देवाच्या प्राप्तीची इच्छा होणे आहे. **सदेव सौम्य इदमग्र आसीत ।** परमात्मा सद्‌घन अशा प्रकारचा आहे. परमात्मा सत्-स्वरुप आहे. परमात्मा ज्ञान-स्वरुप आहे. **सत्यज्ञानानंतं ब्रह्म ।** परमात्मा आनंदघन आहे. **आनंदं ब्रह्मव्यजानात्** परमात्मा आनंदस्वरुप आहे. **सुखरुप ऐसें दुजे कोण सांगा । माझ्या पांडुरंगा सारिखें ते ।।१।।२३६९।।** सत्-चित् आणि आनंदरुप परमात्मा आहे. आनंदाची अपेक्षा होणे, ज्ञानाची अपेक्षा होणे आणि सुखाची अपेक्षा होणे याचा अर्थ आहे देवाच्या प्राप्तीची अपेक्षा होणे. अशा

देवाच्या प्राप्तीची अपेक्षा झाली असता त्याने अनेक साधना केल्या. तो काशीला गेला, ऋषीकेशला गेला जेथे जेथे म्हणून कांही ज्ञान मिळू शकेल तेथून तेथून ते मिळविण्याचा त्याने प्रयत्न केला. वेदांचे अध्ययन केले, मोठा झाला, विद्वान झाला, परंतु तरीही त्याच्या अंत:करणांत शांती निर्माण झाली नाही. तेंव्हा त्याला समजले की, केंदुर या गावांत कान्होपाठक नावाचे एक संत महात्मे आहेत. ते गृहस्थी असले तरी आत्मानुभवी अशा प्रकारचे संत आहेत. म्हणून तो केंदुर या गांवी आला. महाराजांना भेटला त्यांना त्याने साष्टांग दंडवत घातला. **श्री संताचिया माथा चरणावरी । साष्टांग हे करी दंडवत ।।१।।** अथवा **तद्विद्धि प्रणिपातेन परिप्रश्नेन सेवया । उपदेक्ष्यन्ति ते ज्ञानं ज्ञानिनस्तत्त्वदर्शिनः।।४।।३४।।** त्याने स्वत:ची सर्व माहिती महाराजांना सांगितली. तो म्हणाला मी सर्व शास्त्रे अभ्यासलेली आहेत. शास्त्रांमध्ये सांगितलेली कोणतीही प्रक्रिया मला समजली नाही असे नाही. मी सर्व कांही शिकलेलो आहे. मला संसारातील सर्व सुखे प्राप्त आहेत. जगातील शब्द, स्पर्श, रुप, रस, गंध हे सर्व विषय मला प्राप्त आहेत. जगात जो कांही वैषयिक आनंद आहे तो मला प्राप्त आहे, परंतु हे सर्व प्राप्त असूनही मी पूर्ण समाधानी नाही. अंत:करणाची सच्ची शांती मात्र मला मिळालेली नाही. त्यासाठी मी काय केले पाहिजे ते आपण मला सांगा! **नाना साधनांच्या केलीया खटपटा । त्या त्या न पावती वो याच्या दारवंठा । जाणो जाता जाणिव घाली आडफाटा । योगाभ्यासे सिद्धी रोधिती वाटा वो ।।३।।निळोबाराय।।** जर साधना करूनही फलप्राप्ती होत नसेल तर मध्ये प्रतिबंध मानावा लागतो. जर कारण आहे परंतु कार्य होताना दिसत नसेल तर मध्ये कांहीतरी प्रतिबंध आहे, असे मानावे लागते. त्यासाठी उदा- अग्नी आहे त्या अग्नीवर जर पाय ठेवला तर पाय पोळतो. हे त्या अग्नीचे सामर्थ्य आहे. या उदाहरणांत अग्नी हे कारण आहे आणि पायाला पोळणे हे कार्य आहे. आता जर अग्नीवर पाय ठेवूनही पाय पोळत नसेल तर मध्ये कांहीतरी प्रतिबंध आहे असे मानावे लागते. कारण आहे म्हणजे अग्नी आहे. परंतु पाय पोळण्याचे कार्य होत नाही. अग्नीमध्ये जर चंद्रकांत मणी ठेवलेला असेल तर तो त्या अग्नीचे दाह करण्याचे सामर्थ्य कुंठीत करतो. त्यामुळे तो अग्नी पायाला पोळू शकत नाही. त्याच प्रमाणे आपण सर्व प्रकारच्या साधना करूनही त्या साधना सफल होत नसतील, चित्ताला परम शांती प्राप्त होत नसेल तर मध्ये कांही तरी प्रतिबंध आहे हे निश्चित, परंतु नेमका कशाचा प्रतिबंध आहे, हे त्या साधकाला कळत नाही, म्हणून तो साधक महाराजांना विचारतो की, मला परम शांती मिळण्यामध्ये काय प्रतिबंध आहे, ते आपण मला सांगा आणि त्या सच्चा शांतीची प्राप्ती मला करून द्या.

साधकाची ही विनंती ऐकून महाराज त्याला जो उपाय सांगतात, ते अभंगाचे पहिले चरण-**जरी तुज देवाची चाड । तरी न करीं बडबड । बहुत बोलतां वाड । पडसी पतनीं ।।१।।** त्या साधकाला कान्होराज महाराज म्हणतात- तू सर्व शास्त्रांचे अध्ययन केलेले आहेस.



तुला सर्व शास्त्र सिद्धांत अवगत आहेत. ते तुला परम शांती प्राप्त करून देण्यासाठी पुरेसे आहेत, तथापि तुला ती परम शांती मिळत नाही त्याचे मुख्य कारण हे आहे की, तू प्राप्त केलेल्या ज्ञानाचा तुला अहंकार आहे. तो अहंकार तुला गप्प बसू देत नाही, म्हणून तुला लोकांना तुझ्या ज्ञानाविषयी सांगावेसे वाटते, म्हणून तू सतत कोणाला ना कोणाला त्याविषयी सांगत असतोस. ती तुझी बडबड प्रथम तू थांबविली पाहिजे. तू जे कांही शिकला आहेस ते दुसऱ्याला सांगण्यापेक्षा ते तू अनुष्ठानांत, आचरणात आणण्याचा प्रयत्न कर. तुला परमात्म प्राप्तीची चाड आहे ना? चाड म्हणजे इच्छा. तुला परमात्म प्राप्तीची इच्छा आहे ना? तर मग तू तुझी बडबड बंद कर. देव हा इतका शुद्ध आहे की त्याला थोडी सुद्धा अहंबुद्धी सहन होत नाही. थोडा सुद्धा अहंकार सहन होत नाही. **तिळभरी जरी होय अभिमान । मेरु तो समान भार देवा ।।तु.म.।।** थोडा सुद्धा विकार सहन होत नाही. थोडाही संग त्याला सहन होत नाही. काम-क्रोधांचा किंचितसा संस्पर्श देवाला सहन होत नाही. तो परमात्मा पूर्ण रूपाने अंतःकरणामध्ये प्रकट होण्यासाठी अंतःकरणातील काम-क्रोधादी विकार पूर्णपणे नाहीसे होणे गरजेचे आहे. म्हणून परमात्म प्राप्तीसाठी निघालेल्या साधकाला महाराज सूचना देतात की, जर तुला परमात्म प्राप्तीची चाड असेल तर सर्व प्रथम तू हे प्रपंचाचे लिगाड टाकून दे! आणि बडबड करणे सोड! **जया परमार्थी चाड । तेणे सांडावे लिगाड । धरुनी भजनाची चाड । नित्यनेम आदरे ।।१।।ए.म.।।** संसाराच्यासंबंधाने बोलणे सुद्धा सोडले पाहिजे. जगद्गुरु तुकोबाराय म्हणतात- **नका मजपाशीं । वदों प्रपंचाचे विशीं ।।१।। आता नाइकवे कानीं । मज देवाविण वाणी ।।धृ।।३३१३।।** प्रपंचाचे विषयी माझ्याजवळ कांहीही बोलू नका. **आता मज न साहावे सर्वथा । संसारगंधीची हे वार्ता। झालो वेडा असोनी जाणता । पावे अनंता तुका म्हणे ।।, तुका म्हणे देह भरीला विठ्ठले । काम क्रोधे केले घर रिते ।। येवूनी गोपाळ राहे तेथे ।** पण कधी? त्यासाठी तुकाराम महाराज म्हणतात- **तुका म्हणे चित्त करावे निर्मळ । येऊनी गोपाळ राहे तेथे ।।४।।** साधकाच्या अंत:करणामध्ये संसाराविषयीची कोणतीही आसक्ती शिल्लक राहू नये. साधकाने परमात्म्या संबंधीच बोलावे, प्रपंच्याच्या संबंधी बोलल्याने संचित असलेल्या पुण्याचा नाश होतो. आणि पुण्य कमी झाले की, अधोगती होते. महाराज म्हणतात **पुण्यक्षये अधोगती ।** किंवा **दिली चाले वाचा । क्षय मागिल्या तपाचा ।** पूर्वी जे कांही तप केलेले असेल त्या तपाचा क्षय होतो. म्हणून संसारासंबंधी काहीही चर्चा करू नको. संसाराची गोष्टच मनांत आणू नको. आता त्याचा संसार कोणता? तर एखादा आश्रम किंवा मठ असेल तर त्या संबंधाने चर्चा करीत असावा. किंवा भक्त मंडळी बरोबर संसाराची चर्चा करीत असावा. त्याला सांगतात या कोणत्याही प्रकारची चर्चा तू करू नकोस. देवाची चाड असेल तर बडबड करू नकोस. **बहुत बोलता वाड पडशी पतनी, । अनंत वाचाळ बरळती बरळ । त्या कैसेनी गोपाळ पावे हरी ।** त्याला

परमात्मा कसा प्राप्त होईल? पतन म्हणजे या मृत्युलोकामध्ये येवून जी परमात्म प्राप्ती करून घ्यावयाची आहे ती झाली नाही तर पुन्हा कोणत्यातरी योनीत जन्म घ्यावा लागेल, जेथे दु:खच दु:ख आहे. दु:खाची प्राप्ती होणे हेच पतन आहे. परमात्मप्राप्ती ही उर्ध्वगती आहे, आणि परमात्म प्राप्ती सोडून जी कांही गती असेल मग ती स्वर्गाची प्राप्ती असली तरी ती त्याची अधोगतीच आहे.

**बहुत बोलता वाड । पडशी पतनी ।** तू संसारासंबंधाने पुष्कळ बोलत राहाशील तर परमार्थ बाजूलाच राहून जाईल. **''अन्या वाचा विमुञ्चत''** त्या एका परमात्म्याला जाणा आणि परमात्म्याच्या संबंधानेच चर्चा करा. जे काही बोलायचे आहे ते परमात्म्या विषयीच बोला. अन्य काहीही बोलू नका. **तच्चिन्तनं तत्कथनमन्योन्यं तत्प्रबोधनम् । एतदेकपरत्वं च ब्रह्मासं विदुर्बुधाः ।।** त्या परमात्म्या संबंधाने चर्चा केली पाहिजे. संसारासंबंधाने बोलू नका. **तमेवैकं विजानीथ अथ अन्या वाचा विमुञ्चत।** संसारा संबंधाने जे बोलणे आहे ते तुम्ही सोडा. परमात्म्याच्या संबंधी, वेदांच्या संबंधी, शास्त्राच्यासंबंधी आपण चर्चा केली पाहिजे. म्हणून पहिला नियम हा सांगितला की, संसारासंबंधी बोलू नका! हे निषेध मुखाने सांगितले आहे. त्यातील महत्वाची गोष्ट ही आहे की, आपण परमार्थ करतो परंतू जे त्याज्य आहे, जे आपल्या अंत:करणांतून काढून टाकले पाहिजे ते काढून न टाकता परमार्थ सिद्ध होत नाही. आपण नामस्मरण करतो, पूजाअर्चा करतो परंतू अंत:करणातील विकार गेले नाहीत, अंत:करण जर शुद्ध झाले नाही तर परमार्थ सिद्ध होत नाही. म्हणून निषिद्धाची निवृत्ती करण्याची गरज आहे. म्हणून अभंगाच्या पहिल्या चरणांत महाराज निषेध मुखाने त्या साधकाला उपदेश करतात. शेतात चांगले पिक यावे असे वाटत असेल तर पिकातील तण प्रथम काढले पाहिजेत. दळण करायचे असेल तर त्यातील खडे प्रथम काढले पाहि+जेत. जेवण करताना घासांत खडा लागला तर माउली म्हणतात- **घासातील हरळू । फेडीता लागे वेळू । परी तो खडळू । काढावाचि की ।।** घासांतील खडा काढल्याशिवाय आपण पुढील घास घेत नाही. त्याप्रमाणे परमार्थ तेंव्हाच सफल होईल जेंव्हा आपल्या अंत:करणांती विकार अंत:करणातून निघून जातील. म्हणून त्याने अनेक प्रकारची साधना करूनही त्याला फलप्राप्ती झालेली नाही. म्हणून महाराज फलप्राप्तीला प्रतिबंध करणाऱ्या गोष्टींचा त्याग करण्याचा उपदेश करतात. **बहुत बोलता वाड । पडशी पतनी ।** तू मोठ्या पतनाला प्राप्त होशील.

काय करावे? हे शास्त्र अध्ययन जे माझ्या मस्तिष्कामध्ये बसलेले आहे ते मला गप्प बसू देत नाही. ते मला केवळ बोलण्यालाच नव्हे तर वाद करण्याला प्रवृत्त करीत आहे. जशी एखाद्याला भूताची बाधा व्हावी तशी मला देवाची बाधा झालेली आहे. आणि म्हणून तो देवच मला प्राप्त व्हावा, देवच मला मिळावा असेही मला वाटते. तर मी काय करू! असे जेव्हा तो साधक म्हणाला तेव्हा महाराज त्याला म्हणतात- अभंगाचे दुसरे चरण-



**जरी तुज देवाची बाधा । तरी न करी वेवादा । वाद करीता निंदा । घडती दोष ।।२।।** एखाद्या ब्राह्मणाला मुसलमानाचे भूत लागले तर तो ब्राह्मण पूजा पाठ न करता ज्याप्रमाणे मशिदीत जावून नमाज पढतो. त्याप्रमाणे भक्ताला देवाची बाधा झाली पाहिजे म्हणजे त्याची प्रत्येक कृती, विचार व भावना देवासाठी असाव्या पण हा जो साधक आहे याने अनेक शास्त्रांचे केलेले अध्ययन त्याला गप्प बसू देत नाही. तो अनेकांशी वाद घालून आपण किती विद्वान आहे हे दाखविण्याचा प्रयत्न करतो. त्याचा हा प्रयत्नच त्याच्या परमात्म प्राप्तीला प्रतिबंध करीत आहे. माऊली म्हणतात- **नवल अहंकाराची गोठी । विषेशे न लागे अज्ञाना पाठी । सज्ञानाचे झोंबे कंठी । नाना संकटी नाचवी ।।** संतांचा किंवा भक्तांचा स्वभाव हा वाद करण्याचा नसतो. वाद करण्याचा स्वभाव हा विद्वानांचा किंवा पंडीतांचा असतो.

एक पंडीत नाथ महाराजांकडे आला आणि त्यांना म्हणाला- मी तुमची कीर्ति ऐकून येथे आलेलो आहे. मला तुमच्याशी वाद करायचा आहे. नाथ महाराज म्हणाले वादाचा अवलंब करू नये. भगवद्भक्त वाद करीत नसतात. तो म्हणाला नाही वाद केल्याशिवाय जेवण करायचे नाही, असा माझा नियम आहे. तेव्हां तुम्ही माझ्याशी वाद केलाच पाहिजे. तो म्हणाला तुम्ही जे काही बोलाल त्याचे मी खंडन करीन. तुम्ही मांडलेला सिद्धांत मी खोडून काढीन. तुम्हाला कोणताही सिद्धांत मांडण्याचे स्वातंत्र्य आहे. तेव्हा नाथ महाराजांचा नाईलाज झाला. ते त्याला म्हणाले- बघ मी जो मुद्दा मांडील त्याचे तू खंडन करू शकणार नाहीस. तो म्हणाला नाही, तुम्ही त्याची काळजी करू नका. मी त्याचे निश्चित खंडणच करीन. तेव्हा नाथ महाराज त्याला म्हणाले- तू या भारत भूमीचा सुपुत्र आहेस! आता महाराजांच्या या वाक्याचे तो काय खंडन करील? त्यानंतर महाराज म्हणाले- तुझी माता पतिव्रता आहे. कर खंडण! आता या वाक्याचे तो कसे खंडन करील? महाराज पुन्हा म्हणाले- तू विद्वान आहेस! आता तो काय म्हणेल? मी विद्वान नाही, मी मूर्ख आहे, असे म्हणेल का तो? नाथ महाराजांच्या एकाही वाक्याचे त्याला खंडन करता आले नाही. त्याला त्याची चूक लक्षात आली आणि नाथ महाराजांचे मोठेपणही त्याला समजले, तो लज्जित झाला, त्याने नाथ महाराजांना साष्टांग दडंवत घातला. आणि आल्या पावली परत निघून गेला.

असाच एक तथाकथित विद्वान समर्थांच्याकडेही आला आणि समर्थांना म्हणाला की, मला तुमच्याशी वाद करायचा आहे. समर्थ म्हणाले मी वाद करीत नाही. तो म्हणाला नाही तुम्ही माझ्याशी काहीतरी वाद केलाच पाहिजे. तेव्हा समर्थ त्याला म्हणाले तो तिकडे माझा शिष्य कल्याण बसलेला आहे, तू त्याच्याकडे जा आणि त्याच्याशी वाद कर. तो म्हणाला मी अशा लुंग्या-सुंग्यांशी वाद घालून माझा अमुल्य वेळ वाया घालविणार नाही. तेव्हा समर्थ त्याला म्हणाले तू जर वादात कल्याणला जिंकलेस तर तू मलाच वादात जिंकले असे मी मान्य करीन; मग तर

झाले! मग मात्र तो पंडीत कल्याण स्वामींच्याकडे गेला. कल्याणस्वामी सुपाऱ्या फोडीत बसलेले होते. समोर सुपाऱ्यांचा ढीग होता. तो पंडीत कल्याणस्वामींना म्हणाला समर्थांनी मला तुमच्याशी वाद करण्यासाठी पाठविले आहे, म्हणून तुम्ही माझ्याशी वाद करा. तेव्हां कल्याणस्वामींनी समोरच्या सुपाऱ्या आपल्या एका हातात घेतल्या आणि ते त्याला म्हणाले- माझ्या मुठीत किती सुपाऱ्या आहेत ते तू सांग? तेव्हां तो पंडीत म्हणाला हे कसे काय सांगता येणे शक्य आहे? हा काय वादाचा विषय होऊ शकतो का? तेव्हां कल्याणस्वामी त्याला म्हणाले- अरे त्यात काय अवघड आहे? तेव्हा तो पंडीत म्हणाला जर अवघड नसेल तर तुम्हीच सांगा मुठीत किती सुपाऱ्या आहेत ते! त्यावर कल्याणस्वामी म्हणाले मुठभर सुपाऱ्या आहेत. किती सोप्पे आहे! कल्याणस्वामींचे ते उत्तर ऐकून त्या पंडीताला राग आला आणि रागाने तो तेथून निघून गेला. दुसऱ्या दिवशी त्या पंडीताने आपल्या शिष्याच्या हातात एक मोकळी वाटी दिली आणि ते त्याला म्हणाले की समर्थांच्याकडे जा! आणि त्यांना सांग की, माझ्या गुरुंना या वाटीत ब्रह्म घालून द्या! त्याप्रमाणे तो शिष्य समर्थांच्याकडे आला आणि त्याने आपल्या गुरुंचा निरोप समर्थांना सांगितला. तेव्हां समर्थानी त्याच्या हातातील वाटी आपल्या हातात घेऊन निरखून पाहिली आणि त्याला म्हणाले- तुझ्या गुरुंना या वाटीत असलेले ब्रह्म आधी काढून घ्या असे सांग. वाटीत असलेले बह्म काढून घ्या याचा अर्थ असा आहे की, ब्रह्म व्यापक आहे. ते कोठे नाही असे नाही, ते व्यापक आहे, म्हणजेच सर्वत्र ओतप्रोत भरलेले आहे. हे फक्त आत्मज्ञानी पुरुषालाच समजू शकते. म्हणून महाराज त्याला सांगतात बाबारे! तुला देवाची बाधा झालेली आहे ना! देवाची प्राप्ती व्हावी अशी उत्कट इच्छा तुला आहे ना, मग एक काम कर! कोणते? तर न करी वेवादा । वाद करू नकोस! वाद, जल्प, वितंडा यामध्ये पडू नकोस. वाद केला तर काय होईल? महाराज म्हणतात- **वाद करीता निंदा । घडती दोष ।** वाद करायचा म्हणजे आपल्या मताचे मंडन करावे लागते आणि दुसऱ्याच्या मताचे खंडण करावे लागते. खंडण करणे म्हणजे निंदा करणे आलेच. **येती निंदकाजवळी अशेषही पापे ।** किंवा **निंदक आमचा सखा आमचे कपडे धुतो फुका ।** किंवा **करी पातकाची धुणी । मोल न घेता साबणी ।।** साबणाचेही मोल घेत नाही आणि धुण्याची मजूरीही घेत नाही, परंतु तो माझे पापे धुवून टाकतो. आणि त्याने धुतलेली ती पापे सुद्धा त्या निंदकालाच लागतात. रामेश्वर भट्टांनी तुकोबारायांची निंदा केली, त्यामूळे काय घडले? तर त्यांच्या अंगाचा दाह झाला. त्याने अनगड शहा फकीराच्या विहिरीत फकीराच्या अनुमती शिवाय स्नान केले. त्यामुळे अनगडशा फकीराने रामेश्वर भट्टांना शाप दिला. ''डुबते रहो!'' रामेश्वर भट विहिरीतू बाहेर निघाले आणि त्याच्या अंगाचा दाह सुरु झाला. ते माऊलींकडे आले. माऊलींनी त्यांना स्वप्नांत दृष्टांत देवून सांगितले- **त्याची तुज कांही घडली रे निंदा । म्हणवूनी हे बाधा जडली तुज।।** तू संतांची, माझ्या जगद्गुरु तुकोबारायांची निंदा केलीस; त्या निंदेचे फळ



म्हणून हे दु:ख तुला प्राप्त झालेले आहे.

निंदा करणारा कितीही मोठा असला, अगदी रामेश्वर भटांसारखा दशग्रंथी ब्राह्मण जरी असला; तरी त्याला केलेल्या निंदेचे फळ भोगावेच लागते. म्हणून **निंदा मत करना किसीकी ।** कोणाचीही निंदा करू नकोस. निंदा करणे हे सर्वात मोठे पाप आहे. **निंदा सकळ पापांचे माथा ।** म्हणून निंदा करणे हा सर्वात मोठा दोष आहे. **वाद करीता निंदा घडती दोष ।** आणि परमात्म प्राप्तीमध्ये याच दोषांचा प्रतिबंध आहे.

पहिल्या चरणांत सांगितले बडबड करू नकोस! या दुसऱ्या चरणांत सांगतात निंदा करू नकोस! आणि आता या तिसऱ्या चरणांत सांगतात- **जरी तुज देवाचा छंद । तरी सांडी कामक्रोध । तेणे परमानंद । होउनी ठासी ।।३।।** तुला देवाचा छंद असेल तुला देवाची आवड असेल, देवच प्राप्त व्हावा असे वेड जर तुला लागले असेल तर मग एक काम कर! कोणते? तुझ्या अंत:करणांत असणारे काम-क्रोध हे जे विकार आहेत ते तू अंत:करणांतून काढून टाक! देवाव्यतिरिक्त कोणताही छंद तुझ्या अंत:करणांत असता उपयोगी नाही. **आणिक छंद नाशिवंत ।** परमात्म्याला सोडून इतर जे छंद आहेत, ते नाशिवंत आहेत. देवाशिवाय संसारातील कोणताही छंद, कोणतेही व्यसन हे नाशिवंत आहे. नष्ट करणारे आहे, घातक आहे. नरकाला प्राप्त करून देणारे आहे. तुझे अध:पतन करणारे आहे. **तुका म्हणे छंद । आम्हां हरीच्या दासा निंद्य ।** हे छंद आम्हां हरीदासांना वर्ज्य आहेत. आम्हाला एकच छंद आहे. **गोविंद गोविंद । मना लागलिया छंद ।।१।। मग गोविंद ते काया । भेद नाही देवा तया ।।२।।** हा एकच छंद साधकाला असला पाहिजे. म्हणजे काय होईल? तेणे परमानंद होउनी ठासी ।।३।। म्हणजे ज्या समाधानाची तुला इच्छा आहे. ते रम्य समाधान, ती शांती, तो परमानंद तुला प्राप्त होईल.

विषयानंद हा अनित्य आहे, नाशवान आहे, जाणारा आहे, संपणारा आहे, उपाधिकृत आहे, कृतक आहे आणि म्हणून अनित्य आहे. परमानंद नित्य, टिकणारा आहे. **नित्यानंदापुढे आनंद तो कोण । विषयसुख बाई बापुडे तें क्षीण ।। जेथे न सरेची वैकुंठ सदन । शेषशायी त्रिकुटभुवन वो ।।१।।निळोबाराय।।** विषयसुख हे बापुडे आहे. परमानंद हा उत्कृष्ट आहे. हा केवळ आनंद आहे, साक्षात आनंदरूपता आहे, ब्रह्मरूपता, ज्ञानरूपता तुला प्राप्त होईल. नित्य-सिद्ध अशा प्रकारची शांती तुला प्राप्त होईल. तेणे परमानंद होउनी ठासी ।। त्यासाठी तू एकच कर संसाराचा छंद सोडून दे आणि देवाचा छंद लावून घे!

पुढे सांगतात-जरी तुज देवचि व्हावा । तरी मौन धरी पा जिव्हा । जेणें तूं अनुभवा । पावसील ।।४।। जर तुला देवच प्राप्त व्हावा असे वाटत असेल तर मग तू **मौन धरी पा जिव्हा ।** तू तुझ्या जिभेला मौनाची सवय लावून घे! याचा अर्थ असा की, तो विद्वान असल्याने विद्वत्तेचे प्रदर्शन करण्यासाठी तो जास्त बोलत आहे. म्हणून पहिल्या चरणांत बडबड करू नकोस असे

सांगतात. दुसऱ्या चरणांत वाद करू नको असे सांगतात. आणि आता या तिसऱ्या चरणांत मौन धरण्याचा त्याला सल्ला देतात. तू असे म्हणशील की माझे मनाचे मौन आहे, तर तसे करू नकोस. जिभेचे मौन सुद्धा धर त्यामुळे काय होईल तर तुझी वृत्ती अंतर्मुख होईल. जिभेचे मौन धरण्याचे अनुष्ठान तू कर. तुला जर देवच हवा असेल तर जिभेचे मौन धरणे हे तुझे कर्तव्य आहे. तुलाच अद्याप देवाची प्राप्ती झालेली नाही म्हणून तुला जगाला उपदेश करण्याचा अधिकार नाही. म्हणून तू मौन धर. प्रथम देवाला प्राप्त करून घे! **तुज व्हावा आहे देव । तरी हा सुलभ उपाव ।।धृ।। आणिकांचे कानी । निंदा स्तुती मना नाणी ।।३।। वेची ते वचन । जेणे राहे समाधान ।।४।।** जरी तुज देवचि व्हावा । जर तुला देवच हवा आहे, तर जिभेला मौनाची सवय लाव! मग काय होईल? **जेणें तूं अनुभवा । पावसील ।।** परिणाम सांगतात जर तू मौन धरलेस आणि मग तू परमात्म प्राप्तीचा प्रयत्न केलास तर तुझी साधना सफल होईल आणि तू अनुभवरूप होशील. **'नित्यानुभवरूपस्य'** असे पंचदशीकार म्हणतात. अनुभव रूपत्वात् म्हणजे परमात्मा हा अनुभवाचा विषय नाही, तर अनुभवरूप आहे. असा अनुभव, अमृतानुभव तुला प्राप्त होईल. वर सांगितलेल्या परमानंदाला अनुभवरूपतेला तू प्राप्त होशील. ही अनुभवरूपता तुला प्राप्त करून घ्यायची असेल, म्हणजे तुला नित्य देवाची संगती हवी असेल तर तू नित्य संत संगतीत रहा.

पुढे सांगतात-**जरी तुज देवाचा सांगात । होतां अखंडित ।** जरी तुला देवाचा अखंड सांगात होता म्हणजे प्राप्त करून घ्यायचा असेल. तर, नित्य अनुभवरूपात रहायचे असेल, परमात्म्याच्या नित्य संगतीत रहायचे असेल तर तू काय कर हे या चरणांत सांगत आहेत. **जरी तुज देवाचा सांगात । होतां अखंडित । तरी बैस पा निवांत । साधुसंगी ।।५।।** मागील चार चरणांत बडबड करू नकोस, वाद करू नकोस, काम-क्रोधांचा त्याग कर, मौन धारण कर. अशा प्रकारे निषेधमुखाने उपदेश केला आणि आता या पांचव्या चरणांत. तू संत संगतीमध्ये रहा संतांच्या सहवासात निवांत बसून रहा असे विधी मुखाने सांगत आहेत. देव नित्य जर कोठे असेल तर तो संतांच्या जवळ असतो. **भक्त समागमे सर्वभावे हरि । सर्व काम करी न सांगता ।।१।।** परमात्मा हा संतांच्या कायम जवळ आहे. संत देवाचे कीर्तन करतात, नामस्मरण करतात. परमात्म्याची प्रतिज्ञा आहे की, जेथे माझा नामघोष चालू आहे, तेथे मी निश्चित सापडतो. **परि तयाठाया पांडवा । मी हरपला गिवसावा । तेथ नामघोष बरवा । करीती माझा ।।, तेथे असे देव उभा । जैसी समचरणांची शोभा ।** संत कीर्तन करतात तर हा संतांच्या कीर्तनात नाचतो. **हरि तेथे संत संत तेथे हरि । ऐसे वेद चारी बोलताती ।।ए.म.।।** जेथे संत तेथे देव म्हणून देवाची संगती हवी असेल तर संतांच्या संगतीत रहा. हे कूट प्रकारचे वाक्य आहे. कारण देवाचा सांगात हवा असेल तर देवाच्याच संगतीत राहायला सांगायला पाहिजे. परंतु तसे न सांगता, देवाचा कायम सांगात हवा असेल तर संतांच्या संगतीत राहायला



सांगतात; याचे कारण परमात्मा हा संतांना सोडून कधीच रहात नाही. **देव संतांच्या सांगाती । या संतांच्या** जवळ परमात्मा कायम वास्तव्य करतो. **नावडे वैकुंठ शेषाचे शयन । वैष्णव सदन आवडले ।।** आपण परमात्म्याच्या संगतीत राहिलो तर एखादे वेळी आपणास परमात्म्याचा विसर पडू शकतो, परमात्म्याचे विस्मरण होऊ शकते. देवाचा सांगाता याचा अर्थ असा की, देवाचे विस्मरण कधीही होऊ नये. शरीर कोठे का असेना, परंतु अंत:करणांत कायम देवच असावा. असे वाटत असेल तर संतांच्या संगतीत राहा. का? तर संतांच्या संगतीत परमात्म्याचा विसर कधीही होत नाही, म्हणून. म्हणूनच जगद्गुरु तुकोबाराय देवाकडे मागणी करताना ती अशी करतात- **संतसंगती देई चरणसेवा । जेणे हा तुझा विसर न पडावा । हाची भाव माझिया जीवा । पुरवी देवा मनोरथ ।।** तुझा विसर होऊ नये म्हणून देवा तू मला संतसंगती दे! **जरी तुज देवाचा सांगात । होतां अखंडित । तरी बैस पा निवांत । साधुसंगी ।।५।।**

आणि आता अभंगाच्या अंतिम चरणात सांगतात- **जरी तुज देवाचा विश्वास । तरी हृदयीं धरी नागेश । म्हणे कान्हो पाठक । अरे जना ।।६।।** जरी तुज देवाचा विश्वास । तरी हृदयीं धरी नागेश । जर तुझ्या अंत:करणांत देवाचा विश्वास आहे, तुझ्या अंत:करणात देवाचा विश्वास नाही असे नाही. महाराजांनी प्रत्येक चरणांत **'जरी'** आणि **'तरी'** हे शब्द वापरलेले आहेत. **'जरी'** ने जे कांही सांगितलेले आहे, ते तुझ्या अंत:करणांत कांही प्रमाणांत आहे, परंतु पूर्ण रूपाने नाही. त्याला पूर्णता प्राप्त होण्यासाठी महाराज **'तरी'** हा शब्दप्रयोग करून त्याचे दृढीकरण करतात. **जरी तुज देवाचा विश्वास ।** तुझा देवावर विश्वास आहे तर तू एक कर! **हृदयीं धरी नागेश । जेथे जेथे मन जाय । तेथे नागनाथ आहे ।** जेथे जेथे तुझे मन जाईल त्या त्या ठिकाणी नागनाथ म्हणजे भगवान परमात्मा आहेच. नागनाथ हे महाराजांचे गुरु आहेत. म्हणून तू आपल्या गुरुंचे चरण अंत:करणांत कायम दृढ धरून ठेव. तत्त्व रूपाने गुरु आणि ईश्वर हे एकच आहेत. **कान्हो पाठक आनंदला । सद्गुरु नागेश भेटला ।।** हे जना, अरे जना. या शब्दांचा प्रत्येक चरणांशी संबंध आहे. **जरी तुज देवाची चाड । तरी न करी बडबड । अरे जना ।।** महाराज कोणाशी बोलतात तर जो साधक आहे, त्याला ते सांगतात. अरे माणसा, अरे साधका, **जरी तुज देवाची बाधा । तरी न करी वेवादा । वाद करीता निंदा घडती दोष ।।धृ।।** महाराज या अभंगातून चढत्या क्रमाने साधकास उपदेश करीत आहेत. पहिल्या चरणांत बडबड करू नको, दुसऱ्या चरणांत वाद करू नको, तिसऱ्या चरणांत काम क्रोधांना अंत:करणांत थारा देऊ नको, चवथ्या चरणांत जिभेने वाचालता करू नको, म्हणजे मौन धारण कर. अशा प्रकारची निषेधमुखाने करावयाची साधना पहिल्या चार चरणांत सांगून दोषापनयन करण्यास प्रथम सांगतात आणि त्यानंतर पाचव्या चरणांत संतसंगतीत रहाण्याची आणि सहाव्या चरणांत हृदयात गुरुचरणांची स्थापना करण्याची गुणाधान प्रक्रिया सांगतात. भगवंत भगवद्गीतेच्या रूपाने अर्जुनाचे

निमित्त करून संपूर्ण जगाला भगवद्गीतेचे तत्त्वज्ञानाचा उपदेश करतात, त्याच प्रकारे महाराज साधकाचे निमित्त करून आपणा सर्वांनाच या अभंगाद्वारे उपदेश करीत आहेत. साधक हा फक्त निमित्तमात्र आहे. महाराजांनी अभंगात सांगितलेली साधना सर्वांच्या ह्रदयांत दृढ व्हावी आणि तिचे अनुष्ठान सर्वाच्याकडून घडावे. अशी प्रार्थना करून सेवेला पूर्ण विराम देतो. ज्ञानेश्वर माऊली ज्ञानराज माऊली तुकाराम.



मार्गशिर्ष व. त्रयोदशी गुरुवार दिनांक ३/०१/२०१९ रोजी
ह.भ.प. गुरुवर्य डॉ. नारायण महाराज जाधव यांनी महाराजांच्या अभंगावर केलेले कीर्तन.

**४. जेथे जेथे मन जाय । तेथें नागनाथ आहे ।।१।।**
**म्हणवोनि पाहे । मन गुंतले नागेश पाये ।।२।।**
**सुखसोहळा भोगियले । भोग भोगणें नागेश जेणें ।।३।।**
**कान्हो पाठक आनंदला । सद्गुरु नागेश भेटला ।।४।।**

काशीमध्ये जो करी नित्य स्नाना । अरण्यामधें ध्यातसे नित्य ध्याना । भजा हो भजा त्या म्हणे दास राजा । नमस्कार माझा तया कान्होराजा ।। जेथे जेथे मन जाय । तेथें नागनाथ आहे ।।१।। म्हणवोनि पाहे । मन गुंतले नागेश पाये ।।२।। संतसम्राट भगवान ज्ञानोबाराय, वैराग्यराजरसिक जगद्गुरु संतशिरोमणी श्रीतुकोबाराय, शांतीब्रह्म श्रीसंतएकनाथ महाराज आणि महाराष्ट्रातील सर्व वारकऱ्यांचे परम आराध्य दैवत श्रीपांडुरंग परमात्मा. आणि आज ह्या समाधी सोहळ्याचा जो महोत्सव संपन्न होत आहे त्याची अधिष्ठात्री संरक्षक संतदेवता श्रीकान्होपाठक महाराज. या सर्वांच्या अलौकिक, अकारण करूण, अद्भूत, असीम, अपूर्व, अहेतुकी अशा दयेमुळे किंवा अनुग्रहामुळे तुम्ही आम्ही सर्व या मार्गशिर्ष मासाच्या पावन पर्वामध्यें, याचे कारण असे आहे की, या पर्वामध्यें भगवद्गीतेत भगवंतानी **''मासानां मार्गशिर्षोहं''** म्हणजे हा महिना भगवंताची विभूती आहे. हा काळ इतका पावन आहे की, या काळांत आपण केलेले कोणतेही अनुष्ठान हे अनंत पटीने फल देत असते. तेव्हा या पावन पर्वामध्यें आज साजरा होणारा हा समाधी महोत्सव, आज आद्यकवी मुकुंदराज तसेच ज्ञानोबारायांचे अनुज बंधु सोपानकाका यांचाही समाधी सोहळा आजच आहे. त्यात आपण सर्वजण उपस्थित आहोत, जिवंत आहोत, आपले श्वोच्छवास चालू आहेत. ते लोहाराच्या भात्याप्रमाणे व्यर्थ नाहीत, याचे कारण असे आहे की, केवळ आपले श्वासोच्छवास चालू आहेत म्हणून आपण जिवंत आहोत असे नाही. जे लोक शब्द, स्पर्श, रूप, रस, गंध हे पंचविषय संपादन करण्यांत तसेच धन, मान, कीर्ति प्राप्त करण्यांत आयुष्य खर्च करीत आहेत, त्यांचेही श्वासोच्छवास चालू आहेत. त्यांना जिवंत का म्हणायचे? तर ते आहेत. कशावरून आहेत? तर ते दिसतात म्हणून आहेत, तसे आपले नाही. आपण या ठिकाणी महाराजांच्या समाधी स्थळावर उपस्थित आहोत. हे एक महान पवित्र असे स्थळ आहे. तुमची जन्मभूमी आणि कर्मभूमी ही केंदूर नगरी असली तरी सुद्धा खऱ्या अर्थाने या ठिकाणी आपण साधकदशेत महाराजांच्या चरणकमलाजवळ बसून, आपले आत्मकल्याण व्हावे, आपले जीवन मंगल व्हावे यासाठी आपण येथे उपस्थित आहोत. महाराजांनी केवळ सहाच अभंग केलेले आहेत. पण ते सहा अभंग म्हणजे गागर मे सागर असे आहेत. जसे एखाद्या घागरीत संपूर्ण सागर साठवावा

त्याप्रमाणे संपूर्ण वेद, स्मृतीग्रंथ, पुराणे, संतवाङ्मय हे सर्व त्यामध्ये आलेले आहे. आतापर्यंत त्यापैकी चार अभंगांचे चिंतन झालेले आहे. उर्वरित राहिलेल्या दोन अभंगापैकी दादांनी हा अभंग घ्या असे सांगितले, म्हणून तो आत्ता आपणापुढे वाचून दाखविला.

कांही लोक म्हणतात- सहाच अभंग कसे? इतर संतांचे हजारो अभंग आहेत. महाराजांचे कांही अभंग गहाळ झाले असावेत. सर्व अभंगांचे संरक्षण करण्यांत त्यांना अपयश आले असावे, अशी त्यांना शंका येते. परंतु तसे कांहीही झाले असण्याची सुतराम शक्यता नाही. त्यांनी सहाच अभंग केले. त्या सहा अभंगात त्यांनी संपूर्ण अध्यात्माचे, नितीशास्त्राचे, धर्मशास्त्राचे, वेदांताचे संपूर्ण सार एकत्रीत केले आहे. त्यांच्या गुरुंनीच त्यांचे जीवनमुक्त पुरुष असे वर्णन केलेले आहे. म्हणजे वेदांताचे मनोगत खऱ्या अर्थानें, अनुभवाने दुसऱ्यांना सांगणारे आणि त्या द्वारा सर्व समाजाचे उत्थान करणारे असे महाराज आहेत. श्रीमद्भागवतामध्यें असे लिहिले आहे- **ब्राह्मणस्य देहोहं शूद्र कामस्य नेष्यते ।** ब्राह्मणाचा देह आहे ना तो अर्थार्जन करण्यासाठी, कीर्ति मिळविण्यासाठी, पांडित्य संपादन करण्यासाठी नाही. शब्द, स्पर्श, रूप, रस, गंध, घर, दार, मुले-बाळे यासाठी ब्राह्मण शरीर नाही. मग हा देह कशासाठी आहे? **कृच्छाय तपसे... सुखायच ।** ते सांगतात-कृच्छाय ब्राह्मणाने काया, वाचा मनाने अत्यंत कष्टकर असे तपच केले पाहिजे. पिंपळखोरी या ठिकाणी महाराजांनी दुर्धर असे तप केले. डोंगरे महाराज सांगायचे तप हा शब्द उलटा केला तर पत असा होतो. समाजामध्यें, देवाजवळ, शास्त्रदृष्टीने त्याचीच पत वाढते आणि याचा वस्तुपाठ म्हणजे महाराजांचे जीवन आहे. त्यांनी लोकांना उपदेश केला तो केवळ शास्त्र पाहून केला नाही, तर **अनुभवे आले अंगा । ते या जगा देतसे ॥** आणि हे जे सहा अभंग आहेत ना! ते आपल्या अध्यात्मिक जीवनाचे रहस्य सांगणारे सुसूत्र वाङ्मय आहे. सूत्राची लक्षणे शास्त्रांत सांगितलेली आहेत. सूत्र त्याला म्हणतात- **अल्पाक्षरं-**कमीत कमी शब्द वापरलेले असावेत. **असंदिग्धं-** ऐकणाराला कोणतीही शंका राहू नये असे ते शब्द हवेत. **सारवद्-** साररूप म्हणजे मर्म किंवा रहस्य सांगणारे असावेत. **विश्वतोमुखं-** ते सर्व जगांत प्रसिद्ध असे असले पाहिजे. जे ज्ञानोबारायांनी सांगितले, तुकोबारायांनी सांगितले, वेदांनी सांगितले, तेच स्मृती ग्रंथात मनुने सांगितले आणि तेच व्यासांनी सांगितले अशा प्रकारचे असले पाहिजे. **अस्तोभं-** पाल्हाळीक नसले पाहिजे. **अनवद्यंच-** ज्यावर कोणीही आक्षेप घेऊ शकणार नाही किंवा ज्याची कोणी निंदा करणार नाही असे ते निर्दुष्ट हवे. जसे बे दुने चार. जगांत कोठेही गेले तरी बे दुने चारच आहे. तसे कान्होपाठक महाराजांच्या या अभंगांत सांगितलेली जी तत्त्वे आहेत ती विश्वाच्या आध्यात्मिक प्रांतात इदं-इत्थं म्हणजे काळ्या दगडावरची रेघ अशा प्रकारची आहेत. म्हणून जादा अभंगांची गरजच नाही. जो पर्यंत चंद्र-सूर्य आहेत तो पर्यंत या भूमीत जन्म घेणारे जे आहेत त्यांच्यासाठी पारमार्थिक साधन अशा प्रकारची भूमिका त्यांनी तयार करून ठेवलेली आहे.



भागवत सांगतो दुर्धर तपश्चर्या त्यांनी केली, तेवढी आम्हांला होणार नाही! या भूमीमध्यें ज्यांनी जन्म घेतलेला आहे त्यांना कांही करण्याची गरज नाही, फक्त त्यांच्या उपदेशावर अत्यंत श्रद्धा ठेवून त्याचे यथाशक्ती, यथामती अनुसरण केले तर त्यांना परमात्म प्राप्तीचे कष्ट नाहीत. या गावचे नांव आहे केंदूर. केंदूर हा जो शब्द आहे ना! तो **''किं-दूरं''** या शब्दाचे अपभ्रष्ट रूप आहे. **''किं-दूरं-अस्ति''**. याचा अर्थ आहे, येथे जन्मलेल्यांना परमात्म प्राप्ती दूर आहे का? तर मुळीच नाही. **पवित्र तो देह वाणी पुण्यवंत । जेथे हरिचे दास जन्म घेती ॥** त्यांना ती तळहातावरील आवळ्याप्रमाणे अत्यंत सुलभ आहे. तुकोबाराय म्हणतात त्या प्रमाणे बाळवेष घेऊनी श्रीहरी भेटला । असे असेल तर आम्ही साधना करूनही आम्हांला ते रम्य समाधान मिळत नाही, त्याचे कारण काय? आम्हांला मात्र त्यांच्याप्रमाणे साक्षात्कार होत नाही त्याचे कारण काय? त्याचे कारण हेच आहे की आपण जी साधना करता त्या साधनेत कांहीतरी चुकत असले पाहिजे. जसा परीस आहे, त्याला लोखंड लावले की त्याचे सोने होते परंतु त्याला जर खापरखुंटी लावली तर काय होईल? **करितां नव्हे नीट श्वानाचें हें पुंस । खापरा परीस काय करी?॥२॥२८२॥** महाराजांनी प्रमाण दिले परंतु त्याचा अनुवाद करणेही अवघड आहे. परंतु येथे सगळे सुज्ञ लोक आहेत, म्हणून अनुवाद करण्याचीही गरज नाही. संत बहिणाबाईंचा अभंग आहे- **लोह परीसा रूसले । सोनेपणासी मुकले ॥ तेथे कोणाचे काय बा गेले । ज्याचे तेणेच अनहित केले ॥** येथे कांहीच करायचे नाही. कान्होपाठक महाराजांच्या कृपाछत्राखाली आपले जीवन जसे वाटेल तसे घालवायचे फक्त, **''श्रद्धावाँन लभते ज्ञानं'' ।** इतकी श्रद्धा ठेवायची की, मी कसाही असो-दूष्ट, नष्ट, चांडाळ परंतू **''केंदूर''** ही माझी जन्मभूमी आहे आणि कान्होबारायांची कृपादृष्टी माझ्यावर नित्य आहे, त्यामुळे माझी कधीही वंचना करणार नाहीत. हा माझा शेवटचा जन्म आहे. ते जीवनमुक्त संत मानवी देहाला आले म्हणून त्यांनी मानवी व्यवहार करून दाखविला परंतु जोपर्यंत कल्पांत होत नाही तोपर्यंत हे महापुरुष पुन्हा-पुन्हा येत राहातात. ज्यांच्या समाधीचे त्यांनी कीर्तन केले ते संतसम्राट ज्ञानोबाराय, त्यांची ही १०८वी समाधी आहे आणि अजून कल्पांतापर्यंत ज्ञानोबाराय येणार आणि कान्होबामहाराज त्या ठिकाणी समाधीचे कीर्तन करणार. ही परंपरा चालत आलेली आहे. संत जरी गेले तरी त्यांची समाधी, त्यांचे चरित्र, त्यांचे आदर्श आपल्या समोर आहेत. फक्त त्यांच्यावर अत्यंतिक श्रद्धा आणि विश्वास असण्याची आवश्यकता आहे. बाकी कांही करण्याची आवश्यकता नाही. तुकोबाराय जसे देवासी भांडतात ना! त्या प्रमाणे या केंदूर नगरीमध्यें प्रत्येक जनवासियाला देवाशी भांडण्याचा अधिकार आहे. **राजयाचे लेकरू पांघरे वाकळ । तरी ते लाज कोणा?॥** कान्होबारायांच्या जीवनांत केवळ योगसिद्धीचा प्रयोग नाही. ज्याला सगुण-साक्षात्कार म्हणतात तोही आहे. महाराजांचे हे अभंग जर पाहिले तर ते वेदांताच्या शिखरावरचे अभंग आहेत. याचा अर्थ तत्त्वज्ञानाची पराकोटी, भक्ती

सिद्धांताची पराकोटी आणि योगाची पराकोटी आहे. वेदाचे चार भाग आहेत, ते चार भाग म्हणजे कान्होबा महाराजांचे जीवन आहे. महिपती महाराजांनी त्यांचे चरित्र लिहिले आहे किंवा परंपरेने आपण जे ऐकत आलो तेवढेच त्यांचे चरित्र आहे असे नाही. महापुरुष स्वत:बद्दल कांही सांगत नाहीत. आज त्यांच्या पुण्यस्मरणाचा उत्सव आपण करतो आहोत. मघाशीच शास्त्री महाराजांनी सांगितले की, महाराज पिंपळखोरीमध्यें चिंतन करीत असत. त्यांना फारसे कोणी शिष्य किंवा भक्त नव्हते. याचे कारण फारच थोडे लोक महापुरुषांना ओळखू शकतात आणि म्हणूनच कान्होराज महाराजांचा परंपरेने आजपर्यंत उत्सव तरी होतो आहे. जर त्यांना कोणीच ओळखले नसते तर उत्सवही झाला नसता. हे जे महापुरुष असतात ते केवळ आपले आध्यात्मिक किंवा धार्मिक कल्याण व्हावे एवढाच विचार करीत नाहीत, तर लौकिक, सामाजिक एवढेच नाही तर पर्यावरणही चांगले कसे राहिल इतका बारीक विचार करणारे कान्होबा महाराज होते. जेव्हां त्यांना चिताग्नी देण्याची वेळ येईल तेव्हा, **देह आणि देहसंबंधे निंदावी इतरे वंदावी श्वान सुकरे ।** ते म्हणतात हा जो देह आहे ना! नासका, कुजका साडेतीन हात लांबीचा, रक्त, रेत अस्थि, चर्म, मज्जा, दुर्गंधी, नरक मुताने भरलेला, त्याला तुम्ही कधीही माझा म्हणू नका आणि देहसंबंधीयांना कधी माझे म्हणू नका. वाटले तर गाढव, डुक्कर, कुत्रे यांना वंदन करा पण शरीराला मी, आणि तत् संबंधीयांना माझे म्हणू नका. **शरीर माझे म्हणता ब्रह्महत्या कोटी येऊनिया पाठी थोपटीती ।** हा आपल्या ऋषी मुनींचा सकळ मानव जातीला संदेश आहे आणि या संदेशाचे आचरण करण्यासाठी कान्होबा महाराजांचा अवतार आहे. प्राण हा एक प्रकारचा मातीचा पिंड आहे. तो भगवद् चरणी अर्पण करणे एवढेच त्याचे कार्य आहे. त्याचे अंजन-भंजन, लालन-पालन यामध्ये माणसाने आपली शक्ती खर्च करू नये. हे खरे संतांचे म्हणणे आहे.

विचार करा साडेसातशे वर्षांपूवी ज्ञानोबारायांच्या समाधी सोहळ्याच्या वेळेला महाराजांना आग्रहाने श्रीसंतनामदेवराय जे भगवंताचे लाडके भक्त आणि सात दिवस जे उन्मनी अवस्थेत होते ज्यांना जगाचे भानही नाही. माऊली समाधीला जातात तेव्हां ते हळूहळू भानावर आले. जेव्हां समाधीचे कीर्तन करायचे ठरले तेव्हां श्रीनिवृत्तीनाथ महाराज आणि नामदेवराय यांनी आग्रहाने कान्होबा महाराजांना कीर्तन करायला लावले. त्या दिवशी असलेली एकवीस घटकांची द्वादशी आणि त्रयोदशी दोन्ही एकत्र अलेल्या होत्या याचाच अर्थ **वाऱ्याहातीमाप चाले सज्जनांचे । कीर्तिमुख त्यांचे नारायण ।।** लोक म्हणू लागले आम्हाला त्यांची पाद्यपूजा करायची, एखादा मनुष्य जेव्हां कीर्तिमान होतो, त्यावेळी सगळे लोक त्याचे वंदन करायला प्रवृत्त होतात. अगोदर जरी त्यांनी त्यांचा छळ केला तरी सुद्धा ते आता पाद्यपूजा करण्याची इच्छा करतात. ज्याप्रमाणें रामेश्वर भट्ट तुकोबारायांच्या पायावर समर्पित झाले त्याप्रमाणे. आणि हे सगळे प्रकार कान्होबारायांच्या जीवनामध्यें होते. म्हणून लोक त्यांचा सन्मान करू लागले. संतांना सन्मान आवडत नाही. **मान**



**अपमान पावे । अवघे गुंडूनि ठेवावे ।।१।।८४।।** अशा प्रकारची त्यांची जीवनचर्या होती. गुरुंची सेवा कशी करायची? ज्याप्रमाणे **पतीचिया मता । अनुसरोनि, पतिव्रता । अनायासें आत्महिता । भेटेचि ते ।।१६।।४५६।।** पतीची सेवा कशी करायची तर त्याला आवडेल तशी करायची. पत्नीला आवडते तशी नाही करायची. त्याप्रमाणे या शरीराला **जीत असता मेल्यासमान ।** किंवा **झाला प्रेतरूप शरीराचा भाव । लक्षियेला ठाव स्मशानींचा ।।१।।१४५७।।** तुकाराम महाराज म्हणतात- **नेऊनि निजविलें स्मशानीं । माणसें जाळी तें ठिकाणीं ।।धृ.।।९०५।।** जीवंत असतानाच हे शरीर मी नाही, माझे नाही. असे त्यांनी ठरविले, त्यांनाच मोठ-मोठे हार आणि त्यांचाच सत्कार लोक करतात. म्हणून महाराजांनी सगळ्या भक्तांना माझ्या शरीराला चंदनाच्या लाकडांत जाळा किंवा त्यावर तूपाचे डबे ओता असे नाही सांगितले तर त्यांनी सांगितले- माझे शरीर काट्याच्या फासावर ठेऊन समाधीस्थळापर्यंत ओढीत न्या! म्हणजे काय होईल? तर देऊळवाड्यापासून या समाधीस्थळापर्यंत काय होईल तर गंगेचे पात्र नित्य भरलेले राहील! परंतु लोकांना वाटले इतका पवित्र हा देह. **पवित्र तो देह वाणी पुण्यवंत । जो वदे अच्युत सर्वकाळ ।।१।। तयाच्या चिंतनें तरतील दोषी । जळतील राशी पातकांच्या ।।धृ।। देव इच्छी रज चरणींची माती । धांवत चालती मार्गे मार्गे ।।३।। काय त्यां उरलें वेगळें आणीक । वैकुंठनायक जयां कंठीं ।।४।। तुका म्हणे देव भक्तांचा संगम । तेथे ओघ नाम त्रिवेणीचा ।।५।। १०४९।।** पण लोकांना वाटले इतका पवित्र हा देह तो काट्याच्या फासावर ठेवून ओढीत कसा न्यायचा म्हणून तसे केले नाही. समाधीस्थळ जवळ आल्यानंतर केवळ उपचार म्हणून त्यांचा देह काट्याच्या फासावर ठेवला, चार पावले ओढीत नेला. तर तेथे आत्ता या दुष्काळातही हापशाला पाणी आहे. असे क्रांतदर्शी हे महात्मे असतात.

त्यांच्या नुसत्या सांगण्यानें बुधवारी येणाऱ्या एकादशीच्या दिवशी भागीरथीवर गंगा प्रगट होते. कालच्या एकादशीला बुधवार होता त्या दिवशी मनकर्णिका प्रगट दिसली असे सांगतात. जर त्यांच्या मनोगताप्रमाणे सेवा केली तर खऱ्या अर्थाने आपण त्यांचे वंशज आहोत. नाहीतर आपण श्रीमंत बापाची दरिद्री मुले आहोत. नाथ महाराजांनी सर्व संतांच्या बरोबरीने जेव्हां महाराजांचे वर्णन केले तर ते म्हणतात- **दंतपंक्तींचा झळाळ । तो हा कान्हया रसाळ ।।११।।१६२१।।** सकल संतगाथा।। याचा अर्थ कान्होबारायांची रसाळ वाणी या सहा अभंगावरूनच दिसून येते. महिपती महाराजांनी भगवद् आज्ञेवरून त्याचे चरित्र लिहिले आहे. ते म्हणतात- त्यांना पांडुरंगाचा साक्षात्कार आहे. भीष्माचार्यांप्रमाणे ते आपल्या मरणाची तिथी सांगून गेलेले आहेत. संतांच्या मालीकेमध्यें कान्होबारायांचे स्थान फारच उच्च आहे. समजा एखादा मनुष्य आहे, आता माझे दांत जर शेवाळलेले असतील तर ऐकणारालाही ते बरे दिसत नाही. महाराजांची दंतपंक्ती, तिचे जे तेज आहे, नाथ महाराजांनी वर सांगितले आहे. त्यामुळे त्यांचे बोलणे ऐकत

रहावे असे वाटते. आपल्या सर्व अवयवामध्यें दांत हा महत्वाचा अवयव आहे. तुकोबाराय **पंढरिये माझे माहेर साजणी । ओविया कांडणी गाऊ ं गीतीं ।** या अभंगाच्या १० व्या चरणांत महाराजांचे वर्णन करतात. **जीवींच्या जीवना एका जनार्दना । पाठक हा कान्हा मीराबाई ।।१०।।१०६९।।** तुकोबारायांना आपल्या जीवाचे जीवन वाटणारे संत एकनाथ महाराज आहेत आणि तेवढेच प्रिय कान्होबा पाठक आणि मीराबाई सुद्धा आहेत. हे सर्व अध्यात्मिक विश्वाला संजीवनी देणारे प्राणदाते आहेत. चौदाशे वर्षे वय असणारे चांगदेव महाराज जेव्हां ज्ञानोबारायांच्या भेटीसाठी आले तेव्हांचा प्रसंग निळोबाराय वर्णन करताना लिहितात- **कान्होपाठक प्रीतीं चालविले सवें । प्रार्थुनि चांगदेवे अत्यादरें ।।११०।।** नुसती आदरानें विनंती नाही केली तर अत्यादरे विनंती केली. त्या वेळच्या लोकांना आणि साधुसंतांना कान्होबा महाराजांच्या साधुत्वाविषयी इतका आदर, प्रेम आणि आत्मविश्वास होता हे त्यांचे जीवन चरित्र सांगते. हे सर्वांना ज्ञात आहे.

महाराजांचे सकाळी उठल्यानंतर स्नान, संध्यावंदन, ध्यान-धारणा, व्हरामध्ये ज्याला साधन शुचिता म्हणतात ती आणि तपस्येसाठी पिंपळखोरीत जाणारा काळ आणि त्यांची विद्वानांचे बरोबर चालणारी शास्त्रचर्चा असे त्यांचे पथदर्शी जीवन होते. या गावातीलच असणारा एक ब्राह्मण काशीला गेला तेव्हां तेथे ज्ञानवापीवर शास्त्रचर्चा चालू होती. त्या चर्चेत जीवनमुक्ताची लक्षणे कोणती असा चर्चेचा विषय होता. परमार्थाचे जे ग्रंथ आहेत ते सगळे खऱ्या अर्थानें मानवी जीवनाची कृतार्थता करणारे ग्रंथ आहेत. त्या ग्रंथामध्यें जीवनमुक्ती सांगितली जाते. जे ग्रंथ जीवनमुक्ती मानीत नाहीत ते ग्रंथ ग्रंथच नाहीत तर ते ग्रंथी वाढविणारे ग्रंथ आहेत, आपल्याला अनात्म पदार्थाची गाठ देऊन अज्ञानामध्यें भ्रमण करविणारे ते ग्रंथ आहेत. ग्रंथ ते की ज्यामध्यें जीवनमुक्ती सांगितली जाते. आपले ज्ञानेश्वर महाराज, तुकाराम महाराज, एकनाथ महाराज, कान्होबा महाराज सगळे संत जीवनमुक्ती मानतात. पण खरा जीवनमुक्त संत कोणता? ज्याला खऱ्या अर्थाने कोणत्याही प्रकारचे कर्तव्य राहिलेले नाही, कोणतीही इच्छा राहिलेली नाही. त्याला परमात्म तत्त्व हे तळहातावरील आवळ्याप्रमाणे स्पष्ट आहे. ज्याला मागे पुढे परमात्मा सांभाळतो. अशी जी व्यक्ती आहे, तिची लक्षणे सांगितली पाहिजेत. उदा. **अद्वेष्टा सर्वभूतानां मैत्र: करुण एव च । निर्ममो निरहङ्कार: समदु:खसुख: क्षमी ।। ये तु धर्म्यामृतमिदं यथोक्तं पर्युपासते । श्रद्दधाना मत्परमा भक्तास्तेऽतीव मे प्रिया: ।।१२।।१३-२०।।** असे आठ श्लोक आहेत गीतेमध्यें. खऱ्या अर्थानें जो महापुरुष आहे, त्या महापुरुषाची लक्षणे वर्णन करणारे हे श्लोक आहेत. त्या ठिकाणी कोणी म्हटले-या पैकी कांही लक्षणे असली तरी तो जीवनमुक्त आहे. कांही म्हटले- एक लक्षण असले तरी तो जीवनमुक्त आहे. कांही म्हटले- तत्त्वज्ञान झाल्यावर त्याच्या ठिकाणी लक्षणे असोत किंवा नसोत तरी सुद्धा तो जीवनमुक्त आहे. अशा प्रकारची त्यांची



चर्चा चाललेली असताना तेथे असलेल्या एका पंडितानें बाजू मांडली. तो म्हणाला- ज्याअर्थी भगवंतानें एकमुखानें ही एवढी लक्षणे सांगितली आहेत त्याअर्थी ही सर्वच लक्षणे त्या महात्म्याच्या ठिकाणी असायला पाहिजेत आणि ती असतील तरच तो खरा जीवनमुक्त महात्मा आहे असे त्याने सांगितले. तेव्हा तेथे असलेले श्रोते म्हणाले, अहो! एवढी सगळी लक्षणे एका माणसाच्या ठिकाणे असणे कसे शक्य आहे? ज्याला कोणाचा द्वेष नाही, जो सर्व प्राणीमात्राचा मित्र आहे, स्वत: उपाशी राहातो परंतु दुसऱ्याचे दु:ख पाहून त्याचे अंत:करण द्रवीभूत होते, विरघळते. अशा प्रकारचा जो पुरुष आहे ज्याला कोणाविषयीही ममत्व नाही, तो कोणाचा नाही आणि त्याचे कोणी नाही, असा निर्मम त्याच्या ठिकाणी यत्किंचीत सुद्धा अहंकार नाही. कितीही दु:खाचा प्रसंग आला तरी तो सुखदु:खामध्यें समान राहू शकतो. **सुखदु:ख समान सकळ जीवांचा कृपाळ । ज्ञानाचा उद्‌बोध प्रेमाचा कल्लोळ ।** असा पुरुष धन्य आहे. **धन्य जगी तोचि एक हरिरंगी नाचे ।** असे त्याचे वर्णन कितीतरी लोकांनी आणि पंडीतांनी केलेले आहे. परंतु असा पुरुष या जगांत कोणीही नाही. वास्तविक भाऊबंदकी हा ब्राह्मण समाजाचा अंगभूत दुर्गुण परंतु कान्होबा महाराजांविषयी काशीला गेलेल्या त्या ब्राह्मणाच्या ठिकाणी अशी भाऊबंदकी नव्हती. नाथमहाराज लिहितात- एखाद्याला वाटते हा साधु आहे तर दुसऱ्याला वाटते हा साधु नाही. अशा तऱ्हेने जगाचे गुणदोष काढण्यात आपले सगळे आयुष्य बरबाद होते. नाथमहाराज म्हणतात- **मिया सांगितली लक्षणांची पोथी । घेऊनि हिंडला त्रिजगती । तरी मुक्ताची आत्मस्थिती । कवणाप्रती लक्षवेना ।।** ही लक्षणें लिहिलेल्या पोथ्यांचे गाठोडे डोक्यावर घेऊन साधुचा शोध घेत जगभर फिरला तर त्याला **वरकड कोठे कांही । एक आहे एक नाही ।।** त्याला मुक्त कोठे सापडणारच नाही. नाथ महाराज म्हणतात मी ही लक्षणे दुसऱ्याला कांडी लावण्यासाठी सांगितलेली नाहीत तर ती तू साधु व्हावे यासाठी सांगितली आहेत. मुक्ताला सगळे जगच मुक्त दिसते. **देखे आपुलिया प्रतिती जगची मुक्त ।** स्वामी महाराज एक घडलेली गोष्ट सांगायचे. थोडी ग्राम्य भाषेत आहे. परंतु ते सांगायचे म्हणून मी थोड्या सौम्य भाषेत सांगण्याचा प्रयत्न करतो. स्वामी स्वत: दंडी संन्यासी होते. संन्यास घेण्यापूर्वी घडलेली ही गोष्ट आहे. स्वामींचे गाव श्रीगोंदे तालुक्यतील सुरेगांव. भिमा धनगर नावाचा स्वामींचा एक मित्र होता. दोघे गांवातील एका पारावर बसले होते. तेव्हां त्या किाणी एक वैदू स्त्री सुया घ्या, बिब्बे घ्या म्हणत चालली होती. यांना पाहिल्यावर तिने आपल्या पोतडीतून एक लाकडी कांडी काढली आणि ती त्यांना म्हणाली ही कांडी तुम्ही घ्या. तेव्हां ते म्हणाले या कांडीचे आम्हाला काय करायचे आहे? आम्हांला नको! तेव्हां ती म्हणाली ही कांडी कांही सामान्य नाही, ही वशीकरण कांडी आहे. तुम्ही हिचा स्पर्श ज्या व्यक्तिला कराल ती व्यक्ती तुम्हांला वश होईल. तुम्ही सांगाल तशी ती वागेल. तेव्हां स्वामींचा मित्र म्हणाला पाहू बरे कसली कांडी आहे ते! त्या स्त्रीने ती कांडी स्वामींच्या मित्राकडे दिली

आणि म्हणाली तिची किमत दोन रूपये आहे, तर दोन रुपये द्या! स्वामींचा मित्र म्हटला जरा थांब आणि तो त्या कांडीचा स्पर्श त्या स्त्रीलाच करू लागला तेव्हां ती तेथून दूर पळू लागली आणि म्हणाली मेला मलाच कांडी लावतो. साधु जो आहे ना! **चंद्रामृत सुखे सेववेल । रवी अस्ता जाता धरवेल । बाह्या हेळा सागर तरवेल । परी त्या साधुचे न कळे महिमान ।। ऐसे कैसियाने भेटती ते साधु ।।** साधु काय रस्त्यावर पडलेले नाहीत. अनेक जन्मांची सुकृते जेव्हां फळ देण्यासाठी सन्मुख होतात, तेव्हांच आपल्या जन्मामध्यें साधु भेटतात. तो केंदूरचा ब्राह्मण त्या विद्वानांची आणि श्रोत्यांची मते ऐकतो. ते म्हणतात- सध्याच्या या कराल-विकराल कळीकाळात असा साधु कोठेही सापडणे शक्य नाही. तेव्हां तो केंदूरकर ब्राह्मण उभे राहून म्हणाला- तुम्ही असे कसे म्हणता! तुम्हांला भेटला नसेल पण आमच्या गावांत अशा प्रकारचे एक संत रत्न आहे. की, जे आता सांगितलेल्या सर्व लक्षणांनी मंडीत आहे. तेव्हां लोकांनी विचारले काय नाव आहे त्यांचे? त्याने सांगितले कान्होपाठक महाराज. तेथे एक माणूस खरोखरच मुमुक्षू होता. त्याला **कै मी उद्धार पावेन । कै कृपा करील नारायण । ऐसे सांगा तुम्ही संतजन । करा समाधान चित्त माझें ।। बोलाचीच कढी आणि बोलाचाच भात । जेवूनिया तृप्त कोण झाला?।।** ही लक्षणे नुसती ऐकण्यापेक्षा ज्याच्या ठिकाणी ही लक्षणे बाणलेली आहेत, त्यांची मी भेट घेईन, त्यांचे चरणरज मस्तकावर धारण करून मीही त्यांच्या प्रमाणे जीवनमुक्त होण्याचा प्रयत्न करीन असा विचार करून त्याने महाराजांचा पत्ता आणि केंदूरला जाण्याचा रस्ता विचारुन घेतला आणि तो मजल दरमजल करीत एक दिवस कांही दिवसांनी केंदूर नगरीत येऊन पोहचला.

सकाळची वेळ होती महाराज आपल्या लहान मुलीला घेऊन घरासमोरच्या ओट्यावर बसलेले होते. मुलीची अजून आंघोळ झालेली नाही. अंगावरचे कपडे मळलेले आहेत. तिच्या नाकातून शेंबूड वहात आहे. महाराज तो पुसून टाकतात आणि मुलीचे चुंबन घेतात. हे आलेल्या त्या मुमुक्षूने पाहीले आणि महाराजांनाच विचारले- बाबा कान्हो पाठकांचे घर कोठे आहे? महाराज म्हणाले हेच त्यांचे घर आहे! आणि या देहालाच कान्होबा पाठक म्हणतात! कारण ते देहाला मी समजत नव्हते. त्याने विचारले म्हणून त्याला या भाषेत सांगितले. आता महाराज त्याला म्हणतात- का हो! कशासाठी येणे केलेत? तो मुमुक्षू म्हणाला- काशी ते केंदूर येवढा पायी केलेला प्रवास व्यर्थ झाला! येथे मी जीवनमुक्त महात्मा कसा असतो हे पहाण्यासाठी आलो होतो परंतु व्यर्थ झाले. तुकाराम महाराज वर्णन करतात- **भक्त भागवत जीवनमुक्त संत । महिमा अत्यद्भूत चराचरी ।।** अशा प्रकारचा तुमचा महिमा तुमच्याच गावातील एका ब्राह्मणानें सांगितला, ही जीवनमुक्त दशा मलाही प्राप्त व्हावी म्हणून आपल्या चरणाजवळ आलो, तुमची ही अवस्था पाहिली आणि माझा भ्रमनिरास झाला. **''प्रात: उत्थाय चिंतये आत्मनो हितम्'' ।**



सकाळी उठल्यावर माणसाने अंतर्मुख होऊन भगवंताचे नामस्मरण, भजन करावे. **प्रभाते मनी राम चिंतीत जावा ।** हे न करता आपण एका ओंगळ मुलीचा शेंबुड काय पुसाता, तिचे चुंबन काय घेता ही काय जीवनमुक्ती आहे का? कान्होबा महाराजांनी शांतपणे त्यांना विचारले- ठिक आहे पण आपल्या दृष्टीन जीवनमुक्त पुरुष कसा असावा असे वाटते? जीवनमुक्तीचे साधन आहे सन्यांस आणि **संन्यासस्य श्रवणं कुर्यात् ।** प्रथम विधीपूर्वक संन्यास करावा आणि मग **आत्मा वारे वा दृष्टव्य:, श्रोतव्य:, मन्तव्य:, निदीध्यासितव्य:** मग कोठे त्या आत्म्याचे आपल्याला दर्शन घ्यायचे झाले तर होते. म्हणजे संन्यास, श्रवण, मनन, निदिध्यासन आणि मग आत्मसाक्षात्कार होतो आणि मग तो जीवनमुक्त पुरुष होतो. तुम्ही तर अजून मार्गालाच लागलेले नाहीत तर मग तुम्ही जीवनमुक्त कसे? महाराज म्हणाले ही मुलगी तुम्हांला जीवनमुक्तीत प्रतिबंध आहे असे वाटते काय? ठिक आहे! असे म्हणाले आणि त्यांनी लगेच ती मुलगी उचलली आणि शेजारीच असलेल्या आडात टाकून दिली. आता मात्र तो ब्राह्मण घाबरला, अवघडल्यासारखा झाला. तो विचार करू लागला की, आपण म्हटलो म्हणून यांनी ही मुलगी आडात टाकली, हे जर येथील लोकांना समजले तर ते आपल्याला गावातून बाहेर जाऊ देणार नाहीत. बरे नाही जाऊ दिले तरी आता आपल्याला बालहत्येचे पातक लागले आहे. आता कांहीही होवो पण येथे थांबणे आता योग्य नाही असे वाटून तो परत जाण्यासाठी निघाला, तेवढ्यांत कान्होबा महाराजांची पत्नी बाहेर आली आणि ती त्या ब्राह्मणास म्हणाली अहो आता भोजनाची वेळ झालेली आहे. भोजनही तयार आहे. आपण भोजन करावे आणि मगच जावे नाहीतर आमचे सत्त्व जाईल. गृहस्थाश्रमामध्यें अतिथी देवो भव । मातृ देवो भव । पितृ देवो भव । आचार्य देवो भव । ही आमची केदूरकरांची संस्कृती आहे. आपण स्नान करा, भोजन करा आणि मगच आपण जा! तुम्ही म्हणाल कीर्तनांत ऐकायला आम्हांलाही बरे वाटते, परंतु केंदुरमध्यें आता कोठे ही संस्कृती आहे, आपला जन्म जर या भूमिमध्यें झालेला असेल तर आहे, जे बाहेर गावाहून आलेले असतील तर नाही. ते म्हणाले एकतर तुम्हीं मुलीची हत्या केली आणि तुमच्या हातचे जेवण आता करायचे? हे शक्य नाही! ते म्हणाले जेवण केल्याशिवाय आम्ही तुम्हांला जाऊ देणार नाही. अगदीच नाइलाज झाला म्हणून ते जेवायला तयार झाले, ते म्हणाले जर तुम्ही मुलीची हत्या केली नसती तर मी मोकळ्या मनाने जेवलो असतो! आता या जेवणाचा घास माझ्या गळ्याखाली उतरणार नाही. महाराज म्हणाले एवढेच ना! त्यांनी मुलीला हाक मारली, त्याबरोबर ती मुलगी पळत येऊन महाराजांच्या मांडीवर येऊन बसली. आता तुम्ही सांगा ब्रह्मदेव असो, भगवान शंकर असो, नाहीतर भगवान विष्णु असो आता कान्होराज महाराजांची जीवनमुक्ती अकाट्य सिद्ध झाली का नाही! अशा प्रकारचे हे थोर महात्मे आहेत.

तुम्ही म्हणाल कीर्तनाची वेळ संपत आली. तुम्ही कान्होबा महाराजांचा अभंग वाचून

दाखवला, परंतु अशी गोष्ट आहे. पवित्र होईन चरित्र उच्चारीन । भगवंताचे चरित्र उच्चारण करणे यालाच खरे कीर्तन म्हणतात. म्हणून आम्हांला जे श्रुत आहे, तेवढे यथाशक्ती, यथामती सांगण्याचा प्रयत्न केला.हे चरित्र आपणास माहित आहेच. त्यांचे चरित्र गायन केल्याने त्यांना कांही होणार नाही, परंतु त्यामुळे आपले अंत:करण शुद्ध होणार आहे म्हणून आपण या चरित्राचे उच्चारण केले. सहज त्यांच्या ऐकता गोष्टी । परमार्थ पोटी दृढावे ।।

माराजांचा हा अभंग आहे ना! हा तत्त्वज्ञानानें प्रचूर अशा प्रकारचा अभंग आहे. त्यांनी या अभंगाच्या चार चरणांमध्यें सगळा वेदान्त आणलेला आहे. तो सांगण्याचे सामर्थ्य आपले नाही. तेवढा वेळ पण नाही. परंतु त्यांचे चरित्र जे परंपरेने आपल्याला माहिती आहे. संत गेले जया ठाया । देवराया पावर्वी ।। मार्ग दावूनि गेले आधी । दयानिधी संत ते । तेणेचि पंथे चालो जाता । न पडे गुंता कोठे कांही ।। अशा प्रकारे त्यांनी साधी, सोपी वैकुंठाची वाट करून ठेवली. म्हणून त्यांच्या चरित्राचा मागोवा घेणे क्रमप्राप्त आहे. आपण आपल्या नियोजित वेळेत त्यांच्या अभंगाचा धावता भावार्थ पाहाण्याचा प्रयत्न करू.

कान्होबाराय हे केवळ ईश्वर भक्त नाहीत, ते गुरु भक्तही आहेत. त्यांच्याकडून हे जे वाङ्मय तयार झालेले आहे त्याचा सुगंध आज साडेसातशे वर्षानंतरही दरवळत राहिलेला आहे. उपनिषदामध्यें असे वर्णन केलेले आहे. **यस्य देवे पराभक्ती । यथा देवे तथा गुरौ ।। तस्यते कथिताह्यार्था । प्रकाशन्ते महात्मना: ।।** याचा अर्थ आहे- ज्याची आपल्या इष्ट देवतेवर जेवढी भक्ती आहे, तेवढीच आपल्या गुरुवरही असते. किंबहुना गुरु हाच ईश्वर आहे आणि ईश्वरच गुरु आहे. रामकृष्ण परमहंसांनी सांगितले आहे- आपल्या जीवनांत जोपर्यंत गुरु मिळालेला नाही तोपर्यंत आपल्या इष्ट देवतेची रात्रंदिवस उपासना करावी. रात्रंदिवस त्याचे नामस्मरण-ध्यान करीत राहावे, म्हणजे काय होते? तुकोबाराय म्हणतात- माझ्या विठोबाचा कैसा प्रेमभाव । आपणच देव होय गुरु ।। ते गुरु रूपानें आपल्या जीवनांत येतात, गुरुरूपाने आपल्या जीवनांत आले ना! तर तेच आपले आराध्य दैवत आहे. या ठिकाणी आपल्याला मूर्तिपूजा, तीर्थयात्रा, ध्यान-धारणा कांही नाही. गुरु सांगतील तेच प्रमाण. गुरुच आपले दैवत आहे. अशा प्रकारे सेवा करायची आणि कर्म-धर्म संयोगानें आपला देह पडला नाही आणि गुरुंचा देह पडला तर त्यावेळी तेच गुरु आपल्या इष्ट दैवतात लीन झाले असे समजून भगवद् उपासना करीत राहावी. असे रामकृष्ण परमहंसांचे म्हणणे आहे. महाराजांच्या संत जीवनाचे जर चिंतन करायचे झाले तर ईश्वर भक्ती आणि गुरुमक्ती त्यांच्या जीवनांत एकवटून आलेल्या आहेत. वेदान्त महाराजांच्या जीवनांत मुरलेला आहे म्हणून ते म्हणतात- देहाचा तुम्ही विचार करू नका, देहाच्या अतीत असणारे आत्मतत्त्व हे अविनाशी निर्विकार अशा प्रकारचे सच्चिदानंदघन अशा प्रकारचे आहे.ते माझे खरे स्वरूप आहे. देह मी नाहीच आहे, हा एवढा मोठा बोध आहे आणि हा बोध गुरुकृपेमुळे त्यांना



प्राप्त झाला आहे. असे हे जीवनमुक्त महात्मे ज्यावेळी त्यांना समाधीस्थळी समाधी दिली जाते, त्याच्या तिसऱ्या दिवशी या पिंपळाचा अंकूर येथे उद्भूत होतो आणि शेजारी भगवान सदाशिव या ठिकाणी पार्वती मातेसह उपस्थित असतात हा ईश्वर भक्तीचा महिमा आहे. म्हणजे ईश्वरभक्ती आणि गुरुभक्ती या दोन्ही ज्यांच्या ठिकाणी एकवटलेल्या आहेत ते आहेत महाराज. महाराजांचे जे वाङ्मय आहे त्यातीलच हा अभंग आहे. हे जे शरीर आहे यामध्यें पंच ज्ञानेंद्रिये, पंच कर्मेंद्रिये, पंच प्राण आणि मन,बुद्धी,चित्त,अहंकार अशी १९ तत्त्वे मिळून हे सूक्ष्म शरीर झालेले आहे. एक माणूस आहे. त्याच्या चेहऱ्यावर काळे डाग पडलेले आहेत. आता लग्नाचे वय झालेले आहे. त्याने मागील तीन महिन्यांत १ लाख रुपये खर्च केले परंतु तो बरा झाला नाही. परवा तो भेटला तेव्हा ढसा-ढसा रडायला लागला. बरे तो सामान्य माणूस नाही तर एक बुवा आहे. हा देह हे विपायें आगींत पडे । तरी भस्म होऊनि उडे । झाले श्वाना वरपडे । तरी ते विष्ठा ।। या चुके दोहीं काजा । तरी होय कृमींचा पुंजा । हा परिणामु कपिध्वजा । कश्मलु गा! ।।१३।।११०६,११०७।। अशी या शरीराची दशा आहे. आणि त्या शरीराचे आपण आंजन-भंजन करतो. वृद्ध झाला तरी वेळेवर जेवायला दिले नाही, कपडे धुतले नाहीत म्हणून मुलांच्या जीवावर उठतो. अरे! तुकोबाराय म्हणतात- **जीता असता मेल्यासमान ।** आयुष्यभर याचे आपण किती अंजन भंजन केलेले आहे, तर कांही समाधान प्राप्त झाले नाही. त्या ऐवजी अंतर्यामी असणारा परमात्मा तो आनंदाची खाण आहे.त्याच्या ठिकाणी स्वयंप्रकाश ज्ञान आहे, तो अमर आहे तोच मी आहे. मन जे आहे ना, ते संकल्प विकल्प करते. बुद्धी निश्चय करते, चित्त चिंतन करते, अहंकार मी-मी असा अहंकार धारण करतो. ही चार सूक्ष्म तत्त्व आहेत.बाकीची पंच ज्ञानेंद्रियें, पंच कर्मेंद्रियें, आणि पंच प्राण ही स्थूल तत्त्वे आहेत. अंत:करण हे सूक्ष्म तत्त्व आहे. या अंत:करणापैकी जास्त सांभाळायचे ते मनाला. कारण तत् संकल्प-विकल्पात्ममं मन: । मन काय करते? हे करावे की ते करावे? हे नको, तेच केलेले बरे राहिल असे सारखे संकल्प करते. स्वप्नांत सुद्धा त्याचे चिंतन चालू असते. तेव्हां माणसानें काय करावे? तुकोबाराय म्हणतात- **मन करारे प्रसन्न । सर्व सिद्धींचें कारण ।।१।। मोक्ष अथवा बंधन । सुख समाधान इच्छा ते ।।धृ।। मने प्रतिमा स्थापिली । मनें मन पूजा केली । मनें इच्छा पुरविली । मन माउली सकळांची ।।२।। मन गुरु आणि शिष्य । करी आपुलेंचि दास्य । प्रसन्न आपआपणास । गति अथवा अधोगति ।।३।। साधक वाचक पंडित । श्रोते वक्ते ऐका मात । नाही नाही आन दैवत । तुका म्हणे दुसरें ।।४।।** त्या मनाला ताब्यांत ठेवले पाहिजे, मनाला प्रसन्न ठेवले पाहिजे. समर्थ म्हणतात- **मना सज्जना भक्ती पंथेचि जावे ।** माणसे वेळ जात नाही म्हणून विनाकारण शेजाऱ्याला त्रास देतात, तो म्हणतो जा आता, झोपा. तो म्हणतो नाही अता कोठे साडेनऊच वाजलेत. गोष्टी करायच्या तर त्या आपल्या अंतरात्म्याशीच केल्या पाहिजेत आणि त्याचे साधन आहे मन. मनाशी संवाद केला पाहिजे.

नामदेवराय म्हणतात- **देह जावो अथवा राहो । पांडुरंगी दृढ भावो ।।** तुकोबाराय म्हणतात- **देव वसे चित्ती । त्याची घडावी संगती ।।ऐसे आवडते मना । देवा मुरवावी वासना ।।, दुर्बुद्धी ते मना कदा नुपजो नारायणा ।।** या जगाचा नियंता असणारा परमात्मा तो माझ्या हृदयांत कायम राहो. अशा प्रकारच्या प्रार्थना कराव्यात. तुकोबाराय म्हणतात- होईल येणें कळसा आलें । स्थिरावलें अंतरीं ।। माझ्या जीवनाचा कळस कधी आहे? नातवंड, पतवंड पाहिले, म्हणजे माझ्या जीवनाचा कळस नाही. शंभर एकर जमीन झाली, म्हणजे माझ्या जीवनाचा कळस नाही. **राहो आतां हेचि ध्यान । डोळा मन लंपट ।।१।। कोंडकोंडूनि धरीन जीवें । देहभावें पूजीन ।।धृ।। होईल येणें कळसा आलें । स्थिरावलें अंतरीं ।।३।। तुका म्हणे गोजिरिया । विठोबा पाया पडों द्या।।४।।** मनाने प्रार्थना केली पाहिजे आणि ते परमात्म स्वरूपाच्या पायांशी खिळवून ठेवले पाहिजे. लोक म्हणतात- आम्हांला कळते पण वळत नाही. हे वळण्यासाठी संतांची संगत पाहिजे. आपल्या या अभंगात कान्होबा महाराज हेच सांगतात. स्वामी नेहमी म्हणायचे दगड पाण्यांत किती दिवस ठेवला म्हणजे बोटचेपा होतो? परमार्थ करण्याचे वर्म आहे, त्या वर्माने परमार्थ केला पाहिजे आणि ते वर्म आहे मन. त्या मनाला आपण उपदेश केला पाहिजे. त्यासाठी जीवनांत कोणता तरी इष्ट मंत्र रामकृष्णहरि सारखा असला पाहिजे. कोणतातरी इष्ट ग्रंथ ज्ञानेश्वरी सारखा असला पाहिजे. कोणीतरी नागेशनाथ महाराजांसारखे श्रीगुरु सर्वांना सामावून घेणारे असले पाहिजेत, संत आपल्या जीवनांत असले पाहिजेत. पांडुरंगरायासारखे एखादे इष्ट दैवत आपल्या जीवनांत असले पाहिजे. **अगा कोणातरी काळे । म्हणतील माझी बाळे ।। शता एका जन्माच्या शेवटी । कृपाळुवापोटी येईल दया ।।** आपण निश्चित परमात्म्याच्या पायांजवळ जावू, परंतु आपला चाललाय परमार्थ. परमार्थ म्हरजे काय? उत्सवांत सात दिवस भाग घेणे. बाकीचे राहिलेले २५३ दिवस आमचे जसे चाललेले आहे ते तसेच चालू ठेवणे, असा त्याचा अर्थ नाही. आपल्या जीवनांत- **नित्य नेम नामी । तो प्राणी दुर्लभ । लक्ष्मीवल्लभ तया जवळी ।।** म्हणून आपण हे सगळे करीत गेलो तरच आपल्या परमार्थाचा प्रवास होईल. आपल्या जीवनांत श्रीगुरु असले पाहिजेत परंतु ते कधी प्राप्त होतील? जेव्हा आपण आपल्या जीवनांत परमात्म्याची भरपूर सेवा करू, तेव्हां तो परमात्मा आपल्या गुरुंची भेट करून देईल. **ऐसीं कर्मेंसाम्यदशा । होय जेथ वीरेशा । मग श्रीगुरु अपैसा । भेटेचि गा ।।१८।।९६६।।** सद्गुरु तुमचा शोध घेत तुमच्याकडे येतील. त्याप्रमाणे महाराज म्हणतात- नागेशनाथ गुरु मला भेटले.त्यांनी मला काय स्थिति प्राप्त करून दिली? **जेथे जेथे मन जाय । तेथे नागनाथ आहे ।।१।।** जसे तुकोबाराय म्हणतात- **पाहें तिकडें माय बाप । विठ्ठल आहे रखुमाई ।।धृ।। जन विजन झालें आम्हां । विठ्ठलनामा प्रमाण ।।१।।** या भगवंताचे नामस्मरण करताना, लोकामध्यें असलो तरी आम्हांला खरा एकांत आहे. अशी स्थिति त्या गुरुकृपेनें आम्हांला प्राप्त झाली. जेथे



जेथे जाय मन असा तुकोबारांचाही अभंग आहे. जेथे जेथे जाय मन । तेथे तेथे अधिष्ठाण ।। एवढाच फरक आहे. त्या अधिष्ठाणालाच येथे काय म्हणतात? नागनाथ म्हणतात. थोडेसे चिंतन केले तर आपल्या लक्षांत येईल, मनुष्य कितीही दुष्ट असू द्या, बऱ्याच वेळा त्याला असे वाटते की, आपण ही चूक करतो. पापाचे संस्कार लवकर जात नाहीत, पुण्याचे संस्कार लवकर नष्ट होतात. का? तर मनुष्य पाप करताना कोणी पाहू नये म्हणून, इतके जपून करतो ना! त्यामुळे मृत्युसमयी त्याला पापकृत्यांचेच स्मरण होते, पुण्ये समोर येत नाहीत. हे मनोविज्ञान आहे. का तर पापा इतके दक्षतेने केलेले आहे, इतके चोरून आणि सावधानतेने केलेले आहे. तेव्हां आपले मन जे आहे ते, **जेथे जेथे जाय मन ।** मन आपले जेथे जायचे असेल, मोठमोठे लुटारू ते पेंढारी हैबतबाबांना शरण आले. ते जगांत कोणालाच मानीत नव्हते, परंतु हैबतबाबांच्या चरणांशी ते नतमस्तक झाले. का? आपण करतो हे कृत्य जर हैबतबाबांना आवडत नसेल तर आपण ते नाही केले पाहिजे. म्हणून महाराज या मनोविज्ञानाचे एक मर्म सांगतात. आपले गुरु किंवा आपले इष्ट दैवत किंवा आपले संविधानात्मक असणारे शास्त्र यांचे उल्लंघन केले तर आपले अकल्याण आहे, ही धारणा एकदा झाली की मग आपले मन त्या पापकर्माला भित राहाते. आपण जी जी कृत्ये करणार आहोत त्या सर्व कृत्यांचा दृष्टा माझा सद्गुरु आहे, हे कळले तर माणसाची काय बिशाद आहे, वाईट कर्म करण्याची. रामकृष्ण परमहंस हे स्वामी विवेकानंदांचे गुरु तर त्यांच्या चरित्रामध्ये असे घडले की, कलकत्यामध्यें राणी रासमणी म्हणून एक संस्थानिक होत्या. श्रीमंत अशी स्त्री आणि तिच्या पतीचे नांव होते मथुरादासबाबू. आताही लोक जेव्हां कलकत्याला जातात तेव्हां तेथे त्यांनी बांधलेल्या कालीमंदिराचे दर्शन घेऊन येतात. राणी फारच धार्मिक होती, तथापि तिचे पती मधुरादास बाबू मात्र मद्यपी होते. रामकृष्ण परमहंस मथुराबाबूंनी बांधलेल्या काली मंदिरात पूजारी म्हणून होते. दक्षिणेश्वरचे सर्व महापुरुष रामकृष्णांच्या दर्शनासाठी येत असत, एवढे ते प्रसिद्ध होते. एक दिवस रामकृष्ण त्या मथुरादास बाबूंना म्हणाले- राजेसाहेब तुम्ही मद्यपान करू नका. तेव्हा मथुरादास बाबू त्यांना म्हणाले- तुम्हीं आमच्या मंदिरातील पूजारी, तुम्हांला हे सांगण्याचा अधिकार नाही. मी मद्यपान सोडणार नाही. तरी सुद्धा रामकृष्णांना मनोमन वाटत होते की याने मद्यपान सोडावे. म्हणून ते म्हणाले ठिक आहे, तुम्ही मद्यपान करा परंतु ते करण्यापूर्वी मला नैवद्य म्हणून माझ्या मुखांत मद्याचा एक थेंब टाकत जा आणि हे जर शक्य नसेल तर माझ्या फोटोला तरी मद्याचा नैवद्य दाखवित जा आणि मगच मद्यपान करा. मथुरादास बाबू म्हणाले ठिक आहे, हे मी करीन. जेव्हा त्यांना मद्यपान करण्याची हुक्की आली तेव्हां त्यांनी मद्याची बाटली आणि पेला घेतला. पेला मद्यानें भरून घेतला आता ते तो पिणार इतक्यात त्यांना रामकृष्ण परमहंसांना दिलेले शब्द आठवला. ते तो पेला घेऊन रामकृष्ण परहंसाकडे निघाले, पण धाडस होईना. हाताला कंप

सुटला त्यांनी विचार केला नाही शक्य होणार म्हणून ते त्यांच्या फोटोला नैवद्य दाखविण्यास प्रवृत्त झाले. फोटोकडे जाऊ जाऊ लागले, त्यावेळी त्यांच्या डोक्यांत असा विचार आला की, हा एवढा पवित्र महात्मा, परमहंस संन्यासी. माझ्या या शूद्र व्यसनासाठी मी त्यांना अपवित्र करणे योग्य नाही. त्यापेक्षा हे मद्यपान सोडणेच योग्य आहे. त्यांनी तो मद्यानें भरलेला पेला फेकून दिला आणि पुन्हा कधीही मद्याला स्पर्श केला नाही.

याचा अर्थ असा जेथे जेथे मन जाय । तेथे नागनाथ आहे ।।१।। असा जर मनुष्य असेल ना, तर त्याला फार शास्त्र शिकावे लागत नाही. फारमोठी साधना करावी लागत नाही. संत वचनावर विश्वास ठेवणे हेच मुख्य आहे. तुकोबाराय म्हणतात- **संतांचिया पायीं हा माझा विश्वास । सर्वभावें दास झालों त्यांचा ।।१।। तेचि माझें हित करिती सकळ । जेणें हा गोपाळ कृपा करी ।।धृ।। भागलिया मज वेहतील कडे । त्यांचियानें जोडे सर्वसुख ।।३।। तुका म्हणे शेष घेईन आवडी । वचन न मोडी बोलिलें तें ।।४।।** संतांचा वोळगणा दास मी होईन । त्यामप्रमाणे कान्होराज महाराज म्हणतात- मी जेव्हां माझ्या मनाचा साक्षीदार माझ्या गुरुंना केले. ते सिद्ध पुरुष आहेत, ते तत्त्वज्ञ आहेत, ते संत आहेत, भक्त आहेत. ते अवतारी कोटीतील अधिकारी कोटीतील महापुरुष आहेत. त्यांचेच मी रात्रंदिवस चिंतन करतो. जेथे जेथे माझे मन जाते, त्या मनाच्याही अगोदर त्या मनाचे अधिष्ठान असणारेमाझे सद्‌गुरु त्या ठिकाणी असतात. जेथे जेथे मन जाय । तेथे नागनाथ आहे ।। या ठिकाणी नागनाथ हे गुरुंचे नावही फार सार्थ आहे. शास्त्रामध्ये सांगितले एखादा माणूस त्याला सारखी भिती जर असली किंवा त्याच्या चित्ताची चंचलता असली तर त्याने कशाचे चिंतन करावे? त्याने डोळे झाकावेत आणि ध्यान करावे. कशाचे ध्यान करावे? ही संपूर्ण पृथ्वी शेष नागाच्या पाठीवरती आहे. जर शेष नागाने आपली पाठ काढून घेतली, तर पृथ्वी राहिल का? पृथ्वी राहाते का नाही? स्थिर राहाते ना! कधीतरी डामाडौल होते का? कधीतरी भूकंपाच्या रूपाने चमत्कार दाखविते, पण ते कायम घडत नाही. तो असणारा शेष भगवान पृथ्वीला शांतरूपाने धारण करतो. तर आपण त्या पृथ्वीचे चिंतन करावे की जी शेषनागाच्या पाठीवर आहे. शेषनागाच्या पाठीवर असणारी पृथ्वी जशी कलंडणार नाही, त्याप्रमाणे मला भिती बाळगण्याचे कारण नाही. जर आपण त्या शेषनागाचे चिंतन केले तर त्या ठिकाणी पृथ्वी स्थिर राहाते हा उपाय तंत्रशास्त्रातही काही लोकांना सांगितलेला आहे. येथे महाराजांच्या गुरुंचे नाव सुद्धा नागनाथ आहे. मला हा अनुभव आला आणि म्हणून माझे चित्त सद्‌गुरुंच्या पायाशी स्थिर झाले. **म्हणवोनि पाहे । मन गुंतलें नागेश पाये ।।२।।** गुरुकृपा ही महाराजांच्या अनुभवाला आली. जिकडे पाहे तिकडे बाई । श्रीहरी वाचोनि दुजे नाही । पाऊल कोठे ठेवायचीही सोय नाही. म्हणतात- **कहां पग डारु देखे अनेरा । देखा तो सब वहींनें घेरा ।।** अशा प्रकारची आमची स्थिति आहे. जीवनांत सगळ्या गोष्टींचा निषेध करता येतो, पर



अनुभवाचा निषेध-अपलाप करता येत नाही. गुरुंच्या चरणाशिवाय मन आता दुसरीकडे कोठे आता जातच नाही. **रुणुझुणु रुणुझुणु रे भ्रमरा । सांडी तू अवगुणु रे भ्रमरा ।। भोगी तू निश्चळू रे भ्रमरा ।।** तुम्ही म्हणाला आमचे चित्त तसे कधी होईल? तर सांगतात- प्रथम प्रयत्नांची पराकाष्ठा करावी लागते, तेव्हां मग श्रीगुरु आपल्याला हाताला धरून गुरुकृपा आपल्यावर ओततात आणि मग ही स्थिती आपल्याला प्राप्त करून देतात. मग आपण म्हटले ना की, आता गुरुंची आठवण करायची नाही, तरी ते गुरुच आपल्याला आठवण करायला लावतात.भागवतकार या स्थितीचे वर्णन करतात. आपण कधी ऐकले असेल.आराधिका नावाची एक गोपी. तिची आणि भगवंताची सहा महिने भेट झाली नाही. सहा महिन्यानंतर जेव्हां तिची आणि भगवंताची भेट झाली तेव्हां तिच्या हाताच्या बोटाला असलेली जखम पाहून भगवंताने तिला विचारले, गोपी ही जखम तुला कशाने झाली? ती गोपी म्हणाली- तुझेच नख लागले. भगवंत म्हणाले- तुझी आणि माझी सहा महिने भेटही झालेली नाही. नखाने झालेली जखम फारतर एक-दोन दिवसांत बरी होते, तुला काय डायेबीटीस झालाय की काय? तेव्हां ती म्हणाली- जखमेवर खपली येते पण, तशी खपली धरली की मीच ती खपली काढून टाकते. भगवंत म्हणाले का? ती म्हणाली= त्यामुळे मला तुमचे सतत स्मरण होत राहाते. त्याप्रमाणे आपले इष्ट दैवत किंवा श्रीगुरु जागृती, स्वप्न सुषुप्ती न आठवे । तुकोबाराय म्हणतात- **पांडुरंग ध्यानी पांडुरंग मनी । जागृती स्वप्नी पांडुरंग ।।** अशा प्रकारचे परमात्म्याचे चिंतन माझ्याकडून होत आहे. **म्हणवोनि पाहे । मन गुंतले नागेश पाये ।।१।।** नाथ महाराजांनी भावार्थ रामायणांत लिहिले- एकदा एखादी गोष्ट आवडली ना, मग ती विसरायची म्हटले तरी विसरण्याच्या निमित्तानेंही तिचेच स्मरण होते.....

आम्ही पडलो आज्ञाधारक, जसे सांगितले तसे केले. म्हणजे ती चूक कोणाच्या माथ्यावर? तर दुसऱ्याच्या. कांही चांगले झाले तर तो आमचा पुरुषार्थ! असे साधारणपणे आहे की नाही? येथे असलेले कोणी तसे नाहीत असे समजा. मनुष्य जीवनामध्यें ही प्रवृत्ती सर्वत्र दिसते. चांगले झाले ते माझ्यामुळे, वाईट झाले ते त्याच्यामुळे झाले. मात्र त्याने अंतर्मुख होऊन विचार केला तर त्याला कधीच शांति किंवा समाधान प्राप्त होत नाही. जीवनांत कितीही मोठे सुख किंवा दु:ख झाले तरी त्या सुखदु:खाचे अधिष्ठान जे मन त्या मनाचेही अधिष्ठान आहेत सद्‌गुरु, आपले इष्ट दैवत परमात्मा, ब्रह्म. म्हणून आपल्या जीवनांत आलेल्या सुख-दु:खांचा विचार करीत बसायचे नाही. पाहुणा आलेला आहे ना! तो जाण्यासाठीच आलेला असतो. तशी ही सुख-दु:खे सुद्धा आगमापायी आहेत म्हणजे येणारी आणि जाणारी आहेत. ती कधीच कायम राहाणारी नसतात. म्हणून त्यांचा विचार करीत बसू नये तर त्यांचे अधिष्ठान मन आणि त्या मनाच्याही मागे दडलेले जे चैतन्य आहे, चैतन्य, परमात्मा, ब्रह्म त्याचे चिंतन करावे. केवढाही मोठा आनंद झाला तरी त्या आनंदाच्या क्षणी माणसाला आपल्या आराध्य दैवताचे, गुरुंचे स्मरण व्हावे आणि केवढाही मोठा

दुःखाचा प्रसंग जीवनांत आला तरी सुद्धा त्याला कोणाचे स्मरण व्हावे तर आपल्या आराध्य दैवताचेच किंवा गुरुंचेच स्मरण व्हावे. त्यामुळे त्याचे दु:ख हलके होते आणि आनदाच्या क्षणी अतिहर्ष होत नाही. सुख आणि दु:ख समान होतात. सुखदु:खे समे कृत्वा लाभालाभौ जयाजयौ ।

ज्याप्रमाणे सासुरवासी स्त्रिला माहेरच्या दिशेकडून येणारा वाराही आवडतो, त्याप्रमाणे गुरुगृहाकडून येणारा वारा किंवा कुत्रेही आले तरी त्याला वाटले पाहिजे की, माझे गुरुच आले. इतके प्रेम जेव्हा असते, तेव्हां आपल्या जीवनांत सुखाचा क्षण येतो. तो सुद्धा काय आहे गुरुंनी पाठविलेला लखोटा आहे, असे समजून त्याचा स्वीकार करतो. तो त्याचा अभिमान नाही धरीत, कारण गुरुकृपेचे ते फळ आहे असे तो समजतो. केवढेही दु:ख आले तर न जाणो गुरुंच्या किंवा देवाच्या मनांत काय आहे? माहित नाही परंतु ते माझे कल्याणच करणार आहेत. घराच्या गच्चीवर उभी असलेली आई मुलाला म्हणते- बाळा थांब आता मी तुला खालीच टाकून देते! तो म्हणतो खुशाल टाक! त्याला माहित असते ही माझी आई आहे, ही मला टाकू शकणार नाही. आपल्याला सुख येवो किंवा दु:ख येवो, त्या क्षणी आपल्याला आपल्या इष्ट देवतेची किंवा गुरुंची आठवण झाली पाहिजे. हे मनोविज्ञान या ठिकाणी सांगताना म्हणतात- **सुखसोहळा भोगियले । भोग भोगणें नागेश जेणें ।।** माझे गुरु या किाणी आहेत, म्हणून हा सुखसोहळा चालू आहे. त्यामध्यें मी कोणीच नाही. जर कान्होबा महाराज आपले असतील, म्हैस असते; त्या म्हशीला गोचिड आवडत नाहीत, मात्र गोचिडाला म्हैस आवडते तिचे रक्त पिण्यासाठी. कान्होबा महाराज म्हटले तुम्ही माझे आहात, तेव्हां आपणही म्हटले पाहिजे आम्हीं तुमचे आहोत आणि तुम्ही पण आमचे आहात. अशाप्रकारे परस्पर विनिमय झाला, देव माझा मी देवाचा । तर त्याच्या जीवनांत आनंदाचा कडेलोट होत असतो. कान्होबा महाराजांनी तुम्हांला विचारले- तुमच्या जीवनांत सर्वात आनंदाचा क्षण कोणता? कल्पना करा या प्रश्नाचे उत्तर लिहिण्यासाठी तुम्हांला पेपर दिला तर तुम्ही काय लिहाल? मला माहिती नाही, परंतु त्याच प्रश्नाचे कान्होबा महाराजांनी लिहिलेले उत्तर अगदी बरोबर आहे. ते म्हणतात- कान्हो पाठक आनंदला । सद्गुरु नागेश भेटला ।।४।। कोणाला काय चिंता असेल? कोणाला कोणता आजार असेल तर त्याला वाटेल माझी चिंता दूर व्हावी, माझा आजार बरा व्हावा. मला मुलगा व्हावा, मी निवडणूक जिंकावी तो माझ्या आनंदाचा क्षण असेल. आता आपण महाराजांनी लिहिलेले उत्तर आणि तुमचे उत्तर यांची तुलना करून पहा. कोणाचे उत्तर बरोबर आहे. ज्या दिवशी आपल्या जीवनांत गुरु येतील तो दिवस आपल्या जीवनांतील अत्युच्च आनंदाचा क्षण असेल, अशी आपण आपल्या मनांत खुणगाठ बांधली पाहिजे. कशासाठीही हळहळ करू नका पण, ''अस्वलाचिया परी गुरुनामाचा जप करी'' **कै तो स्वामी भेटेल? कै हे बिरडे फिटेल? युगाहुनी वडील निमिष मानी ।।** एकएक क्षण युगासारखा वाटला पाहिजे.सद्गुरु मला कधी भेटतील? ते मला कधी उपदेश करतील? माझ्या जीवनाच्या



कऱ्या कल्याणाचा मार्ग कधी सांगतील? माझ्याकडून साधना कशा प्रकारे करून घेतील? ऐशी चिंता करी सदा सर्वकाळ । रात्रंदिवस हेचि तळमळ । तुका म्हणे नाही आपुलें बळ । जेणें फळ पावेन निश्चयेंसी ।। विठोबा रखुमाई...

**जेथे जेथे मन जाय । तेथें नागनाथ आहे ।।१।। म्हणवोनि पाहे । मन गुंतले नागेश पाये ।।२।। सुखसोहळा भोगियले । भोग भोगणें नागेश जेणें ।।३।। कान्हो पाठक आनंदला । सद्गुरु नागेश भेटला ।।४।।**

आजचे हे फारच पावन पर्व आहे. या ठिकाणी आपल्या सर्वांच्या प्रेमामुळे आणि गुरुवर्य दादांची आज्ञा म्हणून महाराजांच्या अभंगावर यथाशक्ती, यथामती चिंतन करण्याचा प्रयत्न केला. तसे पाहिले तर आज येथे महा उत्सव आहे. आज येथे अनेक भजनानंदी महात्मे आलेले आहेत. येथे आलेले सगळे गानकोकिळ आहेत. या ठिकाणी केवळ आबासाहेब महाराजच आहेत असे नाही, त्यांच्या कृपाछत्राखाली त्यांचे सांप्रदायिक पद्धतीने अनुसरण करणारे सगळे महापुरुष आहेत, परंतु त्यांना आम्ही कांहीच संधी दिली नाही. त्याचे कारण असे आहे की, जो जेथीचे गौरव नेणे । तयासी ते भिंगुळवाणे । तुमच्या लक्षांत आले असेल की, मला फेटा सुद्धा बांधता येत नाही. तुका म्हणे तुम्ही उदार कृपाळ । शृंगारिलें बाळ कवतुके ।। टाळ मृदंग पश्चिमेकडे । माझे गाणे दक्षिणेकडे ।। मी तर गाणे म्हणतच नाही. महाराजांचा हा जो अभंग आहे, त्यापैकी आपल्याला जी थोडीफार माहिती आहे त्याचे थोडेसे उद्घाटन आपली वाणी पवित्र व्हावी म्हणून या ठिकाणी चिंतन करण्याचा प्रयत्न केला. आम्ही जरी अगदी हातवारे करून बोलत असलो, तरी मी सुरुवातीलाच सांगितले की आमच्या दृष्टीनें या गावांत जन्मलेला प्रत्येक प्राणीमात्र, जसे आळंदीला देव येवूनी होती पक्षी । असे म्हटलेले आहे. त्याप्रमाणें केंदूर गांव हे विशेष क्षेत्र आहे आणि याक्षेत्रांत वास करणारे जे क्षेत्रवासी जन आहेत ते साक्षात कान्होबारायांची प्रतिरूपे आहेत. त्यांच्या समोर आम्ही हातवारे करून बोलण्यांत कांहीच अर्थ नाही. तुम्ही म्हणाला तुम्हांला जर कांहीच अधिकार नाही तर का बोलले? या साठी बोललो आम्ही! आम्ही बोलत असलेले शब्द आमच्या तोंडात असतात, पोटांत असतीलच असे नाही. मग कशाला बोलले? तर त्याचे कारण असे की, आमच्या ओठांत असणारे शब्द माऊलींच्या आशीर्वादानें आळंदीत राहायला मिळतेथोडेफार श्रवण होते, त्यामुळे बोलता येते. परंतु त्या ओठांत असणाऱ्या गोष्टी आमच्या पोटांत जाव्यात या प्रकारची भिक्षा या ठिकाणी कान्होबारायांचे स्वरूप असणाऱ्या माता-भगिनी आणि बंधु-बांधव यांच्या चरणी करायची म्हणून या पावन पर्वामध्यें ही आम्ही शब्दरूपी सुमनें संतश्रेष्ठ कान्होबा महाराजांच्या आणि संस्वरूप असणाऱ्या आपल्या चरणी समर्पित केली, इतकाच त्याचा अर्थ आहे. करविली तैसी केली कटकट । वाकडी की नीट देवजाणे ।। कोणाकारणे हे झालेसे निर्माण । देवाचे कारण देव जाणे ।। तुका म्हणे मी तो अभिमाना वेगळा । घालूनि गोपाळा भार असे ।।

कान्होबा पाठक महाराजांच्या चरणी अशा प्रकारची प्रार्थना करून आजचा जो अभंग ज्याचे चिंतन करण्याचा आम्ही प्रयत्न केला, त्याचा गर्भित असणारा जो अर्थ आहे तो आमच्या जीवनामध्यें अनुभवाला यावा. मरणाच्या एक क्षण का होईना पूर्वी आम्हांला कान्होपाठकांच्या गावाला आल्याचे परिपूर्ण समाधान लाभावे आणि त्यांनी आम्हांला त्यांच्या चरणाजवळ घ्यावे अशी प्रार्थना करून आपल्या चिंतनाला पूर्णविराम देऊ...



**५ पेंद्या म्हणे हृषीकेशी । आरुष बोबडें हें परियेसीं ।।१।।**
**या रे नाचों अवघे जन । गावों हरिनाम कीर्तन ।।धृ।।**
**कान्हो पाठक बागडा । प्रेमे नाचे वैष्णवां पुढां ।।३।।**

**पेंद्या म्हणे हृषीकेशी । आरुष बोबडें हें परियेसीं ।।१।। या रे नाचों अवघे जन । गावों हरिनाम कीर्तन ।।धृ।।** कैवल्य साम्राज्य चक्रवर्ती माऊली महावैष्णव श्रीज्ञानोबारायांच्या कृपाशीर्वादानें प्राप्त झालेल्या या कीर्तनरूपी सेवेसाठी निवडलेला अभंग महान भगवद्भक्त वारकरी संप्रदायाच्या शिखराच्याही वरती, आकाशातील ताऱ्यांप्रमाणें शोभणारे वैराग्याचे निष्ठावंत पुतळे की ज्यांनी श्रीज्ञानोबारायांच्या समाधी सोहळ्याचे पहिले कीर्तन केले असे संत विभूषीत असणारे श्रीकान्होराज महाराज पाठक अर्थात काका यांचा हा तीन चरणांचा अभंग सेवेसाठी निवडलेला आहे.

संत साहित्याचा जर आपण विचार केला, अभ्यास केला, त्याचे परिशीलन केले तर संत साहित्यामध्यें आपल्याला विविध प्रकारचे वाङ्मय उदा. अभंग, ओव्या, भारूडे, नाट असे विविध प्रकार आपल्याला पहायला मिळतात. कीर्तनासाठी बहुधा तुकोबाराय, ज्ञानोबाराय, नामदेवराय, एकनाथ महाराज, निळोबाराय इत्यादि संतांचेच अभंग घेतले जातात. त्यामुळे इतर संताचे अभंग लोप पावतील किंवा काय अशी सामान्य जनांना भिती वाटते. वारकरी संप्रदायांत इतरही अनेक संत महात्मे होऊन गेलेले आहेत. त्या सर्वांमध्यें वयाचा विचार करता कान्होपाठक हे सर्वात जेष्ठ आहेत. त्याचे कारण वारकरी संप्रदाय रूपी इमारतीचा पाया म्हणून ज्यांचा उल्लेख केला जातो ते आहेत ज्ञानोबाराय. **ज्ञानदेवे रचिला पाया । उभारीले देवालया ।** त्या ज्ञानोबारायांच्या समाधी सोहळ्यास या आर्यावर्तातील, भारत देशातील जे कांही संत सत्पुरुष होते ते सर्वच्या-सर्व उपस्थित होते. ज्यावेळी समाधी सोहळ्याचे कीर्तन कोणी करावे? असा प्रश्न उपस्थित झाला त्यावेळी ते कीर्तन संतश्रेष्ठ कान्होराज महाराज पाठक यांनीच करावे अशी विनंती श्रीनामदेवराय आणि श्रीनिवृत्तीनाथ महाराज यांनी केली. या वरून महाराजांची योग्यता काय असेल? हे लक्षांत येते. जसे पांडवांच्या राजसूय यज्ञाचे वेळी अग्रपूजेचा मान कोणास देण्यात यावा असा प्रश्न निर्माण झाला होता त्यावेळी अनेक विद्वानांनी, राजे मंडळींनी एकमुखाने सांगितले की, ज्या सभेत प्रत्यक्ष श्रीकृष्ण भगवान उपस्थित आहेत अशा वेळी तो मान त्यांनाच दिला गेला पाहिजे. त्यांना डावलून तो दुसऱ्या कोणाला देणे म्हणजे हा यज्ञ अपूर्ण ठेवणे असेच होईल. त्याप्रमाणे तो मान भगवान श्रीकृष्णांना दिला गेला आणि तो राजसूय यज्ञ जसा यथासांग पार पडला. त्याप्रमाणे माऊलींचे जीवन हा एक यज्ञ आहे, नव्हे नव्हे माऊलींचे जीवन म्हणजे एक धगधगते अग्नीकुंड आहे. माऊली लिहितात- **मी अविवेकाची काजळी । फेडूनि विवेक-दीप उजळीं । तै योगियां पाहे**

**दिवाळी । निरंतर ।।४।।५४।।** ज्ञानेश्वरी, अमृतानुभव, अभंग-गाथा, चांगदेव पासष्टी, हरिपाठ हे ग्रंथ ज्ञानोबारायज्ञांनी निर्माण केले. ज्ञानोबा रायांचे जीवन म्हणजे एक संघर्ष होता. त्या संघर्षामधून तावून-सुलाखून निघालेले रत्न म्हणजे ज्ञानोबाराय. हा कांही सामान्य यज्ञ नाही. हे धगधगते अग्नीकुंड आहे. **मी अविवेकाची काजळी । फेडूनि विवेक-दीप उजळीं ।** वयाच्या बाविसाव्या वर्षी ज्ञानोबारायांनी समाधी घेतली. माऊलींच्या समाधीसोहळ्यास प्रत्यक्ष जगन्नायक पांडुरंग परमात्मा आपल्या सर्व भक्तांसह उपस्थित होते. निवृत्तीनाथ महाराज, सोपानकाका, मुक्ताबाई या भावंडासह चोखोबा महाराज, सावता महाराज, गोरोबाकाका, ज्यांनी वारकरी संप्रदायाची पताका घुमान पर्यत नेली असे कीर्तन केसरी, भगवंताचे लाडके भक्त नामदेवराय. ज्यांनी वाळवंटात कीर्तन करावे आणि त्या कीर्तनांत भगवंताने नाचावे. **नामदेव कीर्तन करी । पुढे देव नाचे पांडुरंग ।। जनी म्हणे ज्ञानदेवा । बोला अभंग ।।** नामदेवरायांनी वाळवंटात कीर्तन करावे आणि त्या कीर्तनांत भगवंतांनीं देहभान हरपून नाचावे असा त्यांचा अधिकार. असे विश्वातील सगळे जेष्ठ श्रेष्ठ भक्तगण समाधी सोहळ्यास हजर असताना, त्यामधून कान्होराज महाराजांना कीर्तन करण्याचा मान दिला जातो, यावरून महाराजांचा अधिकार काय असेल याचा आपण विचार करा. मानवी जीवनांत जी वस्तु आपल्या अत्यंत जवळ असते, त्या वस्तुचा आपल्याकडून सहजच अनादर होत असतो. म्हणतात ना **''अतिपरिचयात अवज्ञा''** याचे एक उदाहरण मी आपल्याला सांगतो. आळंदीला माऊलींच्या मंदिरातील जो कारंजा मंडप आहे, त्या मंडपातील फरशीवर एक फुल तयार केलेले आहे. त्या फुलाच्या मध्यभागी जी तपकीरी रंगाची गोल फरशी आहे ना, त्या फरशीला हातानें चोळा आणि हाताचा वास घेवून पहा. हाताला कस्तुरीचा सुवास येईल. कस्तुरी ही कस्तुरी मृगाच्या नाभीमध्यें असते. त्या कसतुरीचा सुगंध त्याला येतो, तेव्हा तो त्या सुगंधावर इतका लुब्ध होतो की, तीचा शोध घेण्यासाठी तो इतस्ततः धावतो परंतु ती त्याला प्राप्त होत नाही. **हिरणके नाभी कस्तुरी बसत है....।।** जसे माऊली म्हणतात- **एऱ्हवीं सर्वांच्या हृदयदेशीं । मी आमुका आहे ऐसी । जे बुद्धि स्फुरे अहर्निशीं । ते वस्तु गा मी ।।१५।।४२१।। सर्वभूतेषु गुढाः । सर्वाघटी राम देहा देही एक ।** हे आपण बोलतो परंतु तसा आपल्याला अनुभव आलेला नसतो. जर अनुभव आला असता तर आपण परस्परांचा द्वेष केला असता का? याचाच अर्थ परमात्मा आपल्या ओठांवर आहे, पण तो आपल्या पोटांत नाही. हरिणाच्या नाभीमध्यें असणारी कस्तुरी हरिणाला माहित नसल्यामुळे ते धावून-धावून उरी फुटते आणि मरते. तशीच आपली स्तिती आहे. परमात्मा आपल्या आंत आहे परंतु आपल्याला माहित नसल्यामुळे आपण त्याला बाहेर शोधण्याचा प्रयत्न करतो. **तुझे आहे तुजपाशीं । परी तूं जागा चुकलाशी ।।** ज्या महाराजांना माऊलींच्या समाधी सोहळ्यांत कीर्तनाचा मान दिला जातो, ते महाराज आपल्या गावांत असूनही त्यांचे महत्त्व आपणाला वाटत नाही. म्हणून आपण श्रीमंत



बापाची दरिद्री मुले आहोत, असे डॉ. महाराज म्हणत असतात. ज्यांचे आपण पाईक आहोत, त्यांचीच किंमत आपल्याला माहित नाही. आपल्या आईच्या स्तनांत भरपूर दूध आहे, पण ते टाकून देऊन आपण लोकांच्या आईला ढुसण्या मारतो आहोत. माऊली ज्ञानोबाराय म्हणतात- **नातरी निदैवाच्या परिवरी । लोह्या रुतलिया आहाति सहस्रवरी । परि तेथ बैसोनि उपवासु करी । कां दरिद्रे. जिये ।।९।।५९।।** ज्ञानोबाराय उदाहरण देतात- एका गावांतील एक पाटील फारच श्रीमंत होता, परंतु त्याचे दुर्दैव असे की, त्याच्या पोटी जो मुलगा जन्माला आला तो बेअक्कल निघाला. म्हणून पाटलाने असा विचार केला की, ही सर्व संपत्ती याच्या हातात दिली तर तो आपल्या डोळ्यादेखत हीचे वाटोळे करील. म्हणून त्याने ती संपत्ती वेगवेगळ्या कढयामध्यें भरून त्या कढया आपल्या घरापुढील अंगणांत खड्डा खणून पुरुन ठेवल्या. त्यानंतर थोड्यांच दिवसांत पाटलाचे प्राणोत्तक्रमण झाले. त्यांनतर त्याच्या मुलाने असलेली स्थावर मालमत्ता विकून खाण्यास सुरुवात केली. वर्षभरातच सर्व मालमत्तेची वाट लागल्यानंतर आता काय करावे? असा विचार करीत असतानाच त्याची बायको त्याला सोडून देवून माहेरी निघून गेली. विकायला घराशिवाय कांहीच शिल्लक राहिले नाही. म्हणून मग तो गिक्षा मागू लागला. गावांत जावे भिक्षा मागावी आणि मिळालेली ती भिक्षा घरी येवून अंगणात ज्या ठिकाणी ती संपत्ती पुरलेली आहे, त्या जागेवर बसून आणलेली भिक्षा खावी असा त्याचा क्रम सुरु झाला. आता मला सांगा! त्याच्याकडे संपत्ती नव्हती का? संपत्ती होती! पण ती कोठे आहे हे माहित नसल्यामुळे त्याची जशी गत झाली. तसेच आपलेही झालेले आहे. कान्होराज महाराजांनी आपल्यासाठी भरपूर आध्यात्मिक संपत्ती जतन करून ठेवलेली आहे. आपण आपल्या व्यवहारीक संपत्ती विषयी जागरुक आहोत, पण महाराजांनी आपल्यासाठी ठेवलेल्या आध्यात्मिक संपत्तीचा आपणास विसर पडलेला आहे. आणि म्हणून आपण समाधान शोधण्यासाठी इतरत्र धावाधाव करतो आहोत, परंतु त्याचा परिणाम असा होतो की आपल्याला क्षणोक्षणी दुःखच प्राप्त होते. आपण आपली बुद्धी न चालवता, संतांनी सांगितलेल्या मार्गाने, त्यांनी दाखविलेल्या वाटेने जर आपण गेलो तर आपल्याला याची देही याची डोळा सुख प्राप्त झाल्याशिवाय राहाणार नाही. आपण संताचे वाङ्मय, संताचे विचार जेवढे प्रपंचाला अनुकूल आहेत तेवढेच घेतो आणि बाकीचे सोडून देतो, त्याचा हा परिणाम आहे. ज्या कान्होराज महाराजांना माऊलींच्या समाधी सोहळ्यांत कीर्तनाचा मान मिळतो ते कान्होराज महाराज किती मोठे असतील? काय त्यांचा अधिकार असेल? काय त्यांची आध्यात्मिक योग्यता असेल? काय त्यांची स्थिती असेल? काय त्यांचे चारित्र्य असेल? काय त्यांचे वैराग्य असेल? काय त्यांचा विवेक असेल? काय त्यांचे ऐश्वर्य असेल? हे शब्द कळण्यासाठी सुद्धा तेवढी पारमार्थिक उंची असावी लागेल! त्यांची उंची कळून घेण्यासाठी आपल्याला त्या उंचीवर जावे लागेल तेव्हांच त्यांची उंची आपणास कळेल. कान्होराज महाराजांची योग्यता निवृत्तीनाथ महाराजांना

कळली, नामदेव महाराजांना कळली, नाथ महाराजांना कळली, म्हणून त्यांनी महाराजांना समाधी सोहळ्याचे कीर्तन करावे अशी विनंती केली आणि महाराजांनीही त्यांच्या विनंतीचा मान राखून समाधी सोहळ्याचे कीर्तन केले. महाराजांची स्तुती करणे म्हणजे काडवातीने सूर्याला ओवाळण्यासारखे आहे. **यालागीं आतां । स्तुति सांडुनि निवांता । चरणीं ठेविजे माथा । हेंचि भलें: ।।१४।।१५।। काय वानू आतां न पुरे हे वाणी । मस्तक चरणीं ठेवितसे ।।** आपली वाणी त्यांचे वर्णन करण्यास असमर्थ आहे म्हणून त्यांच्या चरणावर आपले मस्तक ठेवावे हेच चांगले आहे.

या मृत्युलोकांत भगवंतही अवतार घेवून येतात आणि संतही अवतार घेवूनच येतात. परंतु दोघांचे कार्य मात्र वेगवेगळे असते. भगवंताचे कार्य- **परित्राणाय साधूनां विनाशाय च दुष्तकृताम् । धर्मसंस्थापनार्थाय सम्भवामि युगे युगे ।।गी-४।।८।।** साधुंचे रक्षण, दुर्जनांचा संहार आणि धर्माची संस्थापना हे भगवंताचे काम आहे. तर संत अवताराला येतात तेव्हां ते सामान्य मानसाने संसार आणि परमार्थ कसा करावा याचा वस्तुपाठ देण्यासाठी येतात. **परी श्रुतिस्मृतींचे अर्थ । जे आपण होऊनि मूर्त । अनुष्ठाने जगा देत । वडील हे ।।ज्ञा.-१७।।८६।।** आपण जन्माला येतो तेव्हां संसारही नीट करीत नाही आणि परमार्थही नीट करीत नाही. **पाहें पां शरीराचिया गांवा । जयालागीं आले पांडवा । तो कार्यार्थु आघवा । सांडूनियां ।।ज्ञा.-७।।१०५।।** जन्माला आलो लहानपणी माझी आई, माझे बाबा. मोठे झाल्यावर आईबाबा त्याला खेळण्यासाठी खेळणे देतात. त्या खेळण्याबरोबर खेळताना पोरेबाळे होतात. मग म्हातारपण येते मग चिंता करू लागतो, आता मृत्यु येईल काय करू. तुकोबाराय म्हणतात- **बाळपण गेलें नेणता । तारुण्यदशे विषयव्यथा । वृद्धपणीं प्रवर्तली चिंता । मरें मागुता जन्म धरीं ।।तु.-४०३३।।३।।** संसारही नाही करता आला आणि जन्म घ्यावा लागला याचा अर्थ परमार्थही नाही करता आला. हा जो मनुष्यदेह प्राप्त झालेला आहे, तर त्याने असे करावे की, **तैसें येर्णेचि शरीरें । शरीरा येणे सरे । किंबहुना येरझारें । चिरा पडे ।।ज्ञा.-१२।।१३६।।** हा पुरुषार्थ ज्यांना करता आला त्यांचे जीवन धन्य झले. बाकीचे असेच जन्माला आले आणि असेच गेले. कांहीच करता नाही आले. संत ज्या वेळी येतात तेव्हा ते संसारही करतात आणि परमार्थही करतात. परमार्थ करीत असताना काम, क्रोध, लोभ जर आडवे आले तर त्यांना झोडून काढतात. आपण मात्र विकारांच्या अधिन होत असतो. म्हणून कान्होराज महाराजांना विनंती करायची की, महाराज विकार आमच्यावर हल्ला करतील, परंतु तुमच्या चरणाजवळची थोडीसी जागा तुम्हीं आमच्यासाठी आरक्षित करून ठेवा. महाराजांनी प्रपंचही केला आणि परमार्थही केला. महाराजांची कीर्ति जेव्हां सर्वत्र पसरू लागली त्याच वेळी गांवात त्यांची निंदा करणारे कांही दुर्जनही होते. सज्जनांची किंमत कळण्यासाठी दुर्जनही आवश्यक असतात. महाराज



जेव्हां काशीला गेले आणि बरेच दिवस झाले तरी गांवी आले नाहीत, तेव्हां त्यांनी गांवात अशी वावडी उठविली की, महाराज गंगेत स्नान करीत असताना गंगेत वाहून गेले. (गंगेच्या प्रवाहाचा वेग फारच प्रचंड आहे. गंगेत स्नान करताना तीरावर असणाऱ्या साखळदंडाला धरून स्नान करावे लागते.) ही वार्ता जेव्हां महाराजांच्या घरी समजली तेव्हां त्यांच्या दोनही पत्न्यांनी सती जाण्याचे ठरविले आणि त्याप्रमाणे त्या सती गेल्या. त्यानंतर कांही दिवसांनी महाराज गांवी आले तेव्हां त्यांना हा सर्व प्रकार समजला. त्यांचा क्रोध अनावर झाला, ते स्मशान भूमीमध्यें गेले. महाराजांचे सामर्थ्य फारच महान होते. त्यांनी काळाला सांगितले- माझा संसार अद्याप अपूर्ण आहे. तो पूर्ण झालेला नाही. त्यासाठी तूं माझ्या पत्न्यांना परत कर! अन्यथा मी तुझा नाश करतो! काळ घाबरला आणि त्याने महाराजांच्या पत्न्या परत केल्या. काळ जगाला खातो परंतु महात्म्यांच्यापुढे काळाचे कांही चालत नाही. महाराजांचा संसार झाला. महात्मे काळाच्या डोक्यावर पाय देतात. **जगा काळ खाय । आम्हीं माथां दिले पाय ।।तु.-२०१४।।१।।** संपूर्ण जगाला काळ खातो. परंतु संतापुढे त्याचे कांही चालत नाही. **देह जाईल जाईल । यासी काळ बा खाईल ।।तु.-२४४७।।१।।** त्यांनी परमार्थही केला आणि संसारही केला. आपल्याला कांहीच करता येत नाही. देव अवताराला येतो तेव्हां काय करतो? गोट्या खेळतो का? **परित्राणाय साधूनां विनाशाय च दुष्कृताम् । धर्मसंस्थापनार्थाय सम्भवामि युगे युगे ।।गी.-४।।७।।** साधुंचे रक्षण करतो, दुर्जनांचा संहार म्हणजे नाश करतो आणि धर्माची संस्थापना म्हणजे विस्कटलेली घडी परत नीट करतो. माऊली म्हणतात- **मी अविवेकाची काजळी । फेडूनि विवेक-दीप उजळीं । तै योगिया पाहे दिवाळी । निरंतर ।।४।।५४।। स्वसुखें विश्व कोंदे । धर्मुचि जगीं नांदे । भक्तां निघती दोंदे । सात्त्विकाचीं ।।५५।। तैं पापांचा अचळु फिटे । पुण्यची पहांट फुटे । जैं मूर्ति माझी प्रगटे । पंडुकुमरा ।।५६।। ऐसेया काजालागीं । अवतरें मी युगीं युगीं । परि हेचि वोळखे जो जगीं । तो विवेकिया ।।५७।।** ज्ञानोबारायांनी ज्ञानेश्वरीत ज्ञान्याची व्याख्या केलेली. कोण आहे ज्ञानी? चांगले कपडे घालतो, मोठा गंध लावतो म्हणजे ज्ञानी झाला असे नाही. आपण जन्माला कशासाठी आलो, हे ज्याला कळते तो ज्ञानी आणि ज्याला हे कळत नाही तो अज्ञानी. आपण कशात मोडतो ते आपले आपण पहा. **जो देवकी-वसुदेवास्तव जाहला । कुमारीसाठी गोकुळीं गेला । तो मी प्राणासकट पियाला । पूतनेतें ।।१०।।२८८।। नुघडतां बाळपणाची फुली । जेणें मियां अदानवीं सृष्टी केली । करीं गिरी धरूनि उमाणिली । महेंद्रमहिमा ।।२८९।। कालिंदीचें ह्रदयशल्य फेडिलें । जेणें मियां जळत गोकुळ राखिलें । वासरुवासाठीं लाविलें । विरिंचीस पिसें ।।२९०।।** वसुदेव आणि देवकी यांच्या पासून मी गोकुळांत जन्माला आलो. नंतर कुमारीसाठी म्हणजे योगमायेसाठी गोकुळाला गेलो. तेथे पूतनेचे स्तनपान करताना तिच्या

प्राणांचेही प्राशन केले. बाल्यावस्था ओलांडण्यापूर्वीच मी अघासूर, बकासूर, तृणावर्त, केशी, शकटासूर, धेनुकासूर, कंस अशा सर्व राक्षसांचा वध करून ही पृथ्वी अदानवी केली म्हणजे पृथ्वीवर असणाऱ्या सर्व दानवांचा संहार केला. गोवर्धन पर्वत करंगळीवर उचलून धरला आणि इंद्राचा गर्व हरण केला. कालिंदी म्हणजे यमुना नदीच्या डोहात असणाऱ्या कालिया नागाला तेथून पिटाळून लावून यमुनेचे दु:ख दूर केले. वनव्यामुळे गोकुळ जळू नये म्हणून मी तो वनवाच प्राशन केला आणि गोकुळाचे रक्षण केले. ब्रह्मदेवाने गायी-गुरे आणि गोपाळांचे हरण करून त्यांना सत्यलोकांत नेले तेव्हां मीच गायी-गुरे आणि गोपाळ यांचे रूप घेवून ब्रह्मदेवास वेड लावले. आपल्या सौंदर्याच्या प्रभावानें भगवंताने गोकुळांतील गोपींचे चित्त असे कांही चोरले की, त्यांचे चित्त प्रपंच्यात लागतच नव्हते. एवढा सुंदर होता परमात्मा. ज्या परमात्म्याने ही सृष्टी निर्माण केली त्या सृष्टीचे सृष्टी-सौंदर्य आपल्याला एवढी भूरळ घालते. श्रावण महिन्यांत तुम्ही सृष्टीचे सौंदर्य पहा. ते सात्त्विक सौंदर्य माणसाला पारमार्थिक साधना करण्यास प्रवृत्त करते, एवढेच नाही तर ती साधना मनुष्याला परमात्म स्वरूपाशी ऐक्य करून देते. म्हणून पूर्वीच्या काळी ऋषी-मुनींचे आश्रम म्हणजे गुरुकुल हे पुणे मुंबई अशा शहरांत नसे तर ते गीरी-कपाटी, पर्वतांच्या गुहांत दऱ्यां-खोऱ्यांत, जंगलात असे. ज्या परमात्म्यानें एवढी सुंदर सृष्टी निर्माण केली तो परमात्मा किती सुंदर असेल? ज्या ज्ञानोबारायांनी हा संसार स्वप्नाप्रमाणे मिथ्या आहे असे सांगितले, तेच ज्ञानोबाराय भगवंताच्या रूपावर भाळले आणि आपल्या बुद्धिरूपी मैत्रिणीला म्हणाले- **रूप पाहता लोचनी । सुख झाले वो साजणी ।।१।। तो हा विठ्ठल बरवा । तो हा माधव बरवा ।।२।।** ज्ञानोबाराय परमात्मा पांडुरंगाला पाहातात, तेव्हां ते वेडे होतात आणि भगवंताच्या रूपाचे वर्णन करतात, त्यांचा तो अभंग वारकरी सांप्रदायाचे नमन म्हणून प्रसिद्धी पावतो. जगद्गुरु तुकोबारायांनी जेव्हां परमात्म्याला पाहिले तेव्हां ते म्हणतात- **सुंदर तें ध्यान उभें विटेवरी । कर कटावरी ठेऊनियां ।। तुळसीहार गळां कासे पीतांबर । आवडे निरंतर हेंचि ध्यान ।।धृ।। मकरकुंडलें तळपती श्रवणीं । कंठीं कौस्तुभमणि विराजित ।।३।। तुका म्हणे माझें हेंचि सर्वसुख । पाहीन श्रीमुख आवडीनें ।।४।।** तुकोबाराय म्हणतात- या पांडुरंग परमात्म्याचें रूप मी आवडीनें पाहात राहीन. भगवंताच्या या बालरूपानें गोकुळांतील गोपींचे चित्त वेधून घेतले. त्यांना भगवंताच्या रूपाचे वेड लागले. कृष्णाला पाहिल्यामुळे त्यांची अंत:करणवृत्ती परमात्म-स्वरूपाच्या ठिकाणी लीन झाली. परिणाम असा झाला की, त्या उलटी-पालटी(चुकीची) कामे करू लागल्या. म्हणून त्यांच्या सासवांनी त्यांच्या डोक्यावरील पदर त्यांच्या तोंडापर्यंत खाली घेण्याची सक्ती त्यांच्यावर केली. हे पाहण्यासाठी आपणाला तिकडे जाण्याची गरज नाही. आपल्याकडे जी मिठाईची दुकाने आहेत ना, ती बहुतेक तिकडच्याच लोकांची आहेत. त्यांच्यातील महिलाही कधी कधी दुकानावर थांबतात. तेव्हां त्याचा पदर कोठे असतो ते पहा! तो परमात्मा



आपल्या सूनांना दिसूच नये यासाठी त्यांनी सूनांना तोंडापर्यत पदर घेण्यास भाग पाडले, परमात्म्याच्या जेव्हां ही गोष्ट लक्षांत आली तेव्हा परमात्म्याने बासरी वाजविण्याची नविन शक्कल लढविली. परमात्म्याच्या बासरीच्या आवाजाचा परीणाम केवळ गोपींवरच झाला असे नाही, तर तो निसर्गावरही झाला. **भुलविले वेणुनादे । वेणु वाजविला गोविंदे ।।** भगवंत जेव्हां वेणु वाजवित तेव्हां यमुना माईचा प्रवाह वाहण्याचा थांबे. हरिणे आणि वाघ परस्परांचे शत्रू खरे परंतु वेणूनादाने त्यांना स्वत:चा विसर पडे आणि ते परस्परांच्या गल्यात गळा घालून तो वेणूनाद ऐकण्यांत दंग होत, आई मुलाला स्तनपान देण्याचे विसरे. परमात्म्याने आपल्या सामर्थ्यानें राक्षस मारले, आपल्या सौंदर्यानें गोपिकांना वेडे केले, वेणूनादाने गाई आणि निसर्गाला मोहित केले आणि नंतर परमात्म्याने मित्रमंडळींना एकत्र करण्यास सुरुवात केली. ज्याप्रमाणे छत्रपतींनी मावळ्यांना स्वराज्य प्राप्तीसाठी एकत्र आणले एवढेच नाही तर महाराजांच्यासाठी ते जीवनही कुर्बान करतील अशी निष्ठा त्यांनी त्यांच्या ठिकाणी निर्माण केली. दुर्योधनाने कर्ण नावाचा असा एक मित्र मिळविला की तो आपल्या सख्या भावांना मारण्यास तयार झाला पण त्याने दुर्योधना बरोबर असलेल्या मैत्रीत अडथळा येवू दिला नाही. परमात्म्याने असे मित्र जोडले की, ते परमात्म्यासाठी कांहीही करण्यास तयात होते. परमात्म्यानें सर्व मित्रांना एकत्र केले आणि दही, दूध, तूप, लोणी इत्यादी पदार्थांची चोरी करण्यास सुरुवात केली. भगवंताच्या चोऱ्यांनी त्रस्त होऊन गोपी यशोदा मय्याकडे गाऱ्हाणी सांगू लागल्या, त्या गाऱ्हाण्यांचा उबग येऊन यशोदा मय्यांनी भगवंताला गायी सांभाळण्याच्या कामावर पाठवून देण्याचा विचार केला. भगवंत आपल्या सवंगड्यांच्या बरोबर गायीं सांभाळण्यासाठी वनांत जावू लागले. तेथे सवंगड्यांच्या बरोबर ते विटीदांडू, सुरपारंब्या, लगोरी, चेंडू-फळी, हूतूतू असे विविध खेळ खेळत. आता हे खेळ जवळपास लुप्त होत चालले आहेत. मग आता काय खेळतात? तर कॅरम, लुडो अशा प्रकारचे खेळ लोक खेळतात तेही नुसते खेळत नाहीत, तर पैसे लावून खेळतात. परमात्मा सर्व प्रकारचे खेळ खेळत. कशासाठी तर हे खेळल्याने शरीर बलदंड होते म्हणून. शरीर या खेळामुळे बलदंड होईल हे खरे, पण बुद्धिचे काय? कशासाठी हा देह प्राप्त झाला आहे? मानवी शरीराची सफलता कशात आहे? याचा विचार करून भगवंत सवंगड्यांना म्हणाले- मित्रांनो! आज आपण असा खेळ खेळणार आहोत की, जो अद्याप फारसा कोणी खेळत नाहीत. सवंगड्यांनी विचारले- भगवंता असा कोणता खेळ आहे? हा खेळ खेळायचा कसा? हा खेळ खेळल्याने काय होईल? परमात्मा म्हणाले- या खेळाचे नाव आहे हरिकीर्तन. तो खेळण्यासाठी- **लावूनी मृदंग श्रुती टाळ घोष । सेवू ब्रह्मरस आवडीने ।।** मृदंग म्हणजे पखवाज आणि श्रुती म्हणजे वीणा आणि टाळ हे लावायचे म्हणजे ते एकासूरात वाजतील असे करून घ्यायचे आणि हा खेळ खेळायचा. हा खेळ खेळण्याने- मानवी जीवन सफल होते. म्हणजे यातून ब्रह्मरस प्राप्त होतो, त्या ब्रह्मरसाचे सेवन करायचे. पेध्या म्हणाला देवा पण हा खेळ खेळऱ्यासाठी किती गडी

लागतात? सहा, सात, दहा, अकरा किती गडी घ्यायचे? भगवंत म्हणाले- या खेळांत गड्यांच्या संख्येचे बंधन नाही! जेवढे खेळू इच्छितात तेवढे सगळे हा खेळ खेळू शकतात. एवढेच नाही तर येथे वय, बुद्धि आणि बळ समान असले पाहिजे असेही बंधन नाही, एवढेच नाही तर हा खेळ आईच्या पोटात असणाराही खेळू शकतो आणि मृत्यु शय्येवर पडले असतानाही हा खेळ खेळता येतो. राजा परिक्षीती हा आईच्या उदरांत असतानाच हा खेळ खेळला, तर भीष्म पितामह हे शरपंजरी पडले असताना हा खेळ खेळता खेळताच वैकुंठाला गेले. **या रे या रे लहान थोर । याती भलती नारीनर । करावा विचार । न लगे चिंता कोणासी ।।धृ।।२३५।।** याचा अर्थ कोणत्याही वयाचा पुरुष, स्त्री, नपुंसक कोणीही हा खेळ खेळू शकतो. बरे हा खेळ खेळल्यानें काय होते असे जर म्हणाल तर, तुकोबाराय म्हणतात- हा खेळ खेळल्याने- **कीर्तन चांग कीर्तन चांग । होय अंग हरिरूप ।।१।।९०६।।** बरे हे फळ फक्त खेळ खेळणारालाच मिळते असे नाही तर हा खेळ जे पाहतात किंवा ऐकतात त्यांनाही हेच फल मिळते. ज्याप्रमाणे डी.जे. वर गाणे लागले म्हणजे पोरांना सांगावे लागत नाही की, **"आता नाचा!"** ती न सांगताही आपोआप नाचायला लागतात, तसेच कीर्तनातही होत असते. **ब्रह्मभूत काया होतसे कीर्तनीं । भाग्य तरी देव ऋणी ऐसा ।।धृ।।३६०९।।** किंवा **सततं कीर्तयन्तो मां यतन्तश्च दृढव्रता: । नमस्यन्तश्च मां भक्त्या नित्ययुक्ता उपासते ।।९।।१४।।** श्री ज्ञानोबाराय म्हणतात- **तरी कीर्तनाचेनि नटनाचे । नाशिले व्यवसाय प्रायश्चित्तांचे । जे नामचि नाही पापाचें । ऐसें केलें ।।ज्ञा.-९।।९७।।** माऊली म्हणतात व्यक्ति कितीही पापी असली, पण ती कीर्तनांत येऊन बसली रे बसली की, तिला दुसरे कोणतेही प्रायश्चित्त घेण्याची गरजच नसते. कारण काय? ज्ञानोबारायांच्या वडीलांनी सन्यांस घेतल्यानंतर परत संसार केला, म्हणून त्यांना देहान्त प्रायश्चित्त घ्यावे लागले. जे चोरी करतात, अभक्ष्य भक्षण करतात, दुसऱ्याची निंदा-नालस्ती करतात एवढेच काय पण पुराणांमध्यें ज्यांना पंच महापातकी म्हटलेले आहे. ते जरी कीर्तनांत येऊन बसले तर **'जळती पापाचे डोंगर'।** जे कीर्तन करतात अथवा कीर्तन श्रवण करतात त्यांच्या पापाचे डोंगरच्या-डोंगर जरी असले तरी ते नष्ट होतात. **ऐसें माझेनि नामघोषे । नाहींचि करिती विश्वाची दु:खें । अवघें जगचि महासुखें । दुमदुमित भरलें ।।२००।।** या कीर्तनाचा परीणाम ज्ञानोबाराय सांगतात- कीर्तन जर त्या प्रकारचे झाले तर सगळे जग महासुखाने भरून जाते. तर भगवंताने हा कीर्तनाचा खेळ खेळण्यास सांगितले, कळलं! हा कीर्तनरूपी खेळ खेळण्याचा अधिकार सर्वांना आहे म्हणून सांगितले, कळलं! कीर्तनाने जन्म-मरणरूपी दु:ख निवृत्त होते, कळलं! पापे नष्ट होऊन काया म्हणजे शरीर ब्रह्मभूत होते, कळलं! मग प्रश्न असा पडतो की, ज्या भारत देशांत दिवसाला लाखो कीर्तने होतात, त्या कीर्तनांत कोणाचे पापाचे डोंगर जळाले? नाही ना जळाले! मग ज्ञानोबाराय खोटे बोलतात का? परमात्मा खोटे बोलतो का? नाही ना!



ज्ञानोबारायांचेही बोलणे खोटे नाही, परमात्म्याचेही बोलणे खोटे नाही. याचा अर्थ असा होतो की, कीर्तनांत पापे जळतात आणि पुण्याची निर्मिती होते हे अगदी खरे आहे, तथापी ते कीर्तन कीर्तनाच्या लायकीचे असले पाहिजे. तुकोबारायांच्या कीर्तनांत मेलेले मुल जीवंत झाले आणि आमच्या कीर्तनांत जीवंत असणारे लोक झोपी जातात. तुकोबारायांनी कीर्तन केले आणि त्यांची काया ब्रह्मभूत झाली एवढेच नाही तर कीर्तनातील सर्वांची काया ब्रह्मभूत झाल्याचा पुरावा आहे. लोहगांवात तुकोबाराय कीर्तन करीत होते. छत्रपती शिवाजी महाराज कीर्तनाला उपस्थित होते. ही बातमी मोगल सैन्याला समजली आणि मोगल सैन्य महाराजांना पकडण्यासाठी आले. काय झाले? त्या सैन्याला कीर्तनांत बसलेले सर्वच लोक शिवाजी महाराज आहेत असे दिसू लागले, मोगलांची मती-गुंग झाली. पकडायचे कोणाल? याचा अर्थ काय? **कीर्तन चांग कीर्तन चांग । होय अंग हरिरूप ।।१।।९०६।।** जगद्गुरु तुकोबारायांचे कीर्तन ऐकताना लोकांचे देहभान हरपून जायचे. आज तसे होताना दिसत नाही. याचे कारण काय तर कीर्तन त्या प्रकारचे होत नाही. नाथमहाराजांनी कीर्तन कसे करावे याची मर्यादा घालून दिलेली आहे. ते म्हणतात- **भक्ति-ज्ञाना विरहित इतरा गोष्टी न कराव्या । प्रेमभरे वैराग्याच्या युक्ति विवराव्या । जेणे करूनी अंतरी मूर्ति ठसावी श्रीहरिची । ऐसी कीर्तन मर्यादा आहे संतांच्या घरची ।।** या मर्यादेमध्यें संत कीर्तन करीत होते, परीणाम त्या कीर्तनांत काया ब्रह्मरूप होत होती आणि सुखाची प्राप्ती होत होती. आता कीर्तनाची रीत बदलली. आता कीर्तनातून कोणालाही ज्ञान प्राप्त होत नाही. कोणालाही वैराग्य प्राप्त होत नाही. कीर्तनातून कोणालाही भगवंताविषयीचे प्रेम निर्माण होत नाही. त्यांच्या कीर्तनाने संपूर्ण जग ढवळून निघत होते, सुखी होत होते आणि आपण कीर्तन करतो तर कांहीच होताना दिसत नाही, फक्त लोक हसताना दिसतात. याचा अर्थ आपले कोठे तरी चुकत असले पाहिजे, हे निश्चित. जेणेकरून भगवंताविषयीचे प्रेम निर्माण होऊन ते वृद्धिंगत होईल हेच कीर्तनांत सांगायचे. माझी आई, माझा बाप हे कीर्तनांत सांगायचे नाही. ज्ञानोबाराय म्हणतात- कवनाचे मायबाप कवनाचे गणगोत । ....... ध्यान, धारणा, समाधी, नाही करू शकत तुम्हीं. माऊली म्हणतात- **म्हणौनि योगाचियां वाटा । जे निगाले गा सुभटा । तयां दु:खाचाचि शेलवांटा भागा आला ।।ज्ञा.-१२।।६९।। पाहें पां लोहाचे चणे । जैं बोचरिया पडती खाणें । तैं पोट भरणें; कीं प्राणें । शुद्धी म्हणों? ।।७०।। वाचा गीत गाईजे...** मग परमात्मा ज्ञानानें प्राप्त होतो. पण ज्ञानमार्गने जाणे एवढे सोपे नाही. **शुरस्य धारा... उजू नोहेचि प्राचीन । नेदीचि प्रज्ञा संवाहन । ऐसें ठेले आपादन । शास्त्रांचें जया ।।ज्ञा.-१७।।३८।। तरी न मिळेचि तो देशु । नव्हेचि काळा अवकाशु । जो करवी शास्त्राभ्यासु । तोही दुरी ।।ज्ञा.-१७।।३६।।** ज्ञानोबारायांनी ज्ञान का प्राप्त होत नाही, या करिता कांही अडथळे सांगितलेले आहेत. **उजू नोहेचि प्राचीन ।** ज्ञान प्राप्तीसाठी प्रारब्ध लागते.

सगळे लोक आळंदीला येतात, सगळ्यांना ज्ञान प्राप्त होईल का? **तैसें आस्थेच्या महापुरीं । रिगताती कोटीवरी । परी प्राप्तीच्या पैलतीरीं । विपाइला निगे ।।ज्ञा.-७।।१३।।** प्रारब्ध लागते. प्रारब्ध असूनही भागत नाही. बुद्धीही लगाते. **नेदीचि प्रज्ञा संवाहन ।** ते देणारे गुरु लागतात. शास्त्रांची कृपा व्हावी लागते. जगांत गुरु भरपुर आहेत पण- **पाणी पिवो छानके और गुरु करो पहचानके ।** कोणालही गुरु करून चालत नाही. गुरु कधी मिळतात, ज्ञानोबाराय म्हणतात- **ऐसी कर्म साम्यदशा । होय जेथ विरेशा । तेत श्रीगुरु अपैसा । भेटेचि गा ।।ज्ञा.-१८।।९६६।।** गुरु मिळाल्यानंतरही त्यांनी ते ज्ञान सांगितले पाहिजे. म्हणून ज्ञानमार्गही एवढा सोपा नाही. मग? कीर्तनामध्यें येवून बसा! तुम्हांला परमात्मा भेटल्याशिवाय राहाणार नाही. कीर्तनाची मर्यादा काय आहे? कीर्तन कसे असावे हे ही कळले, पण आता कीर्तन करायचे कोणी? ज्ञान, भक्ती, प्रेम निर्माण होईल असे कीर्तन करायचे कोणी? असे पेंद्यानें भगवंताला विचारले. तेव्हां भगवंत म्हणाले पेंद्या तूंच करायचे कीर्तन!

पेंद्या म्हणाला देवा! मोठमोठे कीर्तनकार आहेत, त्यांनाही असे कीर्तन करता येत नाही आणि मी तर हा असा, मला कसे काय जमेल? भगवंत म्हणाले पेछ, तूं कीर्तनाला उभा तर रहा! पेद्याचा नाईलाज झाला. पेंद्या कीर्तनासाठी उभा राहिला. रामकृष्णहरि झाले, चाल झाली, भजन झाले आणि मग पेंद्या भगवंतापुढे परिहार देऊ लागला, ते अभंगाचे प्रथम चरण-

**पेंद्या म्हणे हृषीकेशी । आरुष बोबडें हें परियेसीं ।।१।।** तेव्हां कान्होबा महाराज तेथे होते, ते सर्व ऐकत होते. पेंद्या म्हणाला **सेवेलागी सेवक झालो । तुमच्या लागलो नीज चरणा ।।** देवा तुम्ही म्हणालात उभा राहा म्हणून मी उभा राहिलो. पेंद्या भगवंतला म्हणतो देवा माझे बोलणे हे आरुष आणि बोबडे आहे. आरुष म्हणजे वेडे-वाकडे आणि बेढब आहे. बोलण्यामध्यें सौष्ठव हवे, बोलण्यामध्यें शुद्धता हवी, बोलण्यामध्यें मार्दव हवे. ज्याच्या बोलण्यांत सौष्ठव, शुद्धता आणि मार्दव असते, ते बोलणे लोकांन ऐकत राहावेसे वाटते. ज्ञानोबारायांचे ज्ञानेश्वरीतील बोलणे या गुणांनी युक्त असल्यामुळे आजही आपल्याला ज्ञानेश्वरी वाचावी-ऐकावी असे वाटते. **तैसे साच आणि मवाळ । मितले आणि रसाळ । शब्द जैसे कल्लोळ । अमृताचे ।।** ज्ञानोबाराय परमात्म्याच्या बोलण्याचे वर्णन करतात- **मग पिकलिया सुखाचा परिमळु । कीं निवालिया अमृताचा कल्लोळु । तैसा कोवळा आणि रसाळु । बोलु बोलिला ।।ज्ञा.-८।।५७।।** आंबा पिकल्यावर जसा त्याचा सुगंध येतो, त्याप्रमाणें सुख पिकले आणि त्याचा सुगंध दरवळू लागावा, किंवा अमृताची लाट अंगावर यावी त्याप्रमाणें कोवळे आणि रसाळ असे भगवंताचे बोलणे आहे. असे जर वक्त्याचे बोलणे असेल तर श्रोत्यांचे अवधान सहजच वक्त्याच्या बोलण्याकडे आकर्षित होते. आपल्या वाणीत जर सामर्थ्य असेल तर आपण जगावर राज्य करू शकतो, परंतु वाणीत सामर्थ्य नसेल तर घरीही आपले कोणी ऐकत नाही. माऊलींच्या वाणीत सौष्ठव, मार्दव



आणि शुद्धता होती म्हणून ज्ञानेश्वरी निर्माण झाली. तुकोबारायंच्या वाणीतही हे गुण होते म्हणून गाथा तयार झाला. ज्याला जग जिंकायचे आहे, त्याने प्रथम आपल्या वाणीचा विकास करावा. स्वामी विवेकानंदांनी आपल्या वाणीचा विकास केला तर एका भाषणातच सगळी अमेरीका ढवळून काढली.

एकदा काय झाले- जिभेचे आणि दातांचे भांडण झाले. दांत जिभेला म्हणाले आम्ही बत्तीस आहोत आणि तूं मात्र एकटी आहेस. आम्हीं मनांत आणले आणि तुझा चावा घेतला तर तुं काय करशील? **दंत कहे जिभको । हम बत्तीस तूं अकेली माय । एक बार चबाए तो । तुम कहाँ जाय ।।** दांत जिभेला म्हणाले- तूं लय चराचरा बोलतेस, जर आम्ही तुला चावले तर तूं काय करशील? जिभ म्हणाली तुम्ही मला दम देता काय? ती म्हणाली- **जिभ कहे दांतको । तुम बत्तीस मै अकेली माय । एक बार टेढी चलूं । तो बत्तीसी गीर जाय ।।** आपल्या वाणीवर नियंत्रण असेल, प्रेम-निष्ठा असेल तर सारे जग आपल्यावर प्रेम करते आणि वाणीला जर सैराट सोडले तर सारे जग आपले शत्रू होते.

अभंगाचे दुसरे चरण- **या रे नाचों अवघे जन । गावों हरिनाम कीर्तन ।।धृ।।** पेंद्या म्हणतो देवा! तुम्हीं मला सांगितले कीर्तन करायला, परंतु आता तुझेही कांही कर्तव्य आहे. देवा तुमचे मी ऐकले, आता तुम्हींही माझे ऐका! काय? **या रे नाचों अवघे जन ।** सर्वांनी या! स्त्री-पुरुष, लहान-थोर सगळे या आणि काय करा? तर नाचा! कसे? **गाये नाचे उडे आपुलिया छंदे । मनाच्या आनंदे आवडीनें ।।१३४०।। राम कृष्ण गीतीं गात । टाळ चिपळ्या वाजवीत । छंदे आपुलिया नाचत । नीज घेऊनि फिरत गा ।।१।।३९३०।।** कांही लोक येथे येतात परंतु काय करतात? तर लाजतात. टाळ्या वाजवायला लाज वाटते. विठ्ठल-विठ्ठल म्हणायला लाज वाटते. चाल म्हणायला लाज वाटते. ज्ञानोबाराय म्हणतात- या ठिकाणी लाजायचे नाही. या ठिकाणी घाबरायचे नाही. परमात्मा आपल्याला भेटावा असे जर वाटत असेल तर लाजून उपयोग नाही. आपण जर लाजलो तर आपल्या संप्रदायाची ही परंपरा चालवणार कोण? तुम्हीं तुमच्या घरादाराला, संपत्तीला वारसदार निर्माण केले, परंतु संप्रदायाचा वारसा कोण सांभाळणार? **याचा धरीन अभिमान । करीन आपुले जतन ।।** याला आपण नाही तर कोण वारस देणार? आपण आलो नाही तर या परंपरा बंद पडतील आणि त्याचा सर्व दोष आपल्याला लागेल. **पाहे पां ध्वजेचे चिरगुट । राया जतन करीता कष्ट ।।१।। तैसा मी एक पतित । परी तुझा मुद्रांकित ।।२।।** माऊलींची कान्होराज महाराजांची ही पताका आता आपल्या खांद्यावर घेण्याची वेळ आलेली आहे. याचा प्रचार आणि प्रसार झाला पाहिजे यासाठी आता आपल्याला शांत बसून चालणार नाही. कीर्तन-प्रवचनाच्या माध्यमातून समाजाला जागे केल्याशिवाय आता दुसरा पर्याय उरलेला नाही. यासाठी तरुणांची आवश्यकता आहे. छत्रपती शिवाजी

महाराज आपल्या बालपणांतच स्वराज्य स्थापनेचे तोरण बांधतात आणि हिंदुंचे साम्राज्य उभे करतात. एक तरुण आपल्या जीवनांचे आपल्या धर्मासाठी बलिदान देतो, तो तरुण म्हणजे छत्रपती संभाजी महाराज आणि आपले काय? आज येथे उपस्थित असलेले शरद महाराज बंड हे माझे सहकारी, मधुकरीच्या भाकरी खाऊन संस्कृत विषय विद्यार्थ्यांना शिकवितात, एवढेच नाही तर राष्ट्रीय पातळीवरील संस्कृतच्या परीक्षेत संपूर्ण भारतात प्रथम क्रमांकाने उत्तीर्ण होतात. आम्ही आळंदीवरून येथे येतो आणि महाराजांच्या अभंगावर कीर्तन करतो, आम्हांला महाराज थोडेफार समजलेत म्हणून आणि आपण येथे असूनही कीर्तनाला येत नाही. याचा अर्थ काय? ज्ञानोबाराय म्हणतात- **कां कमलकंदा आणि दर्दुरीं । नांदणूक एकेचि घरीं । परी परागु सेविजे भ्रमरीं । येरा चिखलुचि उरे ।।ज्ञा.-९।।५८।।** तळ्यांतील पाण्यांत कमळ उगवते. त्या तळ्यांत तेथेच बेडूकही असतात. ते तिथलाच चिखल खातात आणि भ्रमर म्हणजे भुंगे-मधुमक्षिका लांबून येतात आणि कमळांतील परागकण-मकरंद-मध खातात. आम्ही आळंदीवरून येथे येतो आणि आपण येथे असूनही येत नाही याला काय म्हणावे? कशाकरता बोलतोय मी? आपली सद्विवेकबुद्धी जागृत व्हावी म्हणून. महाराज तुम्हांला म्हणतात- या रे नाचों अवघे जन । या आणि येथे येऊन काय करा? तर **गावों हरिनाम कीर्तन ।।धृ।।** या आणि हरिनामाचे गायन करा. नाचा आणि गा. ठिक आहे, आता तुम्ही सगळे नाचू-गाऊ लागले तर मी शांत बसून राहिल का? नाही! महाराज म्हणतात- **कान्हो पाठक बागडा । म्हणजे साधा-भोळा असणारा मी, काय करील? प्रेमे नाचे वैष्णवां पुढां ।।३।।** विठोबा रखुमाई...

**या रे नाचों अवघे जन । गावों हरिनाम कीर्तन ।।धृ।। कान्हो पाठक बागडा । प्रेमे नाचे वैष्णवां पुढां ।।३।।** संतांच्या समोर, देवाच्या समोर प्रेमाणे नाचले पाहिजे. कान्होराज महाराजांचा हा मासिक उपक्रम किंवा नैमित्तिक सेवा सोहळा तुम्ही साजरा केला नाही तर महाराजांचे कांहीच बिघडणार नाही. परंतु तुमचे मात्र बिघडल्याशिवाय राहाणार नाही. महाराजांचा उत्सव साजरा केल्याने त्यांची कीर्ति पसरते असे नाही, परंतु त्यांचा उत्सव केल्यानें आपल्या जीवनाचे सार्थक झाल्याशिवाय रहात नाही, आपल्याला परमात्म्याची प्राप्ती होते. परमात्मा आपल्याला भेटतो. तुकोबाराय म्हणतात- **पुण्यवंत व्हावें । घेतां सज्जनांचीं नांवें ।।१।।१८४।।** ज्ञानोबाराय म्हणतात- **जें मुक्ताते निर्धारितां । लाभे आपलीच मुक्तता । जैसी दीपें दिसे पाहतां । आपली वस्तु ।।ज्ञा.-१८।।३९७।। तेही प्राणापरौते । आवडती हें निरुतें । चे भक्तचरित्रातें । प्रशंसिती ।।ज्ञा.-१२।।२२७।।** भगवंताला आपली पत्नी आवडत नाही. म्या लक्ष्मी डावलेनि केली परौति ।९।।४८०।। मला माझा पिता आवडत नाही आणि माताही आवडत नाही. **जे न सांगेचि पितया वसुदेवासी । जे न सांगेचि माते देवकीसी । जे न सांगेचि बंधु बळिभद्रासी । तें गुह्य अर्जुनेंशीं बोलत ।।ज्ञा.-४।।८।।**



भगवंताला आई आवडत नाही, बाप आवडत नाही, भाऊ आवडत नाही, परंतु माझे भक्त मला प्राणापेक्षाही जास्त आवडतात. **तेही प्राणापरौते । आवडती हें निरुतें । जे भक्तचरित्रातें । प्रशंसिती ।।ज्ञा.-१२।।२२७।।** कान्होबा महाराज हे भगवंताचे एकनिष्ठ भक्त आहेत. म्हणून जो कोणी या कान्होबा महाराजांच्या पायांशी लीन होईल, जो कोणी त्यांची पूजा करील, जो कोणी त्यांचे नियमाने कीर्तन करील, जो कोणी त्यांची आरती करील, त्यांच्या वाङ्मयाचा अभ्यास करील, तो परमात्म्याला प्राणापेक्षाही प्रिय होतो. जगांत आपल्यावर कोणी प्रेम करण्यापेक्षा भगवंताने आपल्यावर प्रेम करणे ही जीवनाची सर्वात मोठी उपलब्धी आहे, त्यातच जीवनाचे सार्थक आहे. जगातील स्वार्थी आणि आप्पलपोट्या लोकांचे काय घेऊन बसलात? ते तोंडावर एक तर मागे भलतेच बोलतात. काय उपयोग आहे त्यांच्या प्रेमाचा. संतांचे प्रेम जड भिंतीला प्राप्त झाले तर तिच्यातही चैतन्याचा संचार झाला आणि ती चालू लागली. रेड्याला प्राप्त झाले तर तो वेद बोलू लागला. म्हणून संताचे प्रेम प्राप्त करून घेण्यातच जीवनाचे खरे सार्थक आहे. कान्होराज महाराज हे परीस आहेत. परंतु आपले दुर्भाग्य असे की आपण त्या परीसाला स्पर्श करण्यासाठी प्रयत्न करीत नाही. आपल्या जवळच चिंतामणी आहे. कल्पतरु, कामधेनु आहे. परंतु आपल्याला त्याची जाणीव नाही. म्हणून आपण दुःखाच्या गर्तेत खितपत पडलेले आहोत. आपण जातो काशीला, जाऊ नये अशा मताचा मी नाही. परंतु आपल्या जीवनाचे सार जर कांही असेल तर ते आहे कान्होराज महाराजांना शरण जाणे.त्यांच्या एवढे मोठे जगात कोणीच नाही. म्हणून आजपर्यंत जे कांही झाले ते झाले, गंगेला मिळाले. परंतु या पुढे तर कृपा करून सावध व्हा आणि आपले संपूर्ण जीवन कान्होराज महाराजांच्या चरणी समर्पित करा. एवढीच विनंती करतो. आपण सर्वांनी मला या ठिकाणी कीर्तन करण्याचे भाग्य प्राप्त करून दिले आणि महाराजांनीही माझ्याकडून सेवा करवून घेतली म्हणून आपल्या आणि महाराजांच्या चरणी नतमस्तक होतो आणि थांबतो. ज्ञानेश्वर माऊली...

वैशाख वद्य त्रयोदशी (शिवरात्री) २०१८ रोजी
ह.भ.प. माऊली महाराज कुऱ्हाडे यांनी समाधीस्थळी केलेले कीर्तन.

**६. वेद गणिता मर्यादला । तरि तूं अगाध बा विठ्ठला ।।१।।**
**येवढे माप कैचें थोर । ज्याणें उमाणे तुमचा पार ।।धृ।।**
**शेष वर्णितां श्रमला । जिव्हा दुखंड होउनि ठेला ।।३।।**
**म्हणौनि कान्हो पाठक उगा । मौनें मवी पांडूरंगा ।।४।।**

प्राप्त प्रसंगी संतश्रेष्ठ कान्होराज महाराजांच्या या पावन अध्यात्मिक दरबारामध्यें प्रत्येक महिन्याच्या वद्य त्रयोदशीच्या वारीच्या निमित्ताने आज असणारी ही कीर्तनसेवा. परमात्म्याची कोणतीही सेवा घडावी या निमित्तातें संतश्रेष्ठ कान्होराज महाराजांच्या या दरबारामध्ये, महाराजांचे प्रसिद्ध असणारे सहा अभंग त्यापैकी सहाव्या क्रमांकाचा अभंग चिंतनाकरता निवडलेला आहे. सदर अभंग हा चार चरणांचा असून या अभंगातून महाराज भगवान परमात्मा किती अगाध-अपार स्वरूपाचा आहे, जगातील कोणतेही माप त्याला आपल्या कवेत आणू शकत नाही. परमात्मा हा अगाध आहे, अवर्णनीय आहे. आणि जर वर्णन करायचेच ठरले तर त्याचे विधीमुखाने वर्णन करता येत नाही. परमात्म्याचे निषेधमुखाने वर्णन करावे लागते.

कीर्तन सुरू करण्यापूर्वी दोन शब्दांचा परिहार देतो. सेवेचे निमित्त सर्वांनाच माहित आहे; परंतु ह.भ.प. गुरुवर्य असणारे पऱ्हाडदादा यांनी पुढाकार घेऊन या ठिकाणी फार पूर्वीपासुन सुरु असणारी ही त्रयोदशीची कीर्तनसेवा मध्ये कांही काळ खंडीत झालेली होती ती पुन्हा नव्या जोमाने प्रारंभ करण्यात आली आणि तुम्हा सर्वाच्या आशीर्वादाने पहिले कीर्तन करण्याचे भाग्य मला लाभले. आज पुन्हा एकदा कान्होराज महाराजांच्या दरबारामध्यें या सेवेचा योग आलेला आहे. आणि दादांची अशी इच्छा आहे की महाराजांचे जे सहा अभंग आहेत त्या अभंगावरच शक्यतो चिंतन करावे. चिंतन घडावे त्यापैकी तीन अभंगावर आतापर्यंत चिंतन झालेले आहे. तसे पाहिले तर मला आज दुसरा अभंग घ्यायचा होता, परंतु मी असा विचार केला की, एक वर्षानंतर आज आपला पुन्हा प्रमांक लागला, यानंतर पुन्हा कधी क्रमांक लागेल हे सांगता येत नाही. तोपर्यंत महाराजांचे सर्वच अभंग संपून जातील, म्हणून आज मी महाराजांचा हा अभंग चिंतनासाठी घेतलेला आहे.

ह.भ.प. गुरुवर्य डॉ. नारायण महाराज यांचा कीर्तनकार निर्मितीचा कारखाना आहे. सर्व विद्यार्थ्यांना रांगेत उभे करायचे आणि डोळे झाकून खडा मारायचा, तो ज्याला लागेल त्याने कीर्तन करण्यासाठी तयार व्हायचे, इतके कीर्तनकार त्यांच्याकडे आहेत. त्यामुळे बाबा ज्यांना सेवा सांगतात त्यांना सेवा प्राप्त होते. या ठिकाणी आमचे जेष्ठ गुरुबंधु ह.भ.प. निकमबाबा, ज्यांची



संपूर्ण गाथा कंठस्थ आहे, आमचे जेष्ठ गुरुबंधु नरहरि महाराज सांगळे ज्यांची संपूर्ण ज्ञानेश्वरी कंठस्थ आहे, सर्वांचा नामोल्लेख करणे शक्यही नाही, गावातील सर्व मंडळी, म्हणून सर्वांच्या चरणी नतमस्तक होऊन- मस्तक माझा पायावरी । या वारकरी संतांच्या ।।

**वेद गणिता मर्यादला । तरि तूं अगाध बा विठ्ठला ।।१।।येवढे माप कैचें थोर । ज्याणें उमाणे तुमचा पार ।।धृ।।** प्रस्तुत अभंगातून संतश्रेष्ठ कान्होराज महाराज साक्षात परमात्म्याच्या समोर उभे राहून परमात्म्याशी संवाद करीत आहेत. कशावरून? अभंगाच्या पहिल्या चरणांत **'विठ्ठला'** असा शब्द आला आहे. आणि अभंगाच्या शेवटी **'पांडुरंगा'** असा शब्द आलेला आहे. महाराज यदा कदाचित वारीनिमित्त पंढरपुरला प्राप्त झाले असतील आणि मग कान्होबाराय आणि पांडुरंगाचा संवाद झाला असावा त्या संवादातून जे शब्द बाहेर पडले, ते शब्द म्हणजे हा अभंग असावा असा विचार आपण करू शकतो. परमात्म्याची थोरवी सांगत असताना कान्होबा महाराज भगवंताला साक्षात त्यांचे स्वरूप किती अगाध आहे, याचा विचार करतात-

एखादी वस्तु किती मोठी आहे? हे सांगत असताना, तिचे मोठेपण-तिचे व्यापकत्व सांगावे लागते आणि जी वस्तु जितकी व्यापक असते तितकाच त्या वस्तुला देश-काल यांचा परिच्छेद असत नाही. एखादी वस्तु या देशात असेल आणि दुसऱ्या देशांत नसेल तर त्या वस्तुचा देशाने परिच्छेद होत असतो, एखादी वस्तु या कालांत असेल आणि दुसऱ्या कालांत राहाणार नसेल तर त्या वस्तुचा कालाने परिच्छेद होत असतो, एखादी वस्तु येथे आहे पण समोरच्या ठिकाणी नसेल तर त्या वस्तुचा देशाने अंत होत असतो. वस्तुची व्यापकता सांगत असताना त्या वस्तुला देश, काल आणि वस्तु यांचा परिच्छेद प्राप्त होतो, ज्या वस्तुंचा परिच्छेद होत असतो त्या सगळ्या वस्तु विनाशी असतात. या उलट ज्या वसतुला देशाची मर्यादा पडत नाही, म्हणजे ती वस्तु सर्व देशामध्ये असते, ज्या वस्तुला काळाची मर्यादा पडत नाही, अर्थात् जी वस्तु सर्व काळांत कायम असते आणि ज्या वस्तुला वस्तुची मर्यादा पडत नाही, अर्थात जी वस्तु सर्व वस्तुमध्ये विद्यमान असते ती वस्तु अविनाशी स्वरूपाची असते. आपण जेंव्हा विचार करतो तेंव्हा एकतर जगाचा विचार करतो किंवा परमात्म्याचा विचार करतो. जी वस्तु व्यापक स्वरूपाची असते त्या वस्तूचा कधीही अंत होत नाही. जी वस्तु संकुचित असते तिचा अंत होत असतो. त्यासाठी एक उदाहरण सांगतो- जर आपल्याकडे एक हंडाभर दूध असेल तर त्याला कधी ना कधी नासणे प्राप्त होते, म्हणजे ते नासू शकते. परंतु क्षीरसागराचा जर विचार केला तर क्षीरसागर विरजण लावूनही विकाराला प्राप्त होत नाही, म्हणजे त्याचे दही होत नाही. कारण क्षीरसागर हा व्यापक आहे. हंड्यातील दूध हे संकुचित आहे, म्हणून ते विकारी किंवा नासणारे आहे. आकाशाचा जर विचार केला तर आकाश अनंत आहे. पंचमहाभूतामध्यें आकाश व्यापक आहे. वास्तविक आकाश हे सामान्य व्यापक आहे, तरीही त्यात विकार संभवत नाही. आत्मा-परमात्मा तर

निरपेक्ष व्यापक आहे आणि म्हणून परमात्म्याचा कोणीही घात करू शकत नाही. भगवान परमात्मा गीतेमध्ये सांगतात- **य येनं वेत्ति हंतारं यश्चैनं मन्यते हतम् । उभौ तौ न विजानीतो नायं हन्ति न हन्यते ।।** परमात्म स्वरूप व्यापक असल्याने त्याला कोणीही मारू शकत नाही. जी वस्तु व्यापक असते ती वस्तु अविनाशी स्वरूपाची असते. जगाची उत्पत्ती होते, जगाची स्थितीही असते आणि जगाचा प्रलयही होतो. का बरे? कारण जग हे संकुचित आहे. मात्र परमात्मा स्वरूपाने व्यापक असल्याने त्याची उत्पत्ती, स्थिती किंवा प्रलय हाऊ शकत नाही. मग सांगाना परमात्मा किती व्यापक आहे? तर ऐका-

ज्या ज्या वस्तु संकुचित असतात त्यांना मोजण्याकरता कांही ना कांही माप लागते. त्या मापात येतात. परमात्मा मात्र व्यापक असल्याने तो कोणत्याही मापात सामावू शकत नाही. परमात्मा इतका मोठा आहे, इतका मोठा आहे की त्या मोठ्या असलेल्या परमात्म्याला मोजण्यासाठी त्याहून मोठे असणारे माप आणता येत नाही. हेच महाराज अभंगाच्या दुसऱ्या चरणांत सांगतात.

**येवढे माप कैचें थोर । ज्याणें उमाणे तुमचा पार ।।धृ।।** कान्होबा महाराज भगवंताला म्हणतात- आपण वीटेवर जेवढे दिसता तेवढेच आपण नाही. आपले स्वरूप एवढे व्यापक आहे की, त्या स्वरूपाचा पार उमाने म्हणजे त्याची मर्यादा मापाने मोजने. तुमचा पार-मर्यादा उमाने-मोजली जाईल येवढे माप थोर कैचे? या जगात येवढे थोर कैचे-कसे असणार? ज्या मापामध्ये तुमचे परिमाण तुमची मर्यादा मोजली जाईल. वस्तुचे मोजमाप करण्यासाठी अनेक प्रकारची मापे(परिमाणे) असतात. दोन गावातील अंतर मोजावयाचे असेल तर, त्यासाठी किलोमिटर हे माप आहे. द्रवरूप वस्तु मोजण्यासाठी लिटरचे माप असते, वजन मोजण्यासाठी किलोग्रॅमचे माप असते. ही सगळी जी मापे आहेत ती जगातल्या पदार्थांना मोजतात. परमात्मा जगामध्यें येत नाही, म्हणून जगातली ही मापे परमात्म्याला मोजू शकत नाहीत. का? तर समान सत्तेत साधक-बाधक व्यवहार घडत असतो. कान्होराज महाराज अशा प्रकारे पंढरीश परमात्म्याच्या पुढे उभे राहून हा संवाद करतात. ते भगवंताला भगवंताच्या स्वरूपाची जाणीव करून देतात. हे प्रभो ज्या मापाने तुमचा पार उमाणे, ज्या मापाने तुमची असणारी पार-मर्यादा मोजता येईल असे जगामध्यें थोर माप नाही. आम्हाला तर असे वाटते की, परमात्म्याला मोजता येईल का? तर परमात्म्याची उंची फारच कमी आहे. पंढरपूरला वीटेवर उभी असणारी पांडुरंगाची मूर्ती आपल्याला दिसते, तिची उंची आपल्याला सहज मोजता येईल. मग कान्होराज महाराज कसे काय म्हणतात की परमात्म्याला मोजता येत नाही? तर ऐका-

भगवंत जेवढा दिसतोतेवढाच तो नाही. कारण परमात्म्याला आपण पहात असतो, तेव्हा आपण चर्म चक्षूंनी पहात असतो. आपल्या सामान्य दृष्टीने पहात असतो. जर ज्ञानाच्या



दृष्टीने परमात्म्याकडे पाहिले तर मग परमात्मा किती व्यापक आहे ते कळेल. सामान्य दृष्टीने पाहिले तर परमात्मा मूर्तीमध्यें जेवढा आहे तेवढाच दिसेल पण भावाच्या मर्यादेने, भक्तीच्या मर्यादेने, तत्त्वज्ञानाच्या मर्यादेने जर पाहिले तर मग आपल्या लक्षांत येईल, परमात्मा इतका सामान्य नाही. **अणुरेणूया थोकडा । तुका आकाशएवढा ।।** ही तुकोबारायांची अनुभूती आहे. या प्रमाणाचा भाग असणारे उपनिषदांचे एक प्रमाण सांगतो- **अणोरणियान महतोमहियान ।** हे परमात्म्याचे स्वरूप आहे. परमात्मा ''अणोरणियान''-अणूपेक्षाही अणू आहे. आणि ''महतो महियान''-आकाशापेक्षाही मोठा आहे. ज्ञानोबारायांची ओवी सांगू- ज्ञानोबाराय म्हणतात, परमात्मा एवढा मोठा आहे. लहान मुले ज्याप्रमाणे लपाथपीचा खेळ खेळतात आणि एखाद्या असणाऱ्या गुप्त जागेत लपून बसतात. लपून बसण्यासाठी जी जागा निवडलेली असते ती जागा त्या मुलापेक्षा मोठी असते, त्या प्रमाणे ज्ञानोबाराय म्हणतात- आकाश ऐव्हढे मोठे आहे ना की त्यामध्ये ही सूर्यमाला, आकाशगंगा विद्यमान आहे ना! ते आकाश देखील परमात्म्याच्या रूपामध्यें लपंडाव खेळत असते. **नभ तुजमाजी खेळे । लपिथपी ।।** हे आकाश परमात्म स्वरूपामध्यें लपंडाव खेळत असते. **नभ तुजमाजी खेळे । लपिथपी ।।** इतका परमात्मा मोठा आहे. आणि म्हणून मोठ्या असणाऱ्या परमात्म्याला मोजू शकेल असे जगामध्यें कोणतेही माप नाही. परमात्मा आम्हांला ओळखीच्याच परिमाणामध्यें दिसतो ना! मग तो मोठा आहे हे कसे काय सिद्ध होईल? द्वापारयुगामध्यें गोकुळांत एक प्रसंग घडला. या प्रसंगावरून परमात्मा किती मोठा आहे हे आपल्याला कळेल-

भगवान परमात्मा द्वापार युगांत, गोकुळांत गोपाळांबरोबर अनेक प्रकारच्या खोड्या करीत असताना एक दिवस असा प्रसंग घडला. यशोदामैया कांहीतरी कामानिमित्ताने घरकाम करण्यांत व्यग्र झाली आणि त्याच वेळी परमात्म्याने संधी साधली. भगवंताने घरांत असणारा लोण्याचा डेरा उचलला. आता ते लोणी भगवंतांनी खावे ना! कांही हरकत नाही; परंतु भगवंतांनी स्वत: लोणी खाल्लेच परंतु ते आपल्या बरोबर असणाऱ्या इतर गोपाळांनाही वाटले. आता उरलेले लोणी तरी भगवंताने घरांत नेऊन ठेवावे ना! परंतु भगवंताने तसे केले नाही. भगवंत उरलेले सर्व लोणी घेऊन आपल्या घराच्या खिडकीजवळ गेले, जवळच असणाऱ्या झाडावर कांही माकडे उड्या मारत होती. त्या माकडांकडे हात करून ओंजळ-ओंजळ लोणी माकडांना देण्याचा कार्यक्रम भगवंताने सुरू केला. यशोदामैया तेथे येवून पहातात. तर भगवंताने लोणी खाल्लेले आहे. गोपाळ अजून लोणी खात आहेत आणि उरलेले लोणी हा स्वत: वानरांना खाऊ घालीत आहे. आणि अशा प्रकारे लोण्याची नासाडी करतो आहे. भगवंत कोणतेही काम विनाकारण करीत नाहीत. याच वानरांनी मागच्या अवतारांत सीतेचा शोध घेण्यासाठी आपल्याला जी मदत केली

त्यांच्या त्या उपकारांतून उतराई होण्यासाठी भगवंत त्यांना लोणी वाटीत आहेत. दुसऱ्या दिवशीही भगवंतानी याच प्रकारे घरांतील सर्व लोणी वाटलेले आहे. यशेदा मैयांनी तिकडे कानाडोळा केला. तिसऱ्या दिवशी यशोदामैयांनी भगवंताला मांडीवर घेतलेले आहे आणि त्या भगवंताला स्तनपान करीत आहेत. तेवढ्यांत घरांत चुलीवर ठेवलेले दूध उतू गेले आणि त्याचा वास यशोदामैय्यांना आला. दूध उतू जात आहे हे लक्षात आल्याबरोबर यशोदामैयांनी भगवंताला खाली ठेवले आणि त्या चुलीकडे धावल्या. भगवंत विचार करतात- सगळ्या जगाने माझा अंगीकार करावा असा मी! आणि माझीच माता माझी उपेक्षा करून दूधाकडे जाते, हे पाहून भगवंत रडू लागले. तेथेच असणारी दही घुसळण्याची रवी भगवंतानी हातात घेतली आणि घरांत असणारे दुधाचे सर्व माठ भगवंताने फोडून टाकले. घरांतच क्षीरसागराची निर्मिती झाली. हे पाहून यशोदामैयाला खूपच राग आला. काल याने लोणी वाटले, आपण दुर्लक्ष्य केले. आज मात्र सगळ्या दूधाची नासाडी केली. दिवसें-दिवस याच्या खोड्या वाढतच चालल्या आहेत, काय करावे? आपल्याला काम करावे लागते आपणाला काम करता यावे म्हणून माता-माऊल्या मुलाला खेळांत गुंतवून ठेवतात. कांही मुले अशी असतात की, ती खेळांत गुंतत नाहीत. त्यांना आईच हवी असते. मग अशी जी मुले आहेत त्यांना कांहीतरी धाक निर्माण करण्यासाठी शिक्षा करावी लागते. यशोदा मय्यांनी भगवंतांनी केलेल्या अपराधाची शिक्षा म्हणून भगवंताला उखळाला बांधून ठेवण्याचा निर्णय घेतला. भगवंताच्या या लीलेला ''उलूक बंधन'' असे म्हणतात. मी कशाकरता सांगतोय? भगवंताला मोजता येईल असे जगामध्ये माप नाही यासाठी, यशोदा मैय्याला परमात्मा लहान दिसतात. म्हणून याला बांधण्यासाठी कितीसे दावे लागेल असे समजून त्या भगवंताला बांधण्याचा प्रयत्न करतात. थोडेसे दावे उखळाला बांधतात आणि त्याचे दुसरे टोक भगवंताच्या पोटाला बांधू लागतात. ज्याच्या पोटाला दावे बांधले आहे, त्याला दामोदर असे म्हणतात. मात्र हे करताना दावे थोडेसे कमी पडते. किती कमी पडते? तर फक्त दोन बोटे दावे कमी पडते. यशोदा मैय्या विचार करते, फक्त दोनच बोटे दावे कमी पडले आहे ना! म्हणून त्या दुसरे दावे घेऊन अगोदरच्या दाव्याच्या टोकाला बांधतात आणि मग ते भगवंताच्या उदराला बांधू लागतात, पण आश्चर्य असे की, तरी सुद्धा दावे दोन बोटे कमीच पडते. पुन्हा पूर्वीचीच क्रिया केली जाते असे करता करता गोठ्यांतील सर्व गायींची सगळी दावी संपतात. नंद बाबांकडे ९ लक्ष गायी होत्या बरे, त्या सर्व गायींची दावी आणली तरी सुद्धा दोन बोटे दोर कमीच पडला. मग तेथे असणाऱ्या गौळणी आपल्या वेणी बांधण्याच्या काथाड्या यशोदेला देऊ लागल्या. का? तर आपण भगवंताच्या कामी पडावे म्हणून. परंतू त्यानेही भगवंत बांधला जाईना! सर्व दावी, सर्व काथाड्या संपल्या. तरीही भगवंत बांधले गेले नाहीत. का? तर भगवंत दिसतो तेवढाच तो सामान्य स्वरूपाचा नाही. म्हणून जगात असे कोणतेच मोठे माप नाही की जे परमात्म्याचे मोजमाप करू शकेल! का बरे दोर दोनच बोटे कमी



पडला? शास्त्रकार असा विचार मांडतात- यशोदेच्या ठिकाणी अहंकार होता की, मी या परमात्म्याला बांधल्या शिवाय रहाणार नाही. म्हणून यशोदेकडून एक बोट दोर कमी पडला. भक्ताच्या ठिकाणचा अहंकार गेला तर देव सुद्धा आपल्या ठिकाणचा अहंकार सोडून देत असतो, म्हणून भगवंताच्या कडून एक बोट दोर कमी पडत होता. मात्र यशोदा मय्याचा अहंकार नष्ट झाला, त्या म्हणाल्या देवा आता नाही मी तुला बांधू शकत! त्याबरोबर भगवंतानेही आपला अहंकार सोडून दिला आणि भगवंत बांधले गेले.

परमात्मा दिसतो तेवढाच सामान्य स्वरूपाचा नाही. म्हणून ज्या मापाने तुमचा पार म्हणजे मर्यादा मोजली जाईल, एवढे माप कैचे थोर । या जगांत एवढे मोठे कोणतेही माप नाही. मान्य आहे परमात्मा अगाध स्वरूपाचा आहे. हे जरी खरे असले तरी, एका मापाने भगवंताला मोजता येते. **भक्तीचिया मापे मोजितो अनंता । इतराने तत्त्वता न मोजवे ।।** भक्तीच्या मापाने परमात्मा मोजला जातो. इतर कोणत्याही म्हणजे योगाच्या अथवा तत्त्वज्ञानाच्या मापाने तो मापला जात नाही. अंत:करणांत भक्ती असेल तर मात्र परमात्मा मोजला जातो.

दुसऱ्या चरणांतून भगवंत अनंत स्वरूपाचा आहे, हे सांगितले आहे. परंतु परमात्मा शब्दाचाही विषय होऊ शकत नाही. ज्ञानही परमात्म्याला विषय करू शकत नाही. कारण ज्ञानाचा निधी असणारा वेद देखील परमात्म्याची गणना करण्याकरता प्रवृत्त झाला, तेव्हा त्या ज्ञानालाही मर्यादा पडली. हे भगवंताचे अगाधत्व, अपारत्व, व्यापकत्व महाराज अभंगाच्या प्रथम चरणांतून सांगत आहेत. **वेद गणितां मर्यादला । तरि तूं अगाध बा विठ्ठला ।।१।। एवढे माप कैचें थोर । ज्यानें उमाणे तुमचा पार ।।धृ।।** परमात्मा कोणत्याही मापाने मोजला जात नाही. परमात्मा अपार, अमाप स्वरूपाचा आहे, म्हणून तो व्यवहारिक मापाने मोजला जात नाही. ज्ञानाच्याही मापाने तो मोजला जात नाही.वेदाकडे अगाध ज्ञान आहे परंतु तो वेदही परमात्म्याचे वर्णन करण्याच्या बाबतीत असमर्थ आहे. जगांत सर्वात जास्त ज्ञान कोणाकडे असेल तर ते वेदाकडे आहे. वेद हे भारतीय संस्कृतीचा गाभा आहेत. आपली संस्कृती वेदाधारित आहे. आपली संस्कृती वैदिक आहे. विज्ञानांत जे कांही शोध लागलेले आहेत किंवा लागतील त्या सर्व शोधांचे मूळ वेदात आहे. परमात्मा सर्वज्ञ आहे तर वेद हा सर्वज्ञकल्प आहे. जगातील सर्व ज्याला कळते त्याला सर्वज्ञ म्हणतात. आणि वेद हा सुद्धा जवळ-जवळ सर्वज्ञ आहे. तो वेद आपल्या सर्वज्ञकल्प भावाने परमात्म्याची गणना करण्यासाठी प्रवृत्त झाला, परंतु त्याला सुद्धा मर्यादा पडली. वेदाचे ज्ञानही तेथे कुंठीत झाले आणि त्यामुळे परमात्मा अगाधच ठरला. अमर्याद स्वरूपाचा ठरला. वेदाचे ज्ञानही पुरे पडू शकले नाही. भगवंत म्हणतात- अरे अर्जुना! माझ्याकडे येण्याकरीता ज्ञानाची संपन्नता लागत नाही. माझ्याकडे येण्याकरीता वेदाचे सामर्थ्य लागत नाही. माझ्याकडे येण्याकरीता आर्थिक संपन्नताही लागत नाही. जर माझ्याकडे यायचेच असेल तर लहान व्हावे

लागते, तरच माझी प्राप्ती होते. त्याकरीता ज्ञानोबाराय उदाहरण देतात- **पाहे पां, जाणिवेचेनी बळें । कोण्ही वेदांपासूनी असे आगळें । कीं, शेषाहूनि तोंडाळें । बोलकें आथी? ।।९।।३७०।।** भगवंत असे म्हणतात- ज्ञानाच्या बळाने वेदाइतका श्रेष्ठ कोणी आहे का? अजिबात नाही! तोंडाळे बोलके आथी? आणि शेषासारखा बोलका-तोंडाळ कोणी आहे का? नाही! परंतु तो शेषही **अंथरूणा तळवटी दडे ।** येरू म्हणजे दुसरा असणारा वेद **नेती-नेती म्हणोनि बहुडे ।** परमात्मा असा नाही, असा नाही. म्हणून तो मागे फिरला. वेद नेती नेती म्हणोनि बहुडे । म्हणून तो भगवंताचा पलंग झाला. पदार्थाचे वर्णन करण्याच्या दोन पद्धती आहेत. **''वस्तु अशी आहे''** असे वर्णन करण्याला विधीमुखाने वर्णन करणे म्हणतात. तर **''वस्तु अशी नाही'',**असे वर्णन करण्याला निषेधमुखाने वर्णन करणे असे म्हणतात. परमात्म्याचे वर्णन करण्यास वेद प्रवृत्त झाला परंतु तो वर्णन करू शकला नाही. वेद सामान्य नाही. वेदाच्या ज्ञानामध्यें आणि माणसाच्या ज्ञानामध्यें काय फरक आहे? चार प्रकारचा फरक आहे. मनुष्य कितीही बुद्धीमान असला तरी त्याच्या बुद्धीमध्यें चार दोष असतात- भ्रम, प्रमाद, करणापाटव आणि विप्रलिप्सा. एकेक वाक्यात प्रत्येकाची व्याख्या सांगतो. १)**भ्रम:-** मनुष्याची बुद्धी कितीही जरी अगाध असली तरी त्याच्या बुद्धीला भ्रम होऊ शकतो. एखादा मनुष्य सायंकाळच्या वेळी घराकडे जात असताना वाटेत जर दोरी पडलेली असेल तर त्या दोरीवर त्याला सर्पाचा भ्रम होऊ शकतो. २) **प्रमाद:-** म्हणजे कळत असूनही एखादी चूक करण्याची प्रवृत्ती. जाणीव पूर्वक केलेली चूक म्हणजे प्रमाद. ३)**करणापाटव:-** करण म्हणजे इंद्रियें आणि पाटव म्हणजे नैपुण्य. माणसाचे वय झाले म्हणजे त्याला ऐकू नीट येत नाही. नीट दिसत नाही यालाच (करण+अपाटव) करणापाटव असे म्हणतात. त्याला राम-राम म्हटले की तो लांब-लांब जातो, असे होते. ४)**विप्रलिप्सा:-** म्हणजे फसविण्याची बुद्धी. यासाठी एक उदाहरण- एकदा एक जुने गणेश-मंदिर पाहण्यासाठी एक सहल गेली. मुले गणपतीचे दर्शन घेऊ लागली. गणपतीचे मंदिर बहुधा गावाच्या बाहेर असते. गणपतीचे पुजारी सकाळी गणपतीबाप्पांची पूजा करण्यासाठी येतात आणि पूजा करून घरी जातात. गणपतीबाप्पांची नाभी मोठी आणि खोल असते. पूजा करताना पूजेचे पाणी नाभीत जावून त्या ठिकाणी ओलावा राहिल्यानें तेथे गारवा राहात असतो. उन्हाळ्याच्या दिवसात एक विंचू गणपतीबाप्पाच्या बेंबीत गारवा असल्यानें तेथेच बसून राहिला. त्या मुलांमध्यें एक खोडसाळ आणि उपद्व्यापी मुलगा होता, त्याने त्या गणपतीबाप्पाच्या बेंबीत आपले बोट घातले. विंचवानें त्याला डंख मारला. त्याने आपल्याला विंचू चावला हे कोणालाही सांगितले नाही, उलट तो हात झाडीत म्हणाला अरे बापरे! काय गार वारा येतो आहे गणपतीबाप्पाच्या बेंबीतून! ते ऐकून दुसऱ्या मुलानें गणपतीबाप्पाच्या बेंबीत बोट घातले. विंचवाने त्यालाही डंख मारला. तो त्याला म्हणाला- का रे मला फसविले? तो म्हणाला- फसविले असे म्हणायचे नाही! गणपती बाप्पाचा आपल्याला



मिळालेला हा प्रसाद गुरुजींच्यासह सर्वांना मिळायला हवा. मला काय सांगायचे, विप्रलिप्सा. माहित आहे की नाही? ही जी ठकविण्याची बुद्धी आहे, ही मनुष्याकडे असते. वेदाकडे मात्र भ्रम नाही, प्रमाद नाही, करणापाटव नाही आणि विप्रलिप्साही नाही. असा अपौरुषेय असणारा वेद देखील परमात्म्याचे वर्णन करू शकला नाही. **वेद गणिता मर्यादला ।** म्हणजे परमात्मा असा आहे, असा आहे. असे वेदही सांगू शकला नाही. मग वेदाने सांगितले नाही का? सांगितले ना! परमात्मा असा नाही, असा नाही. असे सांगितले. याला निषेधमुखाने वर्णन असे म्हणतात. या ठिकाणी ज्ञानोबाराय उदाहरण देतात-पूर्वीच्या काळामध्यें मुलींची अगदी लहान वयांत लग्ने होत असत. **''अष्टवर्षा भवेत् कन्या''** आठ वर्षांची मुलगी झाली की, तिचे लग्न करायचे. ही अघोरी प्रथा आहे का? नाही. आठ वर्षानंतर मुलीचे लग्न झाले की ती मुलगी परत आपल्या माहेरी जात असे. वय १६ वर्षे होईपर्यंत ती माहेरी राहून नंतर ती सासरी जात असे. पूर्वीचा काळ होता. पती समोर आला तरी पतीला नावानें संबोधायचे नाही, एवढेच नाही तर इतरांसमोर पतीसी बोलायचे देखील नाही. पुढे प्रसंग असा झाला. कांहीतरी निमित्ताने तिचा पती आपल्या मित्रांच्यासह सासुरवाडीला आला. ही बातमी त्या मुलीच्या मैत्रिनींना समजली आणि त्या मैत्रिणी तिला विचारू लागल्या की, तुझा पति कोणता आहे? तो उजवीकडचा आहे का? ती म्हणते तो नाही. मग दुसऱ्या क्रमांकाचा आहे का? नाही! तिसऱ्या क्रमांकाचा? नाही! चौथ्या क्रमांकाचा? नाही! पाचव्या क्रमांकाचा आहे का? असे विचारल्यावर ती कांहीच बोलली नाही. अगोदरच्या चौघांबद्दल, नाही! नाही! असे म्हणणारी ती आता मात्र तिचा खरा पती समोर आला आणि त्याच्या संबंधानें जेव्हां त्यांनी प्रश्न विचारला तेव्हां ती कांहीच बोलली नाही, तरीसुद्धा तिच्या मैत्रिनींनी जाणून घेतले की ज्याअर्थी ही कांहीच बोलत नाही, त्याअर्थी हाच तिचा पती असला पाहिजे. हे जसे आहे. त्या प्रमाणेच वेद सुद्धा परमात्मा असा नाही, असा नाही. असे म्हणतो आणि नंतर गप्प बसतो. हीच गोष्ट ज्ञानोबाराय सांगतात- **जैसें, न सांगणेंवरी । बाळा पतीसी रूप करी । बोलु निमालेपणें विवरी । अचर्चातें ।।१५।।४६८।।** बाला म्हणजे कन्या पतीशी रूप करी म्हणजे पतीचे स्वरूप स्पष्ट करून सांगते, मैत्रिनींच्या लक्षांत आणून देते. त्याप्रमाणे वेदही स्थूल असणारे जगत परमात्मा होऊ शकत नाही. त्याचे कारण असणारे अज्ञान परमात्मा होऊ शकत नाही. या दोघांचे असणारे अधिष्ठान, अधिष्ठान असेही म्हणता येत नाही कारण अध्यस्तच नाही तर अधिष्ठान कोणाचे? मग या सर्व दृश्य पदार्थांचा निरास केल्यावर उर्वरित जे शिल्लक राहाते तेच परमात्म्याचे स्वरूप. **वेद गणिता मर्यादला ।** परमात्म्याची गणना करताना वेद विधीमुखानें सांगू शकला नाही पण निषेधमुखानें मात्र वेदाने परमात्म्याचे वर्णन केले. ही गोष्ट नाथमहाराज अशी वर्णन करतात- **पुसू नका बाई । वेदासी कांही कळलेचि नाही । वेद संपन्न होय ठायी ।** ज्ञानाच्या बाबतीत वेद संपन्न आहे. तरी सुद्धा परमात्म्याचे वर्णन

करीत असताना वेदाला मौन धारण करावे लागले ना! **वेद सांगो गेला । पुढे मौनावला ।** ज्ञानोबाराय म्हणतात- **वेद वानूर्नी तवची चांग । जव न दिसे तुझे अंग ।** जोपर्यंत परमात्म स्वरूप दिसत नाही, तो पर्यंत वेद वर्णन करण्यासाठी प्रवृत्त होतो, परंतु कोठपर्यंत, जोपर्यंत परमात्मा समोर येत नाही तो पर्यंत, परमात्मस्वरूप दिसत नाही तोपर्यंत. परमात्मा समोर आल्यानंतर मात्र वेद परमात्म्याचे विधीमुखाने वर्णन करू शकत नाही. वेद परमात्म्याचे निषेधमुखाने वर्णन करतो. याचा अर्थ येथे वेदाच्या ज्ञानालाही मर्यादा पडते. **वेद गणिता मर्यादला । तरी तूं अगाध बा विठ्ठला ।।१।।** पहिला शब्द वापरला विठ्ठला! जो वीटेवर उभा आहे त्याला विठ्ठल असे म्हणतात. इंद्राला विटेचे स्वरूप प्राप्त झाले आणि भक्तराज असणाऱ्या पुंडलिकरायांनी देव भेटीकरीता आल्यानंतर त्यांना उभे राहण्याकरीता जो इंद्र विटेच्या रूपांत प्राप्त झाला होता ती वीट हातामध्यें घेवून मागे भिरकावली आणि भगवंताला उभे राहण्यासाठी स्थान दिले. इंद्र हा विटेच्या स्वरूपांत भगवंताच्या पायाखाली आहे. ज्याच्या पायाखाली वीट त्यालाच विठ्ठल म्हणतात. किंवा ज्ञानहीन असणाऱ्या सर्वांचा जो उद्धार करतो, त्यालाही विठ्ठल म्हणतात.

वेदही तुमची गणना करू शकत नाही. ज्ञानाच्या बाबतीत वेदही तुम्हला मोजू शकत नाही. मापाच्या बाबतीत तुम्ही व्यापक-अपार स्वरूपाचे आहात, पण का हो? एखादी व्यक्ती जर फारच बोलकी असेल तर ती व्यक्ती तुमचे वर्णन नाही का करू शकणार? अरे जेथे सहस्त्र मुखे असणारा शेष देखील भगवंताचे वर्णन करू शकला नाही, तेथे तो काय करील? हा भाव अभंगाच्या तृतीय चरणांत वर्णन करतात-

**शेष वर्णितां श्रमला । जिव्हा दुखंड होऊनि ठेला ।।३।।** कितीही जरी ज्ञानाची संपन्नता असेल तरी तो परमात्म्याचे वर्णन करू शकत नाही. **वेद गणिता मर्यादला ।** जगातील बाकी मापे परमात्म्याला मोजण्याच्या बाबतीत असमर्थ ठरतात. परंतु एखादा माणूस फारच बोलका असेल तर! **शेषाहुनि तोंडाळे । बोलके आथी?।।** तो कितीही बोलका असला, बडबड करीत असला तरीही तो परमात्म्याचे शब्दाने वर्णन करू शकत नाही. त्यासाठी उदाहरण देतात शेषाचे. **शेष वर्णिता श्रमला ।** म्हणजे शेष परमात्म्याचे वर्ण करीत असताना श्रमला म्हणजे थकला आणि काय झाले तर सांगतात- **जिव्हा दुखंड होऊनि ठेला ।**

कश्यप ऋषींच्या कद्रू आणि विनिता तसेच दिती आणि अदिती या पत्न्या होत्या. कद्रू जी आहे तिच्या पोटी सापच जन्माला आले आणि त्यापैकीच एक आहे शेषनाग! त्याने भरपुर आराधना केली आणि आराधना केल्यानंतर भगवंतांनी त्याला वर दिला आणि तो भगवंताची शय्या झाला, त्यामुळे क्षीरसागरांत तो भगवंताला कायम पहात असतो. भगवंत या शेषाच्या शय्येवरच झोपलेले असतात. किती फणा आहेत याला? एक हजार! मग त्याला जर एक हजार फणा म्हणजे मुखे आहेत तर त्याला जिभा किती असतील? एक हजारच असतील ना! शेषाला



एक हजार जिभा आहेत आणि त्या एक हजार जिभांनी तो भगवंताचे वर्णन करण्यास प्रवृत्त झाला. परंतु काय झाले? तो श्रमला-थकला आणि परिणाम असा झाला की फार बोलल्यामुळे त्याच्या जिभादुखंड झाल्या म्हणजे प्रत्येक जिभेचे दोन भाग झाले. म्हणजेच त्याच्या जिभांची संख्या दोन हजार झाली. तरीही तो भगवंताचे यथार्थ वर्णन करू शकला नाही. या सगळ्या गोष्टींचा समावेश कान्होराज महाराजांनी आपल्या अभंगात केलेला आहे. वेदांचे अगाध ज्ञान, जगातले कोणतेही माप आणि दोन हजार जिभांचा शेषही भगवंताचे वर्णन करू शकत नाही तर मग आपला काय पाड लागणार? म्हणून मी काय करतो, अभंगाचे चौथे चरण- **म्हणोनि कान्हो पाठक उगा । मौने मवी पांडुरंगा ।।४।।** वरील सर्व गोष्टींचा विचार करून कान्होराज महाराज म्हणतात- म्हणोनि हा शब्द पाठीमागच्या चरणांशी लावायचा. म्हणून मी कीर्तनाला आलो. का तर मला कीर्तन ऐकण्याची आवड आहे. वेदही वर्णन करू शकत नाही, जगातील कोणतेही माप मोजू शकत नाही, शेषासारखा तोंडाळ भगवंताचे यथार्थ वर्णन करू शकत नाही, या सर्व कारणामुळे कान्हो पाठक उगा म्हणजे शांत-निवांत आहेत. निवांत राहून काय करतात? तर **मौने मवी पांडुरंगा।।** म्हणजे मौनाने मोजतात. अगोदरच्या तीनही चरणांतून सांगतात की तुम्हांला कोणीही मोजू शकत नाही. आणि मी मात्र मोजतो! भाव असा आहे, जो शांत राहातो तोच मोजू शकतो. शांत राहातो म्हणजे नम्रता धारण करतो. **''विद्या विनयेन शोभते''**. मी नाही शब्दाने मोजू शकत! मग कसे मोजता? मौने मवी-म्हणजे मौनाने मोजतो. मोजण्याकरता काय लागते, शब्द लागतात. कान्होराज महाराज म्हणतात- मी मौनानें परमात्म्याला मोजतो. कसे काय बरे? मौनानें परमात्मा मोजला जाईल का? **वेदु काय काय न बोले ।** माऊली म्हणतात- वेद काय काय बोलत नाही, परंतु देवाचे नावही घेत नाही. मौनाने मोजतो आहे. याचा भाव असा आहे- शब्दाचा अभिमान ज्याला आहे, त्याला असे वाटते की, मी शब्दाने मोजले-वर्णन केले; त्याला शब्दाचाही अभिमान होऊ शकतो. म्हणून शब्दाने परमात्म्याचे वर्णन होऊ शकत नाही. एखादी व्यक्ती जर मौन धारण करून राहीली असेल तर, त्यातून परमात्म्याच्या संबंधाने कांहीच बोलता येत नाही, हा भाव व्यक्त होऊ शकतो. कांहीच बोलता येत नाही त्याच्या संबंधाने, असे मात्र बोलता येऊ शकते. **तेणे कारणे मी बोलेन । बोली अरूपाचे रूप दाविन ।।** परमात्मा शब्दाचा विषय होत नाही हे सुद्धा शब्दानेच सांगावे लागते. **जो सर्व नेणिवां जाणिजे । मौनाचिया मिठीया वानिजे । कांहीच न होनि, आणिजे । आपणपयां जो ।।१६।।१९।। मौन गा , तुझे राशिनांव । आतां स्तोत्रीं कें बांधो हांव । दिसती तेतुली माव । भजों काई? ।।१७।।१५।।** भगवंताचे वर्णन करायचे असल्यास त्या संबंधाने कांही न बोलणे हेच संयुक्तिक आहे. त्याच्या संबंधाने मौन धरून राहणे. असे जर झाले, तर परमात्मा जाणला जावू शकतो. म्हणजे थोडक्यांत ज्याच्या स्वरूपाच्या

ठिकाणी शब्दाचा लाग लागत नाही, शब्द जेथून मागे फिरतात. अशब्दम्, अस्पर्शम्, अरूपम्, अव्ययम् असे जे रूप आहे, तत् संबंधाने मौन धारण करणे हेच परमात्म्याचे मोजणे आहे. म्हणून महाराज म्हणतात **मौने मवी पांडुरंगा ।**

पांडुरंग शब्दाचा गोड अर्थ सांगतो- गोकुळामध्यें भगवंतांनी फारच खोड्या केल्या तेव्हां यशोदामैयांनी असा विचार केला की आता याला गावात ठेवणे योग्य नाही. जी मुले गावात त्रास देतात त्यांना आळंदीला पाठवावे लागते. साधारणत: आळंदीत सगळेच सुधारतात. जो आळंदीत सुधारत नाही, तो कोठेच सुधारू शकत नाही. आता याला शिक्षणासाठी पाठविले पाहिजे. पूर्वीच्या काळचे शिक्षण म्हणजे गाईंचे रक्षण करणे आणि म्हणून भगवंतांनी सर्व गायींना आपल्या सोबत घेतले. प्रसंग असा आहे. गायी कधीं सोडायच्या असतात? सूर्योदय होण्याच्या अगोदर. का? तर सूर्योदयापूर्वी गवतावर दवबिंदू असतात. दवबिंदुंनी युक्त असे गवत गायींनी खाल्ले तर ते गायींना चांगले मानवते, त्या धष्टपुष्ट होतात, अधिक दूध देतात. आताचे गोपाळच ६ वाजता उठतात. सूर्योदय होण्यापूर्वी भगवंताने गायींना सोडावे. सर्व गायीं एकत्र करून त्यांना चारण्यासाठी घेऊन जाताना भगवंत वेणू वाजवित, गायींच्या पुढे चालत असत. **मधुर मधुर वाजवित वेणू ।** भगवंताने वेणू वाजविली की सगळ्या गायीं भगवंताच्या पाठीमागे जायच्या. ज्याच्या मागे गायीं तो गोपाळ. गो म्हणजे गायीं. गो म्हणजे इंद्रिये. इंद्रियांना जो पाळतो, गायींना जो पाळतो तो गोपाळ. सायंकाळी मात्र याच्या उलट. का? दिवसभर गायीं चरायच्या आणि सायंकाळी आपल्या गोठ्यामध्यें असणाऱ्या वासरांच्या ओढीने गायी भगवंताच्या पुढे निघायच्या आणि भगवंत मात्र गायींच्या मागे चालायचे. गायींना आपल्या वासरांची ओढ असल्याने गायीं धावत-धावत घराकडे निघत. त्यांच्या धावण्यानें त्यांचे खूर जमिनीवर जोराने आपटत त्यामुळे खूरातून माती उडायची, गोकुळातील मातीचा रंग पाडूर म्हणजे पांढरा आणि त्या पांढऱ्या मातीचा थर भगवंताच्या मुखावर बसायचा, त्यामुळे भगवंताचे मुख पांढरे व्हायचे. संध्याकाळी गायीं घरी येण्याची जी वेळ, त्या वेळेला **'गोरज मुहूर्त'** असे म्हणतात. परंतु हा शब्द आता फक्त पत्रिकेतच पहायला मिळतो. गायींची असणारी पायधूळ ज्याप्रसंगी आसमंतात उडते त्या वेळेला गोरज मुहूर्त म्हणतात. ती धूळ भगवंताच्या मुखावर बसल्यानें भगवंताच्या मुखाचा रंग पांढूरका व्हायचा. पांडुर+अंग=पांडुरंग. **म्हणोनि कान्हो पाठक उगा । मौने मवी पांडुरंगा ॥** तुमचे स्वरूप आम्ही सांगू शकत नाही या करता तुमच्या स्वरूपाच्या संबंधाने मौन धारण करतो. आता आमची वाणी बोलू शकत नाही. **म्हणून स्तुती सांडूनी निवांता । चरणी ठेवीजे माथा । हेचि भले ॥** असे म्हणून कोन्होराज महाराज आपली असमर्थता व्यक्त करतात आणि मौनाने भगवंताचे वर्णन करतात.

आता ५/१० मिनिटे बाकी आहेत आणि आज चोखोबारायांची पुण्यतिथी आहे म्हणून चोखोबारायांच्या चरित्राचा आपण थोडा विचार करू. आज चोखोबारायांचा समाधी सोहळा



साक्षात भगवंताने साजरा केलेला आहे. या महाराष्ट्रामध्ये अशी एकही जात किंवा धर्म नाही की ज्या जातीत किंवा धर्मात संत जन्माला आलेले नाहीत. सगळ्या जाती-धर्मामध्यें संतांनी अवतार घेतला आणि आपल्या आचरणातून सगळ्यांना भक्तीचा अधिकार असतो हे सिद्ध करून दाखविले. त्यापैकी हरीजन समाजामध्यें महार समाजामध्यें **चोखामेळा बंका जातीचे महार ।** कनिष्ठ असणाऱ्या जातीमध्यें देखील चोखोबारायांनी अवतार घेतला आणि आपली अगाध असणारी नामनिष्ठा जगाच्या समोर प्रगट करून दाखविली. संत कोणत्याही जातीत जन्माला आले तरी भक्तीमध्यें जात अडथळा करू शकत नाही. **म्हणोनि भक्ती गा एथ सरे । जाती अप्रमाण ।** जातीला कांही महत्व नाही. भक्तीला मात्र महत्व आहे. त्यांच्या वाट्याला आलेले जे कर्म आहे, एखादे जनावर मरण पावले तर त्याची विल्हेवाट लावण्याचे कर्म त्यांच्या वाट्याला आलेले असल्याने ही भगवंताची इच्छा आहे म्हणून ते त्या कर्माचे निष्ठेने आचरण करीत. जी व्यक्ती आपल्या वाट्याला आलेले कर्म करते, त्या कर्माच्या माध्यमातून ईश्वराचे पूजनच होत असते. **तया सर्वात्मका ईश्वरा । स्वकर्म कुसुमांची, वीरा । पूजा केली, होय अपारा । तोषालागीं ॥ मग तिये पूजे । रिझलेनि आत्मराजें । वैराग्यसिद्धी देईजे । पसाय तया ॥१८॥९१७-१८॥** वैराग्याचा प्रसाद परमात्मा त्या भक्ताला देत असतो आणि म्हणून भगवंताने भक्ताचे आपल्यावरील ऋण पाहून त्याला ढोरे ओढण्यासाठी मदत करावी. **नरहरि सोनारा घडूं फुंकू लागे । चोखामेळ्यासंगें ढोरें ओढी ।तु.म. ११३५॥** हे काम भगवंताने करावे अशी त्यांची नामनिष्ठा होती. चोखोबांच्या पत्नीचा प्रसुतीकाळ जवळ आलेला आहे आणि त्याच वेळी आषाढी वारी सुद्धा आलेली आहे. गावातील कांही मंडळी पंढरपुरला जाण्यासाठी निघालेली आहेत. त्या दिंडीतील टाळ मृदंगाचा ध्वनी चोखोबांच्या कानावर पडला. चोखोबांची पत्नी चोखोबांना म्हणाली- माझ्यावर कठीण प्रसंग आलेला आहे. या प्रसंगाला बाळंतपण असे म्हणतात. ''एक तर बाळ, नाहीतर अंत''. म्हणून त्याला बाळंतपण म्हणतात. या प्रसंगात माझी सेवा करण्यासाठी कोण आहे? तुम्ही पंढरपुरला गेलात तर माझे काय होणार? यासाठी तुम्ही तुमच्या बहिणीला येथे घेऊन या आणि मगच पंढरपुरला जा! चोखोबा महाराज म्हटले ठिक आहे, कांही हरकत नाही. मी आत्ताच बहिणीच्या घरी जातो आणि तिला येथे घेऊन येतो आणि मगच पंढरपुरला जातो. मात्र झाले असे की, चोखोबाराय वेशीच्या बाहेर पडले आणि रामकृष्ण नामाचा गजर त्यांच्या कानावर पडला आणि चोखोबाराय सगळे विसरून गेले. आणि दिंडीबरोबर नामस्मरण करीत पंढरपुरला निघून गेले. बहिणीला निरोपही दिला नाही पण ज्याला निरोप मिळायचा होता, तो त्याला मिळाला. भगवंतांनी विचार केला आपण जर आता याच्या घरी गेलो नाही, याचे संकट दूर केले नाही तर आपल्याला लांछन लागेल! **तुका म्हणे भक्ती काजा । धावें लाजा लवलाहें ॥२७९४॥** भगवंत वीटेवरून खाली उतरले. चोखोबारायांच्या बहिणीचा वेष धारण केला आणि

चोखोबारायांच्या घराच्या दारावर थाप मारली आणि म्हणाले वहिणी दार उघडा! चोखोबारायांच्या पत्नीनें दार उघडले आणि त्याकाय म्हणतात? ''काय कृपा आहे देवाची''! देवाने तुम्हांला वेळेवर पाठविले! भगवंत म्हणतात- देवाने नाही, देवच आलेला आहे साक्षात्. अशा प्रकारे भगवंतांनी भक्ताच्या असणाऱ्या धर्मपत्नीची सेवा केली. बाळंतपण व्यवस्थित पार पडले आणि मुलाचे नांव कूर्ममेळा असे ठेवण्यात आले. बरेच दिवस झाले चोखोबाराय आता घरी येणार असे लक्षांत आल्यावर भगवंतांनी जाण्याची तयारी केली. भगवंताच्या रूपांतील चोखोबारायांची बहिण म्हणते- आमचे पती आम्हांला रागावतील आता बरेच दिवस झाले, आम्ही आता लवकरांत लवकर गेले पाहिजे. चोखोबारायांची पत्नी म्हणते, अहो लुगडे चोळी कांहीच नाही आणि तशाच कशा जाता? अहो पाऊस पडत आहे, कामाचे दिवस आहेत लुगडे चोळी ते कांही विचारणार नाहीत, मला गेले पाहिजे! चोखोबाराय येतात, भगवंत गुप्त होतात. चोखोबाराय घराजवळ येतात आणि मग त्यांना आपल्या बायकोचे बाळंतपण आठवते. अरे आपण पंढरपुरला जाण्यापूर्वी बहिणीला येथे आणून सोडणार होतो, पण आपण तसे कांहीच केले नाही. असे-कसे झाले असेल? घरात गेले पाहिले तर पत्नीचे बाळंतपण व्यवस्थित झालेले आहे. मुलगा झालेला आहे. नक्कीच भगवंताने आपल्या पत्नीचे बाळंतपण केले, हे चोखोबारायांच्या ध्यानी आले. थोड्याच दिवसांत मंगळवेढ्याला गावकूस बांधण्याचे काम चालू झाले. काम चालू असतानाच गावकुसाची भिंत पडली आणि त्याखाली बरेचसे लोक गाडले गेले, त्यामध्यें चाखोबाराय देखील होते. आज वैशाख वद्य त्रयोदशी आहे आणि हा प्रसंग घडला आजपासून ८ दिवस अगोदर म्हणजे वैशाख वद्य पंचमी या दिवशी. चोखोबारायांचा देह त्या भिंतीखाली गाडला गेला आणि भगवंतांनी आजच्या दिवशी चोखोबारायांची पुण्यतिथी साजरी केली. भिंतीखाली चोखोबाराय गाडले गेले हे समजल्यावर भगवंत अतिशय दु:खी-कष्टी झाले. नामदेवरांनी भगवंताला विचारले, भगवंता आपण फारच दु:खी दिसता काय झाले? भगवंत म्हणाले नाम्या आज माझा प्रिय असणारा भक्त गावकूसाचे काम चालू असताना त्याखाली गाडला गेला. भक्ताचे मी दर्शनही घेऊ ाकलो नाही. माझी अशी इच्छा आहे की, निदान त्याच्या अस्थींचे तरी दर्शन मला घडावे! यासाठी तुम्ही एक काम करा! माझ्या भक्ताच्या अस्थी तुम्ही येथे घेऊन या! नामदेवराय म्हणतात- देवा तेथे कांही एक व्यक्ती मरण पावलेली नाही. तेथे अनेकजन मरण पावलेले आहेत, एवढेच नाही तर सर्वांना एकत्रच भडाअग्नी दिलेला आहे, तेव्हां मी तेथे चोखोबारायांच्या अस्थी कशा काय ओळखणार? भगवंत म्हणाले- एक काम कर! तेथे जरी अनेकांच्या अस्थी असल्या तरी, ज्या अस्थी कानाला लावल्यानंतर, ज्या अस्थीमधून ''विठ्ठल-विठ्ठल'' असा नाम-घोष ऐकू येईल, त्या अस्थी माझ्या चोखोबारायांच्या आहेत हे लक्षांत घे! नामदेवराय मंगळवेढ्याला गेले. तेथे जावून त्यांनी भगवंताने सांगितल्या प्रमाणे अस्थींची पारख केली. आणि चोखोबारायांच्या अस्थी आपल्या उपरण्यांत बाधून त्या घेवून ते पंढरपुरला आले.



काय भाग्य असेल? भगवंतांनी आपला पितांबर पुढे केला. नामदेवरायांनी उपरण्यातील अस्थी भगवंताच्या पितांबरामध्यें टाकल्या तेव्हां त्या अस्थी पितांबरामध्यें उड्या मारू लागल्या. ते पाहून तेथे असलेल्या सर्व वारकऱ्यांनी पुंडलिक ''वरदे हरि विठ्ठल''! असा गजर केला. त्यानंतर रामकृष्णहरि या नावाचा जप झाला. या अस्थी कायम माझ्या डोळ्यासमोर असाव्यात म्हणून त्या अस्थी नामदेवरायांच्या पायरी समोर असलेल्या जागेत विसर्जीत करून त्यावर भगवंतांनी एक शिळा स्थापन केली. तीच चोखोबारायांची समाधी आहे. आज त्या ठिकाणी फार मोठा उत्सव झाला. आपण चोखोबारायांच्या चरित्राचा उल्लेख केला. झालेली सेवा संतसम्राट ज्ञानोबारायांच्या, संतश्रेष्ठ कान्होराज महाराजांच्या, चोखोबारायांच्या सद्‌गुरु जोग महाराजांच्या संस्थेतील सर्व गुरुवर्यांच्या, गुरुवर्य डॉ. महाराजांच्या चरणी समर्पीत करून थांबतो.

## ७. उभारिला हात । जगीं जाणविली मात ।।१।।
## देव बैसले सिंहासनीं । आल्या याचकासी पुरे धणीं ।।धृ।।
## एकाच्या कैवाडें । उगवें बहुतांचें कोडें ।।३।।
## दोहीं ठायीं तुका । नाहीं पडों देत चुका ।।४।।

श्रीमंत श्री जगद्‌गुरु तुकोबाराय या अभंगातून अलौकिक अशा प्रकारचा उपदेश करतात. या कनेरसर परिसरातील मंडळींच्या दृष्टीने आजचा हा दिवस अत्यंत महत्वाचा आहे. महत्वाचा याच्याकरीता आहे की, आज जगदंबा अर्थात् यमाई माता अति प्रसन्न आहे, अति प्रसन्न! कशा करता आई अतिप्रसन्न आहे? दुपारी लग्नाची पावती फाडली म्हणून नाही. आई अति प्रसन्न आहे अशा प्रकारचे जे मी विधान केले, ते शास्त्राला धरुन केलेले आहे. आज ज्या कारणामुळे माता अत्यंत प्रसन्न असणार आहे, ते कारण म्हणजे आज या मंडळींनीं मातेचे लेकरु आज तिच्या जवळ आणून बसविले आहे. ज्या लेकराकरता माहूरहून ती येथे आली. त्या लेकराला आज तिच्या जवळ आणून बसविले असल्यामुळे आई निश्चितच काय असणार आहे? प्रसन्न अतिप्रसन्न आहे. आम्ही दर्शनाला गेलो तेव्हा जाणवले की, आई आज खूपच प्रसन्न आहे. देवाचा एक स्वभाव आहे. काय स्वभाव आहे? अर्थात् माणसाचाही तो असतो, देवाचाही तसाच आहे. काय स्वभाव आहे? देवाला त्याची स्तुती करणाऱ्या. त्याची सेवा करणाऱ्या पेक्षाही, देवाच्या भक्ताची सेवा करणारा हा विशेष रुपाने आवडतो. देवाचा हा स्वभाव आहे की, देवाची सेवा करणाऱ्या पेक्षाही देवाच्या भक्ताची सेवा करणारा हा विशेष आवडतो. माणसाचेही तसेच आहे. तुम्ही पहा एखादी माऊली असेल, माता असेल, आई असेल आणि तिचे मूल आहे. त्याच्यावर तिचे खूप प्रेम आहे. आवडते मूल आहे आणि एखादी पाहुणी आली, त्या पाहुणीने तिच्याकरता साडी-चोळी आणली आणि तिने मुलाकरता कांहीच आणले नाही. दुसरी पाहुणी आलेली आहे तिने तिच्याकरता काहीच आणलेले नाही, पण मुलाकरता जर चांगले कपडे आणले असतील तर ती आई कोणावर जास्त प्रसन्न होईल, असे वाटते तुम्हांला? मुलाकरता जिणे कपडे आणलेत, मुलाची देखभाल करणारी, मुलावर प्रेम करणारी जी कोणी असेल, मुलाला उचलून घेतले. त्याला घेऊन इकडे-तिकडे फिरली, त्याला प्रसन्न केले तर त्या मुलाची आई त्या व्यक्तीवर विशेष रुपाने प्रसन्न होते. तसाच देव सुद्धा, त्याची सेवा करणाऱ्या पेक्षाही त्याच्या आवडत्या भक्ताची जो सेवा करतो, त्याच्यावर विशेष रुपाने प्रसन्न होतो. **तैसे पूजिता वैष्णव । सुखे संतोषतो देव ।।** वैष्णवांची पूजा केल्यावर, वैष्णवांची सेवा केल्यावर, वैष्णवांची भक्ती केल्यावर परमात्मा अत्यंत संतुष्ट होतो. भगवद्‌गीतेचा



बारावा अध्याय जर आपण पाहिला, छोटा अध्याय आहे. वीसच श्लोक आहेत. अध्यायाचे नांव आहे भक्तीयोग. या बाराव्या अध्यायामध्ये भक्ताचे वर्णन करीत असताना भगवंताने भक्त मला प्रिय आहे. भक्त मला प्रिय आहे. असे म्हटलेले आहे. **यो मद्भक्तः स मे प्रियः ।। यो मद्भक्तः स मे प्रियः ।।** पण भक्ताचा जो भक्त आहे, त्याविषयी सांगत असताना **भक्तास्तेऽतीव मे प्रियः ।।** असा शब्द वापरला आहे. माझा भक्त प्रिय आहे. आणि भक्ताचा भक्त हा अतीव प्रिय आहे. माणसं सुद्धा मुलापेक्षा नातवावर विशेष प्रेम करतात. एक उदाहरण अगदी याच परिसरातले याच पुणे जिल्ह्यातील आहे.

तुकोबारायांना ओळखत नाही असा पुणे जिल्ह्यातच काय पण जगात कोणी नसेल. त्यातल्या-त्यात पुणे जिल्ह्याला त्यांच्या बद्दल अभिमान आहे की, तुकोबारायांचा अवतार या जिल्ह्यात झालेला आहे. तुकोबारायांच्या चरित्रामध्ये तुकोबाराय साधना करीत असताना प्रामुख्याने दोन घटक आहेत. तुकोबारायांच्यावर अत्यंत प्रेम असणारी, तुकोबारायांची मनोभावाने सेवा करणारी तुकोबारायांची धर्मपत्नी जिजा-माउली, जिजाबाई आहे आणि तुकोबाराय आहेत. तुकोबाराय देवावर किती प्रेम करीत होते? तुकोबारायांनी देवाची कशी भक्ती केली? हे जगविख्यात आहे. जिजा-माउली काही देवाची भक्ती करीत नव्हत्या. देवाचे नांव तर सोडाच, पण त्या **'विठ्ठला'** किंवा **'पांडुरंगा'** ही म्हणत नव्हत्या. म्हटल्याच तर काळ्या, मुडदा, मेला! माझ्या संसाराचा याने सगळा विस्कोट केला आहे अशा प्रकारे देवाला जिजा-माउली काय द्यायच्या? शिव्या द्यायच्या! पण तुकोबारायांना जेवू घातल्या शिवाय स्वतः जेवत नव्हत्या. तुकोबारायांनी संसाराकडे पूर्णपणे दुर्लक्ष्य केलेले असताना, पाठ फिरविली असतानाही, अगदी हिमतीने कंबर कसून जिजाबाईंनी तुकोबारायांचा संसार चालवला. तुकोबाराय एक असे आहेत की, पांडुरंगाचे नामस्मरण करण्यासाठी गांव सोडून डोंगरावर जाऊन ते बसत आणि अखंड पांडुरंगरचे चिंतन करीत असत. **पांडुरंग ध्यानीं पांडुरंग मनीं । जागृती स्वप्नीं पांडुरंग ।।धृ।।३४०।।** भगवंताने दर्शन द्यावे, भगवंताचा साक्षात्कार व्हावा, भगवंताची भेट व्हावी हा उद्देश ठेवून तुकोबाराय साधना करताहेत. परमात्मा भेट देत नाही, तर परमात्म्याची प्रार्थना करतात, विनवणी करतात, भगवंताची करूणा भाकतात. **माझे चित्त कासावीस । ...भेटीलागीं पंढरीनाथा । जीवा लागली तळमळ व्यथा ।।१।। कधीं कृपा करिसी नेणें । मज दीनाचें धावणें ।।धृ।।२७४६।।** अशा प्रकारची देवाच्या भेटीची आस धरून भगवंताचे चिंतन करणारे तुकोबाराय एका बाजूला आहेत. आणि देवाचे नांव सुद्धा जी घेत नाही, रात्रंदिवस देवाच्या नावाने बोटे मोडणाऱ्या जिजाबाई, शिव्या देणाऱ्या जिजाबाई दुसऱ्या बाजूला आहेत. देवाने अगोदर भेट कोणाला दिली असेल, असे तुम्हांला वाटते? जिजाबाईला! देवांनी प्रथम भेट दिली! विशेष आहे!

तुकोबाराय भंडाऱ्या डोंगरावर पांडूरंगाची भेट व्हावी म्हणून चिंतनासाठी गेलेले आहेत.

घरचे सगळे आवरून, पोरांना जेवू घालून, जिजाबाईंनी तुकोबारायांच्या भाकरी, भाजी; स्वतःही जेवलेल्या नाहीत. तेथे डोंगरावर पाणी नसते, म्हणून पाण्याचा मोरवा टोपल्यात ठेवलेला आहे. चुंबळ केलेली आहे. ते टोपले डोक्यावर घेतलेले आहे आणि तरा,तरा,तरा त्या डोंगरावर निघालेल्या आहेत. उन्हाळ्याचे दिवस आहेत. दुपारची वेळ झालेली आहे. वरून ऊन मी म्हणत आहे. आता रस्ते झालेले आहेत. त्यावेळी काही रस्ते नव्हते. जानावरे चरण्याच्या पाऊटीने त्या डोंगर चढत आहेत. घाम आलेला आहे आणि तेवढ्यांत चपलेचा आंगठा तूटलेला आहे. आता एका चपलेचा आंगठा तुटला तर दुसरी चप्पल कोठे घालता येते? म्हणून दोन्ही चपला काढलेल्या आहेत आणि कमरेला खोवलेल्या आहेत. तशाच अनवाणी पायांनी जिजाबाई निघालेल्या आहेत. चढणीचा रस्ता आहे. अजून किती अंतर राहिलेले आहे म्हणून जिजाबाई वर पहात आहेत आणि चढ असल्यामुळे पाय रोवून टाकीत आहेत. एवढ्यात करवंदीची अशी एक वाळलेली फांदी पुढे पडलेली आहे. रोवून टाकण्यासाठी म्हणून, असा जोरात पाय टाकलेला आहे. करवंदीचा तो काटा पायांत खालून जो घुसला तो वरून बाहेर निघालेला आहे. जिजाबाई मोठ्याने आईऽऽगऽऽ म्हणून किंचाळलेल्या आहेत आणि धाड्कन् जमिनीवर पडलेल्या आहेत. जिजाबाईंना मूर्च्छा आलेली आहे. भाकरीचे टोपले बाजूला पडलेले आहे. पाण्याचा मोरवा फुटलेला आहे. थोड्या वेळाने जीजाबाईंची मूर्च्छा कमी झालेली आहे. पहातात तर पाय बंब सूजलेला आहे. बसलेले असतानाही पाय हालविण्याचे त्राण त्यांच्यात राहिलेले नाहीत. चिंता करताहेत. आता वर कसे जायचे? पायात काटा मोडला याची चिंता नाही, पण तुकोबारायांनी सकाळपासून काहीही खाल्लेले नाही, याची काळजी आहे. रडू कोसळलेले आहे. देवा काय माझ्यावर वेळ आलेली आहे? कसं होतं? आणि कसं झालं! जीजाबाईंचे ज्यावेळी लग्न झाले त्यावेळी तुकाराम महाराजांचा संसार हा अत्यंत भरभराटीला आलेला होता. आता काय करायचं? असं मनांत म्हणतात, न म्हणतात तोपर्यंत एक म्हातारा आला, काय झालयं? काटा मोडला होय. होय बाबा! माझ्या जगण्यालाच काटा मोडलाय! भगवान खाली बसलेले आहेत. महाराज! जिजाबाईंचा पाय भगवंतांनी आपल्या मांडीवर घेतलेला आहे. मेले योगी ध्यान करून करून, पण त्यांच्या स्वप्नातही भगवंत येत नाही. त्या भगवंतांनी जिजा-माउलीचा पाय आपल्या मांडीवर घेतलेला आहे आणि विचारतात- काढू काटा? जिजाबाई म्हणतात- बाबा तुला काढता येतो का काटा? तो म्हणाला माझा धंदाच आहे तो! काटा काढण्याचा! काढ बाबा, पण दुखवू नकोरे! लय दुखतोय. काळजी करू नका! ज्याच्या संकल्पानेच सृष्टी उत्पन्न होते त्याला पायातला काटा संकल्पाने काढणे काय अशक्य होते? नाटक नुसतं, फक्त जिजाबाईंना नुसती भेट द्यायची नव्हती तर जिजाबाईंचे पाय हातात घ्यायचे होते. तुकोबाराय याचे पाय धरीत होते. **तुझ्या पायी सुख सर्व आहे ।** हे तुकाराम महाराजांचे आहे आणि हा जिजा-माउलींचे पाय धरतोय! कारण- जिजाबाई सारखी भाग्यवान दुसरी कोणीही



नाही! का? तर तू माझ्या भक्ताची सेवा करतेस! परमात्म्याने काटा काढून टाकलेला आहे. पण काटा घुसल्यामुळे जिजाबाईंच्या पायाला जी सूज आलेली आहे तीही नाहीसी झालेली आहे आणि ते दुखणेही थांबलेले आहे. जिजाबाईंना आश्चर्य वाटलेले आहे. बाबा तुझ्या हातात कांही जादू आहे की काय रे! काटा तर निघालाच निघाला. सुजलेला पायही ओसरला आणि दुखणेही थांबले आहे. बाबा तू कुठला आहेस? तसं माझं काही निश्चित असं गाव नाही. बाबा नाव काय आहे तुझं? तो म्हणे ईठ्ठल! ती म्हणे ईठ्ठल? महाराज! जिजाबाईंनी दगडच उचलला आणि म्हणाली- मेल्या पहिलं का नाही सांगितलंस की, तुझ नांव ईठ्ठल आहे म्हणून, मी तुला माझ्या पायाला हातच लावू दिला नसता! भगवंतांनी सगुण रूप धारण केलेले आहे, आणि हसायला लागलेले आहेत. माझा दृष्टांत संपला.

म्हणजे आपल्या भक्ताची सेवा करणाऱ्यावर एवढा देव काय होतो? प्रसन्न होतो. आता येथेही माय लेकरांचा संबंध आहे. कान्होबाराय हे यमाई मातेचे काय आहेत? लेकरू आहेत. त्यांच्या करता त्या इतक्या लांबून येथे आलेल्या आहेत. त्या कान्होबारायांना तुम्ही येथे आणून बसविलेले आहे. म्हणून यमाईमाता काय आहेत? निश्चितच! निश्चितच!! माता अतिशय प्रसन्न आहेत.

महाराजांच्या प्राणप्रतिष्ठेचा आजचा दिवस आहे आणि या विषयी तुकोबाराय अभंगाच्या प्रथम चरणांमध्ये अलौकिक अशा प्रकारचा उपदेश करीत आहेत. **उभारिला हात । जगीं जाणविली मात।।१।। देव बैसले सिंहासनीं । आल्या याचकासी पुरे धणीं ।।धृ।।** तुकोबारायांनी हात वर केलेला आहे. एखादी गोष्ट जाहीर सांगायची असेल तर ती सांगण्याची ही पद्धत होती. आता अलिकडे आकाशवाणी आहे, दूरदर्शन आहे, पेपर आहेत त्यामुळे एखादी गोष्ट जाहीर सांगायची असेल तर फारसे अवघड राहिलेले नाही. परंतू पूर्वी अशा प्रकारची कोणतीच साधने नव्हती. त्यावेळी सर्वांना एखादी गोष्ट जाहीर सांगायची असेल तर मग गावचा जो कोतवाल आहे. रामोशी म्हणतात त्याला, त्याच्याकडे ते काम असायचे. गावात लेव्हीची साखर आली म्हणा, तहसिलदार येणार आहे म्हणा किंवा सरकारी नवीन कायदा सर्वांना सांगयचा असेल तर, चौकात जायचे, हालगी असायची डम् डम् डम् डम् अशी हालगी वाजवायची. हालगी वाजली म्हणजे लोकांच्या लक्षात यायचे की काहीतरी जाहीर सांगायचे आहे. मग सगळे लोक जमा व्हायचे. ते जमा झाल्यानंतर, तो कोतवाल मोठ्याने म्हणायचा- ऐका हो ऐकाऽऽ आणि मग जे कांही सांगायचे, ते मोठ्याने सांगितले जायचे. त्याला दवंडी पिटणे असे म्हणतात. मेघगर्जनेने सांगणे असे म्हणतात. उपदेशाचेही दोन प्रकार आहेत. एकाने एकाला एकांतामध्ये कानांत सांगायचे भगवत् स्वरूपाचे ज्ञान सांगत असताना या प्रकारे सांगितले जात असे. कोणालाही नव्हते सांगितले जात. जो योग्य अशा प्रकारचा शिष्य आहे, त्याने सेवा करून गुरुंना प्रसन्न केलेले

आहे आणि गुरुंच्या लक्षात आलेले आहे की, हा आता ज्ञानाला काय आहे? योग्य आहे, अधिकारी आहे, तर त्यालाच फक्त सांगायचे आणि तेही एकांतात नेऊन आणि पुन्हा कानांत सांगायचे. एक गुरु एक शिष्य हा रूढला साच व्यवहारु । असे बरेच लांब पर्यंत **आदिनाथ गुरु सकळ सिद्धांचा । मच्छिंद्र तयाचा मुख्य शिष्य । मच्छिंद्राने बोध गोरक्षासी केला । गोरक्ष वोळला गहिनीप्रती ।।१।।** अशी लाबपर्यंत परंपरा चालत आलेली आहे. आणि ना! सांगण्याचा दुसरा प्रकार हा. कलियुगामध्ये दुसऱ्या प्रकाराला जास्त महत्त्व आहे. तुकोबाराय म्हणतात- **मेघवृष्टीने करावा उपदेश । परी गुरुने न करावा शिष्य ।** का? तर शिष्याने केलेल्या पुण्याचा अथवा पापाचा अर्धा वाटा गुरुला भोगावा लागतो. **शिष्ये केले पाप भोगावे गुरुनें । स्त्रिने केले घेणे पुरुषासी ।।ना.म.।।** मेघवृष्टीने उपदेश म्णजे जसा मेघ कड्कडाट करून वर्षाव करतो तशा प्रकारे सर्वांना ऐकू जाईल अशा प्रकारे सांगणे म्हणजेच हात उभारून सांगणे आहे. मी हात उभारलेला आहे आणि जगी मात जाणविली आणि सर्व जगाला ही गोष्ट सांगितलेली आहे. आता संतांचे सांगणे हे उपदेश या स्वरूपाचे आहे. तुमचे-आमचे सांगणे आणि संत व शास्त्र यांचे सांगणे वेगळे आहे. उपदेशामध्ये सांगणे असते, सांगण्यात उपदेश असतोच असे नाही. नुसते सांगणे, कोणीही कोणाला सांगतो. उपदेश कोणालाही नाही करता येत. कोणीही नाही करू शकत. शाळा शिकला म्हणजे त्याला उपदेश करण्याचा अधिकार आला असे नाही. कीर्तनकार झाला म्हणजे त्याला उपदेश करण्याची योग्यता प्राप्त झाली असे नाही. उपदेश करण्याकरीता अंगी संतत्व बाणावे लागते. उपदेशाला लायक, उपदेशाला योग्य, उपदेशाचे अधिकारी संत असतात. म्हणून तुकोबारायांनी- **नाही संत चिन्हे उमटली अंगी ।** संतचिन्हे अंगी उमटली नाही, संतांची लक्षणे अंगावर उमटली नाहीत म्हणजे संत झाला नाही, संतत्व प्राप्त झालेले नाही आणि लगेच उपदेश करण्याकरीता काय झालेला आहे? प्रवृत्त झालेला आहे, अयोग्य आहे. तो उपदेश नाही. संत, गरु होण्याकरीता शास्त्रानें सांगितलेली लक्षणे त्याच्या ठिकाणी असायला पाहिजेत. लक्षणे नसतील तर तो गुरु नाही, गुरं असतात. आता तुम्ही म्हणाल मग तुम्ही उपदेश करायला उभे राहिलेले आहात, तर तुमच्या ठिकाणी संतचिन्हे उमटलेली आहेत का? तर त्याचे उत्तर असे आहे की, आम्ही उपदेश करायला उभे राहिलो नाही. मग उपदेश तर बोलायला लागलेत. मी सेवा करण्यासाठी उभा आहे. वारकरी संप्रदायामध्यें कीर्तन सांगणे, कथा सांगणे- सांगणाराचे दोन विभाग आहेत. संतांनीही कीर्तनें केली, आम्हीही कीर्तनें करतो पण संत उपदेश करण्याकरीता कीर्तनें करतात. आम्ही उपदेश करण्याकरीता नाही, सेवा करण्याकरीता कीर्तनें करतो. नवविधा भक्तीमध्ये कीर्तन ही दुसऱ्या क्रमांकाची भक्ती आहे. श्रवणं कीर्तनं... आणि ती भक्ती आहे म्हणजे साधना आहे. म्हणून सेवेकरीता घेतलेला अभंग अशा प्रकारे म्हटले जाते. आपण जर पंढरपूरला फडकऱ्यामध्यें गेलात आणि कीर्तनाचे आमंत्रण जर कोणी द्यायला आला तर



कीर्तनाचे आमंत्रण असे नाही म्हटले जात. त्याला कीर्तनाची तारीख असेही म्हटले जात नाही. पंढरपूरमध्यें वारकऱ्यामध्यें सेवेचे निमंत्रण, काय सांगतात- सेवेचे निमंत्रण दिले जाते. उभा राहाणाराही सेवेकरता उभा राहतो. अभंग घेतल्यानंतर हे म्हटले जाते की, सेवेकरीता घेतलेला अभंग. म्हणजे कीर्तनकार हा काय आहे? सेवक आहे आणि तो उपदेश करीत नसतो, तर संतांनी केलेल्या उपदेशाचा अनुवाद करीत असतो. **नव्हे हा उपदेश । तुमचे बडबडीलो शेष ।** हा उपदेश नाही असे तुकोबाराय म्हणतात, संत जे बोललेत त्याचा अनुवाद अशा प्रकारचे त्यांचे बोलणे असते. म्हणून आमचा हा उपदेश वगैरे नाही आहे. आम्ही पांडुरंगाची सेवा करतो, देवाची सेवा करतो. उपदेश करण्यासाठी संतत्व अंगी यावे लागते आणि संतत्व, संतपणा इतका सोपा नाही. जितके कीर्तन करणे सोपे आहे, तेवढा संतपणा सोपा नाही. **नाही संतपण मिळत हें हाटीं । हिंडतां कपाटीं रानीं वनीं ।।१।। नये मोल देतां धनाचिया राशी । नाहीं तें आकाशीं पाताळीं तें ।।२।। तुका म्हणे मिळे जिवाचिये सार्टी । नाहीं तरि गोष्टी सांगो नये ।।३।।८१९।।** असो तुकोबाराय संत आहेत आणि म्हणून त्यांना उपदेश करण्याचा अधिकार आहे. आता ते जो उपदेश करतात, म्हणजे त्यांचे जे सांगणे आहे, त्या सांगण्याला उपदेशत्व येण्याकरीता त्या सांगण्याच्या ठिकाणी, दोन गुण असावे लागतात. एक अज्ञात ज्ञापकत्व असावे लागते आणि सप्रयोजनत्व असावे लागते. अज्ञात ज्ञापकत्व या शब्दाचा अर्थ आहे, दुसऱ्या कशानेही ती गोष्ट न कळणे आणि ते सांगितल्या नंतरच त्याने ती कळणे म्हणजेच अज्ञात ज्ञापकत्व. तुकोबाराय उपदेश करतात, असे का म्हटले तर तुकोबारायांनी या अभंगात जे सांगितलेले आहे ते **'सांगणे'** या प्रमाणाशिवाय दुसऱ्या कशानेच कळत नाही. काय सांगितले आहे तुकोबारायांनी? **देव बैसले सिंहासनी ।** तुकोबारायांनी हे सांगितले आहे की, देव सिंहासनावर बसलेले आहेत. आता मला सांगा! देव या ठिकाणी बसलेले आहेत किंवा नाहीत हे दुसरे कशाने कळणार आहे आपल्याला? तुम्ही म्हणाल प्रत्यक्ष डोळ्यांनी दिसले ना! मी तुम्हांला विचारतो, डोळ्यांनी तुम्हांला मूर्ति दिसली का देव दिसला? मूर्ति बसविलेली दिसली का देव बसविलेला दिसला? मूर्ति बसविलेली दिसली! देव वेगळा आणि मूर्ति वेगळी. देव अनादि अनंत आहे, मूर्ति सादि सांत आहे. देवाने जगत् निर्माण केलेले आहे, मूर्तिला कारागीर निर्माण करतो. देव चेतनस्वरूप आहे. देवाचा प्रकाश घेऊन सूर्य प्रकाशित झालेला आहे. मूर्ति समोर आपल्याला लाईट लावावी लागते. पाषाणाचा विष्णु केला, पण पाषाण विष्णु नाही. मूर्तित देव असतो, मूर्ति देव नसते. मूर्ति घडविणारा छन्नीने हाणीत असतो पायावर. मूर्ति बसविण्याच्या अगोदर आणि मूर्ति बसविल्यानंतर तुम्हाला मूर्तिमध्ये काय फरक दिसतो? मग तुम्हाला मूर्ति बसलेली कळली का देव बसलेला कळला? मूर्ति बसविलेली तुम्हांला डोळ्यांनी दिसली. देव डोळ्यांनी दिसतो होय? कारण देव दिसण्याकरीता अर्जुनाला दिव्य दृष्टी द्यावी लागली भगवंताला. **न तु मां शक्यसे द्रष्टुमनेनैव**

**स्वचक्षुषा । दिव्यं ददामि ते चक्षुः पश्य मे योगमेश्वरम् ।।११।।८।। अनेन मां द्रष्टुं न शक्यः ।** तू या डोळ्यांनी मला नाही पाहू शकत, कारण देव दिव्य आहे आणि आपले डोळे सामान्य आहेत. कसे काय दिसणार? कसे काय कळणार? देव त्या मूर्तिमध्ये आहे किंवा नाही कळतो का आपल्याला? काय डोंबलं कळतं आपल्याला?... देव दिसत नाही कारण देव दिव्य आहे. अलौकिक आहे. सर्वसामान्य चर्मचक्षू त्याला पाहू शकत नाहीत. खरे तर अधिष्ठाण स्वरूप परमात्मा आहे. त्याला रूपच नाही आहे, तर डोळ्यांना काय दिसणार आहे? तो अस्पर्श असल्याने त्वगेंद्रियाने त्याचे ज्ञान होत नाही. गंध नसल्याने घ्राणेंद्रियाने तो कळत नाही. अर्थात् ज्ञानेंद्रियांनी देवाचे ज्ञान होत नाही. तो इंद्रियातीत अशा प्रकारचा आहे. प्रत्यक्ष प्रमाणाने देव कळत नाही. अनुमानानेही कळत नाही, कारण अनुमानाकरता काहीतरी प्रत्यक्ष व्हावे लागते. देव प्रत्यक्ष होतच नाही. असंग आहे तो. काय अनुमान करणार तुम्ही? उपमान, अर्थापत्ती जेवढी म्हणून प्रमाणे आहेत, कळण्याची साधने आहेत, तेवढी सगळीच देवापुढे लंगडी पडतात. देव कळालाच तर फक्त देवाचा साक्षात्कार ज्यांना झालेला आहे, त्या संतांनी सांगितला तर त्यांच्या शब्दामुळेच कळतो. शब्दप्रमाणा वाचून अन्य प्रमाणांना अज्ञात असणारा परमात्मा त्या परमात्म्याचे ज्ञान जे संत करून देतात, त्याला उपदेश असे म्हटले जाते. आता ठिक आहे. बऱ्याच गोष्टी आपल्याला कळत नाहीत, सांगितल्या नंतरच कळतात. काही गोष्टी नाही कळल्यातरी आपले काही नुकसान होत नाही आणि कळल्या तर काही फायदा होत नाही. काही गोष्टी आपल्याला कळत नाहीत. उदाहरणार्थ गाढवाच्या अंगावर किती केस आहेत? तुम्हांला सांगता येईल? समजा एखाद्याने सांगितले ९कोटी ४७लक्ष २हजार ५२० कळलं आपल्याला, पण काय फायदा त्याचा? तेव्हां उपदेश त्याला म्हणतात की, जे अज्ञाताचे ज्ञान करून देणारे आहे आणि त्याच्या ठिकाणी सप्रयोजनत्व आहे. म्हणजे ते कळल्यानंतर कळणाराला काय आहे? फल आहे फल! अशा दोन गोष्टी आहेत महाराज. म्हणून संताकडून दोन गोष्टी सांगितल्या जातात. त्या शब्दांना उपदेश म्हटला जातो.

या अभंगात तुकोबाराय मेघवृष्टीने उपदेश करतात. **उभारीला हात । जगी जाणवली मात ।।** काय उपदेश करतात? **देव बैसले सिंहासनी ।** देव सिंहासनावर बसलेले आहेत. आता तुम्ही परत शंका कराल की, बाबा! तुम्ही आतापर्यंत सांगितले ते ठिक आहे, पण येथे मात्र तुम्ही चुकले! काय चुकले? अभंग घ्यायला चुकले! कसा काय अभंग घ्यायला चुकलो? अहो! येथे संताला बसवलेय सिंहासनावर आणि तुम्ही अभंग कोणता घेतला? देव बैसले सिंहासनी । तुकोबाराय देव बसलेले आहेत असे सांगतात. देवाला बसविलेले आहे सिंहासनावर. कोणाला बसवलेय? संताला बसवलेले आहे. नाही! देव बसलेले आहेत. अहो संताला बसवलेले आहे- बरोबर आहे. कारण- **देव ते संत देव ते संत । निमित्त त्या प्रतिमा ।। तुका म्हणे सांगो**



**किती । त्याची भगवंताच्या मूर्ति ।** संत हे साक्षात देव असतात. भगवंताची या भूतलावर दोन अशा प्रकारची रूपे आहेत. एक मूर्तिचे स्वरूप आहे आणि दुसरे संतांचे स्वरूप आहे. मूर्ति ही जड स्वरूपामध्ये असते, संत हे साक्षात चेतन असतात. आणि म्हणून संत आणि देव हे दोन नाहीत. **धन्य पुण्यरूप कैसा झाला संसार । देव आणि भक्त दुजा नाही विचार ।।धृ।।** संत साक्षात् चालते बोलते देव स्वरूप असतात. संत देव असतात. स्वरूपानेही ते देव आहेत, स्वरूपत्व अवच्छेदकानेही संत देव आहेत. आणि कार्यत्व अवच्छेदकत्वानेही संत देव आहेत. स्वरूपत्व अवच्छेदकत्वाने याचा अर्थ काय? देवाचे जे स्वरूप आहे तेच संताचेही स्वरूप आहे. संतांचे जे स्वरूप आहे तेच देवाचेही स्वरूप आहे. देवाचे काय स्वरूप आहे, ते सांगतो- सच्चिदानंद ब्रह्म. ब्रह्म हे सच्चिदानंद स्वरूप आहे. आनंद, अद्वय, नित्य, निरामय हे देवाचे स्वरूप आहे. आनंदस्वरूप देव आहे. आनंद ब्रह्म इति व्याजानात्। असे श्रुतीमध्ये म्हटलेले आहे. मला आश्चर्य वाटते देव न मानणाराचे. कारण देव म्हणजे काय आहे? आनंद आणि हे म्हणतात- देव मानत नाही. म्हणजे काय मानत नाही? आनंद मानत नाही. मग कशाला झक मारतो संसारामध्ये? तुला जर आनंदच मान्य नाही, तर तू जीवनामध्यें काय कमावतोस? कशा करता जीवन जगतोस? कशा करता मर-मर, आनंदाकरताच आणि आनंद हे काय आहे? देवाचे स्वरूप आहे. म्हणजे आनंदासाठी जीवन जगतोय आणि देव म्हणजे आनंद, तोच मानत नाही. ज्याने देव मानलेला आहे, त्याने देवाचे काय स्वरूप मानलेले आहे? ते समजून तरी घ्यायला पाहिजे ना! देव आम्ही मानत नाही अशा प्रकारचे बोलण्या अगोदर ज्याने देव मानलेला आहे, त्याने देवाचे काय स्वरूप मानलेले आहे, देव म्हणजे नेमके काय आहे? देव हा शब्द आहे, त्या शब्दाचा काय अर्थ आहे? जसा स्टॅन्ड हा शब्द आहे, ही वस्तू त्याचा अर्थ आहे. माईक हा शब्द आहे, ही वस्तू त्याचा अर्थ आहे. मृदंग हा शब्द आहे, ती वस्तू त्याचा अर्थ आहे. तसा देव हा शब्द आहे. त्याचा अर्थ काय मानलेला आहे? ज्याने हा शब्द वापरला त्याने त्याचा अर्थ काय मानलेला आहे? आम्ही देव मानीत नाही. देवापासूनच उत्पत्ती आहे. देवापासूनच उत्पत्ती स्थिती आहे. देवाच्या प्राप्तीकरीताच सगळ्यांचे प्रयत्न आहेत. त्याला देव म्हणत नसतील, दुसरे कांहीतरी नांव देत असतील. नांवे भिन्न असतील, अर्थ नाही भिन्न! अर्थ तोच आहे. तेव्हा आनंद हे देवाचे स्वरूप आहे. तो आनंद नित्य आहे, सत्य आहे आणि तो आनंद प्रकाशरूप आहे. अर्थात् तो आनंद सच्चिदानंद आहे आणि हेच देवाचे स्वरूप आहे आणि संतही त्यांनाच म्हटले जाते. त्याच व्यक्ती संतत्वाला प्राप्त होत असतात, ज्यावेळी त्या स्वरूपाने सच्चिदानंद स्वरूप होतात. तुकोबाराय देव का? तर तुकोबाराय सच्चिदानंद स्वरूप आहेत. रामेश्वर भट काय म्हणतात- **आरती तुकारामा । स्वामी सद्गुरु धामा । सच्चिदानंद मूर्ति । पाय दाखवी आम्हां ।।धृ।। आरती तुकारामा ।** रामेश्वर शास्त्री सांगतात. ते तुकोबारायांची आरती करतात. कोण आहेत तुकोबाराय? स्वामी, सद्गुरु, धामा,

आणि सच्चिदानंद मूर्ति. सच्चिदानंद स्वरूप आहेत तुकोबाराय. पांडुरंगही सच्चिदानंद स्वरूप आहे. तुकोबारायही सच्चिदानंद स्वरूप आहे. अर्थात् ज्ञानोबारयही सच्चिदानंद स्वरूप आहे. जेवढे जेवढे म्हणून संत आहेत ते सर्वच सच्चिदानंद स्वरूप आहेत. म्हणजे त्यांनी आपल्या सच्चिदानंदत्वाला जाणलेले आहे, ओळखलेले आहे. देव सच्चिदानंद स्वरूप आहे आणि जो सच्चिदानंद स्वरूप आहे, तो देव आहे. म्हणून संत स्वरूपाने काय आहेत? देव आहेत. कान्होबारायही कोण आहेत? सच्चिदानंद आहेत. स्वरूपाने संत देव आहेत. दोघांचे कार्यही एकच आहे. देव धर्माची संस्थापना करण्याकरीता, भक्ताचे पालन करण्याकरीता, दुष्टांचा नाश करण्याकरीता अवतीर्ण होतो. **परित्राणाय साधूनां विनाशाय च दुष्कृताम् । धर्मसंस्थापनार्थाय सम्भवामि युगे युगे ।।४।।८।।** म्हणजे संतही दुष्टांचा नाश करण्याकरीताच अवतीर्ण होतात. म्हणजे संत दुष्टांना मारतात काय? संतही दुष्टांना मारतात, फक्त ते तुमच्या लक्षात येत नाही, त्याला आम्ही काय करणार? देवाचे मारणे लक्षात येते. संतांचे मारणे लक्षात येत नाही. तुम्ही मला सांगा- दुष्टांचे असे एखादे गांव आहे का? की, त्या गांवात जो जन्माला येईल तो दुष्ट. असे आहे का? नाही! दुष्टांची अशी एखादी जात आहे का? त्या जातीत जन्माला आला तो दुष्ट. नाही! मग दुष्ट कोणी नाही का? आहेत! याचा अर्थ सगळ्या गांवात, दुष्ट आहेत आणि सगळ्या जातीमध्ये दुष्ट आहेत. माणसाला दुष्ट कधी म्हटले जाते? वाईट अशा प्रकारची त्याने कर्मे केल्यानंतर त्याला काय म्हटले जाते? दुष्ट म्हटले जाते! वाईट कर्मे करणाराला दुष्ट म्हणतात. वाईट कर्मे मनुष्य का करतो? त्याच्या मनांत वाईट विचार येतात आणि मग त्या विचाराने प्रेरित होऊन तो काय करतो? वाईट कर्मे करतो. संत काय करतात त्यांचे वाईट विचार? त्यांचे वाईट विचार नष्ट करतात. मनुष्य दुष्ट कशामुळे होतो? वाईट विचारामुळे होतो. संत काय करतात? वाईट विचार नष्ट करतात. आता वाईट विचार नष्ट झाले आणि फक्त चांगले विचार राहिले, तर आता तो दुष्ट राहिला का? तो सुधारला. वाल्ह्याचा वाल्मिकी झाला. वाल्ह्याला मारला नाही नारदांनी. वाल्ह्याचा वाल्मिकी बनविले म्हणजे वाल्ह्याला मारूनच वाल्मिकी केलेला आहे. आता देवाचे आणि संतांचे कार्य एक आहे. देवाचे आणि संतांचे शरीर एक आहे. म्हणून दोघेही एकच आहेत. दोघांचेही नाव घेतले तर पाप जाते. देवाचे नाव घेतले तर पुण्य होते. **हरि मुखे म्हणा । हरि मुखे म्हणा । पुण्याची गणना कोण करी ।।१।। हरि उच्चारणी अनंत पाप राशी । जातील लयाशी क्षणमात्रे ।।२।।** संतांची नावे घेतली तर पुण्य होते. **पुण्यवंत व्हावे घेता सज्जनांची नावे ।** सज्जनांची नावे घेता पुण्यवंत व्हावे. म्हणजे संतांचे नाव घेतले तरी पुण्य होते. **तुका म्हणे पापे जाती संतांचिया जपे ।** देवाचे ध्यान केल्यानंतर जे फल आहे, तेच फल संतांचे ध्यान केल्यानेही होते. किंबहुना देवापेक्षाही संतांची सेवा केली तर काकणभर जास्त अशा प्रकारचे फल मिळते. म्हणून फलतः संत देव आहेत. कार्यत: संत देव आहेत आणि स्वरूपतःही संत देव आहेत. म्हणून तुकोबाराय म्हणतात-



**देव बैसले सिंहासनी ।** आता फल काय आहे? **आल्या याचकासी पुरे धर्णी ।।** ते काय आहेत समर्थ आहेत. कान्हो पाठकांचा तर हा विशेष आहे की, कान्होपाठक हे पारमार्थिक ऐश्वर्यवानही होते आणि व्यवहारिक ऐश्वर्यवानही होते. ब्रह्मज्ञान हे पारमार्थिक ऐश्वर्य आहे आणि रिद्धी-सिद्धी हे व्यवहारिक ऐश्वर्य आहे. त्यांच्या ठिकाणी रिद्धी-सिद्धी होत्या. त्यांचे चरित्र फार नाही, पण जेवढे ऐकायला मिळाले त्यावरून त्यांनी आडात टाकेली पोरं त्यांनी आपल्या सामर्थ्याने परत वर काढली. पोरं वर काढली, आपल्याला काडी नाही वर निघत. आमच्या आश्रमामध्ये दगड फोडायला पहार घेतली ती खाली विहिरीत पडली ती तशीच आहे. हे रिद्धी-सिद्धींचे सामर्थ्य आहे. आणि काशीला, ब्रह्मज्ञान प्राप्त व्हावे म्हणून अनुष्ठान करणाऱ्या साधकाला काशी-विश्वेश्वरानें काशीहून इकडे केंदूरला कान्होपाठकांकडे पाठवावे हे त्यांचे काय आहे? पारमार्थिक ऐश्वर्य आहे. अशा दोनही ऐश्वर्यांनी संपन्न असणारे कान्होबा महाराज हे बहुतेक चांगले कीर्तनकार होते. कारण ज्ञानोबारायांच्या समाधी सोहळ्याचे कीर्तन त्यांनी केले असे म्हणतात. असे हे पूर्ण संतत्वाला प्राप्त झालेले आणि म्हणून देव असलेले कान्होबाराय या ठिकाणी सिंहासनावर आरूढ झालेले आहेत. संत उदार असतात. आपण याचक होऊन त्यांच्याकडे गेले पाहिजे. आपण याचक होऊन त्यांच्याकडे गेलो आणि याचना केली तर त्या याचना करणाराची इच्छा ते पूर्ण करतात. **संत सज्जनी मांडली दुकाने । जे जया पाहिजे ते आहे रे । भुक्तीमुक्ती फुकाचसाठी । कोणी न पहाती तयाकडे रे ।। एका जनार्दनी संत पूर्ण करती मनोरथ ।, देव बैसले सिंहासनी । आल्या याचका पूरे धनी ।।१।।** येथे कोणी आणले त्यांना? ते अभंगाचे तिसरे चरण-

एकाच्या कैवाडे विशिष्ठ लोकांच्या आग्रहाखातर ते जरी आले असले तरी काम मात्र ते सर्वांचे करतात. बहुतांचे कोडे उगविती. पुष्कळांची संकटे पुष्कळांची कोडी ते उगवितात असे त्यांचे सामर्थ्य आहे. गंगा भगीरथा करता जरी आलेली असली तरी सर्व जगाची पापे घालविते. पाऊस चातकाकरता येत असला तरी सर्व जगाची तहान भागवितो.तसे संत कोणासाठीही आलेले असले तरी सर्वांची कामे करतात. म्हणून ज्यांना ज्या अडचणी आहेत ज्यांची जी कोडी आहेत की जी कोडी संसारात उलगडत नाहीत त्यांनी तेथे जावे, पदर पसरावा आणि त्यांच्याकडून आपली कोडी काय करावित? उलगडून घ्यावीत. **एकाच्या कैवाडें । उगवें बहुतांचें कोडें ।।३।। देव बैसले सिंहासनी ।** अशा प्रकारे तुकाराम महाराज म्हणतात की, हे कार्य आम्हाला करावे लागते, संतांना!, देवाला लोकाकडे आणावे लागते, आणि लोकांनाही देवाकडे न्यावे लागते आणि ही मध्यस्थाची भूमिका बजावत असताना ते कोणतीही चूक होऊ देत नाहीत. **दोहीं ठाई तुका । नाहीं पडों देत चुका ।।४।।** विठोबा रखुमाई । जय जय विठोबा रखुमाई ।

तुका दोहीं ठाई चुका पडो देत नाही. तुकोबाराय म्हणतात की, मी दोन्ही ठिकाणी चूक होऊ देत नाही. देवाच्या बाबतीतही आणि लोकांच्या बाबतीतही. काय आहे? तसे पाहिले तर

देवाला काही लोकांची गरज नाही. लोकांच्या वाचून त्याचे काही अडलेले नाही. त्यामुळे लोकांनी आपली भक्ती करावी अशी त्याला अपेक्षा नाही. त्याला काही घेणे नाही. त्याचे काही खेटर अडलेले नाही, आपल्या वाचून. तडफडा म्हणतो तिकडेच, तुला नाही यायचं माझ्याकडे  तर नको येवू. ज्यावेळी तुझा इथला काळ संपेल तेव्हा तू जे कर्म केलेले आहे, त्याचे फळ देण्याकरीता मात्र मग अशी लावूनच ठेवलेली आहे त्याने. म्हणजे देवाला लोकांची गरज नाही. आणि तसे पाहिले तर लोकांनाही काही देवाचे पडलेले नाही. महाराज! लोकही संसारामध्ये मस्त आहेत. रडतील, बोंबलतील, मरतील तरी पण देवाकडे जाणार नाहीत. म्हणजे लोक संसारात मस्त आहेत. आणि तो त्याच्या स्वरूपामध्ये मस्त आहे. परंतु संतांना कसेतरी वाटते. त्यांना वाटते यांना मानव देह मिळालेला आहे. मानव देहाचे वर्णन शास्त्रामध्यें असे केलेले आहे की, स्वर्गातील देह ज्यांना मिळालेले आहेत, त्यांच्यापेक्षा मानव देह मिळालेले भाग्यवान आहेत. कारण स्वर्गातले देह स्वरूपाने श्रेष्ठ असले तरी स्वर्गातील देहामध्यें क्रांती करता येत नाही. मानव देहामध्ये क्रांती करता येते. जीव दशेतून त्याला शिव दशेमध्ये जाता येते. **देवची होईन म्हणती ते होती ।** असे शरीर यांना मिळालेले आहे. आणि नुसते विषय भोगून या शरीराचे आयुष्य हे नष्ट करू लागलेले आहेत. हे पाहून संतांना दुःख होते. त्यांना वाटते प्रत्येक माणसाने साधना करावी आणि देव व्हावे. मात्र लोकांना वाटते आपण जनावर व्हावे. लोकांची जी कृती आहे, लोकांचे तोंड देव होण्याकडे नाही तर पशू होण्याकडे आहे. एकाला विचारले- का रे उभ्या-उभ्या खातोस? तो म्हणाला कुत्रा नाही का खात! म्हणजे माणसे कुत्र्याशी स्पर्धा करू लागलेली आहेत, डुकराशी स्पर्धा करायला आवडते, गाढवाशी स्पर्धा करायला आवडते. अशी लोकांची अवस्था आहे. पण संतांना हे पाहून दुःख होते. म्हणून काहीतरी करून यांनी दुःखाचा नाश करून मुक्त व्हावे, त्यासाठी त्यांनी साधना करावी म्हणून उपदेश करून त्यांना देवाकडे आणतात आणि देवालाही त्याच्या योग निद्रेतून जागे करून, तुम्ही कोठेही रहा, परंतु जे तुमची भक्ती करतात, त्यांचा तुम्ही उद्धार करा! असे देवालाही जागवतात आणि लोकांनाही जागवतात.दोघांनाही जागविण्याचे काम संत करतात. म्हणून काकड्याच्या अभंगामध्ये नामदेव रायांनी अभंग केलेले आहेत त्यामध्ये देवालाही उठवलेले आहे. **उठा पांडुरंगा प्रभात समयो पातला । वैष्णवांचा मेळा गरूडपारी दाटला ।।१।।** आणि लोकांनाही म्हणतात- अरे देव उठले आणि तुम्ही खुशाल अजून झोपलेलेच आहात. **उठा उठा साधुसंत साधा आपुले हित । जाईल हा नरदेह मग कैचा भगवंत ।।धृ।।** असे लोकांच्या बाबतीत आणि देवाच्या बाबतीत. दोन्ही कडेही तुकोबाराय म्हणतात आम्ही चूक होऊ देत नाही. लोकांना देवाची सेवा करायला लावतो आणि देवाची सेवा करणाऱ्या लोकांचा देवाला उद्धार करायला लावतो. **दोहीं ठायीं तुका । नाहीं पडों देत चुका ।।४।। देव बैसले सिंहासनीं । आल्या याचकासी पुरे धणीं ।।धृ।।** ज्ञानेश्वर माऊली गुरु ज्ञानराज



।।श्री।।

संतश्रेष्ठ कान्हो पाठक

माझे वडील कै. ह.भ.प. श्री सहजानंद स्वामी उर्फ (गणपतराव लक्ष्मणराव चौधरी, पाटील) हे लहानपणी त्यांच्या आजोळी शिक्षणासाठी केंदुर मध्ये होते. जुन्या आठवणी निघाल्या की, ते केंदुर-पाबळ विषयी भरभरून बोलायचे! आणि त्यातही मुख्य विषय असायचा तो संतश्रेष्ठ कान्हो पाठक यांचाच!

इ.सनाच्या बाराव्या शतकांतील म्हणजेच संत सम्राट ज्ञानेश्वर माउलींच्या समकालीन हा एक थोर शिवभक्त महात्मा होता. कुटुंबवत्सल असणाऱ्या श्री कान्हो-पाठक यांची कीर्ति काशी-वाराणशी पर्यंत पोहचली होती. आणि म्हणूनच काशीच्या एका विद्वानानें त्यांना पहाण्यासाठी व त्यांची सत्व परीक्षा घेण्यासाठी उत्तर प्रदेशातून थेट महाराष्ट्रातील केंदुर हे गांव गाठले होते.

कान्हो-पाठक त्यावेळी आपल्या प्रशस्त वाड्यातील विहिरीजवळ नातवंडाला कडेवर घेऊन खेळवत होते. चौकशी करीत जेव्हां हा विप्र त्यांच्या वाड्या-जवळ पोहोचला तेव्हां तर त्याला आश्चर्याचा धक्काच बसला. विरक्त, ज्ञानी, जीवनमुक्त अशी ज्यांची ख्याती ऐकली होती; ते तर मायाजाळात गुंतलेले (नातवंडाला खेळवत असलेले) एक सामान्य संसारी जीव वाटले.

कान्हो पाठकांनी त्या विप्राला पहाताच त्यांचे स्वागत केले व आपण कोण? कोठून आलात? वगैरे चौकशी केली. विप्राची अवस्था थोडीशी संभ्रमित झाली आणि त्यानें कान्हो-पाठकांना विचारले की, आपली कीर्ति ऐकून आम्ही खास काशीहून येथे आलो; पण पहातो तो आपण पूर्ण संसारातच रमलेले आम्हाला दिसताहात!

वरलिया रंगाला भुललेल्या विप्राची भावना कान्हो-पाठकांच्या लक्षात आली आणि त्यांनी क्षणाचाही विलंब न करता आपल्या कडेवरील मूलाला जवळच्या आडात टाकून दिले. विप्र तर आचंबितच झाला. तेव्हां कान्हो-पाठक म्हणाले-'महाराज, आता मी मायातीत झालो आहे; तेव्हां  आपण स्नान वगैरे आटोपून भोजनास सिद्ध व्हावे.

विप्राची अवस्था आता मात्र केविलवाणी झाली... काय करावे हे त्यांना कळेना.. संत पहावयास येथे आलो आणि हा भलताच अनवस्था प्रसंग आपण अंगावर ओढवून घेतला... जेवावे तरी पंचाईत आणि न जेवता निघून जावे तरी पंचाईत, अशी त्यांची अवस्था झाली... आपण त्यांची परीक्षा घ्यायला गोलो आणि नापास होण्याची वेळ मात्र आपल्यावरच आली...

सारासार विचार करून विप्राने स्नान करून पात्रावर बसण्याचे ठरविले... आणि पात्रावर बसल्यानंतर विप्र कान्हो-पाठकांना म्हणाले- आपण जर लेकरास मारले नसते तर मी प्रसन्न चित्तानें तुमच्याकडे जेवलो असतो; परंतु तुम्ही लहान बालकाची माझ्या समक्ष हत्या केलेली

असल्याने मी अन्नाचा घासही गिळू शकणार नाही.

विप्राची अडचण महाराजांच्या लक्षात आल्याबरोबर त्यांनी मुलाला हाक मारली व त्याचक्षणी ते बालक दुडूदुडू धावत आले आणि पंक्तिमध्ये सामील झाले, ते पाहून विप्रास परम संतोष झाला...

...राजा श्रीयाळ याची जशी भगवंताने परीक्षा घेतली होती तशीच येथे संतश्रेष्ठ कान्होपाठक यांची परीक्षा परीक्षा घेण्यात आली व आंतरबाह्य निर्मळ असणारे महाराज हे भगवंताच्या कृपेस पात्र झाले. महाराजांच्या जीवनांत असे अनेक-ज्याला आपण चमत्कार समजतो असे प्रसंग घडले, तथापि आमच्या मते त्यांच्या जीवनांतील अत्यंत भाग्याचा क्षण म्हणजे माउलींच्या समाधी सोहळ्यांत त्यांचे झालेले कीर्तन हाच होय!

संतश्रेष्ठ कान्हो-पाठकांच्या जीवनातील कळसाध्याय म्हणजे-महाविष्णुचा अवतार असणाऱ्या माउली ज्ञानोबाराय यांच्या समाधी सोहळ्यांत त्रयोदशीला त्यांचे झालेले उत्कट कीर्तन हाच होय!

खुद्द श्री निवृत्तीनाथ व विठ्ठलाचे लाडके भक्त असणारे श्री नामदेवराय यांनीच त्यांना समाधी सोहळ्याचे (त्रयोदशीचे क्षीरापतीचे) कीर्तन करण्याची विशेष विनंती केली हा खरोखरच भाग्याचा क्षण होता...

संसारात राहून अलिप्त कसे राहायचे-जळी पद्मपत्र जैसे ह्याचा आदर्श वस्तुपाठ म्हणजेच श्री कान्हो-पाठक यांचे जीवन-चरित्र होय!

(आपल्या अलौकिक जीवननिष्ठेने भगवंताच्या व सकल संतांच्या कृपेस पात्र झालेले ह.भ.प. श्रीकानहोपाठक महाराज यांच्या विषयी सखोल व सविस्तर असे संशोधन होणे खरं तर अत्यंत आवश्यक आहे; परंतु तसे ते झालेले नाही; ही वस्तुस्थिती आहे. या बाबतीत मला श्री हौशाराम आनंदराव पऱ्हाड(सर) यांचे विशेष आभार मानले पाहिजेत की, त्यांनी अनेक संताच्या साहित्यातील त्यांचे विषयीचे संदर्भ एकत्र गोळा करून त्यांचे संकलन जिज्ञासु वाचकांच्यासाठी उपलब्ध करून दिले आहेत. सुदैवाने तेही महाराजांच्याच गावचे म्हणजे श्रीक्षेत्र केंदुर या गावचेच सुपुत्र आहेत; हाही एक योगायोग आहे!

मी श्री पऱ्हाड सरंच्या उपक्रमाचे मन:पुर्वक स्वागत करतो व त्यांचे मनापासून अभिनंदन करतो.)

ज्ञा. ग. चौधरी, संपादक, 'हास्यरंग'

## कान्होराज महाराजांच्या आरत्या



१) आरती कान्हुपाठका । जगद्गुरु जगद्व्यापका ।
भावे तुज ओवाळीन । स्वामी आनंद दायका ।। आरती कान्हुपाठका ।।धृ।।
कलीमध्यें जड प्राणी । त्याच्या उद्धारा लागोनी ।
भागीरथी आणली हो । नीज शिखे पिळोनी ।।१।।
तुझा अगाध महिमा । केली अमावस्येची पौर्णिमा ।
काशीमध्ये जन पाहती । झाली बोलायची सीमा ।।२।।
केंदूर हे ग्राम तुझे स्थान । तेथे येती भक्तजन ।
अगाध तुझे चरण । वंदी दास मधुसूदन ।।

२) जयदेवा कान्हुराजा । तीव्र वैराग्य रूपा ।
देखती संत मंडळी । वेध लागला तुझा ।।धृ.।।
नसे त्याग कलीयुगी । तो दाखविण्यासाठी ।
आलासी मानव रूपे । केंदूर ग्रामीच्या भूमी ।।१।।
प्रगट होई भागीरथी । केली पावन भूमी ।
कुष्ठातूनी मुक्त करी । अनुभव आला जयदेवा ।।२।।
तूज काका म्हणे ज्ञानदेव । तीन स्थळी स्थापिले बाण ।
सिद्धी होई तुझी दासी । सर्व देव तुज पाशी ।।३।।
करुनिया पौर्णिमेसी । दावियेली काशीवासी ।
नामस्मरणे दिननिशी । वारिसी मुक्त भावा ।।४।।
राजा विनवि-तसे तुला । भक्ति वैराग्य देई मला ।
अहंभावादि घेऊनि जाया । पूर्ण शांती मज देई ।।५।।

३) जयदेव जयदेव जय कान्हूराजा । आरती ओवाळू तुज कीर्ति-ध्वजा ।।धृ।।
ईश अंश हा विश्वव्यापक । दिसे नजरेस सारे भ्रामक ।
नाम रूपाने गमे कौतुक । सत्य रूप तू सत्य जाणता ।।१।।
सत्पात्र कुळी जन्म तो झाला । शुद्ध प्रेमात प्रतिपाळ केला ।
कस लाविण्या विघ्नांचा मेळा । तेणे बाणली विरक्ती चित्ता ।।२।।
साक्षात शंकर प्रसन्न झाले । सद्गुरु कृपे अनुग्रही केले ।
माया पाश ते तुटोनी गेले । जन्म कृतार्थ अनुभव येता ।।३।।

### भक्तिपर पद

आनन्द-स्वानन्द तू सौख्य सिंधू ।धृ।।

निराकार निर्गुण पूर्ण । निज भक्त प्रेमा होसी सगुण । सत्-चित् आनन्दा तू दीनबन्धू ।।१।।
देहातितारे तू विश्वव्यापी । विकल्प रहिता तू सर्वरूपी । हे दिव्य तेजा तुज भक्त छंन्दू ।।२।।
नाना रूपांनी नटलास येथ । मणि सूत्र माला दिसतेही जेथ । चरा-चरी तू आनन्द कंन्दू ।।३।।
अद्वैत ध्यानांत ॐकार नाथ । निजध्येय साध्या ती एक पाथ । सद्भावा सुमने तुज सर्व वन्दू ।।४।।

डॉ. सौ. सीता कुलकर्णी M.A.Ph.D..
के. विनया

**आरती भागीरथीची (केंदूर)**

**आरती माय गंगे । चिन्मय रूप तरंगे ।।**
**तुझिया दर्शन मात्रे । पाप तापही भंगे ।।धृ।।**
**सद्गुरु दिना नाथ । कान्होपांक समर्थ ।**
**तयाचे जटे प्रगटूनी । जन करीसी सनाथ ।।१।।**
**पुण्यभूमी केंदुरात । ओघ वेहे सदोदित ।**
**तारावया जडमूढा । पातली मृत्युलोकात ।।२।।**
**पंथ तुझा अखंडीत । धरिती ते भाग्यवंत ।**
**देशील तया परमपद । सुखे नांदती जगात ।।३।।**
**सत्रावी जीवन कला । विनवी चार वाणी सकळा ।**
**हरिहर येथे आला । प्राप्त होय सुखसोहळा ।।४।।**

**आरती रेणुका मातेची**

**जयदेवी आदिरूपे । परशुरामाचे माते ।**
**आरती ओवाळितो । महामाया रेणुके ।।धृ।।**
**तुझे रूप काय वाणू । जैसा शोभतो भानू ।।**
**बैसती सिंहासनी । अंबे तू कामधेनु ।।**
**इच्छिले फळ देसी । तुझे गुण काय वाणू ।।१।।**
**नवरीचे नवरात्र । माझ्या अंबेचे व्रत ।।**
**यात्रेकरु बहु येती । महोत्सव थोर होती ।।**
**रेणुका नाम तुझे । भक्ता तरिसी समाधान ।।२।।**
**मातापुर आदिमूळ । तुझे तुळजापूर ।।**
**बैसली सप्तशृंगी । दैत्य मारिले थोर ।।**
**बालक गंगाधर विनवी । जोडूनी दोन्ही कर ।।३।।**
**(पाठक घराण्यातील जुन्या बाडावरून)**



महाराजांचा मासिक पुण्यतिथी उत्सव नियोजन

| अ. नं. | महिना | भजनी मंडळ | वस्तीचे नांव |
|---|---|---|---|
| १ | चैत्र | श्रीनारोबा भजनी मंडळ | ताथवडेवाडी |
| २ | वैशाख | श्रीराम भजनी मंडळ | पऱ्हाडमळा, भोसुरेस्थळ |
| ३ | जेष्ठ | श्रीजयमल्हार मंडळ सुक्रेवाडी | सुक्रेवाडी |
| ४ | आषाढ | श्रीसावतामाळी भजनी मंडळ | तवलीबेंद, माळीमळा |
| ५ | श्रावण | श्रीमहादेववाडी भक्त मंडळ | महादेववाडी |
| ६ | भाद्रपद | श्रीशेळकेश्वर भजनी ङ्कंडळ | शिळकवाडी |
| ७ | अश्विन | शिवशंभो भजनी मंडळ, महादेववाडी | महादेववाडी |
| ८ | कार्तिक | भैरवनाथ भजनी मंडळ पऱ्हाडवाडी | पऱ्हाडवाडी |
| ९ | मार्गशिर्ष | यात्रा कमिटी केंदूर | यात्रा कमिटी केंदूर |
| १० | पौष | गावठाण केंदूर | गावठाण केंदूर |
| ११ | माघ | श्रीकानिफनाथ भजनी मंडळ जांभळा व थिटेमळा | जांभळा व थिटेमळा |
| १२ | फाल्गुन | श्रीसायंबा मंडळ थिटेवाडी | थिटेवाडी |
| १३ | अधिकमास | | |